# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभा इतिवृत्त

**दिनांक ०३-१२-१९९९ ते १३-०३-२०००**

## रजिष्टर क्र. ११

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ३-१२-९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. शुक्रवार दि. ३-१२-९९ रोजी दुपारी ४.०० वाजता सभापती श्री. नरसिंग ढगे यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मलिक अंबर स्थायी समिती सभागृहात "वदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेस अधिकारी वर्गासह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | स.सदस्य |
| २) | स.स.श्री. बचाटे राजकुमार (मामा) | --//-- |
| ३) | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर | --//-- |
| ४) | स.स.श्री. स.एकबालोद्यीन स.मो. कुतुबुद्दीन | --//-- |
| ५) | स.स.सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ६) | स.स.श्री. विखारोद्यीन पि. खुदबोद्यीन | --//-- |
| ७) | स.स.श्री. अजीजखॉ गणीखाँ | --//-- |
| ८) | स.स.श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ९) | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ | --//-- |
| १०) | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | --//-- |
| ११) | स.स.सौ. लता दलाल श्रीनिवास | --//-- |
| १२) | स.स.सौ. विमल नंदकुमार मुंडलीक | --//-- |
| १३) | स.स.श्रीमती. गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | --//-- |

**संवाद :**

**श्री. व्ही.व्ही. देशमुख :** श्री. बाळासाहेब पवार यांचे दुःखद निधन झाले, तरी त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

**मा. सभापती :** माजी खासदार मा. श्री. बाळासाहेब पवार यांचे दुःखद निधन झालेले आहे. त्यांना दोन मिनिटे स्तब्धता पाळुन श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

कै. बाळासाहेब पवार यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्धता पाळुन श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** गेल्या एक महिण्यापासुन नगररचना विभागाबाबत काही तक्रारी आहेत. या संदर्भाने मागील तीन चार बैठकामध्ये चर्चा होत आहे. आपण आदेशही दिले होते की, ज्या जागा नागरिकांना दिलेल्या आहेत त्या त्यांच्याकडुन डेव्हलप करुन घेतल्यानंतर त्यांना तसे प्रमाणपत्र देतांना त्यातील त्रुटी पाहिल्या जात नाहीत. त्यामुळे अनेक तक्रारी येतात राखीव जागांवर काही बिल्डींग बांधल्या आहेत. तर काहीना एफएफआय वाढवुन दिलेला आहे. या सर्व प्रश्नावर चर्चा करण्यासाठी एक स्वतंत्र बैठक घेण्याचे आपण सांगितलेले होते. परंतु अशी बैठक घेण्यात आलेली नाही. याचा परिणाम म्हणुन नगर रचना विभागातील एका कर्मचाऱ्याने आठ हजार रुपयाचा भ्रष्टाचार केल्याची बातमी वृत्तपत्रात अशातच आलेली आहे. त्यामुळे या कार्यालयात केवळ भ्रष्टाचारच चालतो की काय अशी जनतेस शंका आहे. आपण अधिकाऱ्यांना पाठीसी घालता असे मला वाटते. यामुळे महानगरपालिकेची बदनामी होते. गेल्या आठ दिवसात जी काही प्रकरणे

घडली त्याबाबत माहिती देण्यांत यावी. संबंधित कर्मचाऱ्यांने हे कोणच्या सांगण्यावरुन केले याची संपुर्ण माहिती देण्यांत यावी. आपण नगररचना विभागास पाठीसी घालण्याचा प्रयत्न करता हे चुकीचे आहे.

**मा. सभापती :** स.सदस्यांनी नगर रचना विभागा संदर्भाने, लेआऊट सेल्फ डेव्हलपमॅटसाठी दिलेल्या जागा संदर्भाने काही प्रश्न विचारले होते माहिती मागितलेली होती. नगर रचना विभागाचे अशी माहिती सादर केलेली आहे. ही माहिती सर्व स. सदस्यांना देण्यात येत आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** या विषयावर चर्चा होऊ नये म्हणुन आज माहिती दिली आहे काय? स्थायी समितीच्या बैठका एक एक महिना होत नाहीत.

**मा. सभापती :** नगर रचना विभागासी संबंधित प्रश्नावर चर्चा करण्यासाठी येत्या मंगळवारी एक स्वतंत्र बैठक घेण्यात येईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** वृत्तपत्रात मा. महापौरांचे स्टेटमेंट आले आहे की, एसटी स्टँटजवळ एका बिल्डरचा प्लॉट डेव्हलप होत असुन त्याच्याकडुन संबंधीत कर्मचाऱ्यांने लाच घेतली याची सविस्तर माहिती देण्यांत यावी.

**मा. प्र.आयुक्त :** वृत्तपत्रात प्रकाशित झालेली बातमी वृतपत्र हाती आल्यांनतरच आम्हास समजली, नगररचना विभागातील सर्व कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यांत याव्यात असे मा. महापौरांनी सुचविले आहे. सर्व कर्मचाऱ्यांच्या बदल्या एकदाच करता येतील किंवा नाही हे तपासुन पहावे लागेल. बदल्याबाबत मा. महापौरांनी दिलेल्या पत्राची सत्यता पडताळणी करण्यांत येत आहे सहाय्यक आयुक्त-१ प्रकरणात चौकशी करत आहेत. २-३ दिवसात निर्णय घेवु.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** गांवडे यांना निलंबित केल्याची बातमी आलेली आहे ती खोटी आहे काय?

**मा.प्र. आयुक्त :** त्यांना निलंबित केलेले नाही. त्यांची बदली प्रस्तावित करण्यांत आलेली आहे. प्रकरणात चौकशी चालु आहे. सात दिवसांत अहवाल सादर करण्यांत येईल.

**सौ. लता दलाल :** जनसंपर्क अधिकारी अशा बातम्यांच्या खुलासा का करत नाहीत. त्यांनी अशा प्रकरणांचा खुलासा तात्काळ वृत्तपत्रात करावयास हवा यामुळे महापालिकेची बदनामी होती.

**मा. सभापती :** सभागृहाच्या भावना जाणुन घेऊन प्र. आयुक्तांनी खुलासा केलेला आहे. प्रशासनाने चौकशी करुन त्वरीत कार्यवाही करावी.

**श्री. वसंत देशमुख :** हा खुलासा पुरेसा नाही. अशा प्रकारांमुळे सदस्यांची बदनामी होते. सदर कर्मचाऱ्यांने आठ हजार रुपये घेतल्याचा पुरावा पेपरमध्ये आलेला आहे. संबंधिताने एवढी रक्कम खरोखरच घेतली आहे काय? याची चौकशी व्हावयास हवी.

**मा. सभापती :** सभागृहाच्या भावना व वृत्तपत्रात मागील २-३ दिवसात ज्या बदनामीकारक बातम्या आल्या त्या दृष्टीने व सदरची बाब मा. महापौरांच्या बाबतीत घडलेली आहे. मा. महापौरांनीही काल प्रशासनास पत्र दिलेले आहे. संबंधिताची चौकशी करुन कमीत कमी दिवसात चौकशी अहवाल सादर करावा. मा.प्र.आयुक्त प्रकरणात निर्णय घेण्यासाठी सक्षम आहेत. त्यांनी याबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** हे प्रकरण नेमके काय आहे हे प्रथम सभागृहास कळु द्या. नंतर चौकशी अहवाल सादर करा.

**सौ. विमल मुंडलिक :** हे पैसे घेतले तेव्हा कोणी साक्षीदार होता का, इतरही अधिकारी पैसे खातात मग या एकाच कर्मचाऱ्याची चौकशी का? त्याने पैसे घेतले हे कशावरुन.

**श्री. विखारोद्दीन :** क्रांतीनगर येथील टपऱ्या तोडण्यासाठी आपले दल गेले होते. त्याचा खुलासा व्हावा. तेथील टपरी धारकांकडे परमीशन आहे. मग ते अनाधिकृत कसे? १९८४ पासुन या टपऱ्या तेथे आहेत ते त्यांच्या उत्पन्नाचे साधन आहे. १९९० मध्ये महापालिकेने त्यांना ९x१० फुटाची जागा देऊन त्यास शटर लावण्याची परवानगी दिली होती. मग या टपऱ्या अनाधिकृत कशा त्या उठविण्यात येऊ नये.

**मा. उपआयुक्त (म) :** क्रांतीनगर येथे ज्या अनाधिकृत टपऱ्या आहेत त्या हटविण्या संदर्भाने उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. त्यानुसार या भागातील टपऱ्या हटविण्याची कार्यवाही चालु आहे. या टपऱ्या अनाधिकृत आहेत यास तीन कारणे आहेत. या टपऱ्या अनाधिकृत टपऱ्या या अकरा महिन्याच्या भाडे तत्वाने दिलेल्या होत्या. त्यांची ही मुदत मागेच संपलेली आहे. संबंधीतानी मुदत संपल्यानंतर त्यांचे नुतनीकरण केलेले नाही. जेवढे क्षेत्रफळ टपरीसाठी दिलेले. होते ती मर्यादा या लोकांनी पाळलेली नाही. दिलेल्या क्षेत्रफळापेक्षा जास्त जागा त्यांनी वापरलेली आहे. संबंधित टपरीधारकांनी जागा पोट भाडयाने इतररांना दिलेल्या आहेत आहेत. नियमानुसार त्यांना पोटभाडेकरु ठेवता येत नाही. यासाठी या टपऱ्या अनाधिकृत आहेत.

**श्री. विखारोद्दीन :** १९८४ ला ११ महिन्यासाठी दिलेले होते १४ वर्ष झाले त्यावेळी रु. ३०/- इतके भाडे आकारण्यात आलेले होते. १९९० मध्ये त्यांना ९x१० फुटाची जागा रुपये ७५/- च्या भाडयाने दिलेली आहे. त्यांना अलॉटमेंट लेटर दिले आहे. जर त्यांनी क्षेत्रफळापेक्षा जास्त जागा घेतली असेल व वेळेवर भाडे भरण केला नसेल तर त्या त्याचवेळेस खाली करुन का घेतल्या नाहीत. या ठिकाणी श्री. शेगावकर श्री. गाडे यांचे भांडण चालु आहे. प्रशासनाने कोर्टात चुकीचे प्रतिज्ञापत्र दिलेले आहे. कोर्टात भाडंण चालु असलेल्या टपऱ्याचा मुद्दा वेगळा आहे. त्या सोडुन इतरांना का हटविण्यांत येत आहे.

**मा. सभापती :** संबंधितांनी अकरा महिन्यानंतर भाडे कराराचे नुतनीकरण केलेले नाही. या संदर्भाने मा. आयुक्तांनी प्रतिज्ञापत्र दिलेले आहे. तेथील नागरिकांनी कोर्टात परत केस केलेली आहे. त्यामुळे येथे चर्चा करण्यात काही अर्थ नाही.

**श्री. स.अ. इकबालोद्दीन :** शहरात इतरही अनेक ठिकाणी अनाधिकृत टपऱ्या आहेत त्यांना का हटविले जात नाही. शहरात किती अनाधिकृत टपऱ्या आहेत. क्रांतीनगर येथील टपऱ्या जुन्या आहेत. त्यांनाच नेमके हटविण्याचे कारण काय?

**श्री. विखारोद्दीन :** या टपऱ्या पोलिस प्रोटेक्शन हटविण्यात येत आहोत आम्हास कोणत्याही परिस्थितीत तोड यचे आहे. असे मा. उपआयुक्त म्हणतात.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** कायद्याच्या चौकटीत ३ कलमे सांगुन अनाधिकृत संबोधले क्रांतीनगर येथील टपऱ्याप्रमाणे शहरात इतर ठिकाणी टपऱ्यांना दिलेल्या जागेपेक्षा जास्त जागा किती जनानी व्यापली आहे. याचीही माहिती देण्यांत यावी. ज्यांना टपऱ्यासाठी जागा दिलेली आहे. त्यांनी पोटभाडेकरु ठेवले आहेत काय याचीही माहिती देण्यांत यावी.

**मा. उपआयुक्त (म) :** क्रांतीनगरच्या प्रकरणात मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश आहेत. टपरीधारकांना दिलेल्या जागेपेक्षा जास्त जागा त्यांनी व्यापाली आहे काय याची माहिती सादर करण्यांत येईल. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अपमान होईल असा निर्णय सभागृहाने घेऊ नये ही विनंती.

**श्री. विखारोद्दीन :** आपण मा. सुप्रीम कोर्टाचेही निर्णय मानत नाही. मग मा. हायकोर्टाचेच कसे मानता काही प्रकरणात मा. सुप्रीम कोर्टाने आदेश देउुनही प्रशासन त्याची अमंलबजावणी करत नाही. नुतन कॉलनी रस्त्याबाबत, तसेच गुणवाणी यांच्या बिल्डींग बाबत मा. सुप्रीम कोर्टाने आदेश देऊनही प्रशासन ते पाळत नाही. मा. न्यायालयाच्या आदेशाच्या सीनीरीटी नुसार कामे हाती घेण्यात यावीत.

**मा. सभापती :** कोर्ट मॅटर असल्याने या प्रकरणात आपण कोणतही निर्णय देणे उचीत नाही. कोर्टाच्या आदेशांची प्रशासनाने अंमलबजावणी करावी मा. उपआयुक्तांनी त्यांचा खुलासा केलेला आहे.

**श्री. विखारोद्दीन :** ज्या टपऱ्या अनाधिकृत आहेत त्या तोडण्यात याव्यात असे मा. कोर्टाचे आदेश आहेत.

**श्री. वसंत देशमुख :** या सभागृहात आमजनतेच्या प्रश्नाबाबत कोणी बोलत नाही. आम्ही मा. न्यायालयाच्या आदर ठेवतो. जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन त्या प्रश्नावर चर्चा करण्यांत यावी.

**सौ. लता दलाल :** निराला बाजाराच्या प्रश्नावर मी सातत्याने बोलत आहे. परंतु या प्रश्नावर प्रशासन काहीही करत नाही. या बाबीचा मी निषेध करते. याच बरोबर औरंगपुरा येथील मुतारी तोडण्याबाबत मी सातत्याने पाठपुराव करत आहे. मात्र येथील मुतारी तोडली जात नाही. ही मुतारी उघडयावर असल्याने महिलांची या भागातुन वावरतांना कुचबंना होते. ही मुतारी का तोडले जात नाही याची सविस्तर माहिती द्यावी अन्यथा मी आजची सभा होऊ देणार नाही.

**श्री. अजिज खॉ गणीखॉ :**शहागंज येथील मुत्री तोडुन तेथे टपरीसाठी जागा देण्यात येते. मस्जीद जवळील मुत्री का तोडली जात नाही.

**मा. सभापती :** शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

**शहर अभियंता :** औरंगपुरा भागातील जुनी मुत्री तोडण्यापुर्वी नविन बांधणे आवश्यक आहे. नविन बांधण्याचे काम सध्या चालु आहे. ते पुर्ण झाल्यानंतर ही मुत्री तोडली जाईल. येत्या ८-१० दिवसात सदरचे काम पुर्ण होईल. नविन मुत्री बांधण्याचे काम चालु असतांना कोणीतरी ते तोडले होते. त्यामुळे कामात उशीर झाला.

**मा. सभापती :** दहा दिवसांत नविन मुत्री बांधण्याचे काम पुर्ण करण्यात यावे व जुनी मुत्री तोडण्यात यावी.

**श्री. अजिजखॉ गणीखॉ :** पानदरीबा येथील मस्जीदजवळ एक मुत्री आहे. या भागात जवळच इतरही मुत्र्या आहेत. ही मुत्री तोडण्यात यावी १०० पावलावरच किराणाचावडी पोलिसस्टेशन, अप्पा हलवाई, मोठा गणपती येथे मुताऱ्या आहेत.

**मा. सभापती :** प्रशासकीय अधिकारी यांनी पाहणी करावी व जनतेस गैरसोय होणार नसेल तर ती तोडण्यात यावी. शहागंज मध्ये मोडलेल्या मुत्रीबाबत व्यापाऱ्यांनी

बराच वाद घातला होता. वादग्रस्त निर्णय स्थायी समितीत घेतले जाऊ नयेत.

**श्री. बचाटे राजकुमार :** स. नगरसेवक, अधिकारी, पदाधिकारी यांच्याबाबत वृत्तपत्रात बऱ्याच बातम्या येतात उपमहापौरांना लालुच दाखविण्याचा जकात अधिकाक्षकांचा प्रयत्न अशी एक बातमी प्रकाशित झालेली आहे त्याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** सदर बातमी बाबतचा खुलासा प्राप्त झालेला आहे. सचिवांनी तो सभागृहात वाचुन दाखववावा मा. सभापती यांचे सुचनेनुसार नगरसचिव यांनी वाचुन दाखविलेला खुलासा सोबत जोडलेला आहे.

**मा. सभापती :** दैनिक तरुण भारतामध्ये आजच ही बातमी प्रकाशित झालेली आहे. या बातमीच्या संदर्भाने खुलासा झालेला आहे. खुलाश्याच्या प्रती सर्व स. सभासदांना देण्यात येतील सदरची तक्रार मा. उपमहापौरांची आहे. प्रशासनाने येत्या बैठकीत सविस्तर खुलासा सादर करावा.

**सौ. लता दलाल :** नगररचना विभागासी संबंधित दोन प्रश्न मी पुर्वी चर्चिले होते. जयहिंद कॉलनीतील श्री. मुनोत यांच्या प्रकरणाबाबतचा खुलासा समाधान कारक नाही. त्यांना जी बांधकाम परवानगी दिली आहे. ती कोणाच्या नावावर आहे. सदरची व्यक्ति हयात आहे काय? आपण सदरचे बांधकाम स्थगित ठेवण्यचाचा निर्णय दिला होता परंतु ते स्थगित झालेले नाही. पुर्वीच्या स्थायी समितीने केलेला ठराव रद्द करुन बांधकाम थांबविण्यात यावे.

**मा. सभापती :** मागील बैठकीत या प्रश्नाबाबत खुप चर्चा झालेली आहे. बांधकाम परवानगी थांबविण्याबाबत प्रशासनास सुचना दिल्या होत्या. मा. आयुक्तांनी संबंधित यांचिका मागवून घेऊन ज्यांचे याबाबत अक्षेप होते त्यांचे म्हणणे ऐकुन घेतलेले आहे. याबाबत मा. आयुक्त योग्य निर्णय घेतील असा आम्हास विश्वास आहे.

**सौ. लता दलाल :** मागील बैठकीत २२ लिपीकांच्या भरतीचा प्रश्न मी उपस्थित केला होता या प्रकरणात चौकशी केली जाणार होती. त्याचे काय झाले याचा बरोबर सीटीएस क्र. २०५९२ जुलेखा बेगम यांना एफएसआय त्यांना कसा दिला, री.हाईजड परमीशन कशी दिली गेली याचा खुलासा व्हावा. याच बरोबर त्या लेआऊटची ओपनस्पेस किती त्यांनी एफएसआय नाल्याचा वापरला आहे. काय याचाही खुलासा व्हावयास हवा. याबाबत संबंधिताची चौकशी करण्यात यावी व जुलेखा बेगम यांना दिलेली बांधकाम परवानगी थांबविण्यात यावी.

**मा. सभापती :** सदर प्रकरणातील सविस्तर माहिती नगररचना विभागाने मंगळवारच्या बैठकीत सादर करावी. २२ लिपीकांच्या भरतीबाबत मा. आयुक्तांनी टिपणी सादर केलेली आहे. सचिवांनी ती सभागृहास वाचुन दाखववी. मा. सभापती यांचे सुचनेनुसार नगरसचिव यांनी वाचुन दाखविलेला खुलासा सोबत जोडलेला आहे.

**सौ. लता दलाल :** काही उमेदवारांना टंकलेखनही येत नाही त्यांनाही घेण्यात आले आहे हे कसे यांचा खुलासा व्हावा. निवड केलेल्या उमेदवारांची टंकलेखन चाचणी मा. सभापती, मा. आयुक्त, संबंधित निवड कमेटीचे सदस्य यांच्यासमोर परत देण्यात यावी अशी मी मागणी केली होती.

**मा. सभापती :** लिपीक भरती कशाप्रकारे झाली हयाची माहिती मागविलेली होती सदरची बाब प्रशासकीय आहे. प्रशासनात चांगले लोक कामासा असावेत अशी मा. आयुक्तांची धारणा असली पाहिजे म्हणुन त्यांनी हा खुलासा दिला आहे.

**श्री. वसंत देशमुख :** महापालिकेत घेतलेल्या लोकांना टंकलेखन येते का? याचा खुलासा व्हावा. आयुक्त म्हणतात आम्ही उमेदवारांना शिकविणार आहोत मग आमचे आरोप बिनबुडाचे आहेत काय?

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सचिवांनी वाचुन दाखविलेल्या शर्ती पुर्वीच ठरल्या होत्या ही सभागृहाची दिशाभुल आहे. अनेक लोकांना टंकलेखन येत नाही.

**मा.प्र. आयुक्त :** याबाबत गैरसमज निर्माण झालेला आहे. याबाबत प्रशासनाची अशी स्पष्ट भुमिका आहे की, जी गुणवत्ता कर्मचाऱ्यांमध्ये होती या पदासाठी आवश्यक पात्रता ठरवून उमेदवारांच्या प्रमाणपत्राची छाननी करण्यात आली. त्यानुसार पात्रता धारण करणाऱ्या इंग्रजी मराठी टंकलेखन परिक्षा पास झालेल्या उमेदवारांना मुलाखती साठी बोलावले होते. परीक्षा घेण्यासाठी स्वतंत्र मंडळ होते त्यांनी जो अहवाल प्रशासनाकडे दिला त्यानुसार हायेस्ट मार्कस् प्राप्त झालेल्या उमेदवाराची निवड करण्यात आली.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** मागील काही वर्षापासुन आपल्या कार्यालयातील शिपाई टंकलेखनाचे काम आहेत एकंदर उमेदवारांपैकी आपल्या कार्यालयातील किती लोक होते समितीमध्ये कोणकोण होते. त्यांचे क्वॉलिफिकेशन काय ते कोणत्या पदावर कार्यरत आहेत.

**मा. प्र.आयुक्त :** निवड समितीमध्ये उपआयुक्त (प्र.) उपआयुक्त(म.) मुख्य लेखा परिक्षक, मुख्यलेखाधिकारी होते तर टंकलेखन परीक्षेसाठी उपअभियंता श्री. काझी व शिक्षणाधिकारी पर्यवेक्षक होते.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** काझी व देशमुख यांना टंकलेखनाचा अनुभव नाही. ज्या जागेसाठी भरती होणार आहे. त्यातील तज्ञ परीक्षेसाठी नेमावयास हवेत.

**श्री. वसंत देशमुख :** भरती करण्यात आलेल्या लिपीकांच्या परीक्षा परत सर्वासमोर घेण्यात याव्यात.

**मा. प्र. आयुक्त :** श्री. काझी व देशमुख हे टंकलेखन परीक्षेच्या हॉलवर सुपरवायझर होते. पेपर संपल्यानंतर कार्यालयातील श्री. ढेकळे श्री. बाहेती, श्री. मोईनोद्दीन यांनी ते तपासले.

**मा. सभापती :** सदरची बाब मा. आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली झालेली आहेत. यामुळे कोणताही प्रश्न उद्‌भवत नाही.

**मा. प्र. आयुक्त :** २२ लिपिकांची जी भरती झालेली आहे ती कायदयाच्या चौकटीत राहुन झालेली आहे मेरीट प्रमाणे ज्यांना जास्त मार्कस् मिळालेले आहेत ते सक्षम आहेत. परत परीक्षा घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

**सौ. राधाबाई तळेकर :** जवाहर कॉलनी आरोग्य केंद्राजवळ असलेल्या त्रिकोनी खुल्या जागेबाबत वेळोवेळी पत्र दिलेले आहे, दि. २३-४-९८ ते दि. ४-६-९९ पर्यंत १० ते १५ पत्र दिलेले आहेत. चौधरी यांनी तेथे अतिक्रमण केलेले आहे. पुर्वी भाजी मंडईसाठी येथे मार्कआऊट झालेले होते. परंतु ही जागा पार्कींग साठी ठेवावी असे मी सुचविले होते. चौधरी यांच्या नावावर पी.आर.कार्ड असल्याने अधिकारी सांगतात ही जागा महापालिकेची असतांना पी.आर.कार्ड दुसऱ्याचे नांवे कसे होते. याबाबत सभेत आणि त्यानंतरा सर्वच अधिकारी श्री. तुर्कमाने श्री. खखडकर श्री. गायकवाड यांना भेटुन पाठपुरावा केला, मागील वर्षी

एकाने तेथे विनापरवाना रसवंती चालु केली होती. याची चौकशी व्हावी ही ओपन स्पेस महापालिकेची आहे. महापालिकेची तारकुंपणाच्या पुढे रसवंती आणी संतोष रसवंतीचा विना परवानगी वापर चालु आहे महापालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र नाही. एमएसईबीचा मीटरही नाही आणखी दोन दुकाने बांधले १००० रुपया प्रमाणे भाडयाने दिले आहे.

**प्रशासकीय अधिकारी :** सदर जागेची स्थळ पाहणी केली आहे. संबंधिताने मालकी हक्काचे कागदपत्र सादर केलेले आहेत या जागेवर अनाधिकृत बांधकाम झालेले आहे. नगररचना विभागाकडुन माहिती घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

**श्री. विखारोद्दीन :** गुलमंडीवर रिझर्व्हेशन झोनमध्ये बांधकाम होत आहे अशी वृत्तपत्रात बातमी आहे ही खरी आहे काय?

**मा. सभापती :** नगररचना विभागाने याबाबत मंगळवारच्या बैठकीत माहिती सादर करावी.

**श्री. स.अ. एकबालोद्दीन :** बारुदगर नाल्यावर गादीया बिल्डरने बांधकाम करुन नागरिकांचा येण्याजाण्याचा रस्ता अडविला आहे. मागील बैठकीत मी हा प्रश्न उपस्थित केला होता त्याचे काय झाले.

**मा. सभापती :** मंगळवारच्या बैठकीत नगररचना विभागाने ही माहिती सादर करावी.

**श्री. स.अ.एकबालोद्दीन :** नाल्यावर ५३ लाखाचे कॉम्लेकसचे काम चालु आहे. फक्त ५ मंजुर काम करतात. काम अंत्यत गतीने चालु आहे. हायमास्टच्या कामाचे काय झाले.

**शहर अभियंता :** १८ कॉलमसची खोदाई झालेली आहे. मध्यंतरी पावसामुळे काम बंद होते सध्या काम चालु आहे. २ इंजिनद्वारे उपसा करण्यात येत आहे.

**मा. सभापती :** सदर काम मुदतीत पुर्ण करावे.

**श्री. विकास जैन :** १८ नोंव्हेबर ९९ रोजी अग्निशमन दलातील कर्मचारी श्री. निकम यांचे दुःखद निधन झाले त्यांच्या पत्नीस अनुकंपा धर्तीवर महापालिकेत नोकरी देण्यात यावी प्रशासनातर्फे त्यांच्या कुंटुंबीयांना एक लाख रुपयाची मदत देण्यात यावी अग्निशमन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कुटुंबियांना एक दिवसाचा पगार दिलेला आहे.

**मा. सभापती :** श्री. निकम हे नोकरीत असतांना त्यांचे दुःखद निधन झालेले आहे. त्यांच्या पत्नीस त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार महापालिकेत नोकरीत सामावुन घेण्यात यावे त्यांच्या कुंटुंबियांना एक लाख रुपये मदत म्हणुन देण्याचा प्रश्न पुढे आलेला आहे ही बाब प्रशासनाने गांर्भियाने घेऊन योग्य ती मदत करावी ही बाब सर्वसाधारण सभेकडे सुर्पुद करण्यात येते.

**श्री. वसंत देशमुख :** स.नगरसेविका मोहसिना बिल्कीस यांनी प्रश्न विचारला आहे की, शहागंज येथील मुत्री का तोडण्यात आली.

**मा. सभापती :** त्या भागातील काही नागरिकांनी अर्ज दिला होता की, या भागात मुत्री आहे तीचा वापर होत नाही म्हणुन ती तोडण्यात यावी त्या ठिकाणी पर्यायी व्यवस्था झाल्यानंतर व सुलभ शौचालयाची व्यवस्था झाल्यावर प्रशासनाने ती मुत्री तोडण्याचा निर्णय घेतला. उत्पन्नाची बाब म्हणुन स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठवून एका नागरिकास जागा दिली होती तथापी हा निर्णय नियम बाहय असल्याने महापालिकाने निविदा काढुन जास्त भाडे भरणारास ती जागा दिलेली आहे हा संबंध कालावधी दीड ते दोन वर्षाचा आहे. वृत्तपत्रात निविदा आल्यानंतर आपण ऑब्जेक्शन दिले असते तर पुढील कार्यवाही

थांबवता आली असती संबंधिताने महापालिकेकडे दुकानासाठी रितसर जागा ॲलॉट झाल्यानंतर डिपॉझीट भरले आहे व बांधकाम सुरु केले आहे आता ते थांबवता येणार नाही. या भागात दुसरी मुत्री असल्याने ही मुत्री तोडली असे प्रशासनाचे मत आहे. प्रशासनाने याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री. वसंत देशमुख :** आपण केलेली कार्यवाही सर्व जनतेस माहित नसते. मुत्री तोडत असतांना इतराना माहिती झाली. जनतेचे प्रश्न सोडवणे हा महत्वाचा प्रश्न आहे.

**मा. सभापती :** प्रशासनाने न्याय कार्यवाही करावी. स.नगरसेवकांनी पत्र दिल्यानंतर त्याची उत्तरे दयावीत.

**सौ. विमलताई मुंडलिक :** सिडको भागातील पाणीपट्टी माफ करण्याचा प्रश्न मी वारंवार मांडत आहे पण त्यावर कार्यवाही होत नाही.

**मा. सभापती :** पुढील बैठकीत याबाबतीत चर्चा करण्यात येईल प्रशासनाने माहिती सादर करावी.

**श्री. विकास जैन :** सुरक्षा रक्षकांना वेतनश्रेणी देण्याबाबतची त्यांची मागणी होती त्याचे काय झाले.

**सौ. लता दलाल :** ठराव क्र. ६१०/९१ अन्वये त्यांना रु. ८२५-१२०० वेतनश्रेणी लागु करण्यासाठी मंजुरी दिलेली होती. परंतु त्यात ठरावाच्या अंमलबजावणीची तारीख दिलेली नव्हती हा ठराव १९९२ चा आहे. १९८६ पासुन सुरक्षा रक्षकांना वेतनश्रेणी लागु करण्याबाबतचा ठराव झालेला होता. त्यांना ही वेतनश्रेणी १९८६ पासुन लागु करावी अशी त्यांची मागणी आहे.

**मा. सभापती :** ठराव तपासुनच प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री. वसंत देशमुख :** किती अधिकाऱ्यांना महापालिकाने विशिष्ट मानधनावर घेतलेले आहे. महापालिकेत कार्यकारी दर्जाचे अभियंते आहेत मग अशा वेगळया अधिकाऱ्यांची परत मदत आहे काय? दिलेल्या पत्राची उत्तरे वेळेवर दिली जात नाहीत.

**मा. सभापती :** प्रशासनाने प्रकरणात सविस्तर माहिती दयावी मंगळवारच्या सभेत त्यावर चर्चा करण्यात येईल.

**विषय क्र. ३५९/१ :**

दिनांक ०६ नोव्हेंबर ९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

**श्री. विकास जैन :** ६ नोव्हेंबर ९९ च्या बैठकीतील इतिवृत्ताचे पृष्ठ क्र. १९ विषय क्र. ३२९/१० च्या ठरावात "कॅटीनचे व्यवसाय फक्त कार्यक्रमांचे वेळीच चालु असल्याने फक्त या एका वर्षाकरिता ऐवजी पाच वर्षा करिता दुरुस्ती करण्यात यावी.

**मा. सभापती :** दुरुस्तीस मंजुरी देण्यात येते.

**श्री. विखारोद्यीन :** शहरातील स्मशानभुमी, कब्रस्तानच्या जमीन संरक्षणा साठी चौकीदार नेमण्याचा निर्णय झालेला होता त्यांची नियुक्ती का होत नाही.

**मा. सभापती :** यासाठी एक महिन्याचा कालावधी दिलेला आहे. प्रशासनाने त्या कालावधीत पुर्तता करावी.

**श्री. विखारोद्दीन :** दि. ६ नोव्हेंबर ९९ च्या बैठकीचे इतिवृत्त पृष्ठ क्र. ३२ क्रांतीचौक ते पैठणगेट रस्ता रुंदी करणाबाबत मागील बैठकीतही प्रश्न विचारला होता रस्ता रुंदीकरणाचे काम का होत नाही याची माहिती देण्यात यावी आपण त्या ठिकाणच्या मालमतांचा ताबा का घेत नाहीत. तेथील मालमत्ता धारकांना महापालिकाने ५६ लाख रुपये दिलेले आहे.

**मा. सभापती :** पुढील बैठकीत भुसंपादन अधिकारी यांचा खुलासा मागविण्यात यावा भुसंपादन अधिकारी जागेचा ताबाघेऊन महापालिकेस देतात.

**श्री. विकास जैन :** दि. ६-११-९९ च्या बैठकीचे इतिवृत्त पृष्ठ क्र. ३५ वरती मुळ अंदाजपत्रकातील रक्कमेच्या १०% अनामत रक्कम म्हणुन राहील. अशी नोंद आहे या अटीवरती ठेकेदारांनी आक्षेप घेतलेला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांना ही अट लागु होत नाही त्यामुळे ती रद्द करण्यात यावी.

**मा. सभापती :** एकुण बिलाच्या १०% रक्कम सेक्युरीटी डिपॉझीट म्हणुन ठेवण्यात यावी असे पुर्वीच्या बैठकीत ठरले होते. पुर्वीच्या निविदांसाठी ही अट नसुन येथुन पुढे निघणाऱ्या निविदांसाठी ही अट लागुराहील. अंदाजपत्रकापेक्षा १५% कमी दर येणाऱ्या टेंडर्ससाठी ही अट राहील.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** कमी दराने झालेली कामे तपासण्यासाठी मागे एक समिती स्थापन करण्यात आली होती, परंतु अदयावपावेतो समिती सदस्यांना संचिका अथवा कामे दाखविण्यात आलेली नाहीत मीही त्या समितीचा सदस्य आहे. आपण टाकलेली जबाबदारी सांभाळण्यास आम्ही सक्षम आहोत. डीएसआर दराप्रमाणेच सर्व अटी लागु करावयास पाहिजेत. जी कामे २५% कमी दराने जातात त्यांच्या कामाची गुणवत्ता राहत नाही. आपण घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी व्हावयास हवी.

**मा. सभापती :** सर्व कार्यकारी अभियंता यांना सुचित करण्यात येते की, अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने जी कामे चालु आहेत त्यांची माहिती देण्यात यावी अशा कामाची गुणवत्ता चांगली राहील याबाबत दक्षता बाळगावी.

**श्री. विखारोद्दीन :** इतिवृत्त पृष्ठ क्र. १२ वस्ती हमालवाडा स्मशानभुमीच्या कामावरती आलेल्या स्टे संदर्भाने चर्चा आहे १५ वर्ष झाले या स्मशान भुमीचे काम केव्हा सुरु होणार.

**शहर अभियंता :** येथील स्मशनाभुमीचे काम चालु झाले होते. या जागेच्या विकासासाठी स्टे आल्याचे समजले होते. चौकशी करता येथे स्टे नसल्याचे कळाले पुर्वीच्या इस्टीमेटल बराच कालावधी झालेला आहे. त्या दराने काम करण्यास कॅन्ट्रक्टर तयार नाही. त्यामुळे नविन इस्टीमेंट बनविण्यात येत आहे. त्यास मंजुरी मिळताच कामास सुरुवात केली जाईल.

**मा. सभापती :** आगामी बैठकीत इस्टीमेंट तयार करुन सादर करावे.

**श्री. विखारोद्दीन :** शहासुक्त दर्ग्याजवळील अतिक्रमण काढण्यात आले की नाही याची माहिती देण्यात यावी.

**प्रशासकीय अधिकारी :** याबाबत कोर्टाचा स्टे आहे.

**श्री. विखारोद्दीन :** झोपडपट्टीतील लोकांसाठी एक योजना तयार केलेली आहे. त्यानुसार दारिद्रय रेषेखालील लोकांना कर्ज देण्यासाठी काही निकर्ष लावलेले आहेत. ज्यांची सिमेंट क्रॉकीटची घरे आहेत त्यांना या योजनेचा लाभ कसा देता येतो.

**प्रकल्प संचालक :** याबाबतची चौकशी आली आहे. कर्ज मंजुर झालेले लोक दरिद्रय रेषेखालचे आहेत असे समजले आहे. केवळ पडक्या घरामुळे त्यांना दारिद्रय रेषेच्या यादीतुन वगळता येत नाही. घराबरोबर त्यांचे उत्पन्नही पाहिले जाते.

**मा. सभापती :** मीही या प्रकरणाची माहिती घेतलेली आहे. प्रकल्प संचालकांनी योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** महापालिका कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागु झालेला आहे असे समजते मा. मुख्यमंत्र्यांनी महापालिका कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागु करण्यास मंजुरी दिली याबाबत त्यांचे आभार मानन्यात यावे.

**मा. सभापती :** महापालिका कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागु करण्यासाठी प्रयत्न केले, त्यास मंजुरी दिली याबाबत सर्व स.सदस्य, मा. महापौर, मा. मुख्यमंत्री महोदय या सर्वाचे आभार मानन्यात येतात.

**ठराव :**

दिनांक ६ नोंव्हेबर ९९ च्या सभेतील ठराव क्र. ३२९/१० अन्वये" कॅन्टीन व्यवसाय फक्त या एका वर्षाकरिता १०% ऐवजी ४% (चार टक्के) भाडेवाढ करण्यात यावी अशी मंजुरी दिली आहे. त्याऐवजी "कॅन्टीन व्यवसाय फक्त कार्यक्रमांचे वेळी चालु असल्याने पांच वर्षाकरिता १०% ऐवजी ४% (चार टक्के) भाडेवाढ करण्यात यावी अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वरील दुरुस्तीसह दिनांक ६ नोंव्हेबर ९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ३६०/२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको भागातील सेक्टर एन-४, एच,एफ,एफ-१ या भागात जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक र.रु. ४,५४,४५८/- च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन सदरील कामावर होणारा खर्च पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्ती या लेखाशिर्षकातील सन १९९९-२००० च्या आर्थिक तरतुदीतुन करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी मिळालेली आहे.

तरी सिडको सेक्टर एन-४,एच,एफ,एफ-१ या भागात जलवाहिनी टाकण्याचे कामाचे अं.प.प.र.रु. ४,५४,४५८/- चे मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको भागातील सेक्टर एन-४,एच,एफ,एफ-१ या भागात जलवाहिनी टाकण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ४,५४,४५८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६१/३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जायकवाडी नविन येथे (व्हॅक्युम सर्कीट कंट्रोलर) चा पुरवठा करणे, बसविणे व चाचणी देणे या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या यांत्रिकी दरसुची (९८-९९) नुसार र.रु. ६,४५,२२४/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. यास मा. आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीच्या आर्थिक तरतुदीतुन करण्यात येईल.

करिता अं.प.र.रु. ६,४५,२२४/- स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद**

**सौ. लता दलाल :** देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी किती रक्कमेस आतापावेतो मंजुरी दिलेली आहे. याची माहिती देण्यात यावी. वर्षभरासाठी किती साहित्य लागते, याबाबीची माहिती देण्यात यावी. अन्यथा तोपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा. केवळ कामाची अर्जन्सी दाखवून ते मंजुर करुन घेऊ नयेत.

**श्री. वसंत देशमुख :** या सुचनेशी मी सहमत आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** कार्यकारी अभियंता (पापु) यांच्या मार्फत वेळोवेळी दुरुस्तीच्या कामासाठी वेगवेगळे ठराव आणले जातात. वर्षभराची किती साहित्य लागते याचा खुलासा व्हावयास पाहिजे.

**मा. सभापती :** बहुमताने सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो. पुढील बैठकीत याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.

**ठराव :**

पुढील बैठकीपर्यंत सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा. असे बहुमताने ठरले.

**विषय क्र. ३६२/४ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शताब्दीनगर येथे १५० मी.मी. व्यासाचे एस.डब्ल्यु.जी. पाईपलाईन टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु. ३,९९,५९९/- चे तयार करण्यात आले आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ११-६-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा. स्थायी समितीने विषय क्र. १२९/६ दि. २२-६-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरील कामास्तव कार्यालयीन निविदा सुचना वर्तमानपत्रात देऊन निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम ताखपर्यंत एकुण (२०) निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (६) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. संधु कंन्स्ट्रक्शन | ३९.% | कमी |
| २. | श्री. बी.ए. काल्डा | ३०.८०% | कमी |
| ३. | श्री. अजिमोद्दीन सिद्दीकी | २७.७८६% | कमी |
| ४. | श्री. इंडीयन कंन्स्ट्रक्शन | २६.६९% | कमी |
| ५. | मे. युनायटेड कंन्स्ट्रक्शन | १९% | कमी |
| ६. | श्री. एस.ए.देशमुख | १६.१०% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प. दरापेक्षा ३९.९% कमी दराने मे. संधु कंस्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त झाली असुन त्यास मा. आयुक्त यांनी दि. ५-११-९९ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

तरी मे. संधी कन्स्ट्र. यांची ३९.९% कमी दराची निविदा स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शताब्दीनगर येथे १५० मी.मी. व्यासाचे एस.डब्ल्यु. जी. पाईप लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३९.९% कमी दराची मे. संधु कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६३/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कोहीनुर कॉलनी येथील बहुउद्देशीय हॉलवर पहिला मजला बांधण्यासाठी सन ९७-९८ चे जिल्हा दरसुचीनुसार र.रु. ३,११,४९०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २२-५-९९ अन्वये मान्यता दिली आहे. तसेच सदरील अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीने विषय क्रमांक ७९/९ दि. २७-७-९९ च्या इतिवृत्तामध्ये मान्यता दिली आहे. त्यानुसार उपरोक्त कामास्तव कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र. मनपा/लेखा/नि/१९/९९ दि. २९-६-९९ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण अकरा निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन (२) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. १७-९-९९ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एजाज अहमद | ६% | जास्त दराने |
| २. | श्री. शेख याकुब | १०% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प. दरापेक्षा ६% जास्त दराची निविदा श्री. एजाज अहेमद यांची प्राप्त झालेली आहे. परंतु मा. आयुक्त महोदय यांनी दि. २९-१०-९९ अन्वये ६% जास्त दराऐवजी २% जास्त दराने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार एजाज अहेमद यांची ६% जास्त दराऐवजी २% जास्त दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोहीनुर कॉलनी येथील बहुउद्देशीय हॉलवर पहिला मजला बांधण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. एजाज अहेमद यांचेकडुन ६% जास्त दराऐवजी २% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ३६४/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, कैसरकॉलनी येथील रुग्णालयाचे विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता सा.बां. खात्याच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रुपये २,७०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तरी र.रु. २,७०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैसरकॉलनी येथील रुग्णालयाचे विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. २,७०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६५/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, गांधीनगर, नवयुग कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता सा.बां. खात्याच्या सन १९९८-९९ वर्षाच्या दरसुचीनुसार रक्कम रु. २,३८,०८६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन १९९९-२००० वर्षाच्या "नविन डांबरी रस्ते" या लेखा शिर्षा अंतर्गत करण्यात येईल. तरी र.रु. २,३८,०८६/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गांधीनगर, नवयुगकॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,३८,०८६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६६/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, गारखेडा सुतगिरणी चौक ते शिवाजीनगर या मुख्य रस्त्यावरील पोल शिफ्ट करणे व पथदिव्यांच्या विद्युतीकरणाचे काम करणेसाठी सन १९९८-९९ च्या सा.बां. खात्याच्या दरसुचीनुसार र.रु. ६,६०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाची आर्थिक तरतुद "शहरात सोडीयम व्हेपर दिवे लावणे" यामधुन करण्यात येईल. तरी वरील कामाकरिता तयार करण्यांत आलेले र.रु. ६,६०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा चौक ते शिवाजीनगर या मुख्य रस्त्यावरील पोल शिफ्ट करणे व पथदिव्यांच्या विद्युतीकरणाचे काम करणेकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ६,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६७/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, हर्सुल ते कोलठाणवाडी पर्यंत रस्त्याचे मजबुती करण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ चे सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. ७,०५,०००/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च "नविन डांबरीकरण" या लेखा शिर्षाखाली ठेवण्यात आलेल्या जनरल सेव्हींग मधुन पैसा उपलब्ध करुन काम करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल ते कोलठाणवाडी पर्यंत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ७,०५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६८/१० :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. कैलासनगर येथे १५० मी.मी.व्यासाची एस.डब्ल्यु.जी. लाईन काढुन २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक र.रु. २,५३,४००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याच्या सन ९८-९९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले आहे.

सदरील काम लेखाशिर्षक देखभाल व दुरुस्ती ९९-२००० यातुन प्रस्तावित केले असुन मा. आयुक्तांनी दि. २८-११-९९ ला मंजुरी दिलेली आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैलासनगर येथे १५० मी.मी. व्यासाची एस.डब्ल्यु.जी. लाईन काढुन २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. २,५३,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ३६९/११ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव केला आहे की, रामगोपालनगर (पडेगांव) येथे १०० ते १५० मी.मी. व्यासाची जीवन प्राधिकरणाची टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची दरसुची सन १९९८-९९ नुसार अंदाजपत्रक र.रु. १,६०,०००/- चे तयार करण्यात येऊन मा. आयुक्त यांची दि. १०-१०-९९ रोजी मान्यता घेण्यात आली आहे.

सदर कामाचा खर्च हा "पाणी पुरवठा भांडवली कामे" या लेखा शिर्षातुन करण्यात येणार आहे. करिता प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविप्रमाणे रामगोपालनगर (पडेगांव) येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७०/१२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, सब्जीमंडी, पैठणगेट येथे जुनी दगडी व व्ही टाईप गटार तोडुन पुर्वरचित ३०० मी.मी. व्यासाची अर्धगोलाकार आर.सी.सी. गटार बांधणे या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां. विभागाच्या दरसुचीनुसार र.रु. १,९२,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १,९२,१००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सब्जीमंडी, पैठणगेट येथे जुनी दगडी व व्ही टाईप गटार तोडुन पुर्वरचित ३०० मी.मी. व्यासाची अर्धगोलाकार आर.सी.सी. गटार बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,९२,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ३७१/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, उल्कानगरी गणपती मंदिराजवळील उद्यान विकसित करणेच्या कामाचे अंदाजपत्रकास सा.बां. विभागाचे जिल्हा दरसुची सन ९८-९९ नुसार र.रु. १,५२,८००/- चे तयार करण्यात आले असुन सदर कामास मा. आयुक्त यांची मान्यता घेण्यात आली आहे. सदर प्रस्तावित काम हे "सिध्दार्थ उद्यान विकास" या तरतुदी अंतर्गत प्रस्तावित आहे.

सबब वरील प्रमाणे कामाचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर मान्यतेस्वत व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उल्कानगरी गणपती मंदिराजवळील उद्यान विकसित करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १,५२,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७२/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कैसर कॉलनी चंपा मस्जीद कब्रस्तान संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रकास सा.बां. विभागाचे जिल्हा दरसुची सन ९८-९९ नुसार र.रु. १,६७,९००/- चे तयार करण्यांत आले असुन सदर कामास मा. आयुक्त यांची मान्यता घेण्यात आली आहे. सदर प्रस्तावित काम हे "स्मशानभुमी विकास" अंतर्गत प्रस्तावित आहे. सबब वरील प्रमाणे कामाचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैसर कॉलनी चंपा मस्जीद कब्रस्तान संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १,६७,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७३/१५ :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या पडेगांव येथील असलेल्या कत्तलखान्याचे आधुनिकीकरण करण्यासाठी केंद्र सरकाने एकुण रक्कम रु. २२४.२० लाखचे ५०% अनुदान तत्वावर मान्यता दिली असल्याने सदरील पडेगांव येथील कत्तलखान्याचे आधुनिकरण प्रकल्पाचे काम चांगल्या रितीने व शास्त्रोकत पध्दतीने करणे आवश्यक आहे. तयाकरिता हया आधुनिकीकरण प्रकल्पाच्या कामाचे डिझाईन,ड्राईग, इजिनिअरिंग वर्क्स इत्यादी स्वरुपाची कामे करण्यासाठी या कामाचा अनुभव असणारी कन्सल्टन्सी नेमणे आवश्यक आहे.

देशातील मोठया शहरातील इतर महानगरपालिकांमध्ये कत्तलखान्याच्या आधुनिकीकरणाचे काम केलेल्या मुंबई येथील फॉखर्ड इंजिनिअरींग कॉर्पोरेशन या कंन्साल्टन्सीने औरंगाबाद महानगरपालिकेच्या पडेगांव येथील कत्तलखान्याच्या आधुनिकीकरणाचे काम त्यांचे कंपनीस देणेबाबत ऑफर दिली आहे. परंतु सदरील कत्तलखाना आधुनिकीकरणाचे काम मोठया स्वरुपाचे व महत्वपुर्ण असल्याने केवळ या कामाचा अनुभव असलेल्या देशपातळीवरील, राज्यपातळीवर इतर ठिकाणी काम केलेल्या

संस्थाना, एजन्सीला सुध्दा बोलावून कन्सल्टन्सीचे काम देणे बाबत व यासंबंधी एजन्सी निश्चित करणे बाबत निविदा देऊन जाहीर प्रगटन देणे बाबत प्रस्ताव स्थायी समितीस सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या पडेगांव येथील कत्तलखान्याचे आधुनिकीकरण करण्याकरिता केंद्र सरकारने ५०% अनुदान तत्तवार एकुण र.रु. २२४.२० लाखाचे कामाकरिता मान्यता दिली व शास्त्रोक्त पध्दतीने करण्याकरिता प्रकल्पाचे डिझाईन,ड्रॉइंग, इंजिनिअरिंग वर्क्स इ. स्वरुपाचे कामे करण्याकरिता अनुभवी कन्सल्टन्सी नेमण्याकरिता देशपातळीवरील, राज्यपातळीवर इतर ठिकाणी काम केलेल्या संस्थाना/एजन्सीजला बोलावून कन्सल्टन्सीचे काम देण्यास्तव वर्तमानपत्रातुन जाहीर प्रगटन देवुन निविदा मागविणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७४/१६ :**

मुख्य लेखा अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका कार्यालयातील कायमस्वरुपी सर्व चतुर्थश्रेणी स्त्री कामगार तसेच आरोग्य केद्रातील परिचारीका नर्सेस यांना मकर संक्रांतीपुर्वी दरवर्षीप्रमाणे गणवेशाचे अनुषंगाने साडी/शर्ट सल्वार, ओढणी कापड तसेच ब्लाऊज पिसेसचे वाटप करणे करिता वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्द करण्यात येऊन दरपत्रके मागविण्यात आली असता एकुण सात निविदा प्राप्त झाल्या.

प्राप्त निविदा व नमुन्याच्या अनुषंगाने साडया/शर्ट सल्वार पसंतसाठी विभागीय कार्यालयातील कामागारांना तसेच कामगार नेत्यांना साडया/शर्ट, सलवार कापड पसंतीसाठी मा. सभापती दालनात बोलविण्यात आले. पसंत सहित्यावर संबंधितांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. पसंत साहित्याचे प्राप्त दरात वाटाघाटीसाठी मा. मथुरादास छबीलदास यांचे प्रतिनिधीस बोलवून वाटाघाटी अंती ८% दर कमी करण्यात आलेले आहे. दर खालील प्रमाणे.

| | | प्रति नग दर | संस्था | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | साडी रंगीत ९ वार (८ मीटर) | ४११/- पॉलीबुटा | ७०० | २,८७,७००.०० |
| २. | साडी रंगीत ६ वार (५ मीटर) | २७८/- पॉलीबुटा | ७४ | २०,५८२.०० |
| ३. | साडी पांढरी ९ वार (८ वार) | ३८९/- वाँची प्लेन | ७४ | २८,७८६.०० |
| ४. | साडी पांढरी ६ वार (५ मीटर) | २७८/- वांची प्लेन | १४४ | ४०,०३२.०० |
| ५. | साडी प्लेन (पांढरी | २७८/- | ७४ | २०,५७२.०० |
| ६. | ब्लाऊज पीस (रंगीत) (८० सेमी) | २३/- दिल से | ७७४ | २०,१२४.०० |
| ७. | ब्लाऊज पीस (पांढरा) | २६/- दिल से | २९२ | ७,१२४.०० |
| ८. | शर्ट सलवार (रंगीत) | ४११/- | ७६ | ३१,२३६.०० |
| ९. | शर्ट सलवार (रंगीत) | ४०८/- | ७६ | ३१,००८.०० |
| १०. | ओढणी कापड | ७०/- पुनम | १५२ | १०,६४०.०० |
| | | | एकुण | ४,९८,२६२.०० |

वरील एकुण खर्च र.रु. ४,९८,२६२.०० मधुन वाटाघाटी अंतर्गत ८% कमी याप्रमाणे र.रु. ३९,८६१/- वजा जाता असे एकुण र.रु. ४,५८,४०१.०० याप्रमाणे अंदाजित खर्च अपेक्षित आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका कार्यालयातील कायमस्वरुपी सर्व चतुर्थश्रेणी स्त्री कामगार तसेच आरोग्य केंद्रातील परिचारीका/नर्सेस यांना मकर संक्रांतीपुर्वी दरवर्षी प्रमाणे गणवेशाचे अनुषंगाने साडी/शर्ट सल्वार, ओढणी कापड तसेच ब्लाऊज पीसेसचे वाटप करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी विभागीय कार्यालयातील स्त्री कामागारा तसेच कामगार नेत्यांचे उपस्थितीत पसंत करण्यात आलेल्या नमुन्याप्रमाणे प्रस्तावातील अ.क्र. १ ते १० चे ॲटम समोर दर्शविण्यात आलेल्या दरामध्ये मा. मथुरादास छबीलदास यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार ८% दर कमी करुन खरेदी करण्यास तसेच या कामी येणाऱ्या एकुण खर्च र.रु. ४,५८,४०१/- च्या खर्चास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत यते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७५/१७ :**

मौजे ईटखेडा येथील गट क्र. ५४ करिता सौ. शशीकला गोपाळराव घोगे यांनी सादर केलेल्या रेखांकन प्रस्तावास मंजुरीच्या वेळी त्यांनी या रेखांकनाखालील जमिनीपैकी मंजुर विकास योजना १५ मीटर रुंद रस्त्याने बाधीत होणाऱ्या क्षेत्रासाठी मोबदला देण्याची मागणी केली आहे. रेखांकनाकरिता संबंधिताने मनपात भरावी लागणारी १००% विकास खर्च व १००% जमीन विकास शुल्क रक्कम वळती करुन घ्यावी म्हणुन विनंती केली आहे.

मंजुर विकास योजनामध्ये १५ मी. रुंद रस्त्याने हया रेखांकनाखालील जमीनीचे ९३३.१७ चौ.मी. क्षेत्र बाधीत होत असुन एवढे क्षेत्राचे ९८ च्या दरानुसार र.रु. २,९४,७८८/- एवढे मुल्य निश्चित होते व या रेखांकनाकरिता संबंधिताने महानगरपालिकेस १००% विकास खर्च व १००% जमीन विकास शुल्कापोटी रु. १,६०,८२४/- एवढी रक्कम जमा करावयाची आहे.

करिता बाधीत क्षेत्राचा देय मोबदला म्हणुन र.रु. २,९४,७८८/- निश्चित करुन त्यामधुन १००% विकास खर्च व १००% जमीन उर्वरित र.रु. १,३३,९६४/- वजा करुन उर्वरित र.रु. १,३३,९६४/- संबंधितास देण्यासाठी प्रसताव मान्यतेस्तव सादर. प्रस्ताव मान्यतेनंतर रेखांकनास नेहमीच्या इतर अटी व शर्तीस पात्र राहुन अंतिम मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे ईटखडा येथील गट क्र. ५४ करिता सौ. शशीकलजा गोपाळराव घोगे यांनी सादर केलेल्या रेखांकनाखालील जमीनीपैकी मंजुर विकास योजना १५ मीटर रुंद रस्त्याचे बाधीत होणाऱ्या जमीनीचे ९३३.१७ चौ.मी. क्षेत्रासाठी निश्चित केलेल्या मोबदला रक्कम रु. २,९४,७८८/- मधुन रेखांकनाकरिता १००% विकास खर्च व १००% जमीन विकास शुल्कापोटी र.रु. १,६०,८२४/- वळती करुन उर्वरित मोबदला र.रु. १,३३,९६४/- संबंधित जमीन मालकास अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७६/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहाबाजार काली मस्जीद कब्रस्तान येथे मुतारी व खोली बांधणे बाबतचे अंदाजपत्रक र.रु. २,३८,१५०/- ला स्थायी समिती सभा दि. २२.६.९९ विषय क्र. १३८/५ अन्वये मंजुरी प्राप्त झाल्यानुसार सदर कामाची निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/२६/९९ दि. १५-९-९९ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या तारखेला एकुण १५ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या तारखेला एकुण ३ निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष्झ उघडण्यात आल्या असता दिलेले दर पुढील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. तुराब अली खान | ४% | जास्त |
| २. | श्री. राजेंद्र वर्दे | १०% | जास्त |
| ३. | श्री. गुलाम अझहर | २०% | जास्त |
| | | (१% एमडी भरलेली नाही) | |

या अनुषंगाने तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ४% जास्त दराची निविदा असलेले श्री. तुराब अली खॉन यांना दराचे वाटाघाटी संदर्भाने चर्चेस बोलावून वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास लेखी मंजुरी दिलेली आहे. त्यास मा. आयुक्तांची दि. ११-११-९९ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

करिता दराच्या वाटाघाटीनुसार श्री. तुराब अलीखॉन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने निविदा स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहाबाजार काही मस्जीद कब्रस्तान येथे मुतारी व खोली बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री. तुराब अलीखॉन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७७/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्तावा सादर केला की, साईनगर म्हाडा कॉलनी जवळील खुल्या जागेत शॉपिंग सेंटर बांधणे करिता सन ९७-९८ चे जिल्हा दरसुचीनुसार र.रु. १६,१०,०८०/- चे अं.प. तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २९-४-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच सदर प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र. ३१/१ दि. २०-५-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त कामास्तव कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१३/९९ दि. ११-५-९९ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १६ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष दि. २८-५-९९ रोजी उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शेख समद | ७% | जास्त दराने |
| २. | श्री. एस.एच. असोशिएटस् | १०% | जास्त |
| ३. | श्री. एस.एम. मंडोरे | १२% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प. दरापेक्षा ७% जासत दराची निविदा श्री. शेख समद यांची प्राप्त झालेली आहे. परंतु त्यास मा. आयुक्त महोदय यांनी ७% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने दि. २९-१०-९९ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार श्री. शे. समद यांची ७% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे साईनगर, म्हाडा कॉलनी जवळील खुल्या जागेत शॉपिंग सेंटर बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री. शेख समद यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७८/२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, संत एकनाथ रंगमंदिर इमारतीचे छताचे पत्रे काढुन नविन जी.आय.पत्रे बसविणे करिता सा.बां. विभागाचे सन ९७-९८ चे जिल्हा दरसुचीनुसार र.रुपये ३,९५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २१-४-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा. स्थायी समितीने विषय क्र. ५२/४२ दि. १२-५-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे.
त्यानुसार उपरोक्त कामास्तव कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र. मनपा/लेखा/नि/३०/९९ दि. ८-१०-९९ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण २२ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ४ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. २२-१०-९९ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सुजात अली हाश्मी | १५% | जास्त |
| २. | हुसेन अली | १२% | जास्त |
| ३. | राजेंद्र वर्दे | १८% | जास्त |
| ४. | एस.बी. साधवाणी | २०% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प. दरापेक्षा १२% जास्त दराची निविदा श्री. हुसेन अली यांची प्राप्त झालेली आहे. त्यानुसार मा. आयुक्त महोदय यांचे दि. ५-११-९९ रोजीचे आदेशान्वये संबंधित गुत्तेदारास दराच्या वाटाघाटीस्तव बोलविण्यात आले असता दराबाबतच्या वाटाघाटी अंती अं.प. दरापेक्षा १२% जास्त दराऐवजी ५% जास्त दरास सदरील निविदेस मा. आयुक्त महोदय यांनी दि. २६-११-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार श्री. हुसेन अली यांची अं.प. दरापेक्षा १२% जास्त दराऐवजी ५% जास्त दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंग मंदिर इमारतीचे छताचे पत्रे काढुन नविन जी.आय.पत्रे बसविणे च्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री. हुसेन अली यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील

काम त्यांचेकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७९/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नेहरुनगर कटकटगेट येथील २० खाटी रुग्णालय जागेभोवती संरक्षित भिंत व तार कुंपण करणे करिता अंदाजपत्रकास स्थायी समितीची दि. ६ जुलै १९९९ बैठक विषय क्र. १९२/३ अन्वये मान्यता घेण्यात येऊन कार्यालयीन निविदा सुचना क्रमांक मनपा/लेखा/नि/२७/९९ दि. २१-९-९९ प्रसिध्द करुन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोरे निविदा विक्री दि. ३०-९-९९ पर्यंत १९ निविदा विकल्या गेल्या व दर भरुन अंतिम स्विकृती दि. ८-१०-९९ पर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या. त्याचे तुलनात्मक वर्गीकरण खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. प्रकाश जाधव | ०.०१% | कमी दराने |
| २. | श्री. असलम पटेल | ५% | जास्त दराने |

या अनुषंगाने प्राप्त दरात तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच गुत्तेदार श्री. प्रकाश जाधव यांचे अं.प. दरापेक्षा ०.०१% कमी दराचे दर प्राप्त आहे. त्यास मा. आयुक्तांची प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. सबब वरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरुनगर कटकटगेट येथील २० खाटी रुग्णालय जागेभोवती संरक्षित भिंत व तारकुंपण बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ०.०१% कमी दराची श्री. प्रकाश जाधव यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते सिकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८०/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, न्यु उस्मानपुरा (हॉटेल डर्लिंग मागील भाग) येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ७,८२,४२५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण नऊ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त सहा निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. के.बी.पाथ्रीकर | ३९% | कमी |
| २. | मे. मॉस्कॉट कंन्स्ट्र. | ३८% | कमी |
| ३. | मे. व्यंकटेश कंन्स्ट्र. | २७.७९% | कमी |
| ४. | श्री. डी. अजितसिंग | ३१.१०% | कमी |
| ५. | मे. आदिनाथ कंन्ट्र. | १९.९९% | कमी |
| ६. | मे. जग्गी कंन्स्ट्र. | -- | अं.प. दराने |

वरील प्राप्त निविदांपैकी श्री. के.बी. पाथ्रीकर यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ३९% कमी दराचे आहेत.करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न्यु उस्मानपुरा (हॉटेल डर्लिंगच्या मागील भाग) येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३९% कमी दराची श्री. के.बी. पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८१/२३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, बन्सीलालनगर भागातील विविध वसाहतींच्या रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ५,०४,७८८/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण नऊ निविदा विकल्या गेल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त पाच निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. ती खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. के.बी. पाथ्रीकर | ३९.११% | कमी |
| २. | मे. मॉस्कॉट कंन्स्ट्र. | ३६.८६% | कमी |
| ३. | श्री. डी. अजितसिंग | ३१.३०% | कमी |
| ४. | मे. आदिनाथ कंन्स्ट्र. | १९.९८% | कमी |
| ५. | मे. जग्गी कंन्स्ट्र. | १५% | कमी |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री. के.बी.पाथ्रीकर यांचे निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३९.११% कमी दराचे आहेत. करिता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बन्सीलालनगर भागातील विविध वसाहितींच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३९.११% कमी दराची श्री. के.बी. पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८२/२४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शिल्पनगर आदर्शनगर मुख्य रस्त्यास डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,५१,६५५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण बारा कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त पाच निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. के.बी. पाथ्रीकर | ३८.२१% | कमी |
| २. | मे. मॉस्कॉट कंन्स्ट्र. | ३७.३६% | कमी |
| ३. | श्री. डी. अजितसिंग | २७.९१% | कमी |
| ४. | मे. रे. कन्स्ट्र. | २१.१५% | कमी |
| ५. | मे. आदिनाथ कंन्स्ट्र. | १९.१०% | कमी |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री. के.बी. पाथ्रीकर यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३८.२१% कमी आहेत. करिता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिल्पनगर, आदर्शनगर, मुख्य रस्त्यास डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३८.२१% कमी दराची श्री. के.बी. पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८३/२५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, श्रीनगर, आदित्यनगर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ७,६०,०३२/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण नऊ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त सहा निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. के.बी. पाथ्रीकर | ३९.२५% | कमी |
| २. | मे. मॉस्कॉट कंन्स्ट्र. | ३८% | कमी |
| ३. | मे. व्यंकटेश कंन्स्ट्र. | ३७.७९% | कमी |
| ४. | श्री. डी. अजितसिंग | ३१.५०% | कमी |
| ५. | मे. आदिनाथ कंन्स्ट्र. | १७.७९% | कमी |
| ६. | मे. जग्गी कंन्स्ट्र. | १५% | कमी |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री. के.बी. पाथ्रीकर यांची निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३९.२५% कमी दराची आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीनगर, आदीत्यनगर येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३९.२५% कमी दराची श्री. के.बी. पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८४/२६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, वेदांतनगर भागातील रस्त्यांचे डांबरीकरण कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ६,०६,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत बारा निविदा विकल्या गेल्या व निविदा सिवकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत पाच निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. के.बी. पाथ्रीकर | ३८.२१% | कमी |
| २. | मे. मॉस्कॉट कंन्स्ट्र. | ३७.३६% | कमी |
| ३. | मे.रे. कंन्स्ट्र. | २१.१५% | कमी |
| ४. | मे. आदिनाथ कंन्स्ट्र. | २१.१०% | कमी |
| ५. | री. डी. आजितसिंग | २१.१०% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३८.२१% कमी दराची श्री. के.बी. पाथ्रीकर यांची निविदा आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वेदांतनगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराची व अं.प. दरापेक्षा ३८.२१% कमी दराची श्री. के.बी. पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८५/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, रेल्वेस्टेशन भाजीमंडी ते अजिज गुत्तेदार (बन्सीलालनगर) यांच्या घरापर्यंत ४० फुट रस्ता रुंदीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,०४,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखपर्यंत एकुण १७ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत पाच निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याखालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुखबीरसिंग | ४६.५०% | कमी |
| २. | श्री. कुलवंतसिंग | ३९.८६% | कमी |
| ३. | श्री. एच.डी. पडुळ | ३६.३७% | कमी |
| ४. | श्री. मो. सलीम | ३५% | कमी |
| ५. | श्री. मेराज अली | २७.८७% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ४६.५०% कमी दराची श्री. सुखबीरसिंग यांची निविदा आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन भाजीमंडी ते अजिज गुत्तेदार (बन्सीलालनगर) यांच्या घरापर्यंत ४० फुट रुंद रस्ता रुंदीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या

निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ४६.५०% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८६/२८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सन १९९९-२००० या वर्षाकरिता महापालिका हद्दीत सौर पथदिवे, सौर घरगुती दिवे, प्रकल्प राबविणे बाबतच्या कामाकरिता महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सीतर्फे पत्र प्राप्त झाल्यानुसार सौर उर्जा पथदिवे सार्वजनिक ठिकाणी लावणे करिता व उर्जेची बचत होत आहे. या कामाचे अंदाजपत्रक र.रु. १,५०,०००/- तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च शासन व म्हाडाचे अनुदानामधुन करण्यात येईल. तरी वरील कामासाठी तयार करण्यात आलेले र.रु. १,५०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १९९९-२०० या वर्षाकरिता महापालिका हद्दीत सौर उर्जा पथदिवे सार्वजनिक ठिकाणी लावण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८७/२९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिलकमिल कॉलनी येथे बहुउद्देशिय सांस्कृतिक हॉल बांधण्याकरिता सन ९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार र.रु. १५,९८,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २६-१२-९८ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा. सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ११७३/१३ दि. १६-३-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र. मनपा/लेखा/नि/१३/९९ दि. ११-५-९९ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १४ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ३ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. २८-५-९९ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. राणा कंन्स्ट्र. | १०% | जास्त दराने |
| २. | श्री. कम्फर्ट कंन्स्ट्र. | १०.१०% | जास्त दराने |
| ३. | श्री हयात कंन्स्ट्र. | ५.५% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प. दरापेक्षा ५.५% जास्त दराची निविदा प्राप्त झाली होती. परंतु मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक १०-६-९९ अन्वये अंदाजपत्रकीय दराने मान्यता असल्यास स्थायी समितीसमोर सादर करणेस्तव आदेशित केलेले आहे. संबंधित गुत्तेदार सादर कंन्स्ट्र. यांनी अं.प. दरापेक्षा ५.५% जास्त दराऐवजी अं.प. दराने काम करण्यास तयार असल्याबाबत कार्यालयास लेखी संम्मती दिलेली आहे. त्यानुसार हयात कंन्स्ट्र. यांची ५.५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिलकमील कॉलनी येथे बहुउद्देशिय हॉल बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. हयात कंन्स्ट्रक्शन यांनी लेखी संमती दिल्यानुसार सदरील काम त्यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८८/३० :**

शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेतर्फे इमारती व इतर कामासाठी लागणारे एम.एस.स्टील व टॉर स्टील खरेदी करण्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र. ६३/९ दि. १९-६-९९ व्दारा र.रु. ५७,४४,०००/- ला मंजुरी प्राप्त आली आहे. त्यानुसार कार्यालयामार्फत निविदा सुचना जा.क्र. मनपा/लेखा/नि/२५/९९ दि. १५-९-९९ दै. वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या असता एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्यानुसार दराचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला तो खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | एम.एस.एस.आय.डी.सी. | अं.प. दरापेक्षा ६.०७% कमी दराने (वाटाघाटीनुसार) जकात कर वेगळा |
| २. | अमील स्टील रेलिंग मील्स | अं.प. दरापेक्षा ४.४६५% कमी दराने जकात कर वेगळा |
| ३. | ट्रीडेन्ट स्टील लि. | अं.प. दरापेक्षा २.५०६% कमी दराने जकात कर वेगळा |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे दरपत्रक एम.एस.एस.आय.डी.सी. यांचे असुन ते अं.प. दरापेक्षा ६.०७% ने कमी आहेत. एम.एस.एस.आय.डी.सी. ही संस्थाशासन अंगिकृत असल्यामुळे कमी दराचे दरपत्रक मान्य करण्यास हरकत नाही. करिता प्रस्ताव स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतर्फे इमारती व इतर कामासाठी लागणारे एम.एस. स्टील व टॉर स्टील खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे निविदाधारक मे. एम.एस.एस.आय.डी.सी. यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडुन अं.प.दरापेक्षा ६.०७% कमी दराने (जकात कर वेगळा) करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८९/३१ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका वाचनालयाकरिता पुस्तके खरेदी करावयाची आहेत. त्याकरिता सर्वाधिक सुट देण्याबाबत सुट देणाऱ्या निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यानुसार पुस्तके खरेदी वरील सर्वाधिक सुट भाषेप्रमाणे आणि वाङ्मयीन दर्जा प्रमाणे निश्चित केलेली आहे. सर्वाधिक दर मराठी हिन्दी-उर्दु १५% इंग्रजी-दि. अंक- संदर्भिय पुस्तके १०%, क्रमिक पुस्तके ५% लॅ-दुर्मिळ, मराठी मासिके, शासकीय पुस्तके सुट नाही याप्रमाणे निश्चित केले आहेत.

उपरोक्त निश्चित केलेल्या दरास अधिन राहुन पुस्तक निवड समितीच्या शिफारशी प्रमाणे मराठी-उर्दु व विशेष वाचनालयाकरिता एकुण १० लाख रुपयांची पुस्तके खरेदी

करावयाची आहेत. सर्वसाधारण त्यांचे पृथ: करण याप्रमाणे आहे. उर्दु २.०० लाख, इंग्रजी २ लाख, मराठी ५.५० लाख हिन्दी ५०,०००/- तथापी यातुन बालसाहित्य शासकीय प्रकाशने. लॉ/क्रमिक इ. प्रकारची पुस्तके खरेदी करण्यात येतील. प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका वाचनालयाकरिता पुस्तके खरेदी करण्याकरिता मागविण्यात आलेल्या निविदानुसार मराठी-हिन्दी-उर्दु १५% सुट, इंग्रजी-दि. अंक- संदर्भिय पुस्तके १०%, सुट, क्रमिक पुस्तके ५% सुट, लॉ-दुर्मिळ, मराठी मासिके, शासकीय पुस्तके (सुट नाही) याप्रमाणे निश्चित केल्यानुसार एकुण १० लाख रुपयांची (उर्दु २.०० लाख, इंग्रजी २ लाख, मराठी ५.५० लाख, हिंदी ५०,०००) पुस्तके खरेदी करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९०/३२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हनुमाननगर गारखेडा येथे खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां. खात्याच्या डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. ३,९२,५४८-०० चे तयार करण्यात आले असुन सदरील खर्च सन १९९९-२००० च्या शासकीय अनुदान मधुन प्रस्तावित आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हनुमानगर गारखेडा येथे खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,९२,५४८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९१/३३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शिवशंकर कॉलनी व बौध्दनगर भागातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता सा.बां. खात्याच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार र.रु. ६,६३,७१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९९-२००० वर्षात प्राप्त शासकीय अनुदानातुन करण्यात येईल. तरी र.रु. ६,६३,७१०/- चे अंदाजपत्रक विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिवशंकर व बौध्दनगर भागातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ६,६३,७१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९२/३४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कोकणवाडी चौक ते देवगिरी कॉलेज वस्तीगृहापर्यंत रस्त्यास डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां. खात्याच्या डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. ३,८३,९०४/- चे तयार

करण्यात आले असुन सदरील खर्च सन १९९९-२००० च्या "नविन डांबरीकरण" या लेखाशिर्षकातुन करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोकणवाडी चौक ते देवगिरी कॉलेज वस्तीगृहापर्यंत रस्त्यास डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,८३,९०४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९३/३५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, खोकडपुरा, कामगार हॉ.सोसायटी सब्जीमंडी येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां. खात्याच्या डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. ७,१६,०१७.०० चे तयार करण्यात आले असुन सदरील खर्च शासकीय अनुदान १९९९-२००० मधील तरतुदीमधुन करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खोकडपुरा, कामगार हॉ. सोसायटी सब्जीमंडी येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ७,१६,०१७.०० च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९४/३६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पंचशीलानगर, विष्णुनगर, अरिहंतनगर भागातील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां. खात्याच्या जिल्हा दरसुचीनुसार अंदाजपत्रक र.रु. ९,९९,०००/- चे तयार करण्यात आले असुन सदरील खर्च शासकीय अनुदान (१०.०० लक्ष) मधुन करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पंचशीलनगर, विष्णुनगर, अरिहंतनगर भागातील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ९,९९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९५/३७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, गारखेडा येथील सर्व्हे नं. ५४ काबरानगर (अल्प उत्पन्न गट, बिडी कामगार सोसायटी) मधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार र.रु. ९,५९,३४७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान १९९९-२००० मधुन करण्यात येईल. तरी र.रु. ९,५९,३४७/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा येथील स.नं. ५४ काबरानगर (अल्प उत्पन्न गटबिडी कामगार सोसायटी) मधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेकरिता तयार

करण्यात आलेल्या र.रु. ९,५९,३४७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९६/३८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर दिला की, गारखेडा आपुलकी अपार्टमेंट ते छत्रपतीनगर श्री. गुर्जर यांच्या घरापर्यंत १५ मी. विकास रस्ता (खडीकरण ) करण्याच्या कामाकरिता सन १९९८-९९ च्या सा.बां. खात्याच्या दरसुचीनुसार र.रु. ५,२०,०१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन १९९९-२००० वर्षाच्या शासकीय अनुदानातुन करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा आपुलकी अपार्टमेंट ते छत्रपतीनगर श्री. गुर्जर यांच्या घरापर्यंत १५ मी. विकास रस्ता (खडीकरण) करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ५,२०,०१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९७/३९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जयदुर्गा सह. गृहनिर्माण संस्था, गारखेडा संस्थेस जोड रस्ता तयार करण्याच्या कामाकरिता सा.बां. खात्याच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. २,९६,६६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन १९९९-२००० वर्षातील शासकीय अनुदानामधुन करण्यात येईल. तरी रक्कम रु. २,९६,६६०/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जयदुर्गा सह. गृहनिर्माण संस्था गारखेडा संस्थेस जोड रस्ता तयार करण्याकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,९६,६६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९८/४० :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, कैलासनगर येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकासाठी सन १९९७-९८ चे सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ९,९९,५००/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च "शासकीय अनुदान" सन १९९९-२००० (रु. २.२८ कोटी) मधुन करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैलासनगर येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ९,९९,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९९/४१ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, न्यु एस.टी.कॉलनी कटकटगेट येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठील सन १९९८-९९ चे

सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. ६,९९,५९१/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च "शासकीय अनुदान" सन १९९९-२०० (२.२८ कोटी) मधुन करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न्यु एस.टी. कॉलनी कटकटगेट येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ६,९९,५९१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४००/४२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, हबीब कॉलनी अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ चे सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. ३,४८,९००/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च "शासकीय अनुदान" सन १९९९-२००० (रु. २२८ कोटी) मधुन करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हबीब कॉलनी अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामाकरिता तयारकरण्यांत आलेल्या र.रु. ३,४८,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०१/४३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, पडेगांव कत्तलखाना रस्ता व भावसिंगपुरा ते कत्तलखाना पर्यंतच्या रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. ९,९८,७५२/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च "शासकीय अनुदान" सन १९९९-२००० (२.२८ कोटी) मधुन करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पडेगांव कत्तलखाना रस्ता व भावसिंगपुरा ते कत्तलखान्यापर्यंतच्या रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ९,९८,७५२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०२/४४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करित आहे की, सर्व्हे नं. १७९/पी हरसिध्दी सोसायटी, हर्सुल अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. २,६३,७३५/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च "शासकीय अनुदान" सन १९९९-२००० (रु. २.२८ कोटी) मधुन करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स.नं. १७९/पी हरसिध्दी सोसायटी, हर्सुल अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. २,६३,७३५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०३/४५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, खासगेट ते जिनिंग मील पर्यंत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ चे सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ८,५०,२१९/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च "शासकीय अनुदान" सन १९९९-२००० (२.२८ कोटी) मधुन करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तताव दर्शविल्याप्रमाणे खासगेट ते जिनिंग मील पर्यंत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ८,५०,२१९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०४/४६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, नारायणनगर, आझम कॉलनी येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९६-९९ चे सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. ४,९८,९३०/- चे तयार करण्यांत आले असुन सदरचा खर्च "शासकीय अनुदान" सन १९९९-२००० (२.२८ कोटी) मधुन करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारायणनगर, आझम कॉलनी येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ४,९८,९३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०५/४७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, म्हाडा कॉलनी (महावीर चौकाजवळील) मध्ये रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सा.बां. खात्याच्या जिल्हा दरसुचीनुसार अंदाजपत्रक र.रु. ३,६१,६४८/- चे तयार करण्यात आले असुन सदरील खर्च सन १९९९-२००० च्या शासकीय अनुदान लेखाशिर्षकातुन करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे म्हाडा कॉलनी (महावीर चौकाजवळील) मध्ये रस्त्यांचे पुर्वडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. ३,६१,६४८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०६/४८ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एन-१,पी-२ येथील एकंदर ३४ रहिवाश्यांनी महापालिकेविरुध्द दिवानी दावा क्र. ६२५/९३ हरमितसिंग विरुध्द हा दावा दाखल करुन त्यांनी दाव्यामध्ये सदरील व्यक्तीं हयांना सन १९८७ मध्ये सिडकोने घरे अलॉट केली असुन ते सन १९८७ पासुन तेथे राहत आहेत.

महानगपालिकेने पाणी पुरवठा संबंधि सन १९८७ मध्ये पाणी पुरवठा लाईन टाकुन पाणी पुरवठया संबंधि व्यवस्था केली होती. परंतु पाईप लाईन डिफेक्टीव्ह असल्याने

संबंधिताच्या घरांना पाणी पुरवठा करण्यात आला नाही. त्यामुळे त्यांनी खाजगी विहीरी, बोअरवेल करुन स्वखर्चाने पाण्याची व्यवस्था केली, सदरील पाईपलाईन डिफेक्टीव्ह असल्यामुळे पर्यायी पाण्याची व्यवस्था म.न.पा. तर्फे करण्यात आलेली नाही. व त्यामुळे सदरील भागास पाणी पुरवठा म.न.पा. तर्फे झाली नाही.

सदरील डिफेक्टीव्ह पाईपलाईन महानगरपालिकेने काढुन नविन पाईपलाईन जुन १९९० मध्ये पी-१,पी-२ या सेक्टरसाठी टाकली व पी-१ व पी-२ या सेक्टरमधील वस्तीला जुन ९० पासुन पाणी पुरवठा करण्यात आला. परंतु महानगरपालिकेने सन १९९२ मध्ये पाणीपट्टी मागणी बील करुन सन १९८७ ते ९२ पर्यंतच्या पाणीपुरवठा मागणी केली ही मागणी (सन ८७-९० पर्यंतच्या कालावधीची) बेकायदेशीर असल्याने रद्द करावी, दिलेले बिल ऑफ डिमांड रद्द करावे व वरील यादीचे सेक्टर पी-१ व पी-२ मधील वरील कालावधीचे बिल वसुल करण्यास महानगरपालिकेस प्रतिबंध करावा अशी विनंती न्यायालयास केली,

मा. न्यायालयाने संबंधिताचे नळ कनेक्शन तोडु नये व जैसे थे परिस्थिती ठेवावी म्हणुन दि. ७-८-९३ रोजी आदेश पारित केला. सदरील प्रकरणातील वाद पाहुन मा. न्यायालयाने सदरील प्रकरण लोकन्यालया समोर ठेवले वादींनी त्यांच्या वस्तीस पी-१ व पी-२ सेक्टरला सन १९८७ ते ९० पर्यंत पाणी पुरवठा झालेला नसल्याने सन ८७ ते ९० पाणी पट्टी वसुल करु नये असे नमुद केले, तसेच पाणीपट्टी वसुली बाबत एल सेक्टरच्या रहिवाशाने सन १९९० मध्ये डब्ल्यु.पी. ३४४/९० ही रिट याचिका दाखल करुन (मा. उच्च न्यायलात) म.न.पा. तर्फे लावण्यात आलेल्या सन १९८७-९० च्या पाणीपट्टी च्या बिलास आव्हान दिले. आणि सदरील याचिकेमध्ये महानगरपालिकेतर्फे जे प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले त्यामध्ये एल-२,एम-१,पी-१,पी-२, एल-३,एल-४,एल-१ या सेक्टरमध्ये मनपाने जी पाईपलाईन टाकली ती डिफेक्टीव्ह असल्याचे मान्य केले आहे. आणि कमी दाबाने असल्याने वरील सेक्टरला पाणी मिळत नव्हते. त्यामुळे पाणी मिळत नसल्याने जुनी लाईन बदलून दुसरी नवीन लाईन टाकण्यात आली व ज्या कालावधीपासुन पाणी पुरवठा करण्यात आला त्यावेळेस पासुन पाणीपट्टी वसुल करण्यात येईल असे नमुद केले. म्हणजे १९० पासुन पाणीपट्टी वसुल करण्यात येईल असे नमुद करण्यात आले.

सदरील याचिकेतील ही बाब मा. न्यायालयाच्या निर्देशनास लोक न्यायालयात ही बाब वादिनी प्रकर्षाने मांडली व पाणी टॅक्स सन १९९० पासुन महापालिकेने वसुल करावा म्हणुन बाजु मांडली व याच धर्तीवर मा. उच्च न्यायालयातील ऑपिडीहीटच्या आधारे लोक न्यायालयात वादी व प्रतिवादीत खालीलप्रमाणे समजौता झाला. व त्याआधारे न्यायालयाने प्रकरण निकाली काढले मा. न्यायालयात खालीलप्रमाणे तडतोड घडुन आली तडजोड अटी सदरील केसमध्ये वादी व प्रतिवादीमध्ये खालीलप्रमाणे सुलानामा खालील अटीवर ठरलेला आहे.

असे की, असे ठरले की, एप्रिल १९८६ ते मार्च ९० या कालवधीसाठी पाठविलेला पाणी करापोटी बिले रद्द करण्यास संमती देण्यात आली. कारण महापालिकेने उच्च न्यायालयात रिट क्र. ३४४/९० मध्ये शपथपत्र दिले, ज्या भागात महानगरपालिकेने रामनगर व विठ्ठलनगर या ठिकाणी पाणी पुरवठा केलेला नाही त्यामुळे प्रतिवादी महानगरपालिका त्या कालावधीचा पाणी कर घेणार नाही. म्हणुन एप्रिल ९० मार्च ९८ पर्यंत वादीने पाणी करापोटी रक्कम बिले आल्यावर भरावी, याआधी वादीने भरलेली रक्कम येणाऱ्या बिलातुन वजा करुन राहिलेली रक्कम द्यावी असे ठरले आहे. सदरील वरील अटी शर्तीनुसार प्रकरण मा. न्यायालयाने निकाली काढले.

वरील दावा प्रतिनिधीक स्वरुपाचा असुन विठ्ठलनगर येथील ८८२ घरांना एप्रिल १९८६ ते मार्च १९९० या काळात पाणी पुरवठा करण्यात आलेला नाही व त्यामुळे

महानगरपालिका या कालावधीचा पाणी कर घेणार नाही असे प्रतिज्ञापत्र उच्च न्यायालयाच्या रिट नं. ३४४/९० या दाव्यात दिलेले आहे. तरी विठ्ठलनगर येथील एकुण ८८२ घरांची एप्रिल १९८६ ते मार्च १९९० या काळाची पाणीपट्टी रद्द करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-२ सेक्टर पी-१ पी-२ येथील एकंदर ३४ रहिवाशांनी महानगरपालिकेविरुध्द दिवाणी दावा क्र. ६२५/९३ हरमितसिंग विरुध्द म.न.पा. या दाखल केलेल्या दाव्याचा न्यायालयाने दिलेला निकाल हा प्रधिनिधिक स्वरुपाचा समजुन विठ्ठलनगर येथील एकुण ८८२ घरांना एप्रिल १९८६ ते १९९० या काळात मनपातर्फे पाणी पुरवठा करण्यात आलेला नाही. करिता मा. न्यायालयाचे निर्णयानुसार महानगरपालिकेतर्फे रिट नं. ३४४/९० या दाव्यात प्रतिज्ञापत्र दिल्याप्रमाणे ८८२ घरांची एप्रिल १९८६ ते मार्च १९९० या काळाची पाणीपट्टी रद्द करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०७/४९ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, कटकटगेट ते सिडको या गटार बांधणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु. ४,२५,२००/- च्या अंदाजपत्रकास २८-८-९८ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. १७५/२० अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र./मनपा/लेखा/नि/५७/९८ दि. २२-९-९८ चे निविदा सुचनेव्दारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेपर्यंत एकुण (१७) निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण (०४) दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ४१% कमी दराने मे. सोनी कंन्स्ट्रक्शन कं. यांचे निविदेस दिनांक ३०-१-९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ४९८/१३ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरील ठेकेदारास अनामत रक्कम व करारनामा करणेसाठी पत्राव्दारे कळविले असता त्यांनी उलट टपाली खुलासा केला नाही. त्यामुळे त्यांना पुन्हा स्मरणपत्र देवून देखिल प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करुन त्यांची निविदा रद्द करण्यात आलेली आहे. तसेच सदरील कामासाठी आलेले दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या क्रमांकाच्या ठेकेदारास पहिल्या कमी दराचे ठेकेदाराने दिलेल्या दरात काम करणेसाठी पत्र दिले असता दुसऱ्या क्रमांकाचे ठेकेदार श्री. कुलवंतसिंग यांनी पहिल्या कमी दराच्या ठेकेदाराने दिलेल्या दरात व त्यांनी दिलेले दर २७.७६% कमी या दरात काम करण्यासाठी असमर्थता दाखविलेली आहे.

तिसऱ्या कमी दराचे ठेकेदार मे फाईव्हस्टार कंन्स्ट्र. यांनी खुलासा केला आहे की, त्यांनी निविदा आठ महिने अगोदर भरलेली असल्याने दरम्यानच्या काळात मटेरियलचे भाव वाढल्याने पहिल्या कमी दराचे ठेकेदाराने दिलेल्या दरात म्हणजे ४१% कमी दराने काम करण्यास परवडत नसुन त्यांनी दिलेले दरात म्हणजे २५.१% कमी दराने काम करण्यास सम्मती दिली आहे.

चौथ्या क्रमांकाचे ठेकेदारास रजिस्ट्री पोष्टाने पत्र पाठविले असता त्यांच्याकडुन खुलासा प्राप्त झालेला नाही.

करिता तिसऱ्या कमी दराचे ठेकेदार मे. फाईव्हस्टार कंन्स्ट्रक्शन कं. यांचे निविदेस खालील अटीवर मान्यता देण्यात आलेली आहे.

१) कोणत्याही क्षणी स्पेसीफिकेशन नुसार काम न झाल्यास व तसे स्थळावर आढळयास संबंधित ठेकेदारास काळया यादीत समाविष्ठ करण्यात येईल व पुढे म.न.पा. संबंधितास काम दिले जाणार नाही. तसेच झालेल्यानंतर देयक दिले जाणार नाही.

२) काम पुर्ण झाल्यानंतर अंतिम बिलातुन झालेल्या कामाच्या रक्कमेच्या १०% रक्कम व नेहमीची कपात होणारी ३% रक्कम अशी एकुण १३% सुरक्षा अनामत रक्कम काम पुर्ण झालेल्या तारखेपासुन एक वर्षाच्या कालावधी पर्यंत मनपाकडे रोखुन ठेवण्यात येईल व एक वर्ष काम समाधानकारक टिकल्यास १३% रक्कम संबंधितास परत करण्यात येईल व काम समाधानकारक न टिकल्यास किंवा वर्षभरात खराब झाल्यास ठेकेदरास काम अद्ययावत करणे बद्दल कळवुन तसे करुन न दिल्यास त्याची कपात केलेली १३% सुरक्षा रक्कम जप्त करुन मनपा फंडात जमा करुन घेण्यात येईल.

तरी वरील अटानुसार मे. फाईव्हस्टार कन्स्ट्र. यांचेकडुन त्यांनी निविदेत व लेखी हमीपत्राव्दारे दिलेल्या दराने म्हणजे अं.प. दरापेक्षा २५.१% कमी दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कटकटगेट ते सिडको या रस्त्यावर गटार बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी पहिल्या व दुसऱ्या कमी दराचे निविदाधारकांनी काम करण्यास नकार दिल्याने तिसऱ्या कमी दराचे ठेकेदार यांनी लेखी हमीपत्र दिल्यानुसार प्रस्तावातील अ.क्र. १ व रचना कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन अं.प.दरापेक्षा २५.०% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०८/५० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, म्हाडाकॉलनी येथे स्टेशन येथील खुलया जागेवर सांस्कृतिक हॉल बांधणे करिता सा.बां. विभागाचे सन ९८-९९ चे दरसुचीनुसार र.रु. १,९०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २-१२-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर कामास शाळा विकास इमारती व दवाखाने या बजेट अंतर्गत घेण्यात आलेले आहे. तरी प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे म्हाडाकॉलनी येथे स्टेशन रोड येथील खुल्या जागेवर सांस्कृतिक हॉल बांधणे करिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०९/५१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बन्सीलालनगर येथील सांस्कृतिक केंद्र व वाचनालय या ठिकाणी उर्वरित कामे करणेस्तव सा.बां. विभागाचे सन ९७-९८ चे जिल्हा दरसुचीनुसार र.रु. २,२९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ३-१२-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च हा सन १९९९-२००० या आर्थिक वर्षा अंतर्गत इमारत दुरुस्ती व देखभाल या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे अं.प.र.र. २,२९,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बन्सीलालनगर येथील सांस्कृतिक केंद्र व वाचनालय या ठिकाणी उर्वरित कामे करणेसाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. २,२९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद**

**मा. सभापती :** मनपाच्या निवडणुका जवळ आलेल्या आहेत. लवकरच आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. स्थायी समिती सभेत पारीत झालेले सर्व ठराव स्विकृतीसह मंजुर करण्यात येतात दोन दिवसांत टेंडर नोटीसा काढण्याची कार्यवाही करण्यात यावी. आठ दिवसात एजन्सी फिक्स करुन वर्क ऑर्डर देण्यात याव्यात.

**सौ. लता दलाल :** अनेक ठिकाणी कामे चालु आहेत. परंतु ती मुदतीत पुर्ण होत नाहीत. गुत्तेदारांना विहित कालावधीत कामे पुर्ण करणे बाबत सुचना देण्यात याव्यात.

**मा. सभापती :** कर्मचाऱ्याची दोन अपिले आलेली आहेत. त्यावर विचार निनिमय करणे आहे. श्री. खेडकर व श्री. म. रफीक शे. महंमद यांचे अपील स्थायी समितीसमोर विचारार्थ आलेले आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** श्री. खेडकर यांना कोणत्या नियमान्वये निलंबित केले अशी डायरेक्ट कार्यवाही करता येते काय? त्यांना निलबंनापुर्वी नोटीस का देण्यात आली नाही.

**मा. सभापती :** श्री. खेडकर, दुय्यम आवेक्षक यांच्याबाबत ७-११-९९ रोजी कार्यकारी अभियंता (पापु) यांनी मा. आयुक्तांना पत्र दिले होते. त्यांच्या पत्रानुसार प्रशासनाने ही कार्यवाही केलेली आहे. श्री. खेडकर यांनीही ८-११-९९ रोजी तक्रार केलेली आहे. श्री. खेडकर यांच्याबाबत प्रशासनाचे मत घेऊन अपील मंजुर करण्यात येते. तसेच मो. रफीक शे. मोहम्मद यांच्या आपिलावरही प्रशासनाचे मत घेऊन अपिल मंजुर करण्यात येते. ऐनवेळचे इतर अंदाजपत्रकांचे प्रस्तावांना स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४१०/५२ :**

श्री. ए.एल. खेडकर, दुय्यम आवेक्षक, पा.पु. २ सिडको म.न.पा. औरंगाबाद यांचे निलंबन आदेश क्र. मनपा/म.आ./स्वीस/९९/६६८ दि. २६-११-९९ विरुध्द च्या अपिलावर विचार विनियम करुन निर्णय घेणे.

**संवाद**

**मा. सभापती :** अपिल मान्य करण्यात येते.

**ठराव :**

दुय्यम आवेक्षक श्री. ए.एल. खेडकर यांचे अपिलाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाचे मत घेऊन श्री. खेडकर यांना निलंबनापुर्वी त्यांचे म्हणणे मांडण्यास नियमानुसार संधी न देता दि. २६-११-९९ च्या आदेशान्वये निलंबीत केले आहे. श्री. खेडकर यांचेवर दि. २६-११-९९ च्या पत्रकान्वये करण्यात आलेली निलंबनाची कार्यवाही रद्द करुन

त्यांना कामावर रुजु करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. श्री. खेडकर यांचा निलंबन काळ हा सेवाकाळ समजण्यात यावा असे सर्वानुमत ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४११/४३ :**

श्री. महंमद रफीक शेख मोहम्मद, क.लि.झो.क्र.२, म.न.पा. औरंगाबाद यांच्या निलंबन आदेश क्र. मनपा/अस्था-१/९९/४/१५८ दि. २२-११-९९ विरुध्दच्या अपिलावर विचार निनिमय करुन निर्णय घेणे.

**मा. सभापती :** अपिल मान्य करण्या येते.

**ठराव :**

श्री. मो. रफीक शेख मोहम्मद, क.लि.विभाग क्र. २, म.न.पा. यांचे अपिलाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाचे मत घेऊन खालील अटींसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ चे कलम ४ खालील तरतुदीनुसार अपिलकर्त्यास ४८ तासांपेक्षा जास्त कालावधीसाठी पोलिस किंवा न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले नव्हते.

२) महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असुन कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते नागरिकांकडुन जमा झालेल्या करातुन देण्यात येतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांकडुन कामे न घेता ५०% ७५% वेतन देणे योग्य वाटत नाही तसेच सेवेत असतांना देखील खाते चौकशी करता येऊ शकते.

३) अपिलकर्त्यांचा निलंबन काळ हा न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार गृहीत धरण्यात यावा. त्यांच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप न्यायालयामधुन अद्याप सिध्द व्हावयाचे आहेत.

४) उपरोक्त बाबींचा विचार करता श्री. मो. रफीक शे. मोहम्मद क.लि. यांचे निलंबन न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहुन रद्द करण्यात येते. संबंधितास कामावर रुजु करुन घ्यावे.

प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद**

**श्री. अजिज खॉं गणीखॉं :** विभाग क्र. ३ चे दैनिक वेतन कर्मचारी श्री. फय्याज खॉन यांच्याबाबत मी प्रश्न विचारला होता. त्याचे काय झाले.

**मा. सभापती :** मागील बैठकीतच या बाबींवर चर्चा झालेली आहे. प्रशासनातर्फे चौकशी चालु आहे. प्रकरणात जे दोषी असतील त्यांच्या वर कार्यवाही करण्यात यावी. मुख्य लेखाधिकारी श्री. खैरनार यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती झालेली आहे. ते लवकरच मा. आयुक्तांना अहवाल सादर करतील.

**मा. सभापती :** यापुढे दर शुक्रवारी दुपारी ३.०० वाजता स्थायी समितीची बैठक होईल.

सर्वांचे अभार मानुन ६.४५ वाजता बैठकीचे कामकाज "जन गण मन" या राष्ट्रगितानंतर संपल्याचे मा. सभापतींनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | सभापती स्थायी समिती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

**<u>दैनिक तरुण भारत मधील जयहिंद कॉलनी येथील न.भु.क्र. १७८०४ बाबतच्या बातमीची खुलासा.</u>**

औरंगपुरा भागातील जयहिंद कॉलनी या वसाहतीत नगर भुमापन क्र. १७८०४ ही मिळकत श्री. मनोहर किसनराव पाडळकर यांच्या नावाने आहे. जयहिंद कॉलनी या गृहनिर्माण संस्थेने श्री. मनोहर किशनराव पाडकळ यांना संस्थेचे सभासद करुन वाटप पत्र १९८१ च्या खरेदीखताच्या आधारे दि. २२-३-८२ रोजी आखिल पत्रिकेत मालकी हक्कास पाडळकर यांच्या नावाची नोंद झाली. सन १९९८२ पासुन सदरील मिळकत ही श्री. पाडळकर यांच्या ताब्यात आहे. सन १९९८७ मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेने एक जाहीर प्रगटन देऊन ज्या रेखांकनातील खुली जागा जमीन मालकाने महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन दिल्या नाहीत त्या करुन घाव्यात अन्यथा त्या हस्तांतरीत झाल्या असे समजुन त्या जागांचे नामांतर महानगरपालिकेच्या नावे करावे असे कळविले, सदरील जागके बाबतची महानगरपालिकेने रेखांकनातील खुली जागा आहे अशी धारणा डोक्यात ठेवून नगर भुमापन कार्यालयाकडे पाठपुरावा केला व सन १९८९ साली या जागेच्या आखिव पत्रिकेवर मालकी हक्कात श्री. पाडळकर यांच्या ऐवजी "जयहिंद प्रेस वर्क्स इंडको औ.हौ. सोसायटी औरंगाबाद मंजुर लेआऊट मधील खुली जागा "अशी नोंद घ्यावयास लावली.

न.भु.क्र. १७८०४ च्या मिळकत पत्रिकेवर मंजुर रेखांकनातील खुली जागा म्हणुन नोंद झाल्यानंतर श्री. पाडळकर यांनी त्याबाबत प्रकरण न्यायालयात दाखल केले. न्यायालयीन कार्यवाही होऊन मा. सहदिवाणी न्यायाधिश "क" स्तर १३ वे कोर्ट औरंगाबाद यांनी आर.सी. एस.नं. ७५०/९६ मधील निर्णय दि. १४-१-९७ अन्वये दावा दाखल केला व न्यायालयाने त्यांच्या बाजुने निर्णय दिला दरम्यानच्या काळात न.भु. कार्यलयाने त्यांच्या अभिलेखात मालकी हक्कात श्री. पाडळकर यांची नोंद केल्याने महापालिकेकडे बांधकाम परवानगी प्रस्ताव सादर केले. त्यावेळी कार्यालयीन अभिलेख विचारात घेवून प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने प्रकरण नाकारले त्यानंतर मिळकतधारकांने महानगरपालिकेकडे तडजोडीचा प्रस्ताव सादर केला. त्यानंतर महानगरपालिके गेल्या अनेक वर्षात या जागेवर श्री. पाडळकर याचा असलेला ताबा व सहदिवाणी न्यायालयाचा त्यांच्या बाजुन व महानगरपालिकांच्या विरुध्द झालेला निर्णय याचा विचार करुन संबंधिताने दिलेल्या तडजोड प्रस्तावाच्या अनुषंगाने वरिष्ठ न्यायालयात महानगरपालिकाने केलेले अपील व त्यानुषंगाने हा तडजोड प्रस्ताव कितपत महानगरपालिकाच्या हितावर आहे याबाबत महानगरपालिकाचे विधी सल्लागार व संबंधित विधी यांचे अभिप्राय घेण्यात आले, असता त्यांनी असे कळविले की, न्यायालीयन प्रकरणात लागणारा प्रदिर्घ कालावधी व अपीलात मांडण्यात आलेले मुद्दे यांचा विचार करता तडजोडीचा प्रस्ताव महानगरपालिकाने विचारात घ्यावा असे मत नांदविले. महानगरपालिकेस या प्रकरणात संबंधिताच्या बाजुने न्यायालयीन निर्णय झालयास विनार्शत व विना मोबदला हक्क सोडावा लागला असता. परंतु तडजोड करतांना महानगरपालिका प्रशासनाने महानगरपालिकाच्या हिताचे दृष्टीने २५% बांधकाम विना मोबदला मिळकतधारकांकडुन बांधुन घेण्याच्या अटीवर विचार केला. महानगरपालिकेच्या हिताचा विचार करुन प्रशासकीय निर्णय झाल्यानंतर मुंबई प्रांतिक महसुल अधिनियम १९४९ चे कलम ४८१ अन्वये कोणत्याही न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने तडजोड करण्यासाठी स्थायी समितीची मान्यता आवश्यक असल्याने स्थायी समितीच्या दि. १६-१०-९८ च्या बैठकीत हा तडजोड प्रस्ताव सादर केला, असता त्यास ठराव क्र. ३१९/६ ने मान्यता देण्यात आलेली. आहे.

जयहिंद कॉलनी, शारदाश्रम कॉलनी या संस्थेच्या सभासदामध्ये काही अंतर्गत वाद असल्यास त्याने समक्ष न्यायालयाच्या २ कडुन अथवा समक्ष कार्यालयाकडुन सोडविणे आवश्यक होते. परंतु संस्थेतील सभासदाने महानगरपालिकेला या गृहनिर्माण संस्थेवर दबाव आणण्यासाठी माध्यम म्हणुन वापरण्याचा प्रयत्न केला असे दिसते. कारण कोणतेही ठोस व सबळ कागदोपत्री पुरावे न देता केवळ अर्ज देवून महानगरपालिकाकडुन या प्रकरणी त्यांना अपेक्षित असेल अशी कार्यवाही व्हावी अशी धारणा ठेवणे चुकीचे आहे.

या कार्यालयाने न.भु.क्र. १७८०४ व दिलेली बांधकाम परवानगी ही महानगरपालिकाच्या हिताचा विचार करुन व लोक नियुक्त सभासदाच्या स्थायीसमितीपुढे कार्यदेशीर तरतुदीप्रमाणे मांडून व समितीची रितसर मान्यता घेवून दिलेली आहे. व या प्रकरणी झालेली कार्यवाही योग्य व पारदर्शी आहे.

स्वाक्षरीत/-
उप संचालक नगररचना,
महानगरपालिका, औरंगाबाद.

**<u>टिप्पणी</u> :-**

विषय : भुसंपादन औरंगाबाद.
क्रांतीचौक ते पैठणगेट (सिल्लेखाना चौका पर्यंत)
१०० फुट रस्ता रुंदीकरणासाठी मालमत्ता संपादना बाबत भूसंपादन कायदा. १९९४ अन्वये कार्यवाही......

औरंगाबाद शहराच्या विकास योजना आरखडा महाराष्ट्र शासनाने ठराव क्र. गुडी/पी.एस.डी./ॲन्ड हौसिंग डिपार्टमेंट/एस.डी/३०६७-२२९६३/डब्ल्यु, दिनांक २४-४-१९६९ व क्रमांक टि.पी.एस.-३०७३-४९५८/डब्ल्यु-दिनांक ६-१-१९७५ अन्वये मंजुर केला असुन त्यामध्ये क्रांतीचौक ते पैठणगेट हया रस्त्याची रुंदी १०० फुट दर्शविलेली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेने ठराव क्रमांक ८३९, दि. १६-१-९८ रोजी सदर रस्ता रुंदीकरणाची कार्यवाही हाती घेतली त्याप्रमाणे जा.क्र.ड.व.प्र/नरवि/भुसं/४७६/८७, दिनांक २०-२-८८ अन्वये तसा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे सादर केला होता. सदर प्रस्ताव भुसंपादनाची पुढील कार्यवाही पार पाडणेस्तव विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांचेकडे मा. जिल्हाधिकारी, यांनी त्यांचे आदेश क्रमांक ८८/अरबी-डेस्क-२//एलब्क्यु/कवि/२७८, दिनांक ६-४-१९८८ अन्वये सुपुर्त करण्यांत आला.

या संदर्भात भुसंपादन कायद्याच्या तरतुदीनुसार सर्व कार्यवाही पार पाडून व प्रारुप निवाडयास मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडुन मंजुरी घेऊन दिनांक २५-२-९४ रोजी अंतिम निवाडा जाहिर करण्यांत आला. त्याप्रमाणे सर्व संबंधितांस भुसंपादन कायद्याच्या कलम १२ (२) अन्वये तसेच कलम १६ अन्वयेच्या ताबा घेण्याबाबतच्या सुचना दिनांक २-३-९४ रोजी बजावण्यात आल्या. त्यानुसार दिनांक ८-३-९४ रोजी संपादनांतर्गत ८ मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा ही घेण्यात आला.

प्रस्तुत भुसंपादनांतर्गत सुरुवातीस संयुक्त मोजणी नुसार एकुण ३८ मिळकती रस्ता रुंदीमुळे बांधित दाखविण्यात आल्या होत्या. पैकी ४ मिळकती हया शासकीय मालकीच्या असल्याचे लक्षात आल्यावरुन त्या अंतिम निवाडयातुन वगळण्यांत आल्या. त्या बाबत महानगरपालिकेस मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे तर्फे शासकीय जमिनी हस्तांतर करुन घेणे बाबत कळविले आहे व त्यानुसार कार्यवाही चालू आहे.

निवाडयाती (३४) मिळकती पैकी (८) मिळकतीचा ताबा दिनांक ८-३-९४ रोजी घेण्यात येऊन महानगरपालिकेत दिला आहे. दरम्यान वरील मिळकती पैकी (१४) मिळकत धारकांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठात क्रमांक २९३५/१० अन्वये एक याचिका दाखल करुन सदर रस्ता रुंदीकरणास आव्हान दिले होते. (श्री. मुजलिम खॉन व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन) सदर याचिकेच्या सुनावणी नुसार हया चौदा मिळकतीचा ताबा घेण्यास मा. उच्च न्यायालयाने दि. ११-१०-९९ रोजी स्थागिती आदेश दिला होता. त्यावर दिनांक ४-५-९९ रोजी खंडपिठात पुन्हा सुनावणी होऊन सदर स्थगिती आदेश उठविण्यांत येऊन याचिका फेटाळण्यांत आली. सदर याचिका निवाडा दिनांक २५-२-९४ रोजी जाहीर झाला असल्याने तसेच मंजुर विकास योजनेच्या आराखडया नुसारच भुसंपादन प्रस्ताव सुसंगत असल्याचे मत प्रतिपादले होते.

मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांक ४-५-९९ च्या आदेशानुसार पुढील भुसंपादन कार्यवाही महानगरपालिकेकडे विचारणा करण्यात आल्यावरुन रुपये ५६,५३,८८२/- (लाख) नुकसान भरपाई पोटी भुसंपादन अधिकारी यांचेकडे जमा करण्यात आल्यावर पुन्हा सर्व संबंधितांना मिळकतीचा ताबा देण्यासाठी सुचना बजावण्यात येऊन दिनांक ७-९-९९ रोजी ताबा घेण्याचे ठरविण्यात आले होते, सदर दिवशी आणखी दोन मिळकतीचा ताबा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आला परंतु हयाच दिवशी मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंड पिठामध्ये (श्री. नवनितदास मालानी व इतर सहा विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर याचिका क्रमांक ४४०९/९९ दाखल होऊन ताबा घेण्यास प्रतिबंध करण्यास आव्हाण देण्यात आले. सदर याचिकेची कार्यवाही दिनांक ७-९-९९ ते १६-९-९९ पर्यंत चालुन मा. उच्च न्यायालयाचे खंड पिठाने अंतिमतः दिनांक १६-९-९९ रोजी सदर याचिका फेटाळली असुन प्रतिवादांची ताबा घेण्यात थोडा अवधी देण्याची विनंती देखील अमान्य करण्यात आली आहे.

सदर याचिका फेटाळतांना मा. खंडपीठाने "औरंगाबाद शहराची सर्वदूर वणिज्य व औद्योगिक दृष्टया विकासाची वाढत गती पहाता व सर्वच मुख्य रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण लक्षात घेता सन १९७५ साली मंजुर झालेल्या विकास योजनेतील हया १०० फुट रुंद रस्त्याची रुंदी सुधारीत विकास योजनेस सन १९९९ मध्ये मंजुरी देताना शासन १०० फुटापेक्षा कमी करण्याचा प्रस्ताव मान्य करण्याची शक्यता वाटत नसल्याचे मत प्रतिपादन करतानाच सदर रस्त्याची रुंदी आज २५ वर्षानंतर किमान १०० फुट ठेवणेच आवश्यक असल्याचे मतही व्यक्त केली आहे.

त्यानुसार दिनांक २८-९-९९ रोजी उर्वरित २३ मिळकतीचा ताबा सक्तीने घेण्यासाठी सर्व संबंधितांस सुचना देण्यांत आल्या होत्या.

परंतु पुरेसा पोलिस बंदोबस्त निवडणुकीच्या बंदोबस्तामुळे उपलब्ध होऊ शकते. नसल्याचे मा. पोलिस आयुक्त, औरंगाबाद यांनी कळविल्यामुळे व सदर ताबा घेताना कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता असल्याने ताबा घेण्याची आजची दिनांक २८-९-९९ रोजी कार्यवाही स्थगित ठेवण्यात आली.

स्वाक्षरीत/-
उप संचालक नगररचना,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १०-१२-९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**शुक्रवार दि. १०-१२-९९ रोजी मा. सभापती श्री. नरसिंग मुरलीधर ढगे यांच्या अध्यक्षते खाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर" स्थायी समिती सभागृह येथे दुपारी ३.०० वाजता "वंदेमारतरम्" या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्ग यांच्या सह खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | स.सदस्य |
| २) | स.स.श्री. बचाटे राजकुमार (मामा) | --//-- |
| ३) | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर | --//-- |
| ४) | स.स.श्री. स.अ.एकबालोद्यीन स.मो. कुतुबुद्दीन | --//-- |
| ५) | स.स.सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ६) | स.स.श्री. विखारोद्यीन पि. खुदबोद्यीन | --//-- |
| ७) | स.स.श्री. अजीजखॉ गणीखॉं | --//-- |
| ८) | स.स.श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ९) | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | --//-- |
| १०) | स.स.श्री. वसंत विनायकराव देशमुख | --//-- |
| ११) | स.स.सौ. लता दलाल श्रीनिवास | --//-- |
| १२) | स.स.सौ. विमल नंदकुमार मुंडलीक | --//-- |
| १३) | स.स.श्रीमती. गंगवाल पुष्पाताई रमेशचंद्र | --//-- |

**संवाद :**

**श्री. विकास जैन :** मागील स्थायी समिती बैठकीत आपण आदेशित केल्यानुसार ज्या इस्टेमेटसना मंजुरी दिलेली होती ती निविदा काढण्यासाठी गेली का?

**श्री. स.अ.एकबालोद्यीन स.मो. कुतुबुद्यीन :** अधिकारी बैठकीस उपस्थित नाहीत त्यांना सभेची वेळ माहित नाही का?

**मा. सभापती :** सर्वाना वेळ कळविलेली आहे. परंतु ते बैठकीची ते वेळ वाचत नसावेत असे दिसते. सर्व अधिकाऱ्यांनी बैठकीस वेळेवर उपस्थित राहण्याची नोंद घ्यावी. मागील बैठकीत ठरल्यानुसार मंगळवारी आयोजिलेली बैठक काही कारणामुळे आज घेण्यात येत आहे. नगररचना विभागाचे पुरविलेली माहिती पुस्तिका सर्वाना देण्यांत आलेली आहे. चर्चा करावयाची असल्यास प्रथम या पुस्तीकेवर चर्चा करण्यात येईल.

**सौ. लता दलाल :** नगररचना विभागासी संबंधित अनेक प्रश्नांचा पाठपुरावा अनेक दिवसांपासुन करण्यात येत आहे. बऱ्याच ठिकाणी बेटरमेंट चार्जेस भरलेले नाहीत. न्याल्यात ले आऊट टाकलेले आहेत. काय याची माहिती मागितलेली होती. या पुस्तिकेत १९७३ च्या ले आऊट बाबत माहिती दिलेली आहे. सीटीसर्व्हे नंबर २०-५-९२ मधील ले आऊटची माहिती वेळोवेळी मागितलेली आहे परंतु या पुस्तिकेत त्याचा कोठेही उल्लेख नाही. ही माहिती का दिली जात नाही. सदरचा ले आऊट हा जुलेखा बेगम यांच्या

नावावर असुन नाल्याच्या जागेत लेआऊट टाकण्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. सदरच्या जागेच्या एफएसआय देता येतो का? या लेआऊटबाबत डेप्युटी डायरेक्टर यांच्याकडुन आलेल्या पत्राचा खुलासा करण्यात यावा. १९८९ पासुन या लेआऊट बाबत मी प्रश्न विचारात आहे. असे असतांनाही या लेआऊटमध्ये बांधकाम परवानगी कशी देण्यात येते. ले आऊटची ओपन स्पेस किती, सद्यस्थितीत तेथे ओपन स्पेस किती याचा खुलासा व्हावयास पाहिजे. रिवाईज्ड ले आऊटमध्ये ओपनस्पेस किती दाखवली आहे. १९९४-९५ च्या पुर्वीच्या लेआऊटमध्ये १५% ऐवजी ५% जागा वगळुन बांधकाम परवानगी द्यावी असा जी.आर आहे कायद्याचाही खुलासा व्हावा.

**उपसंचालक नगररचना :** नगररचना विभागाकडे उपलब्ध असलेल्या रेकॉर्डवरुन सदरची माहिती बनविण्यात आलेली आहे. जुलेखा बेगम यांचा ले आऊट १९८६-८७ मध्ये मंजुर झालेला आहे. सिटी सर्व्हे कार्यालयाकडील रेकॉर्ड प्रमाणे तो मंजुर करण्यात आलेला आहे. ही जागा फोर्ट वॉलच्या अलिकडची आहे. या नाल्याची रुंदी १० मीटर आहे. मध्यंतरीच्या काळात शासनाने कोल्हापुर महानगरपालिकाचे बायलॉज ॲडाप्ट करा असे सुचविले होते. याच धर्तीवर प्रस्ताव तयार करुन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला, ज्यास शासनाने १९९२ मध्ये मंजुरी दिली. अशा १४ लेआऊटच्या बाबत यादी दिलेली आहे. शासनाने कोणत्या वर्षापासुन याचा अवलंब करावा असे स्पष्ट म्हटलेले नाही.

**सौ. लता दलाल :** एखादी सोसायटी स्थापन झाल्यानंतर व सर्व प्लॉटस् विकले गेल्या नंतर लेआऊटच्या मालकाचा त्याठिकाणी काय हक्क राहतो. मग त्या मालकास ५% जागा कशी देण्यात आली.

**श्री. राजकुमार बचाटे :** ले आऊटमध्ये ज्या जागा खुल्या ठेवल्या जातात त्याची नोंद महानगरपालिकाकडे करण्यात येते का? लिजवर ज्या जागा देण्यात येतात त्याची नोंद कोठे होते. काही मोकळया जागावर अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत याची माहिती मिळु शकेल का?

**मा. सभापती :** आपल्या प्रश्नावर प्रशासन माहिती देईल. आज विषयावर आपण बैठक घेत आहोत तो प्रश्न वेगळा आहे.

**श्री. वसंत देशमुख :** स.श्री. बचाटे यांचा प्रश्नही आजच्या बैठकीस अनुसरुनच आहे. नगररचना विभागाच्या प्रश्नावर एक स्वतंत्र बैठक घेण्यात यावी कारण हे शहरासी निगडीत प्रश्न आहेत.

**सौ. लता दलाल :** नगररचना विभागाकडुन देण्यात आलेले बुकलेट अर्धवट आहे. जुन १९९९ पासुन एन.ए. बाबत निर्णय झालेला आहे. परंतु त्या पुर्वीच्या परमिशनसाठी एन.ए.आवश्यक होता. एकुण रेखांकनाचे क्षेत्र किती, खुली जागा किती सोडलेली आहे याबाबत मी माहिती मागितली होती. वेलकम नगरास एन.ए.परवानगी नसतांना १९९८ मध्ये मंजुरी देण्यात आलेली आहे. एन.ए.नसतांना किती ले आऊटना परवानगी देण्यात आलेली आहे.

**मा. सभापती :** स्थायी समितीच्या रेग्युलर बैठकी व्यतिरिक्त अशा प्रकरणात विशेष बैठक लावण्याची तरतुद नाही. परंतु आपण काही विषयावरती बैठक घेऊन त्यात

या प्रश्नांवर आपण चर्चा करु शकु तथापी शनिवारी इतर विषयाबरोबरच या विषयावर बैठक घेण्यात येईल.

**श्री. विकास जैन :** एस्टीमेटस् मंजुर झाल्यानंतर शॉर्ट टेंडर नोटीस काढावी अशी आपण रुलिंग दिली होती. महानगरपालिकेची निवडणुकीची आचार संहिता लागण्यापुर्वी कामे सुरु व्हावीत आपण याबाबत सर्वाना सुचना दयाव्यात.

**मा. सभापती :** मागील बैठकीत याबाबत निर्णय दिला होता सर्व कार्यकारी अभियंत्यानाही मी व्यक्तिशः तशा सुचना दिलेल्या होत्या प्राप्त माहितीनुसार जवळपास सर्वानीच टेंडर्स तयार केलेले आहेत. इतिवृत्ताची वाट न पाहता बैठकीत झालेल्या चर्चेनुसार सर्वानी कार्यवाही करावी. टेंडर्स लवकरात लवकर काढण्यात यावेत.

**सौ. राधाबाई तळेकर :** केसरबाई देविदास चौधरी यांनी जवाहर कॉलनी वॉर्ड नं. ७४ मधील महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमन केल्याबाबत मी मागील ७-८ बैठकांपासुन सागत आहे. १९८८ पासुन या प्रकरणात काहीही माहिती दिली जात नाही ही जागा नक्की कोणाची आहे. याची माहिती दिली नाही. कालपरवाच एक पत्र मिळाले आहे त्यात लिहिले आहे कार्यवाही चालु आहे. याचा खुलासा व्हावा.

**प्रशासकीय अधिकारी :** हे पत्र नगररचना विभागाकडुन आलेले आहे ही जागा महापालिकेची आहे पत्रात चौधरी यांची नगरभुमापन क्र. १५३५९/३४ असा दिला आहे. नगर भुमापन कार्यालयासी संपर्क साधुन प्रकरणात पुढील कार्यवाही करण्यात येईल. संबंधिताने न्यायालयातुन आणलेला मनाई हुकुम महानगरपालिकेचा आरक्षित भुमापन क्रमांक एकच आहे काय हे तपासुन पाहुन प्रकरणात तात्काळ कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** न्यायालयाचा मनाई हुकुम त्याचे सी.स.नं.व जायमोकयावरील जागेचे सी.स.नं. याची तपासणी लवकर करण्यात यावी व खात्री करुन घ्यावी.

**श्री. वसंत देशमुख :** मुस्लीम बांधवाचा पवित्र रमजान महिना सुरु झालेला आहे. माझ्या व माझ्या वार्डाच्या वतीने त्यांना शुभेच्छा देतो. शहरात रस्त्याच्या डांबरीकरणासाठी उबर, खडी व इतर जे साहित्य आणले जाते त्यावर पुर्ण जकात घेतली जात नाही. एकाच पावतीवर दिवसभरात अनेक ट्रक्स येतात त्यामुळे मोठया प्रमाणावर जकात बुडते, वर्षभरात शहरात महानगरपालिकेने किती रस्त्यांची कामे केली, त्यासाठी किती साहित्य लागले व प्रत्यक्षात यापासुन किती जकात मिळाली याची माहिती देण्यात यावी या प्रकरणात बऱ्याच मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला दिसुन येईल.

**मा. सभापती :** मागील वर्षात अशाप्रकारे किती जकात वसुली झाली याची माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी हा महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रश्न आहे.

**श्री. स.अ. एकबालोद्दीन स.मो. कुतुबुद्दीन :** माझ्या वॉर्डात टेलीफोन डिपार्टमेंटने रस्ते खोदुन ठेवलेले आहेत. त्यांच्या दुरुस्तीबाबत मी वेळोवेळी विचारणा केलेली आहे. मात्र त्यांची दुरुस्ती होत नाही. याबाबत ५ लाखाचे एस्टीमेंट बनवून डिपार्टमेंटकडे पाठविले होते त्याचे काय झाले.

**सौ. लता दलाल :** टेलीफोन डिपार्टमेंटने रस्ते खोदल्यानंतर त्यांच्या डागडुगीसाठी येणारा पुर्ण खर्च त्यांनी द्यावयास हवा रस्ते दुरुस्तीसाठी प्रत्यक्षात येणारा खर्च व मिळणारी रक्कम यात मोठी तफावत आहे. यासाठी एखादा अधिकाऱ्याकडे

हे काम पुर्णत: देण्यात यावे. नविन रस्ते झाल्या बरोबर ते खोदले जाऊ नयेत टेलीफोन डिपार्टमेंटचे काम झाल्याबरोबरं मनपाने तो रस्ता दुरुस्त करुन घ्यावा. टेलीफोन विभागाला ६-७ लाखाचे बिल दिले तर १-२ लाख भरतात व त्याची झेरॉक्स करुन सर्व नगरसेवकांना दाखवतात.

**उपअभियंता (बा.)** : पुर्वी टेलीफोन डिपार्टमेंट रस्ते खोदतांना महापालिकेची परवानगी घेत असे परंतु काही ठिकाणी महापालिकास न कळवता त्यांनी रस्ते खोदले आहेत. अशी काही प्रकरणे निदर्शनास झाली असता मी कामाच्या ठिकाणची ५०-६० टोपली फावडे जप्त केली आहेत हे लोक बऱ्याच वेळा रात्री खोदतात. टेलीफोन विभागाकडे आतापावेतो अशा प्रकारच्या कामासाठी ३० लाखाचे बिल वाढवले आहे. त्यांनी १.१० लाखाचा चेक दिलेला आहे. अनाधिकृत खोदकामा संदर्भात पोलिस स्टेशन मध्येही एक तक्रार दाखल केलेली आहे.

**मा. सभापती :** महापालिकेच्या परवानगी शिवाय टेलीफोन डिपार्टमेंटने रस्ते खोदल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा महानगरपालिकेच्या एस्टीमेटची प्रमाणे त्यांच्याकडुन पैसा वसुल करुन घेण्यात यावा.

**श्री. वसंत देशमुख :** आतापर्यंत आलेल्या कामाची व एस्टीमेंटची यादी मागविण्यात यावी दोन्ही विभागात समन्वयाची भावना असणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** मा. आयुक्तांनी याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

**श्री. विखारोद्दीन :** शहरात ५२ अधिकृत झोपडपट्या आहेत झोपडपट्टयातील जागाचा सीटीसर्व्हे होत नाही त्यामुळे जागेचे नामांतर होत नाही सर्वसाधारण सभेत हा विषय मंजुर झालेला आहे. मालमत्तांचे नामांतर करण्यात यावे.

**मा. सभापती :** हा विषय स्थायी समितीच्या कक्षे बाहेरचा आहे. सर्वसाधारण सभेत या संदर्भाने काही निर्णय झाला असेल तर प्रशासनाने त्यावर कार्यवाही करावी.

**श्री. विकास जैन :** शहरात मोठमोठे होर्डींग्ज लावले जातात. अशा होर्डींगजवर कर लावण्यात यावा त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडु शकेल अशा बोर्डसना महानगरपालिका तर्फे परवानगी देण्यात यावी. विना परवाना बोर्डस् काढुन टाकण्यात यावेत.

**श्री. वसंत देशमुख :** स्वच्छ औरंगाबाद मोहिमे अंतर्गत जालना रोडवर काही बोर्डस लावले आहेत या मोहिमेतील बरेचसे बोर्डस् खराब झालेले आहेत. या बोर्डसमुळे अपघात होऊ शकतात ते काढुन घेण्यात यावेत.

**श्री. स.अ. एकबालोद्दीन :** या मतासी मीही सहमत आहे.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** स.स. विकास जैन यांच्या मतासी मी सहमत आहे. महापालिकेच्या आर्थिक प्रश्ना संदर्भाने त्यांनी काही सुचना माडल्या आहेत त्याची अंमलबजावणी करण्यात यावी सिडको प्रशासनाने अशा होर्डींग्जसाठी जागा निश्चित करुन दिलेल्या आहेत व त्यावर ते कर लावत आहेत त्याच धर्तीवर काही एजन्सीज ठरवून होर्डींग्ज लावण्याची परवानगी देण्यात यावी व अशा होर्डींग्जवर कर लावण्यात यावा. यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात भर पडेल ठराविक आकाराचे बोर्डस् लावण्यासच परवानगी देण्यात यावी यात राजकीय पक्षाचे बार्डस असले तरी त्यांच्याकडुन कर घेण्यात यावा.

**श्री. अजीजखॉ गणीखॉ :** यासाठी पोलिसांची एनओसी घेण्यात यावी.

**मा. सभापती :** राजकीय पक्षांनी बोर्डस् लावतांना महानगरपालिकेची परवानगी घ्यावी व महानगरपालिकेने लावलेला कर भरावा. राजकीय पक्षासह व्यावसायीक जाहिरातींच्या बोर्डस्वर कर लावण्यात यावा.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** मागील वर्षी महानगरपालिकाचे १०१ कोटीचे अर्थसंकल्प बनविण्यात आला होता यात शासकीय अनुदानाचाही समावेश होता शासनाकडुन मोठया प्रमाणावर अनुदान येणे बाकी आहे. अनुदान मिळत नाही तोपर्यंत निविदा काढल्या जाणार नाहीत महानगरपालिकेच्या निवडणुका समोर आलेल्या आहेत आचार संहितेच्या काळात शासकीय अनुदान आले तरी त्याचा विनीयोग होऊ शकणार नाही पर्यायाने शहर वासीयांना पुरेशा सुविधा मिळु शकणार नाहीत. शासकीय अनुदान मिळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात यावेत. महानगरपालिकेस मालमत्ता व जकात कराच्या माध्यमातुन उत्पन्न मिळत असते आर्थिक वर्ष संपण्यासाठी तीन महिन्याचा कालावधी उरलेला आहे. आतापर्यंत किती जकात वसुली झाली याची माहिती देण्यात यावी. जकात विभागातील किती चेक बाऊन्स झाले, किती चेकच्या रकमा येणे बाकी आहे याचीही माहिती देण्यात यावी.

**मा. प्र. आयुक्त :** या आर्थिक वर्षासाठी ४८ कोटीचे जकात कराचे उद्दीष्ठ निश्चित करण्यात आले होते मालांवर जकात कर वाढविण्यात आला होता परंतु त्यास अद्याप शासन मिळालेली नाही. आतापर्यंत जकात कराची २८.८० कोटीची वसुली झालेली आहे. येत्या तीन महिन्यात कर वसुलीचे उद्दीष्ट पुर्ण होईल अशी आशा आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** जकात कराचे ४८ कोटीचे नाही तर ५२ कोटीचे उद्दीष्ट दिले होते. किती प्रस्तावावर शासनाकडुन मंजुरी आल्यानंतर अंमलबजावणी केली जाते.

**मा.सभापती :** सर्वसाधारण सभेने काही मालावर जकात करवाढ केली होती. जकात वसुली व बाऊन्स चेकची माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी.

**श्री. विखारोद्दीन :** ५ कोटी रुपये प्रत्येक महिण्यात वसुल होतील काय?

**मा. सभापती :** येत्या तीन चार महिन्यात जवळपास १९ कोटी रुपये वसुल करणे अशक्यप्राय वाटते. दिलेले उद्दीष्ट पुर्ण करण्याची प्रशासनाने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात व दिलेले टार्गेट पुर्ण होतील काय?

**श्री. काशिनाथ कोकाटे :** शासनाकडे पाठपुरावा करुन वाढीव जकात कर वाढीच्या प्रस्तावास मंजुरी आतापावेतो दयावयास हवी होती यासाठी एखादा सक्षम अधिकारी नियुक्त करण्यात यावा व त्या अधिकाऱ्यांने शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावांचा पाठपुरावा करावा.

**मा. सभापती :** आपले बरेचसे प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी जातात परंतु त्यांच्या वेळेवर पाठपुरावा करावयास हवा स.स.कोकाटे यांच्या सुचनेवर प्रशासनाने गांभीर्याने विचार करुन अशी एखादी नियुक्ती करता येत असेल तर करावी.

**सौ. लता दलाल :** औरंगपुरा येथील युरीनल बाबत मागील बैठकीत प्रश्न विचारला होता. ८-१० दिवसात नविन युरीनलचे बांधकाम पुर्ण करण्यात येईल असे सांगितले होते. अशातच वृत्तापत्रात एक बातमी आली आहे काही संतप्त महिलांनी ते बांधकाम तोडले परंतु ही बातमी चुकीची आहे, ज्यांनी नविन युरीनलचे बांधकाम तोडले असेल त्यांच्या विरुध्द गुन्हा नोंदविण्यात यावा. जुने युरीनल तात्काळ पाडण्यात यावे.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** युरीनलचे बांधकाम तोडण्यास कोणी प्रोत्साहन दिले याची चौकशी व्हावयास हवी पुर्वीचे युरीनल तोडु नये असा कोणाचा प्रयत्न आहे काय, असल्यास त्यांना चर्चेसाठी बोलवुन समन्वयाने मार्ग काढावा.

**सौ. लता दलाल :** जुने युरीनल तोडण्याचा उद्देश केवळ हाच की, २५ वर्षापुर्वी या भागात एवढया मोठया प्रमाणात बाजार, गर्दी, मंगळ कार्यालया नव्हते हे युरीनल एकदम रोडवर असल्याने ते तोडण्याची मागणी केली होती ही मागणी सामाजिक दृष्टीकोनातुन करण्यात आली होती याचा विचार व्हावा.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** स.सदस्यांच्या भावनेशी आम्ही सहमत आहेत. हा प्रश्न त्वरीत निकाली निघाला पाहिजे.

**सौ. लता दलाल :** जुन्या युरीनलच्या जागेवर कर्मचाऱ्यांसाठी हजेरी सेंटर बांधण्यात यावे.

**शहर अभियंता :** या भागातील काही लोकांचा हे युरीनल तोडण्यासाठी विरोध आहे.

**मा. सभापती :** औरंगपुरा भागातील जुने युरीनल लवकरात लवकर तोडण्यात यावे. ज्यांचा यासाठी विरोध असेल त्यांना चर्चेसाठी बोलवुन घेण्यात यावे. याचबरोबर जे जाहिरात बोर्डस रस्त्यावर रहदारीस अडथळा करत असतील ते काढण्यांत यावेत.

**श्री. राजकुमार बचाटे :** चौसरनगर भागात सार्वजनिक शौचालय आहे. त्याचे पत्रे दारे चोरीस गेलेली आहेत. तेथील ड्रेनेज लाईनही तोडलेली आहे. त्याची चौकशी व्हावी.

**मा. सभापती :** शहरातील स्लम भागात महानगरपालिकेने शौचालये बांधून दिलेली आहेत ड्राय लॅट्रीनची स्कीमही महानगरपालिकेने राबविली होती. प्रियदर्शनी इंदिरानगर भागातही शौचालयाची अशीच परिस्थिती आहे. परंतु हे प्रकार कोण करतो हे शोधणे कठीण आहे. अशा ठिकाणी वॉचमन ठेवणेही शक्य नाही. त्या भागातील नागरिकांनीच अशा प्रकारची दखल घ्यावयास पाहिजे. तेथील लोकांनी महानगरपालिकेकडे अशा व्यक्ति बाबत तक्रार केल्यास महानगरपालिका त्यावर कार्यवाही करेल. महानगरपालिकेने हे उपक्रम सामाजिक भावनेतुनच राबविलेले आहेत.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** त्या-त्या भागातील नागरिकांवर याची जबाबदारी टाकण्यांत यावी.

**सौ. लता दलाल :** या योजनेवर ४३ लाखाचा खर्च झालेला आहे. ही योजना चांगल्याप्रकारे राबविली जावी. हा शासनाचा उद्देश होता. ही योजना स्वंयसेवी संस्थाकडुन राबविण्यात यावी. असेही शासनाचे निर्देश होते. तथापी महानगरपालिकेने मात्र एका प्रतिथ यश कंत्राटदारास दिले. स.स.श्री.गौतम खरात व गौतम लांडगे यानीही हे काम बरोबर होत नसल्याबाबत आयुक्तांकडे तक्रार केली होती. परंतु प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले. संबंधीत कॉन्ट्रक्टरला बोलवून चौकशी करण्यांत यावी.

**मा. सभापती :** माझ्या वार्डातही झोपडपट्टी आहे. त्या भागातही ३-४ ठिकाणी संडासांचे बांधकाम झालेले आहे. प्रशासनाने कामांची काळजी घ्यावी.

**विषय क्र. ४१२/१ :**

दिनांक ३-१२-९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

**सौ. विमल मुंडलिक :** दिनांक ३-१२-९९ चे इतिवृत्त पृष्ठ क्र. ३५ वरती दुरुस्ती सिडको पी-१ जी-२ मयुरनगर, नाथनगर,स्किम मध्ये जी, एच.के,एफ. या भागातही ५ वर्षापासुन पाणी नव्हते. या भागातील नागरिकांना पाणीपट्टी माफ करण्यांत यावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** काही लोक पाण्याच्या बिला संदर्भाने कोर्टात गेलेले आहेत. तत्कालीन मा. आयुक्त, भोगे साहेबांनी तोंडी आदेश दिले होती की, या भागात पाणी पुरवठा झाला नाही म्हणुन तीन वर्षाची पाणीपट्टी घेण्यात येवू नये. परंतु तसा ठराव झालेला नाही. काही लोकांनी बिले भरलेली आहेत. या भागास पाणी मिळालेले नाही हे पाहुन कोर्टाने तसा निकाल दिलेला आहे. पी-१ जी-२ भागातील ८८२ घरांना पाणीपट्टी आकारु नये असा ठराव आहे. जी.एच.के.एफ. सेक्टरमधील घरांचीही अशी तक्रार आहे. आपण जेव्हापासुन पाईपलाईन टाकली आहे. तेव्हापासुनच बिल घेण्यांत यावे. एन-७ भागात ४ घरात एक स्टॅंडपोस्ट आहे. त्याचेही बिल आकारण्यात येते. या भागात कोणासही वैयाक्तिक कनेक्शन दिलेले नाही सिडकोने पत्र दिले आहे. तेव्हा या स्टॅंडपोस्टवर कर आकारण्यात येऊ नये. गेल्या सहा वर्षापासुन सिडको भागातील एन-११, मयुरनगर, जी.एस.के. एफ मधील ज्यांच्या तक्रारी आहेत त्यांची पाणीपट्टी माफ करावे. कोर्टाच्या निकालप्रमाणे सर्व गाळेधारकाना पाणीपट्टी माफ करावी. दोन घरे एकाच मालकाच्या नांवे आकारावी कारण ते एकच घराचे नळ कनेक्शनसाठी पट्टी देऊनही प्रशासनाने यावर कार्यवाही केलेली नाही. असे पत्र देऊनही प्रशासनाने यावर कार्यवाही केलेली नाही. असे अर्जही निकाली काढण्यात यावेत.

**श्री. राजु इंगळे :** एन-७ विभागीय कार्यालयातुन अशा प्रकारच्या प्रत्येक ॲप्लीकेशनवर स्वतंत्ररित्या फाईल चालविली जाते, सर्व संचिका एकत्रच चालवाव्यात व निकाली काढाण्यात.

**मा. सभापती :** या प्रश्नावर २-३ वेळा चर्चा झालेली आहे. स.स. घडामोडे यांनीही हा विषय वारंवार काढलेला होता. मी कार्यकारी अभियंता यांच्याशीही चर्चा केली होती. काही नागरिकांनाच वेगळी वागणुक देऊ नये. नागरिकांना न्याय देणारी कार्यवाही उपआयुक्तांनी करावी.

**प्र.आयुक्त :** उपआयुक्त (म) सर्व प्रकरणे तपासुन घेतील एखाद्या विशिष्ट भागात पाणी आले होते की, नाही याचा अभिप्राय संबंधित उपअभियंता यांचेकडुन घेतील व निर्णय घेतील.

**मा. सभापती :** तत्कालीन आयुक्त मा. भोगे व वैद्य साहेबांनी या भागाची पाहणी केली होती. या भागातील नागरिकांना पाणी मिळाले नाही म्हणुन त्याची बिले माफ व्हावयास हवीत एक एक वैयक्तिक प्रकरणात कार्यवाही न करता सर्व प्रकरणात एकत्रित कार्यवाही करण्यांत यावी.

**श्री. वसंत देखमुख :** मागील बैठकीत मी महानगरपालिकेमध्ये मानधनावर घेतलेल्या अधिकाऱ्यांबाबत माहिती विचारली होती. या अधिकाऱ्यांच्या सेवेमुळे महानगरपालिकेस नक्की काय फायदा होतो. त्यांच्याकडुन महानगरपालिकेस काही फायदा नसेल तर त्यांना कमी करण्यांत यावे.

**मा. सभापती :** महानगरपालिका अस्थापनेवर श्री. वर्दे यांना तांत्रिक सल्लागार व श्री. कुलकर्णी यांना अग्निशमन सल्लागार म्हणुन घेण्यात आलेले आहे. त्यांच्या नियुक्ती माधनावर मा. आयुक्तांनी केलेल्या आहेत. मा. आयुक्त आल्यानंतर त्यांच्याशी या प्रश्नावर चर्चा केली जाईल.

**श्री. विखारोद्दीन :** पैठणगेट ते क्रांतीचौक रस्त्यात बाधीत होणाऱ्या मालमत्ता संपादनाचे कार्यवाही बाबत मी वेळोवेळी प्रश्न विचारत आहे. या मालमत्तांचे पजेशन आपण केव्हा घेणार याबाबत आपण केव्हा निर्णय घेणार आहोत.

**उपसंचालक नगररचना :** मालमत्तांचा ताबा घेण्यासाठी गेलो असता पोलिस बळ व तहसिलदार नसल्याने तो घेता आला नाही आता संबंधितांना परत नोटीसा द्याव्या लागतील.

**मा. सभापती :** दि. ३०-११-९९ रोजी भुसंपादन अधिकारी यांचे पत्र आलेले आहे. परंतु तहसिलदार व पोलिस न आल्याने मालमत्तांचा ताबा घेण्यात आला नाही.

**मा.प्र.आयुक्त :** न्यायालयीन निर्णयाप्रमाणे भुसंपादन अधिकारी यांचेकडे रक्कम भरलेली आहे. लँड ॲकबोजीशन ऑफीसर या जागांचा ताबा घेऊन तो महानगरपालिकेस देतील. दोन वेळा महानगरपालिका अधिकारी ताबा घेण्यासाठी गेले होते तथापी, तहसिलदार व पोलिस बंदोबस्त न आल्याने ताबा घेतला गेला नाही. भुसंपादन अधिकाऱ्यांनी ताबा दिला तर महानगरपालिका तो घेण्यास तयार आहेत.

**श्री. वसंत देशमुख :** भुसंपादन अधिकारी यांना बैठकीत बोलविण्यात यावे.

**मा. सभापती :** मा. आयुक्तांनी विशेष भुसंपादन अधिकारी यांच्याशी चर्चा करुन लवकरात लवकर या मिळकतीचा ताबा घ्यावा.

**श्री. विखारोद्दीन :** गुलमंडीवरती रिझर्वेशन झोनमध्ये बांधकाम चालु आहे. त्यांनी बांधकामासाठी परवानगी घेतलेली आहे काय?

**सौ. लता दलाल :** गुलमंडीवरती मोंढा बांधकामे चालु आहेत त्याची सर्वाची चौकशी करण्यात यावी.

**उपसंचालक नगररचना :** प्रशासकीय अधिकारी यांनी अशा बांधकामांची पाहणी करुन ती अनाधिकृत आहेत किंवा कसे ते पहावे.

**श्री. विखारोद्दीन :** स्मशानभुमीच्या कामाबाबत मी वारंवार प्रश्न विचारात आहे हे काम केव्हा सुरु होणार.

**शहर अभियंता :** या कामासाठी वाढीव इस्टीमेट तयार करण्यात आलेले आहे त्यास मान्यता मिळणे आहे ८७.०% काम झालेले आहे वाढीव एस्टीमेटला मंजुरी मिळताच काम सुरु करण्यांत येईल.

**मा. सभापती :** वाढीव इस्टीमेंट स्थायी समितीकडे मंजुरीस्तव पाठवावे. दुरुस्त्यासह इतिवृत्तास मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

दिनांक ३ डिंसेबर ९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ४१३/२ :**

उपसंचालक नगररचना प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे शहानुरवाडी समपैकी वैद्यकीय कर्मचारी गृहनिर्माण संस्थेच्या रेखांकनास १६-१-८७ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे. मंजुरीच्या वेळी जमिन मालकाने स.न.१२ पैकी काही भाग या रेखांकनाच्या खुल्या जागेत सामिल करुन रेखांकन मंजुर करुन घेतले आहे. सं.नं. १२ च्या मालकाने या रेखांकनाच्या खुल्या जागेत त्याची परवानगी न घेता सामिल केलेली जमिन परत मागितली आहे. रेखांकनात १५% खुली जागा सोडणे आवश्यक होते रेखांकन खालील क्षेत्र १३५०० चौ.मी. आहे. म्हणजे २०२५ चौ.मी. खुली जागा सोडणे आवश्यक होते परंतु रेखांकन धारकाने सोसायटीने २१०३.१२ चौ.सी. म्हणजे १५.५७% खुली जागा सोडलेली आहे. जागेवर प्रत्यक्ष मोजमाप केले असता खुल्या जागेचे क्षेत्र २०४१.३० चौ.मी. इतके येते. लगतच्या मालकाचे क्षेत्र त्यात सामिल साल्याने त्यांना ६१.१२ चौ.मी. जमीन परत करावी.

हा प्रस्ताव दिनांक ३०-१-९९ रोजी झालेल्या स्थायी समितीचे बैठकीत मांडण्यात आला होता. ठराव क्र. ५०६/२१ परंतु स्थळपाहणीसाठी म्हणुन स्थगित ठेवण्यांत आला होता. तरी आता हा प्रस्ताव पुन्हा मंजुरीस्तव सादर. वरील ६१.१२ चौ.मी. क्षेत्र वजा जाता खुल्या जागेचे क्षेत्र १४.६७% भरते.

**संवाद**

**सौ. लता दलाल :** प्रस्तावावर उपसंचालकांनी खुलासा करावा.

**उपसंचालक नगररचना :** १९८६ मध्ये लेआऊट मंजुर झाला होता. शेजारच्या जमीनीवर ओव्हरलॅप होऊन तो मंजुर झाला होता. त्यामुळे ओव्हरलॅप झालेल्या जागेचा हा लेआऊट आहे. १४% वर जागा शिल्लक राहते.

**मा. सभापती :** मागील वर्षीच्या स्थायी समितीस हा प्रस्ताव आला होता तेव्हा तो स्थगित ठेवला होता १४% वर जमीन तेथील लोकांसाठी उपयोगासाठी राहते.
प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे शहानुरवाडी येथील सर्व्हे नं १२ वैद्यकीय गृहनिर्माण संस्थेच्या रेखांकनातील खुल्या जागेत लगतच्या मालकाने ६१.१२ चौ.सी. क्षेत्र सामिल झाल्याने सदर मालकाने त्याची परवानगी ने घेता या रेखांकनाच्या खुल्या जागेत सामिल केलेली जागा परत मागितली असल्याने त्यांना ६१.१२ चौ.मी. जमिन परत मागितली असल्याने त्यांना ६१.१२ चौ.मी. जमिन परत करणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. ैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१४/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगापुरा भाजीमंडई समोर मनपाच्या दुकानावर पहिला मजला बांधणो करिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ चे जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. २५,८७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक ४-८-९८ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र. १४४/९ दि. १९-११-९८ च्या इतिववृत्तान्वये सदरील अंदाजपत्रकास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र.मनपा/लेखा/नि/१३/९९ दिनांक ११-५-९९ अन्वये निविदामागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ३ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दिनांक

२८-५-९९ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मकदृष्टया तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मौला अलीयार खॉन | ९.१०% | जास्त दराने |
| २. | हायवे कंन्स्ट्र. | २५% | जास्त दराने |
| ३. | शेख शरीफ | १५% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.१०% जास्त दराची श्री. मौला अली यारखॉन याची प्राप्त झालेली होती. मा. आयुक्त महोदय यांचे दि. ६-७-९९ चे आदेशान्वये संबंधित गुत्तेदारास दराबाबतच्या वाटाघाटीस्तव बोलविण्यात आले असता दरबाबतच्या वाटाघाटीस्तव बोलविण्यात आले असता दराबाबतच्या वाटाघाटी अंती ९.१०% जास्त दराऐवजी ४% जास्त दराने सदरील निविदेस मा. आयुक्त महोदय यांनी दि. २८-११-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार श्री. मौला अली यारखॉन यांची ९.१०% जास्त दराऐवजी ४% जास्त दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद**

**सौ. लता दलाल :** हे शॉपिंग कॉम्लेकस कोठे बांधणार

**शहर अभियंता :** पुर्वीच्या आस्तित्वात असलेल्या जागेवर अतिरिक्त कॉलबस टाकुन हे बांधकाम करण्यांत येणार आहे. हे प्रयोजन एक दिड वर्षापासुन चालु आहे.

**सौ. लता दलाल :** शॉपींग कॉम्पलेक्स संदर्भाने आपण जळगांव मार्केटची पाहणी करुन त्यानुसार योजना आखणार होतो. भाजी मंडई औरंगपुरा बाबत यापुर्वीही एक ठराव आला होता तो आतापर्यंत पुर्ण का झाला नाही. हा ठराव पुढील बैठकीत घेण्यात यावा.

**श्री. वसंत देशमुख :** आतापर्यंत निविदा अंदाजपत्रकीय दराने मान्य झालेल्या आहेत. मगच हीच निविदा जास्त दराने का?

**शहर अभियंता :** हे काम नाल्याच्या काढावर आहे. खाली इमारत आहे तशीच ठेऊन हे काम करावयाचे आहे. डी.एस.आर. रेटबरोबर याची तुलना करता येणार नाही. चर्चा करुन ४% जास्तीचा दर मान्य करण्यात आला आहे.

**मा. सभापती :** हे काम दुसऱ्या मलल्याचे आहे. पुर्वी या कंत्राटदारास ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्यात आले होते. असे स.श्री. स.अ.इकबालोद्दीन यांनी सांगितले ब्लॅक लिस्ट कंत्राटदास आपण टेंडर्स देत नाही. प्रस्ताव सर्वानुमते स्थगित ठेवण्यांत येतो.

**ठराव :**

सभागृहात आलेल्या चर्चेच्या अनुषंगाने सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ४१५/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मौजे गारखेडा औरंगाबाद येथील सी.सं.नं. १५३१० मध्ये व्यायाम शाळा बांधणे हया कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ४,९९,९०९/- चे विषय क्र. ३९/२९ दिनांक १२-५-९९ चे स्थायी समिती मध्ये मंजुर झालेले आहे. कामासाठी निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/१६/९९ दि. ३-६-९९ अन्वये प्रसिध्द करुन

बी-१ नमुन्यात मागविल्या असता सर्वात कमी दराची निविदा श्री. मो. इस्माईल यांचे नावाने अं.प. दरापेक्षा १९.२५% कमी दराची प्राप्त झाली. त्यास स्थायी समितीच्या दिनांक ५-१०-९९ च्या सभेमध्ये विषय क्र. २४६/७ अन्वये मान्यता प्राप्त झाली होती. निविदा सुचनेमध्ये नमुद केल्यानुसार ९० दिवसांपर्यंत ठेकेदराने दिलेले नियम बंधनकारक होते. निविदा मंजुरीस जास्तीचा काळ झाल्याने मंजुर निविदा धारकाने काम करण्यासाठी नकार कळविला आहे. तृतीय क्रमांकाच्या निविदाधारकाने त्यांचे निविदा दराने म्हणजेच १६.१७% कमी दराने काम करण्यासाठी लेखी संमती दिली आहे. व त्यास मा. आयुक्त हयांनी मान्यता दिली आहे.

करिता सदर कामासाठी वरील प्रमाणे मान्यतेनुसार श्री. मन्नानखॉन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.१७% कमी दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे गारखेडा येथील सी.टी.नं. १५३१० मध्ये व्यायाम शाळा बांधणेच्या कामासाठी मंजुर असलेल्या निविदा सुचना मध्ये नमुद केल्यानुसार ९० दिवसांपेक्षा जास्त काळ झाल्याने निविदाधारकाने काम करण्यास नकार दिल्याने तृतीय क्रमांकाच्या निविदाधारकाने त्याच्या निविदा दराने म्हणजेचे १६.१७% कमी दराने काम करण्यास लेखी संमती दिल्याने श्री. मन्नानखॉन यांचे १६.१७% कमी दराचे निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१६/५ :**

बनेवाडी दुर्जल उपसा सिंचन योजना १९९४ मध्ये देवगिरी सहकारी साखर कारखाना दि. फुलंब्री यांना हस्तांतरीत करण्यांत आलेली होती. साखर कारखान्यातर्फे सदर योजना काही दिवस चालवून बंद करण्यांत आली. दरम्यान कारखान्याने विद्युत देयक अदा न केल्यामुळे विद्युत पुरवठा कायमस्वरुपी खंडीत करण्यात आला.

दुर्जल उपसा बंद असलमुळे दुषित पाण्यामुळे प्रदुषण होत आहे. हे प्रदुषण थांबविण्यासाठी दि. १९-६-९९ रोजी मनपाने देवगिरी कारखान्याकडुन सदर योजना परत ताब्यात घेतली आहे. योजना कार्यान्वित करण्यासाठी खंडीत झालेला विद्युत पुरवठा चालु करण्यासाठी म.रा.वि.मं.स. कोटेशन र.रु. २,७९,३२०/- अदा करणेस मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. तरी बनेवाडी दुर्जल सिंचन उपसा योजनेसाठी विद्युत पुरवठा घेण्यासाठी येणाऱ्या र.रु. २,७९,३२०/- च्या खर्चास मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बनेवाडी दुर्जल उपसा सिंचन योजना बंद असल्यामुळे दुषित पाण्यामुळे प्रदुषण थांबविण्यासाठी योजना पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी खंडित झालेला विद्युत पुरवठा चालु करण्याकरिता येणारा खर्च र.रु. २,७९,३२०/- च्या खर्चास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१७/६ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, विष्णुनगर व अरिहंतनगर येथे कमी व्यासाच्या ड्रेनेज लाईन्स काढुन २५० मी.मी. व्यासाच्या आर.सी.सी. ड्रेनेज लाईन्स टाकणे बाबतच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या महाराष्ट्र जीवन प्रधीकरण

विभागाच्या दरसुचीप्रमाणे अंदाजपत्रकीय र.रु. ५,४४,१००/- ला स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविल्या असता एकुण २१ (एकवीस) कोऱ्या निविदा अंतिम तारखेपर्यंत विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेला एकुण ११(अकार) निविदा दर भरुन सिलबंद प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मे. संधु कंन्स्ट्रक्शन | ३५.००% | कमी दराने |
| २. | श्री. एम.के. राठोड | ३३.७५% | कमी |
| ३. | श्री. आर.बी. चव्हाण | ३३.५०% | कमी |
| ४. | श्री. बाबुराव चौंडीये | ३२.४४% | कमी |
| ५. | श्री. मोहंमद सलीम | ३१.००% | कमी |
| ६. | श्री. राणा कन्स्ट्रक्शन | ३०.३०% | कमी |
| ७. | श्री. सय्यद शफीकोद्यीन | २९.२०% | कमी |
| ८. | श्री. बी.ए. काल्डा | २८.५०% | कमी |
| ९. | श्री. ए.ए. आग्रे | २४.०७% | कमी दराने |
| १०. | श्री. मे. फाईव्हस्टार कंन्स्ट्रक्शन | २२.१०% | कमी दराने |
| ११. | श्री. ग्रॅन्ड कंन्स्ट्रक्शन | २०.१०% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा मे. संधु कंन्स्ट्रक्शन यांची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.००% कमी दराची आहे.

तरी मे. संधु कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.००% कमी दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद**

**श्री. राजकुमार बचाटे :** कामासाठी खुप कमी दराची निविदा आलेली आहे. यामुळे कामाचा दर्जा चांगला राहील का?

**मा. सभापती :** प्रत्येक कंत्राटदाराकडुन आपण रेट अनॉलिसीस करुन घेत असतो.

**श्री. विखारोद्यीन :** पुर्वी केव्हा पाईपलाईन टाकण्यात आली होती आता ती बदलण्याचे कारण काय?

**श्री. काशिनाथ कोकाटे :** पुर्वी टाकलेली ड्रेनेज लाईन किती व्यासाची होती, ती केव्हा, टाकली, लाईन असतांना त्या त्या भागात वाढणारी लोकसंख्या यांचा विचार केला जात नाही का अशा कामामुळे विभागीय आयुक्तांकडुन एकदा चौकशीही करण्यांत आलेली आहे. एकदा टाकलेल्या लाईन्स १०.२० वर्षाकरिता परत बदलण्याची आवश्यकता भासु नये, याचा विचार व्हावयास हवा.

**मा. सभापती :** कार्यकारी अभियंता (पा.पु.) आज उललब्ध नाहीत त्यामुळे माहिती मिळु शकणार नाही. तथापी स्थायी समिती समोर प्रस्ताव येण्यापुर्वी प्रशासकीय कार्यवाही पुर्वी करुन नंतरच ते मांडले जातात. प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विष्णुनगर व अरिहंतनगर, येथील कमी व्यासाची ड्रेनेज लाईन काढुन २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.००% कमी दराची मे. संधु कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *सर्वसाधारण चर्चा*

**संवाद**

**श्री. स.अ. इकबालोद्दीन :** महानगरपालिका ते नेहरुभवन व महानगरपालिका ते देना बँक रस्त्याच्या दुरुस्ती बाबत मी वेळोवेळी प्रश्न उपस्थित केलेला आहे. परंतु त्याचे काम हाती घेतले जात नाही.

**उप अभियंता (बां-१) :** याबाबतचे अंदाजपत्रक तयार आहे. परंतु तरतुद संपलेली आहे. आजच्या बैठकीतील प्रस्ताव शासकीय अनुदानातुन खर्च करण्याबाबतचे आहेत.

**श्री. स. विखारोद्दीन :** डांबरीकरणाचे प्रस्ताव २-२ वर्ष का हाती घेतले जात नाहीत. नेहमी अंदाजपत्रकातील तरतुदीबाबतच सांगितले जाते.

**सभापती :** अत्यावश्यक रस्त्यांची कामे प्रथम हाती घेण्यात आलेली आहेत. स.स.श्री. स.अ. इकबालोद्दीन यांनी प्रस्तावित केलेल्या दोन्ही रस्त्याच्या डांबरीकरणाची कामे लवकरात लवकर हाती घेण्यात यावीत.

**श्री. वसंत देशमुख :** वॉर्ड क्र. २९ मधील खासगेट ते गंजेशाही दर्गा रस्ता खुप खराब झालेला आहे. प्रशासनाचे त्याची पाहणी करावी. शासकीय अनुदानातुन या रस्त्याचे काम हाती घेण्यात यावे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** कामांची उद्‌घाटने झाल्यानंतर परत एक-एक महिना तेथे कामे सुरु केली जात नाहीत. अविष्कार कॉलनी म्हाडा येथील कामाचा शुभारंभ झाला परंतु अद्यापही तेथे काम सुरु झालेले नाही.

**उप अभियंता (बां-१) :** अविष्कार कॉलनीतील कामाची सुरुवात झालेली आहे. तथापी मशिनरीत काही बिघाड उत्पन्न झाल्याने सध्या ते बंद आहे. स.स. श्री. देशमुख यांनी खासगेट ते गंजेशाही दर्ग्यापर्यंतच्या कामाबाबत प्रश्न विचारला हे काम मागील स्थायी समिती बैठकीत मंजुर झालेले आहे.

**मा. सभापती :** मुस्लीम बांधवाचा पवित्र रमजान महिना सुरु झालेला आहे. त्यांच्या भागातील दैनंदिन साफसफाई वरती लक्ष देण्यात यावे. सर्व मुस्लीम बांधवांना यानिमित्त शुभेच्छा.

**श्री. विखारोद्दीन :** स.सभापतीचे आम्ही आभार मानतो.

**विषय क्र. ४१८/१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, लोटाकांरजा भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार र.रु. ३,७७,०७०=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९९-२००० वर्षासाठी प्राप्त शासकीय अनुदानातुन करण्यात येईल.

तरी र.रु. ३,७७,०७०=०० चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लोटाकारंजा भागातील रस्त्याच्या डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,७७,०७०=०० चे अंदाजपत्रक सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१९/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सर्व्हे नं. १७ चैतन्य गृहनिर्माण संस्था गारखेडा अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार र.रु. २,६८,९४४=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च पुर्नः डांबरीकरण या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल.

तरी र.रु. २,६८,९४४=०० चे अंदाजपत्रक विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्व्हे नं. १७ गारखेडा चैतन्य गृहनिर्माण संस्था अंतर्गत रस्त्याच्या डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु. २,६८,९४४/- ला सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२०/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दिलरस कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार र.रु. ६,१८,२५०=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९९-२००० वर्षासाठी अनुदानातुन करण्यात येईल.

तरी र.रु. ६,१८,२५०=०० चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिलरस कॉलनी येथील रस्त्याच्या डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ६,१८,२५०/- चे अंदाजपत्रक सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२१/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद टाईम्स कॉलनी, विरशैव कॉलनी, राहत कॉलनी मधील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार

र.रु.४,१२,२२९=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९९-२००० वर्षासाठी प्राप्त शासकीय अनुदानामधुन करण्यात येईल.

तरी र.रु. ४,१२,२२९.०० चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद टाईम्स कॉलनी विरशैव कॉलनी, राहत कॉलनी, मधील रस्त्याच्या डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेले रक्कम रुपये. ४,१२,२२९/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२२/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, विद्युत कॉलनी बेगमपुरा भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार र.रु. ७,०६,४७५=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९९-२००० वर्षासाठी प्राप्त शासकीय अनुदानातुन करण्यात येईल.

तरी र.रु. ७,०६,४७५=०० चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विद्युत कॉलनी बेगमपुरा भागातील रस्त्याच्या डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेले रक्कम रु. ७,०६,४७५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२३/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जिव्हेश्वरी सहकारी गृहनिर्माण संस्था हत्तेसिंगपुरा मधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणाच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार र.रु. १,३०,०००=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे सदरील कामाचा खर्च सन १९९९-२००० वर्षासाठी प्राप्त शासकीय अनुदानामधुन करण्यात येईल.

तरी र.रु. १,३०,०००=०० चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिव्हेश्वरी सहकारी गृहनिर्माण संस्था हत्तेसिंगपुरा मधील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता रक्कम रु. १,३०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२४/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहाबाजार भागातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार र.रु. १,१३,७७०=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले

आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९९-२००० वर्षासाठी प्राप्त शासकीय अनुदानामधुन करण्यांत येईल.

तरी र.रु. १,१३,७७०=०० चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहाबाजार भागातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. १,१३,७७०/- चे अंदाजपत्रक सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२५/८ :**

प्र. कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, ब्रिजवाडी स्लम गल्ली क्रमांक-२ येथे कॉक्रेट रस्ते तयार करणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते यांच्या वर्ष सन ९८-९९ च्या दरसुचीनुसार स्लम रु. १,४८,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "नविन खांडकी रस्ते" या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकात मा. आयुक्त साहेबांनी दि. ७-१२-९९ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

करिता सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रु. १,४८,२००/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रसतावात दर्शविल्याप्रमाणे मो. ब्रिजवाडी (स्लम) गल्ली क्र. २ येथे कॉक्रीट रस्ते तयार करण्याच्या कामाकरिता रक्कम रु. १,४८,२००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२६/९ :**

प्र.कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. नारेगांव येथील उर्वरित सिमेंट रस्ते तयार करणे करिता अं.प.र.रु. ७,२०,४७९/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९८-९९ नुसार करण्यात आलेले असून मा. आयुक्तांनी त्यास दि. ८-१२-९९ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर काम मनपा अर्थसंकल्प ९९-२००० मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतुद लेखाशिर्ष नविन खडी रस्ते मध्ये खर्च करण्याचे प्रस्तावित आहे.

करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. नारेगांव येथील उर्वरित सिमेंट रस्ते तयार करण्यात आलेले रक्कम रुपये ७,२०,४७९/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२७/१० :**

प्र. कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे, मो. आंबेडकरनगर स्लम येथे पुर्नडांबरीकरण करणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते यांचे वर्ष ९८-९९ च्या दरसुचीनुसार र.रु. ५,७६,२१६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "डांबरी रस्ते" या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ६-१२-९९ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले र.रु. ५,७६,२१६/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे आंबेडकरनगर स्लम येथे पुर्नडांबरीकरण करणे बाबत तयार करण्यात आलेले र.रु. ५,७६,२१६/- अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२८/११ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. आरेफ कॉलनी पार्ट "अ" अंतर्गत असलेली ड्रेनेज लाईन अपुटींग करण्याच्या कामकरिता र.रु. ८,९२,९२०/ - चे अंदाजपत्रक महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या सन ९८-९९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. सदरील काम देखभाल व दुरुस्ती सन ९९-२००० यातुन प्रस्तावित केले आहे.

मा. आयुक्तांनी दि. २-१२-९९ रोजी प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरेफ कॉलनी पार्ट "अ" अंतर्गत असलेले ड्रेनेज लाईन अप्रुटींग करण्याच्या कामाकरिता र.रु. ८,९२,९२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२९/१२ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हत्तेसिंगपुरा सर्व्हे नं. ३० मध्ये २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याकरिता अंदाजपत्रक रु. ८,८०,८१०/- चे परिसर अभियांत्रिकी व बांधकाम विभागाच्या सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले आहे.

सदरील कामाचा समावेश शासकीय अनुदान रक्कम ३.१७ कोटीच्या आराखडयातुन सदरील काम प्रस्तावित केलेले आहे. सदरील कामास मा. आयुक्तांनी दि. १०-१२-९९ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हत्तेसिंगपुरा सर्व्हे ३० मध्ये २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याकरिता तयार करण्यांत आलेले र.रु. ८,८०,८१०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३०/१३ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, निराला बाजार ते औरंगपुरा नाल्यापर्यंतच्या रस्त्यावर विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या (विद्युत) दरसुचीनुसार र.रु. १,९५,०००=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च "सोडीयम व्हेपर दिवे लावणे" या लेखाशिर्षामधुन करण्यात येईल.

तरी र.रु. १,९५,०००=०० चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे निराला बाजार ते औरंगपुरा नाल्यापर्यंतच्या रस्त्यावर विद्युतीकरण कामासाठी रक्कम रु. १,९५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४११/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सब्जीमंडी खोकडपुरा येथील अंतर्गत गल्ल्यामध्ये फरशी बसविणेच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९८-९९ च्या डि.एस.आर. दराने रक्कम रुपये १,४६,७५२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदरील कामाचा खर्च सन १९९९-२००० च्या "नवीन खांडकी रस्ते" या लेखाशिर्षातुन करण्यांत येईल.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सब्जीमंडी खोकडपुरा येथील अंतर्गत गल्ल्यात फरशी बसविण्याच्या कामासाठी रक्कम रु. १,४६,७५२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येत.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३२/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, महावीर चौक ते रेल्वेस्टेशन या मुख्य रस्त्यावर सेंट्रल पथदिव्याकरिता विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या (विद्युत) सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ९,६०,०००=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९९-२००० या वर्षाकरिता प्राप्त शासकीय अनुदानामधुन करण्यात येईल.

तरी र.रु. ९,६०,०००=०० चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महावीर चौक ते रेल्वेस्टेशन रस्त्यावर सेंट्रल पथदिव्याकरिता विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता रक्कम रु. ९,६०,०००=०० च्या अंदाजपत्रक सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३३/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, टी.व्ही. सेंटर चौकात ३० मीटर उंचीचा हायमास्ट पोल व फिटींग काम करण्यासाठी सन १९९७ वर्षाच्या अंदाजपत्रकानुसार र.रु. १०,००,०००=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले सदरील कामाचा खर्च सन १९९९-२००० वर्षाकरिता प्राप्त शासकीय अनुदानामधुन करण्यात येईल.

तरी र.रु. १०,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टी.व्ही. सेंटर चौकात ३० मीटर उंचीचा हायमास्ट पोल व फिटींगचे काम करण्यासाठी रक्कम रु. १०,००,०००=०० च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३४/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, रेल्वेस्टेशन समोरी चौकात ३० मीटर उंचीचा हायमास्ट पोल व फिटींगचे काम करण्यासाठी सन १९९७९८ वर्षाच्या अंदाजपत्रकानुसान र.रु. १०,००,०००=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामचा खर्च सन १९९९-२००० वर्षाकरिता प्राप्त शासकीय अनुदान मधुन करण्यात येईल.

तरी र.रु. १०,००,०००=०० चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविघ्ल्याप्रामणे टी.व्ही. सेंटर रेल्वेस्टेशन समोरील चौकात ३० मीटर उंचीचा हायमास्ट पोल व फिटींगचे काम करण्यासाठी रक्कम रु. १०,००,०००=०० च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३५/१८ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, भावसिंगपुरा येथील स्मशनाभुमीस संरक्षित भिंत बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सन ९८-९९ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. ३,१९,२००/- चे तयार करण्यात येऊन सदर

कामावर होणारा खर्च "समशानभुमी विकास कार्यक्रम" या तरतुदीतुन प्रस्तावित करण्यात येऊन त्यास मा. आयुक्त यांची दि. ७-१२-९९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सबब भावसिंगपुरा येथील स्मशानभुमीस संरक्षित भिंत बांधणेसाठीचे ३,१९,२००/- स्मशनाभुमी विकास कार्यक्रम या तरतुदीतुन करण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा येथील स्मशानभुमीस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु. ३,१९,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३६/१९ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सहकारी गृह निर्माण संस्था नक्षत्रवाडी गट नं. ११५/२ येथील खुल्या जागेना संरक्षित भिंत बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सन ९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. २,१८,१३५/- चे तयार करण्यात येऊन सदर कामावर होणारा खर्च हा विकास योजने अंतर्गत भुंखडाचे संरक्षण या तरतुदीतुन प्रस्तावित करण्यात येऊन मा. आयुक्त याची दि. ८-१२-९९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सबब सहकारी गृह निर्माण संस्था गट नं. ११५/२ येथील खुल्या जागेचा संरक्षित भिंत बांधणे साठीचे रक्कम रु. २,१८,१३५/- चे विकास योजने अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या तरतुदीतुन करण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सहकारी निर्माण संस्था नक्षत्रवाडी गट नं. ११५/२ खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु. २,१८,१३५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३७/२० :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा जवळील सि.डी. देशमुखनगर सर्व्हे नं. ६० मधील मनपाच्या खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे बाबतच्या कामाचे अंदाजपत्रक सन ९८-९९ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीनुसार रक्कम रु. १,३१,३००=०० चे तयार करण्यात येऊन सदर कामावर होणारा खर्च हा विकास योजने अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या तरतुदीतुन प्रस्तावित करण्यात येऊन त्यास मा. आयुक्तांची दि. ७-१२-९९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

करिता गारखेडा जवळील सि.डी. देशमुखनगर सर्व्हे नं. ६० मधील मनपाच्या खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे बाबतचे रक्कम रु. १,३१,३००=०० चे विकास योजने अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या तरतुदीतुन करण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा येथील स.नं. ६० सी.डी. देशसमुखनगर मधील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु. १,३१,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३८/२१ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नारेगांव येथील ट्रेचिंग ग्रांऊड लगत वृक्षारोपनाकरिता तारकुंपन करणे बाबत या कामाचे अंदाजपत्रक सन ९८-९९ च्या सार्वजनिक बांधकाम विभागच्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. २,१७,९००/- चे तयार करण्यात येऊन सदर कामावर होणारा खर्च "सिदार्थ उद्यान" या तरतुदीतुन प्रस्तावित करण्यात येऊन त्यास मा. आयुक्त यांची दि. ७-१२-९९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सबब नारेगांव येथील ट्रेचिंग ग्रांऊड रोड लगत वृक्षारोपणा करिता तार कुंपन करणे साठीचे रु. २,१७,९००/- चे सिध्दार्थ उद्यान या तरतुदीतुन करण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगांव ट्रेचिंग ग्रांऊड रोड लगत वृक्षारोपणाकरिता तारकुंपन करण्याच्या कामासाठी रक्क्म रु. २,१७,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३९/२२ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, टिळकनगर दिपनगर येथे संरक्षितभिंत बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सन ९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. १,८६,३२८=०० चे तयार करण्यात येऊन सदर कामावर होणारा खर्च हा "नविन उद्याने" या तरतुदीतुन प्रस्तावित करण्यात येऊन त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सबब टिळकनगर दिपनगर येथे संरक्षित भिंत बांधणे साठीचे रु. १,८६,३२८=०० चे नविन उद्याने या तरतुदीतुन करण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टिळकनगर दिपनगर येथे संरक्षित भिंति बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु. १,८६,३२८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४०/२३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, संत एकनाथ रंगमंदिर येथे दुरुस्त्या करणे करिता सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९८-९९ चे जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रुपये ४,९७,०८६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ८-१२-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदर कामाचा खर्च सन ९९ ते २००० या आर्थिक वर्षा अंतर्गत इमारत दुरुस्ती व देखभाल या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ४,९७,०८६/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकनाथ रंगमंदिर येथील दुरुस्तीच्या कामाकरिता रक्कम रु. ४,९७,०८६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४१/२४ :**

कार्यकारी आभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मकसुद कॉलनी येथील वितरण व्यवस्थेसाठी १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची दरसुची सन १९९८-९९ नुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ४,३६,१००/- चे तयार करण्यात येऊन मा. आयुक्त यांची दि. ७-१२-९९ रोजी मान्यता घेण्यात आली आहे. सदस्य कामाचा खर्च हा "पाणी पुरवठा भांडवली कामे या लेखाशिर्षकातुन करण्यात येणार आहे. करिता प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मकसुद कॉलनी येथे वितरण व्यवस्थेसाठी १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी रक्कम रु. ४,३६,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४२/२५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कोटला जलकुंभ ते समतानगर येथील सतीश हिवराळे यांच्या घरापर्यंत १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची दरसुची सन १९९८-९९ नुसार अंदाजपत्रक रक्कम रु. १,६०,२५०/- चे तयार करण्यात येऊन मा. आयुक्त यांची दि. ७-१२-९९ रोजी मान्यता घेण्यात आली आहे. सदरच्या कामाचा खर्च हा "पाणी पुरवठा भांडवली कामे" या लेखाशिर्षकातुन करण्यात येणार आहे. करिता प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोटला जलकुंभ ते समतानगर येथील सतिश हिवराळे यांच्या घरापर्यंत १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी रक्कम रु. १,६०,२५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४३/२६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बारीकॉलनी येथे १०० व २०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाचे आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची दरसुची सन १९९८-९९ नुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ४,६६,६२९/- चे तयार करण्यात येवून मा. आयुक्त यांची दि. २५-११-९९ रोजी मान्यता घेण्यात आली आहे. सदर कामाचा खर्च हा "पाणी पुरवठा भांडवली कामे" या लेखाशिर्षकातुन करण्यात येणार आहे. करिता प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बारीकॉलनी येथे १००/२०० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी रक्कम रु. ४,६६,६२९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४४/२७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्कमिल कॉलनी रुग्णालयास संरक्षित भिंत बांधण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९८-९९ जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. ४,८५,५७५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ७-१२-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च हा विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखाशिर्षामध्ये असलेली तरतुद संपुष्टात आल्यामुळे इतर कामाच्या होणाऱ्या बचतीमधुन करण्यात येते. त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ४,८५,५७५/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्कमिल कॉलनी येथील रुग्णालयास संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी रक्कम रुपये ४,८५,५७५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

सर्वाचे आभार माणुन ६.१५ वाजता स्थायी समिती बैठकीचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहिर केले. "जन गण मन" या राष्ट्रगितानंतर बैठकीचे कामकाज संपले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | सभापती स्थायी समिती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २१-१२-९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**मंगळवार दि. २१-१२-९९ रोजी मा. सभापती श्री. नरसिंग ढगे यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ३.०० वाजता "वदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्ग याच्यासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | स.सदस्य |
| २) | स.स.श्री. बचाटे राजकुमार (मामा) | --//-- |
| ३) | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर | --//-- |
| ४) | स.स.श्री. स.एकबालोद्दीन स.मो. कुतुबुद्दीन | --//-- |
| ५) | स.स.सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ६) | स.स.श्री. विखारोद्दीन पिता खुदबोद्दीन | --//-- |
| ७) | स.स.श्री. अजीजखॉ गणीखॉं | --//-- |
| ८) | स.स.श्री. काशिनाथ हरीभाऊ कोकाटे | --//-- |
| ९) | स.स.श्री. वसंत विनायकराव देशमुख | --//-- |
| १०) | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | --//-- |
| ११) | स.स.सौ. लता दलाल श्रीनिवास | --//-- |
| १२) | स.स.सौ. विमल नंदकुमार मुंडलीक | --//-- |
| १३) | स.स.श्रीमती. गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | --//-- |
| १४) | स.स.श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |

**संवाद :**

**श्री. देशमुख व्ही.व्ही. :** वार्डामध्ये ड्रेनेजचे घाण पाणी पिण्याच्या पाण्यात येत असुन नागरिकांच्या आरोग्यास धोका होण्याची शक्यता टाळता येत नाही. याबाबत बैठकीमध्ये चर्चा होते. संबंधित अधिकाऱ्यांना तक्रारी दिल्या जातात तरी कार्यवाही होत नाही. आम्ही प्रश्न मांडल्यानंतर व तक्रार दिल्यानंतर कार्यवाही व्हावयास पाहिजे. आमच्याच कामासाठी पैसे नसतील व ठेकेदाराकडे अशी तातडीची कामे दिल्यास तात्काळ होत नसतील तर सभागृहात निर्णय होऊन उपयोग काय? सभाच कशासाठी घ्यावयाची मी तक्रार केल्यानुसार त्या कामासाठी निधी उपलब्ध होणार की नाही याचा अधिकारी यांनी खुलासा करावा. संजयनगर गल्ली नं. एन-१ नळाला घाणपाणी येते. (यावेळी त्यांचेकडील घाण पाण्याची बाटली दाखवतात) जिन्सी भागामध्ये पिण्याच्या पाण्यामध्ये ड्रेनेजचे पाणी येऊ लागले आहे. कुठल्याही भागातील स. सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्यानुसार व तक्रार नुसार त्या कामा संबंधिची कार्यवाही व्हावयास पाहिजे. ठेकेदार कामे करण्यास तयार नसतील तर त्यांना महानगरपालिका कर्मचाऱ्याकडुन करुन घ्यावे. तसेच अधिकारी यांचे याकडे लक्ष देण्यास वेळ नसेल किंवा त्यांच्या विभागात कामाचा जास्त भार पडलेला असेल तर संबंधित अधिकाऱ्यानां त्यांच्या विभागातील काही कामे दुसऱ्या उपअभियंता यांच्याकडे दयावीत

तथा खुलासा अधिकारी यांनी करावा. व मी दिलेल्या तक्रारीचाही खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** पाणी पुरवठा अधिकारी उपस्थित नाही त्यांना बोलावणे केले आहे. आल्यानंतर खुलासा देण्यांत येईल. स. सदस्यांनी दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

**श्री. स.अ. एकबालोद्दीन :** शहरात तीन ठिकाणी हायमस्ट दिवे लावण्याबाबत सभेची मंजुरी झालेली आहे. त्यापैकी एक रेल्वेस्टेशन येथे, इतर दोन ठिकाणी हायमस्ट दिवे लावण्यात यावे असा निर्णय झालेला असतांना कालच पेपरमध्ये बातमी प्रकाशित झालेली आहे की, टि.व्ही. सेंटर येथे हायमस्ट दिवा लावण्यात येणार आहे. तशी सर्वसाधारण सभेची मंजुरी घेतलेली आहे काय? वर्दळीच्या ठिकाणी दिवे लावण्यात यावी. माझ्या वार्डामध्ये आमखास मैदान जवळील मज्जीद जवळ कोपऱ्यावर एक हायमस्ट दिवा लावण्याबाबत कार्यवाही व्हावी. येथुन जवळच डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर असुन त्या रिसर्च सेंटरच्या अंतर्गत वस्तीगृह असुन तेथे रात्री व रात्री जाण्या येण्याकरिता उजेड राहील या दृष्टीकोनातुन एक हायमास्ट दिवा लावण्यात यावा.

**मा. सभापती :** टि.व्ही. सेंटर चौकात हायमस्ट दिवा लावण्या बाबत सिडको हाडकोतील बऱ्याच लोकांची मागणी होती त्यानुसार कार्यवाही होत असेल आपण सांगितल्याप्रमाणे आमखास मैदान जवळील रस्त्यावर हायमस्ट दिवा लावण्याबाबत येणाऱ्या रिवाईजड बजेट मधुन कार्यवाही करता येईल. तशी सुचना संबंधित अधिकारी यांना देण्यांत येईल.

**सौ. लता दलाल :** नगर रचना विभागा संबंधित मुद्दे उपस्थित केल्यास माहिती घेण्यास वेळ मिळेल काय/ बऱ्याच वेळेस या विभागासंबंधीत प्रश्न उपस्थित करण्यांत आले परंतु या विभागा संबंधित माहिती घेण्या करिता एक विशेष बैठक घेण्यात येईल पण तसे झालेले नाही. २. सुरक्षा विभागातील चार कर्मचाऱ्यांची सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत २९-४-९२ च्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव पारित झालेला होता. त्या ठरावात कधीपासुन वेतनश्रेणी दयावयाची याचा उल्लेख नव्हता. त्या ठरावाची प्रत अस्थापना-२ विभाग मध्ये सदर कर्मचारी घेऊन गेले असता त्यांना असे सांगण्यात आले की, पुन्हा ठराव मंजुर करुन घ्यावा लागेल नंतर अंमलबजावणी करता येईल या संबंधिताची संचिका कुणाकडे आहे. पुन्हा ठराव पारीत करण्याची आवश्यता काय याचा सविस्तर खुलासा करावा.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी उपस्थित नाही. त्यांना बोलवून त्यांच्याकडुन माहिती घेता येईल दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

**सौ. लता दलाल :** वाचनालयामध्ये १४ वर्षापासुन काही कर्मचारी कार्यरत असुन त्यांना सुरुवातीचा दै.वेतन रु. १०/- होता तेव्हा पासुन ते काम करत आहे. जून-९९ मध्ये त्या कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनावरुन ठरविक वेतन रु. ७००/- आदेश देण्यांत आले कारण की त्यांचे कामाचे तास कमी भरतात. या संबंधी मागील बैठकीत मी चर्चा केली होती. परंतु अदयाप त्यांना दैनिक वेतनावर घेण्यात आलेले नाही. सध्या देण्यांत येणारे दैनिक वेतन व ठराविक वेतन रुपये ७००/- यात तफावत येत असल्याने सदर कर्मचाऱ्यांनी जुन-९९ पासुन

अद्याप पगार घेतलेला नाही. प्रशासनाचे अशा प्रकारचे धोरण योग्य वाटत नाही. या संबंधीचा योग्य तो खुलासा होऊन निर्णय घेण्यांत यावा.

**मा. सभापती :** शिक्षणाधिकारी यांनी माहिती दयावी.

**प्र.शिक्षणाधिकारी :** सदर वाचनालयातील कर्मचारी पुर्ण वेळ काम करतात. असे दिसुन आलेले आहे. व मागील बैठकीत झालेल्या चर्चेनुसार नोंद घेऊन संबंधित संचिका मा. मुख्यलेखाधिकारी यांच्याकडे चर्चेसाठी पाठविण्यात आलेली आहे. त्यांच्या वरील अन्याय दुर करण्यास हरकत नाही.

**मा. सभापती :** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संचिका पाठवलेली आहे काय? सदर कर्मचारी पुर्ण वेळे काम करत असतील तर त्यांना दैनिक वेतनाप्रमाणे घेण्यास प्रशासनाने कार्यवाही करावी.

**प्र. शिक्षणाधिकारी :** चर्चे अंती निर्णय झाल्यावर संबंधित वाचनालयातील कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनावर घेण्याबाबत कार्यवाही होईल.

**श्री. स.अ. एकबालोद्दीन :** विद्युत लाईनमन पदावर काम करणारे कर्मचाऱ्यांना वाहन चालका प्रमाणे दैनिक वेतन द्यावे त्यांना दररोज रु. ७५/- मान्य केले परंतु रु.६०/- प्रमाणेच दैनिकवेतन देण्यात येते.

**श्री. व्ही.व्ही. देशमुख :** वर्ग-३ च्या संवर्गातील सर्वच कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनावर घेऊन त्यांना फेब्रुवारी -९९ पासुन वेतन देण्यांत यावे. असा ठराव मार्च-९९ च्या सर्वसाधारण सभेमध्ये पारीत झालेला असुन प्रशासनाचे रु. ७५/- दै. वेतन देण्यास मान्य केले असे असतांना जे ठरविक वेतनावर कार्यरत होते त्यांना दैनिक वेतनावर घेण्यात आलेले नाही. ठरविक वेतन व सध्याचा दैनिक वेतन यात एकुण महिण्यासाठी पडणाऱ्या वेतनामध्ये तफावत येत आहे. ठरविक वेतनावरील कर्मचाऱ्यांना कमी पगार मिळतो. सर्वानाच फेब्रुवारी-९९ पासुन दैनिक वेतनावर घेण्यात यावे असे केल्याने कुणावरच अन्याय होणार नाही.

**मा. सभापती :** मागील बैठकीत वाहनचालक ही पदे तांत्रिक वर्गामध्ये येत असल्याने त्यांना शासनाच्या वळोवेळी पारीत होणाऱ्या जी.आर. नुसार दैनिक वेतन देण्यांत यावे अशी चर्चा झालेली होती. त्या संबंधिचा ठराव ही १९९५ हा स्थायी समितीने मंजुर केलेला आहे. जे टेक्नीकल वर्गामध्ये पदे येतात त्या सर्वच पदांना शासनाच्या नियमाने जे दैनिक वेतन असेल ते देण्यास प्रशासनाच्या माध्यमातुन कार्यवाही व्हावी. दैनिक वेतन रुपये ७५/- हा वर्ग-३ च्या संवर्गातील जे कर्मचारी येत असतील त्यांना त्याप्रमाणे वेतन देण्यांत यावे असा ठरावच सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सर्वानाच दैनिक वेतनावर घेऊन दैनिक वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे. तसेच वाचनालयातील कर्मचाऱ्याकडुन पुर्णवेळ काम करुन घ्यावे व त्यांना दैनिक वेतनाप्रमाणे वेतन देण्यांत यावे. जे टेक्नीकल वर्गामध्ये येतात. उदा. लाईनमन वाहनचालक यांना शासन नियमाने दैनिक वेतन देण्याबाबत कार्यवाही व्हावी.

**सौ. लता दलाल :** सुरक्षा रक्षका बाबत खुलासा मागविलेला होता माहिती दयावी.

**सहाय्यक आयुक्त :** सुरक्षा विभागातील चार कर्मचारी यात १) श्री. भारसाखळे २) श्री. वाघुळे ३) श्री. वाघमारे ४) श्री. बाबु भारसाखळे यांना दिनांक २-१-८६ अन्वये सुरक्षा रक्षक ज्युनिअर ग्रेड यापदावर वेतनश्रेणी रु. २००-२८० मध्ये

नियुक्ती देण्यांत आली. चौथ्या वेतन आयोगाची सुधारित वेतनश्रेणी ७५०-९४० असी आहे. सदरील कर्मचाऱ्यांनी त्यांना १-१-८६ पासुन २२०-३७५ सुधारित वेतनश्रेणी रु. ८२५-१२०० ही वेतनश्रेणी मिळण्यासाठी मागणी केली त्यानुसार स्थायी समितीचा ठराव क्र. ६१०/९१ दिनांक २९-४-९२ अन्वये रु. ८२५-१२०० ही वेतनश्रेणी देण्याचा प्रस्ताव पारीत झाला होता. परंतु ठरावात वेतनश्रेणी कधीपासुन लागु करावयाची याचा उल्लेख नव्हता पुन्हा दिनांक ३०-९-९२ ला प्रस्ताव ठेवुन दि. २-१-८६ पासुन वेतनश्रेणी देण्याची मंजुरी मिळाली. प्रस्तावानुसार प्रशासकीय टिप्पणी सादर करुन प्रशासनाचे असे मत झाले की, वरील दिनांकापासुन सदर कर्मचाऱ्यांना ८२५-१२०० वेतनश्रेणी देणे योग्य नाही कारण की, या कर्मचाऱ्यांची नेमणुक मंजुरी मधुन ज्युनिअर सुरक्षा रक्षक या पदावर करण्यांत आलेली आहे. यानंतर प्रशासनामार्फत दि. १७-६-९३ च्या बैठकीत ठराव पारीत करुन सदर सुरक्षा रक्षकांना दिनांक १-८-९२ पासुन पदोन्नती वेतनश्रेणी रुपये ८२५-१२०० प्रमाणे देण्याची मान्यता मिळाली त्यानुसार मनपा/जा.क्र. अस्था-२/२६२३/९३ दि. २६-७-९३ अन्वये तसे आदेश पारीत करण्यांत आलेले आहे.

**सौ. लता दलाल :** दिनांक २-१-८६ पासुन वेतनश्रेणी लागु करण्याबाबतचा ठराव वाचुन दाखववावा.

**सहा. आयुक्त-२ :** (ठराव वाचुन दाखववावा.)

**सौ. लता दलाल :** ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देवुन त्यांना सुरक्षा रक्षक पद देण्यांत आले ती पदे रिक्त होती काय?

**सहा. आयुक्त-२ :** सदर पदे रिक्त नव्हती.

**श्री. विखारोद्दीन :** अगोदर प्रशासनामार्फत ठेवण्यात आलेल्या ठरावात दि. २-१-८६ पासुन ची मंजुरी आहे. नंतरच्या ठरावात १-८-९९ पासुन म्हणतात या तफावत येत आहे.

**मा. सभापती :** ज्यावेळी प्रशासनामार्फत ठराव ठेवण्यात आला त्यावेळी संबंधित कर्मचाऱ्यांची मागणी अशी होती की, २-१-८६ पासुच वेतनश्रेणी लागु करावी. तसा ठराव दिनांक ३०-९-९२ मंजुर झाला. परंतु या अगोदर या कर्मचाऱ्यांना मजुरा मधुन ज्युनिअर सुरक्षा रक्षक या पदावर पदोन्नती करण्यांत आले. त्यांना पदोन्नती दिल्याने ठरावानुसार दिनांक २-१-८६ ला वेतनश्रेणी देण्यांचे प्रशासनाने मान्य केलेले नाही तसा निर्णय घेतला आहे. व त्या कर्मचाऱ्यांना दिनांक १-८-९२ पासुन मागणी नुसारची वेतनश्रेणी लागु केलेली आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** प्रशासकीय मंजुरी कधी मिळाली त्यांची चौकशी करुन निर्णय घेण्यात यावा.

**मा. सभापती :** ३०-९-९२ ला स्थायी समितीने त्या बाबतचा ठराव घेऊन दिनांक २-१-८६ ला मंजुरी दिली. परंतु संबंधिताना पदोन्नती दिल्याने ते सुरक्षा रक्षक म्हणुन काम करत होते. त्यांना ज्युनिअर ग्रेड या पदावर वेतनश्रेणी प्रमाणे २००-२८० मध्ये सुधारित वेतनश्रेणी ७५०-९४० असी होती. सदर कर्मचारी यांनी दिनांक १-१-८६ पासुन २२०-३७५ सुधारित वेनतश्रेणी ८२५-१२०० मागणी केली परंतु सदर कर्मचारी हे १-१-८६ ला सुरक्षा रक्षक म्हणुन काम करत नव्हते. म्हणुन प्रशासनाने १-८-९२ पासुनचा निर्णय घेतलेला आहे. याबाबत सविस्तर माहिती प्रशासनाने पुढील बैठकीत दयावी.

**श्री. विखारोद्दीन :** जाफरगेट येथील कडबा कटर वाल्यांना ४x६ स्क्वे. फुटाची जागा प्रति स्क्वे. फुट ३ रु. महिन्याने दिली होती परंतु ३ रु. वरुन ८ रु. प्रमाणे वाढ होऊन वसुली केली जाते. ती कमी करण्यात यावी.

**श्री. व्ही.व्ही. देखमुख :** महापालिकाने नियमाने कडबा कटरसाठी जी जागा दिली आहे त्याच जागे व्यतिरिक्त इतर जागेचा संबंधित लोक वापर करत आहेत काय? असे समजते की, सदर लोक बाजुला इतर जागेचा संबंधित लोक वापर करत आहेत काय? असे समजते की, सदर लोक बाजुच्या इतर महापालिकेच्या मालकीच्या जागेचा वापर होतो. त्याही जागेचे भाडे वसुल करावे.

**मा. सभापती :** महापालिकेची जागा असुन दर महिन्याचे भाडे ३ रु. स्क्वे. फुटानी दिलेली आहे. अर्थसंकल्पाचे वेळी दर वाढविण्यात आले आहे. ४x६ स्क्वे. फुटाची जागा कमी भाडे दर महिन्याचे भाडे ३ रु. स्क्वे. फुटाची जागा कमी भाडे लावण्याबाबत ही बाब सर्वसाधारण सभेच्या कक्षातील आहे. सदर भाडे कमी करण्याबाबत विचार करण्यात यावा या संबंधी सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यांत येत आहे.

**श्री. विखारोद्दीन :** प्रति स्क्वे. फुट ८ रु. महिन्याचे दर ५ रु. करावे तशी शिफारस आपल्या आदेशाने व्हावी. तशी आपण रुलिंग दयावी.

**मा. सभापती :** याबाबत आपणांस निर्णय घेता येणार नाही. सदर बाब ही सर्वसाधारण सभेच्या अंतर्गत येत आहे. बजेटच्या बैठकीत निर्णय घेण्यात येईल.

**श्री. व्ही.व्ही. देशमुख :** पाणी पुरवठा अधिकारी उपस्थित झालेले आहे. त्यांनी मी केलेल्या वार्डातील येणाऱ्या दुषीत पाण्याच्या संदर्भात खुलासा करावा. मी सुचविलेल्या कामासाठी बजेट नाही काय?

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :**स.सदस्य श्री. देशमुख यांनी सुचना केलेल्या प्रश्नाबाबतची तक्रार अदयाप मला मिळालेली नाही. त्यामुळे कार्यवाही झालेली नाही.

**श्री. व्ही.व्ही. देशमुख :** या संबंधी मी बऱ्याच वेळा तक्रारी केल्या आहे. मी मांडलेली सुचना ही छोटयाशा कामाची असुन अधिकारी यात जातीने लक्ष देत नसतील तर त्यांना प्रत्यक्ष घेऊन त्याठिकाणी जावे लागेल नंतरच कार्यवाही होईल काय? तक्रारी केल्यानुसार सर्व सुविधा पुरविण्याची कार्यवाही झाली पाहिजे. सेक्शनला गेल्यास कर्मचारी उपलब्ध नाही असे सांगितले जाते.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** घाण पाण्याच्या तक्रारी आल्यानंतर तात्काळ कार्यवाही करण्यात येते. नवीन नळ कनेक्शन घेतल्याचे असे प्रकार होतात.

**मा. सभापती :** अत्यावश्यक सेवा म्हणुन तात्काळ संबंधित प्रभागातील पाहणी करुन कार्यवाही करावी. स. सदस्यांनी तक्रार केल्यानुसार कार्यवाही करण्यास उशीर न लावता कामे व्हावीत.

**श्री. अजीज खॉन गणीखॉन :** माझ्या वार्डमध्ये पाण्याची लाईन फुटलेली होती. जेथे झडप आहे तेथुन पाणी वाहते. पोलिस क्वार्टर रोड व माझ्या घराकडे जाणाऱ्या गल्लीत जेथे बत्याच झडप टाकलेल्या आहेत तेथे चेंबर बांधण्यात यावे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** झडपा रोज ऑपरेट कराव्या लागतात. त्यामुळे झडप मध्ये असलेली ग्लॅउरोप वेळोवेळी बदलावी लागते. घासल्यानंतर गॅप निर्माण होतो व त्यामुळे पाणी बाहेर येण्यास जागा होते. व ज्यावेळी पाणी सोडण्यात येते तेव्हा त्यातुन पाणी बाहेर येते. नेहमीच असा प्रकार होत नाही. सदर ठिकाणी जाऊन पाहणी करुन कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती :** स. सदस्य आपल्या खालच्या अधिकाऱ्याकडे तक्रार घेऊन गेल्यास कर्मचारी उपलब्ध नाही असा काही प्रकार काय? आपणाकडे कर्मचारी कमी आहे तसे असेल तर जास्तीच्या कर्मचाऱ्याबाबत मागणी करावी स.सदस्य श्री. अजीजखॉ यांनी केलेल्या तक्रारीची पाहणी करुन कार्यवाही करावी.

**श्री. व्ही.व्ही. देशमुख :** संबंधित अधिकारी यांनी सांगितले की, घाण पाण्याबाबत तक्रारी आल्यास तात्काळ कार्यवाही होते अधिकारी सभागृहाची दिशाभुल करतात संबंधित कामासाठी मी अधिकारी यांच्याकडे बऱ्याच तक्रारी केलेल्या आहे. तरीही कार्यवाही होत नाही. वार्डामध्ये चेंबर फुल भरलेले आहे. खरी परिस्थिती असतांना का कार्यवाही करण्यात येत नाही. नवीन कामे ज्या वेळेस होतात त्यावेळेस ठेकेदार चांगल्या कॉलिटीचे काम करत नाही अशा तक्रारी आम्ही दिल्यातरी कार्यवाही होत नाही. त्यावेळेस योग्य त्या कॉलिटीचे काम झाल्यास असे नेहमी लाईन फुटून घाण पाण्याच्या तक्रारी येणार नाही. सुरवातीस जी कामे करण्यात येतात ती योग्य होत नाही.

**मा. सभापती :** पाणी पुरवठा विभागाच्या संबंधात वॉल लिकेजचे बरेच प्रकार घडतात. माझ्याही वार्डामध्ये अशी परिस्थिती आहे.

**श्री. अजीज खॉ गणीखॉ :** तक्रार देवून ३-३ महिने होतात तरीही अधिकारी यांचेतर्फे कार्यवाही करण्यात येत नाही.

**मा. सभापती :** शहरात प्रत्येक झोनच्या अंतर्गत बऱ्याच जलवाहिन्या आहेत. बऱ्याच जल वाहिण्या आहेत. बऱ्याच ठिकाणी वॉल लिकेजचया घटना घडतात. व इतर काही प्रॉब्लेम येतात त्यासाठी प्रत्येक झोनला जो कर्मचारी आहे तो पुरेशा नसेल तर संबंधित अधिकारी यांनी निश्चित पणे पाणी पुरवठा विभागाला जास्तीचा कर्मचारी देण्याबाबत कार्यवाही करावी. पाणी प्रश्न हा अत्यावश्यक सेवा म्हणुन महानगरपालिकेच्या माध्यमातुन पुरविला जातो. लाईन फुटल्यानंतर २-२ दिवस दुरुस्त होत नसेल तर योग्य नाही गळती ताबडतोब थांबविण्यासाठी माणसे वाढवून घ्यावीत.

**श्री. विकास जैन :** दि. २५-९-९६ ला महापालिका मध्ये कार्यरत असलेले शाखा अभियंता श्री. के. आर. कुलकर्णी यांचा अपघात झालेला आहे. प्रत्यक्ष कामांवर असतांना त्यांचा अपघात झालेला असुन औषधोपचार चालू असून तसे बिल ही त्यांनी दाखल केलेले आहे. त्यांना औषधोपचारासाठी १००% देण्या ऐवजी ८०% टक्केच रक्कम देण्याबाबत कार्यवाही झाली १००% देयकाची रक्कम देण्यांत यावी.

**मा. सभापती :** महापालिकेच्या नियमाप्रमाणे अपघाती कर्मचाऱ्यांना आपण होणाऱ्या एकुण खर्चाच्या ८०% रक्कम दिल्या जाते. १००% (टक्के) नाही. परंतु प्रत्यक्ष काम करत असतांना झाला तर वाढीव रक्कम देण्याची तरतुद आहे काय संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मुख्य लेखापरीक्षक :** सर्वसाधारण पणे सर्वांना वैद्यकीय औषधोपचारासाठी अपघात झालेल्या व्यक्तींना आपण ८०% रक्कम एकुण खर्चाच्या प्रमाणे देत आहोत. परंतु सभागृहात मांडलेल्या सुचनेनुसार जे की, प्रत्यक्ष काम करत असतांना अपघात झाल्यास अशा कर्मचाऱ्यांना १००% रक्कम देण्याबाबत तरतुद करावी लागेल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** स.अधिकारी श्री. सोनार यांनी केलेल्या खुलाशानुसार जर १००% रक्कम देण्याबाबत तरतुद नियमाने करता येत असेल तर तशी कार्यवाही करावी. अपघातामध्ये फॅक्चर झाले व इतर सर्व गोष्टींना त्या व्यक्तींना तोंड दयावे लागते. वैद्यकीय औषधोपचारासाठी पैसे देणे योग्य असून महापालिका ही स्वायत्त संस्था असल्यामुळे तरतुद करण्यास फारसे अवघड जाणार नाही. आज शाखा अभियंता यांच्यावर वेळ आली. उदया एकादया आपल्याकडील अग्निशामन दलातील कर्मचाऱ्यांवर वेळ येईल. त्यांना तर बऱ्याचदा वेळोवेळी काम पडते. वरीलप्रमाणे निर्णय घेण्यात यावा. त्या मताशी मी ही सहमत आहे.

**श्री. विकास जैन :** इतर नागरिकांच्या वैयक्तिक औषधोपचारासाठी स.सदस्यांच्या स्वेच्छा निधी मधुन आपण रक्कम देतच आहोत याचा विचार करता जे कर्मचारी आपले असुन सेवेत कार्यरत सेवेत कार्यरत आहेत व डयुटीवर असतांना अपघात झाल्यास अशा सर्वच कर्मचाऱ्यांना औषधोपचारासाठी ८०% रक्कम देण्या ऐवजी होणाऱ्या एकुण खर्चाच्या १००% रक्कम देण्याबाबत कार्यवाही व्हावी व तसे आदेश आपण दयावे.

**मा. सभापती :** या अगोदर आपण सर्वाना खर्च म्हणुन ८०% रक्कम देत होतोच यात दुरुस्ती करुन १००% खर्च औषधोपचारासाठी देण्यांत यावा.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** यात दुरुस्ती अगर विशेष बाब म्हणुन निर्णय घेता येणार नाही. आपण असा निर्णय घ्यावा की भविष्यात यापुढे ज्या ज्या कर्मचाऱ्यांचा ऑन डयुटीवर अपघात झाला अशा कर्मचाऱ्यांना पुर्णतः औषधोपचाराचा खर्च देण्याबाबत मंजुरी देण्यात येते. व तसे आदेश काढण्याबाबत आदेशित करावे.

**मा. सभापती :** महापालिका अस्थापनेवरील सर्व कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष काम करत असतांना अपघात झाल्यास किंवा दुर्घटना घडल्यास अशा कर्मचाऱ्यांना औषधोपचारासाठी ८०% खर्च देण्या ऐवजी १००% खर्च देण्याबाबत स्थायी समिती हा निर्णय घेत आहे. तशी प्रशासनाने कार्यवाही करावी व सर्वसाधारणपणे इतर आजार अपघात होतात त्यांना आपण ८०% खर्च देतच आहोत.

**श्रीमती गंगवाल पुष्पाताई :** किराणा चावडी येथील पोलिस चौकी दुसरीकडे स्थलांतर करण्याबाबत कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे रस्ता रुंदीकरणास अडथळा येत आहे.

**उपसंचालक नगररचना :** सदर पोलिस चौकी दुसरीकडे बांधण्या बाबतचा कालच निर्णय झालेला आहे. मा. आयुक्तांची ही त्यास मंजुरी झालेली असुन लवकरच कार्यवाही होणार आहे.

**श्रीमती गंगवाल पुष्पाताई :** याच रस्त्यावर ४x६ स्केवेअर फुटाची १९-२० दुकाने कार्यान्वित आहे यातील काही दुकाने विना परवानगीने झालेली आहे. संबंधित दुकानदांनी जागा वाढवून घेतलेली असून ती कशाच्या आधारे घेतली या संबंधात संबंधित विभागाकडे पत्र दिलेले आहे. माहिती मिळत नाही.

**मा. सभापती :** स.सदस्या श्रीमती. गंगवाल यांनी मांडलेल्या दुकाने संबंधित मुद्दयाबाबत संबंधित अधिकारी सदर दुकाने किती बाय कितीची आहे. संबंधितास

परवानगी दिली आहे. किती जागेची परवानगी दिली होती याचा खुलासा स. सदस्या यांना देण्यांत यावा.

**श्री. तुळशीबागवाले किशोर :** पानदरिब्यामध्येही अशा प्रकारची दुकाने झालेली असुन लोकांनी महापालिकेच्या मालकीच्या जागेवर ओटे बनविले आहे. त्यामुळे रस्ता अरुंद झालेला आहे. असे असतांना सुध्दा अतिक्रमण काढण्याचे काम वेळीच होत नाही. एकीकडे रस्ता रुंदीकरणाची अंमलबजावणी होते व एकीकडे रस्ते अरुंद होत जातात.

**मा. सभापती :** त्या रस्त्यावरील प्रॉपर्टी महापालिकेला घ्यावयाची आहे.

**श्री. तुळशीबागवाले किशोर :** त्या लोकांना एफएसआय दिलेला आहे. त्यांनी किती रक्कम महापालिकेला दिलेली आहे. सदर मिळकत महापालिकेकडे का घेत नाही उशीर झाल्यास संबंधित लोक न्यायालयात जातात प्रकरण वाढत जाते व पुन्हा अडचणी निर्माण होतात.

**उपसंचालक नगररचना :** या रस्त्यावरील एकाच व्यक्तीची प्रॉपर्टी महापालिकेकडे घेण्याचे बाकी आहे बाकी सर्वाची मिळालेली आहे. संबंधित व्यक्तींने न्यायालयात प्रकरण दाखल केलेले आहे. त्याबाबतचा अंतिम निर्णय झाल्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल.

**श्री. विखारोद्दीन :** एकाच व्यक्तीची प्रॉपर्टीघ्यावयाची बाकी असेल तर त्या व्यक्तींला चर्चेसाठी बोलवण्यात यावे व वाटाघाटीनुसार प्रकरण निकाली काढावे.

**मा. सभापती :** संबंधित व्यक्ती वाटाघाटी करण्यास तयार असेल तर तशी कार्यवाही करावी.

**सौ. लता दलाल :** रंगारंगल्ली, पानदरीबा रस्त्याप्रमाणेच कुंभारवाडा येथील रस्ता अरुंद झालेला आहे. रस्ता रुंदीकरण होण्याची कार्यवाही होण्या अगोदरच तेथील स्थनिक लोकांना जास्तीच्या जागा देण्यात आलेल्या असून त्यात मध्यप्रदेश उत्तरप्रदेश भागातील लोक आहेत. स्वतःच्या मालकीच्या जागा संबोधून महापालिकेच्या जागा बळकावण्याचा प्रयत्न होत आहे. याबाबत मी सभागृहात तसेच लेखी तक्रारीही दिलेल्या असुन कार्यवाही होत नाही काय काढण्यात आलेले नाही याचा खुलासा करावा.

**मा. सभापती :** शहरातील कोणतही जागा महापालिकेने रस्ता रुंदीकरणाच्या हिशोबाने नागरिकांकडुन जागा ताब्यात घेतलेली आहे अशा रस्त्यावर अतिक्रमण झ ालयास ती काढणे गरजेचे आहे. उदा. रंगारगल्ली कुंभारवाडा निराला बाजार पैठणगेट अशा रस्त्यावरील जागा संपादित केल्या असतील तर ती त्या जागेवरील अतिक्रमण काढण्यात यावी जेणे करुन पहिल्या स्थितीत तो रस्ता असेल.

**सौ. लता दलाल :** औरंगपुरा येथील युरीनल बांधण्याबाबत काय कार्यवाही झाली या संबंधी मागील बैठकीत चर्चा झालेली आहे. याच बरोबर कर्मचाऱ्यासाठी हजेरी सेंटर बांधण्यात यावे.

**शहर अभियंता :** जे युरीनलचे नवीन बांधकाम केलेले होते ते पुन्हा तोडण्यात आलेले आहे सभागृहाने स्थळ पाहणी केल्यानंतरच योग्य तो निर्णय घेता येईल.

**मा. सभापती :** ठिक आहे स. अधिकारी यांच्या सांगण्यानुसार सभागृहातील स. सदस्या सौ. लता दलाल सौ. मुंडलिक व मी स्वतः प्रत्यक्ष त्या ठिकाणी पाहणी करुन नंतर योग्य तो निर्णय घेता येईल.

**सौ. तळेकर राधाबाई :** मागील बैठकीत चर्चा केल्यानुसार श्री. चौधरी यांनी महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण केले होते. त्याबाबत योग्य चौकशी करण्याचे सांगितल्यानुसार संबंधित अधिकारी त्याठिकाणी गेले व त्यांनी संबंधित जागा कुणाची आहे याची पडताळणी केलेली आहे. नक्कीच ती जागा कुणाची हे अधिकारी यांना आता कळालेले आहे. तसा खुलासा अधिकाऱ्याकडुन घ्यावा. सदर जागा महापालिकेच्या मालकीचीच होती परंतु अधिकाऱ्यांच्या चौकशीला दिरगांईमुळे संबंधित व्यक्तींने अतिक्रमण करुन जागा बळकावण्याचा सपाटा लावलेला होता. सर्व संबंधित अधिकारी यांनी ती जागा आपल्या ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी. श्री. चौधरी यांनी केलेले बांधकाम तात्काळ पाडण्याचे आदेश प्रशासनाला दयावे.

**मा. सभापती :** स.सदस्या सौ. तळेकर यांनी मागील दोन-तीन बैठकीमध्ये श्री. चौधरी नावाच्या व्यक्तींने मनपाच्या जागेवर अतिक्रमण केल्याच्या तक्रारी केल्या होत्या त्याची शहानिशा झालेली आहे असे स. सदस्याच्या म्हणण्यानुसार संबंधित व्यक्तीने केलेल्या अतिक्रमणातील किती जागा महापालिकेच्या मालकीची आहे याची दोन-तीन दिवसात चौकशी करुन जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही करावी व अतिक्रमणामध्ये केले बांधकाम तात्काळ पाडण्याबाबत कार्यवाही व्हावी.

**सौ. लता दलाल :** महापालिकेच्या मालकीच्या जागेवर तात्काळ व्यक्तींची दोन-तीन दुकाने सद्य स्थितीत उभी आहेत ती तात्काळ काढण्यात यावी अतिक्रमणात येणारी सर्वच दुकाने काढण्यात यावी कुणाचीही गय करु नये.

**श्री. स.अ. एकबालोद्दीन :** सध्या रमजानचा महिना असुन काही मुस्लीम बांधव छोटया मोठया हातगाडया लावून विक्री करत आहे. रमजानचा महिना संपल्यानंतर अतिक्रमण हटविण्याबाबत कार्यवाही केल्यास योग्य होईल.

**सौ. लता दलाल :** वर्षातुन बरेचशे सण येतात रमजान नंतर संक्रात येईल. त्यांनतर पाडवा, दिवाळी येईल वर्षभर अशा विक्रेत्यांना महापालिकेच्या जागेवर दुकाने लावून देणार काय? कुणाचाही दुजाभाव न करता अतिक्रमणातील दुकाने नियमाने काढण्यात यावी.

**श्री. व्ही.व्ही. देशमुख :** मी केलेल्या ड्रेनेजच्या घाण पाण्याविषयाच्या मुद्दया संदर्भात अधिकारी यांनी कार्यवाही करण्याबाबतचा स्पष्ट खुलासा केलेला नाही.

**कार्यकारी अभियंता :** ड्रेनेज लाईनचे रिपेरिंगचे जे काम असेल ते तात्काळ करुन घेण्यात येईल.

**श्री. व्ही.व्ही. देशमुख :** आमचे म्हणणे असे की, सदर काम हे कार्यकारी अभियंता यांच्याकडे असुन ते या कामासाठी कमी पडतात. कार्यकारी अभियंता यांनी दोन वेळा पाहणी केलेली आहे. त्यांच्या अधिकारातील उपअभियंता यांनी ६ वेळेस पाहणी केलेली आहे. आमच्या भागातील जे जे प्रश्न उद्‌भवतील त्या बाबत मी प्राधान्याचे प्रश्न माडणार आहे. ठिकाणी चेंबरवर महिण्यापासुन झाकन नाही. रिंग ढापे नाही. आमचे म्हणणे चुकीचे असेल तर आताच प्रशासनाच्या मान्यमातुन पाहणी व्हावी सद्यस्थिती काय हे दिसुन येईल.

**मा. सभापती :** ठिक आहे. स. सदस्यांनी माडलेल्या सुचनाची संबंधित अधिकारी यांनी नोंद घेऊन, पाहणी करावी व पुढील कार्यवाही करावी.

**सौ. तळेकर राधाबाई :** जवाहर कॉलनीत मोठे हॉस्पीटल झालेले आहे. हॉस्पीटलसाठी जी ड्रेनेजची लाईन टाकण्यात आली तीच्या खाली पाण्याच्या लाईन टाकलेली आहे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती घेऊन कार्यवाही करावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** उदया जाऊन पाहणी करण्यात येईल. त्यानंतर कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** शहरामध्ये एका दिवसात १५-१६-२० असे जास्तीत जास्त उद्घाटनाचे कार्यक्रम पार पडले. ज्यांच्या त्यांच्या मर्जीने उद्घाटनासाठी आपआपले लोक बोलवण्यात आले. पैसा महानगरपालिकेचा, उद्घाटन होते चांगल्या गोष्टी होतात. परंतु एकदा उद्घाटन झाल्यावर ते काम ठराविक वेळात होत नाही. व कोणत्याही प्रकारचे कामासंच सुरुवात होत नाही. गेल्या महिन्या भरामध्ये शहरात किती उद्घाटने झाली. त्यानुसार किती कामांना सुरुवात झाली, एकुण उद्घाटने किती झाली याची संबंधित अधिकारी यांनी सविस्तर माहिती दयावी.

**उप अभियंता (इ.) :** उद्घाटन झाल्यावर कामास तात्काळ सुरुवात करण्यात येते. म्हाडा कॉलनी सिडको येथील काम ४ दिवसापासुन चालु आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली आहे. उद्घाटन झाल्यानंतर कामास सुरुवात होत नाही. अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा तर असे सांगण्यात येते की, येते की, ठेकेदाराकडील मशीन खराब झाली. आपल्याला माहित आहे ठेकेदाराकडे एकच मशीन नसते. उद्घाटनाच्या वेळी मशीन घेऊन येतात. पुन्हा त्या ठिकाणी कामे सुरु करण्यास त्यांना वेळच नसतो. सभागृहात अधिकारी यांना माहिती विचारल्यास उत्तरे बरोबर मिळत नाही असे होत असेल तर विकास कामे ठप्प होतील.

**मा. सभापती :** उद्घाटन झाल्यानंतर तात्काळ कामे सुरु झाली पाहिजे. स. सदस्य यांनी मांडलेला मुद्दा योग्य आहे. जर ठेकेदाराकडे मशीन नसेल तर त्यांनी भाडण्याने दुसरी मशीन आणुन काम सुरु करण्याबाबत कार्यवाही करावयास पाहिजे संबंधित अधिकाऱ्यांनीच त्या ठेकेदाराच्या मागे राहुन तात्काळ कामे करुन घेण्याची कार्यवाही केली पाहिजे. कामे वेळेवर व्हावीत एवढया उद्देश आमचा आहे.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** काही अधिकारी/कर्मचारी चांगल्या प्रकारे काम करतात. या दृष्टीने काहींना पदोन्नती तर काहींचे ग्रेड वाढवून दिलेले आहे. अशा कर्मचाऱ्यांनी प्रशासकीय कामात जर नियमाने तसेच तात्काळ कामे करण्याबाबत दिरंगाई केल्यास त्या कर्मचाऱ्यांना देण्यांत आलेली पदोन्नती/ग्रेड रद्द करण्यात यावे असे माझे मत आहे.

२) दि. २८-१०-९७ तसेच २६-३-९९ च्या स्थायी समिती सभेत १६ अधिकारी वर्गामधील कर्मचाऱ्यांना वाढीव वेतनश्रेणी देण्याबाबत चर्चा झालेली होती. काहींना वेतनश्रेणी देण्यांत आली. काहींना नाही ज्यांना देण्यात आलेली नाही त्यांच्या संदर्भात सभागृहात चर्चा होऊन प्रशासनाने असा खुलासा केला होता की, प्रशासनामार्फत प्रस्ताव आणण्यात येईल. परंतु अदयाप प्रस्ताव मंजुरीसाठी आलेला नाही. काहींना देणे काहींना देता नाही. हे प्रशासनाचे धोरण योग्य नाही. याबाबत खुलासा करावा.

३)दुसरी एक बाब निदर्शनास आणु देऊ इच्छितो की, महापालिका अस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे वेगवेगळया कारणाने निलंबन होते. उदा. भ्रष्टाचार, खाते चौकशी, कामात निष्काळजीपणा, ॲन्टीकरप्शन इ. कारणाने निलंबन होते. निलंबन केल्यानंतर सदर कर्मचारी सेवेत पुन्हा घेण्यासाठी मागणी करतात. परंतु एकाच प्रकरणात दोन कर्मचारी त्यात एक अधिकारी/दुसरे वर्ग-३ चे कर्मचारी जेव्हा निलंबित होतात. व त्यांना कामावर घेण्यासाठी सभागृहात निर्णय घेतांना वेगवेगळे निकष लावले जातात. काहीचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठवण्याची शिफारस होते तर एक अधिकारी निलंबित होतो त्यावेळेस तातडीने बैठक बोलवून त्यांना कामावर घेण्याबाबत तात्काळ कार्यवाही होते. सर्वांना अशा प्रकरणात माझ्र यामते मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६(४) प्रमाणे कामावर घेण्याबाबतचे नियम लागु पडतात. परंतु एकाच प्रकरणात वेगवेगळे निर्णय देणे योग्य नाही यापुढे याची दखल घेण्यात यावी. व सर्वांना सारखेच नियम असावे. असेच उदा. दयावयाचे झाल्यास मागील बैठकीत खेडकर नावाच्या, कर्मचाऱ्यांच्या अपीलावर कामावर घेण्यात आलेले नाही. का उशीर लागलेला आहे. याबाबतचा खुलासा करावा.

४) आपल्याचे विभागातील एक कर्मचारी "लघुटंकलेखक" पदावर १५००/- रुपये दरमहा वेतनावर काम करतात. त्यांनी बऱ्याच वेळेस वेतनश्रेणी लागु करण्याबाबत अर्ज केलेले आहे. जर वेतनश्रेणी देता येत नसेल तर त्यांना १५००/- रु. ऐवजी दरमहा कमीत कमी २५००/- रु वेतन देण्यांत यावे.

**मा. सभापती :** स. सदस्य श्री. कोकाटे यांनी मांडलेल्या सुचनाची मा. प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री. विखारोद्यीन :** माझ्या वार्डातील दवाखान्यामध्ये एक्सरे मशीन अदयाप आलेले नाही खुलासा करावा.

**सौ. लता दलाल :** दिड वर्षापुर्वी एक ठराव झालेला होता की, औरंगपुरा येथील महापालिकेच्या दवाखान्यात सुरु करण्यात यावी. अदयाप कार्यवाही झालेली नाही. याचा खुलासा करावा.

**मा. सभापती :** एक्सरे मशीन आपण मागणी केलेली आहे. आरोग्य विभागातर्फे शहरातील नागरिकांना चांगल्याप्रकारे सुविधा दिल्या जातात. परंतु आरोग्य विभागा संदर्भात काही लोकांनी तक्रारी ही केलेल्या आहेत. या विभागात लागणारे साहित्य, औषधोपचाराचे सर्व साहित्याची मागणी किती केली जाते त्याचे टेंडर काढण्यात येतात. याची माहिती उपआयुक्त (म.) यांनी घ्यावी. तसेच कर्मचाऱ्यांना नियमाने सवलती देण्याची कार्यवाही या विभागाकडुन होत नाही. कर्मचाऱ्यांची अडवणुक केली जाते अशाही तक्रारी आलेल्या आहेत. असे जर असेल तर मा. आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी.

**श्री. विकास जैन :** महापालिकेच्या संपुर्ण दवाखान्यासाठी लागणारी औषधी यांचे टेंडर कधी निघते किती निघते याची माहिती घेऊन स.सदस्यांना दयावी.

**श्री. विखारोद्दीन :** डॉक्टर नाही व २०० ते २५० पेशंट येतात त्यांना कोण उपचार करणार डॉक्टरची कधी नियुक्ती होणार.

**मा. सभापती :** आरोग्य विभाग हा जनसेवा करणारा विभाग आहे या विभागाची चौकशी व्हावी येणाऱ्या समितीकडे एक्सरे व औषधी खरेदी व्हावयास पाहिजे उपआयुक्त (म.) यांनी चौकशी करावी.

**श्री. विकास जैन :** बऱ्याच इस्टीमेंटसला मंजुरी झालेली आहे. यानंतर टेंडर काढण्यात येतात. १०% रक्कम अनामत ठेकेदार ठेऊ शकत नाही तसे पत्रही त्या ठेकेदारांनी दिलेले आहे. ठेकेदारांवर अन्याय होता. त्यांनी बहिष्कार टाकलेले आहे. परिस्थिती अशीच चालु राहिली तर काम थांबेल आपण जनतेला सांगु शकणार नाही १०% अनामत ठेवण्या संबंधी लवकर निर्णय घ्यावा.

**मा. सभापती :** मा. प्रशासनाने ठेकेदाराकडुन एका कामात एकुण होणाऱ्या खर्चाच्या २०% रक्कम अनामत ठेवण्याबाबत कळविले होते. त्यात आपण मागच्या बैठकीत २०% ऐवजी फक्त एकुण कामाच्या १०% रक्कम अनामत ठेवण्याबाबत सहानुभुतीच्या दृष्टीने निर्णय घेतलेला आहे. परंतु संबंधित ठेकेदाराने त्यावर आक्षेप घेऊन तसे पत्र मा. आयुक्तांकडे दिलेले असून त्यात त्यांनी १०% ची अट काढुन न टाकण्यास उपोषणाचा इशाराही केलेला असुन त्याची सुचनाचा मी विचार केलेला आहे. आपण सगळयांच्या म्हणण्यानुसार ठेकेदारांनी चांगल्या पध्दतीने कामे करावीत म्हणुन १०% रक्कम अनामत ठेवण्याचा निर्णय घेतलेला होता मी माझा प्रस्ताव वाचुन दाखवतो ठेकेदाराकडुन विकास कामातील १०% रक्कम राखुन ठेवलीच पाहिजे. हा आपण निर्णय कायम ठेवावा.

**श्री. विकास जैन :** २ महिन्यानंतर बजेटची मिटींग येईल. पुढच्या आर्थिक वर्षासाठी हा निर्णय आपण लागु करावा. म्हणजे ०१ एप्रिल २००० पासुन लागु करावा.

**श्री. विखारोद्दीन :** पुढील वर्षी म्हणजेच १ एप्रिल २००० पासुन वरील अट लागु करावी मागील बैठकीत घेतलेला निर्णय रद्द करण्यात यावा.

**श्री. व्ही.व्ही. देशमुख :** सभागृहाने घेतलेला निर्णय पुन्हा बदलता येतो का हे पहावे. यात दुरुस्ती करणार काय?

**श्री. कोकाटे काशिनाथ :** ठेकेदार जे डीएसआर वापरतात ते वेगवेगळे वापरण्यात येतात २०-२५ टक्के कमी दराने कामे करण्याबाबत निविदा निघतात. शासनाच्या इतर कार्यालयातील विकास कामाबाबत १० टक्के २० टक्के अनामत ठेवत नाही आपण जी १०% अनामत रक्कम ठेवण्याची अट घातली ती चांगले काम करणारावर अन्यायकारक होईल. त्यासाठी १०% ची अट शिथील करुन जे कन्ट्राटदार चांगल्या प्रतीचे काम करणार नाही त्याचीच रक्कम अनामत ठेवावी. चांगले काम करणारावर अन्याय होऊ नये.

**मा. सभापती :** माझ्या प्रस्ताव असा आहे की, ज्या निविदामध्ये अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% कमी दराने काम करण्याचे सुवविले अशा कामात १०% ची अट शिथील करुन व एक वर्ष अनामत रक्कम ठेवता एकुण कामाच्या खर्चाच्या ५% टक्के रक्कम अनामत ठेवण्यात येईल व ती फक्त नऊ महिण्यासाठीच ठेवण्यात येईल या अगोदर २% सुरक्षा ठेव तसेच ३% इएमडी भरावीच लागते त्यात आपण निर्णय घेऊ शकत नाही. मागील बैठकीत १०%

अनामत रक्कम एक वर्षासाठी ठेवण्यात येईल ती अटीशिथील करण्यात येऊन वरील प्रमाणे ५% रक्कम देयकातुन कपात करावे व नियमाप्रमाणे २% अनामत रक्कम व ३% एफ एस डी हे कायम राहील. असा निर्णय घेण्यात येतो. त्याची अंमलबजावणी व्हावी.

**श्री. व्ही.व्ही. देशमुख :** एखादे काम २५ हजाराचे काम आहे व प्रत्यक्षात १०-१५ हजाराचे काम होते परंतु प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची नोंद न होता अंदाजपत्रकीय रक्कमेची नोंद होते.

**मा. सभापती :** २५ हजाराचे घेतलेले काम १५% पेक्षा कमी दराने झाले असेल तर यातील येणारा फरक म्हणुन नोंद होईल. आपण जी सुचना मांडली ते काम नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतील असेल तर पत्र दिल्यानुसार विशिष्ट कालावधी ते काम व्हावयास पाहिजे व या संबंधिची नोंद लेखा विभागाने घ्यावयास पाहिजे अशी विनंती आहे.

**सौ. तळेकर राधाबाई :** महापालिकेच्या शाळातील विदयार्थ्यांसाठी शालेय साहित्य खरेदी करण्यासाठी २५,००० हजार रुपये स्वेच्छानिधी उपलब्ध करुन देण्याची मंजुरी आहेच परंतु जर आणखी काही स. सदस्य शालेय साहित्य खरेदी करण्यासाठी २५ हजारापेक्षा जास्त निधी उपलब्ध करुन देण्यास संम्मती देत असतील, उदा. सिडकोतील बऱ्याच नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतील रक्कम बाकी असुन त्याचे पत्र घेऊन निधी देण्यास तयार असतील तर तसा सभागृहाने निर्णय घ्यावा. मुलांना साहित्य वेळेवर न मिळाल्याने त्याचे शैक्षणिक नुकसान होते.

**सौ. लता दलाल :** नगररचना विभागाचे प्रश्न उपस्थित करण्यासाठी वेगळी बैठक घेणार काय या विभागातुन कोणत्याही प्रकारचे कागदपत्राचे पुरावे नसतांना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येते. चर्चा करण्यासाठी वेळ देणार काय नसता पत्रकारांना या विभागा संबंधीची माहितीची प्रत मी देणार आहे. माझ्या पुतणीला एका प्रकरणात परवानगी घेण्यासाठी सर्व कागदपत्राची पुर्तता असतांना १ ॥ वर्ष परवानगी घेण्यास लागले.

**विषय क्र. ४४५/१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नेहरुभवन येथे स्टेजवर नविन पडदे बसविण्यासाठी ढोबळमानाने र.रु. १,१७,२५०/- चा खर्च गृहीत धरुन मान्यतेस्तव पाठविले असता मा. आयुक्त महोदय दि. २८-७-९८ अन्वये मागविणेस्तव आदेशित केलेले होते. त्यानुसार उपरोक्त कामासाठी जा.क्र.मनपा/लेखा/नि/९१/९८ दिनांक २४-११-९८ अन्वये दरपत्रके मागविली असता दरपत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन (२) दरामध्ये प्राप्त झाली. दरपत्रके दि. ७-१२-९८ रोजी उपस्थित दरपत्रका धारकासमक्ष उघडण्यात आली.

मा. आयुक्त महोदय यांचे आदेशान्वये दोन्ही एजन्सीला दराबाबतच्या वाटाघाटीस्तव बोलविण्यांत आले असता मा. आयुक्त महोदय यांनी दि. ६-११-९९ अन्वये वाटाघाटी अंती मे. आयव्हरी ट्रेडर्स यांचे दरास मान्यता दिलेली आहे. सदरील दोन्ही एजन्सी चे दर खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे विरण | आयव्हरी ट्रेडर्स | सजावट हॅन्डल्युम | वाटाघाटी अंती आयव्हरी ट्रेडर्स यांचे मान्य दर. |
|---|---|---|---|---|
| १. | साईक | ४०००/- रु. | ६४८०/- रु. | ४०००/- रु. |
| २. | विंग्ज (दोन बाजुस ८ नग) | १२००/- रु. प्रतिनग | १२००/- प्रतिनग | १२००/- रु. प्रतिनग |
| ३. | फ्लाईज | १३,१००/-रु. | १४१००/- रु. | १३,०००/- रु. |
| ४. | मुख्यपडदा (वेलवेट) | ७१,३००/- रु. | ३२९००/- रु. | ३२,९००/- रु. |
| ५. | स्टील रॉड | ३१००/- रु. | दरभरले नाही. | ३०००/- रु. |
| ६. | मंडपी | ९०००/- रु. | --//-- | ८०००/- रु. |
| ७. | पडदा उघडणे व बंद करण्यासाठी इ. ऑटोमॅटीक मोटार | ४७,०००/- रु. | --//-- | ४०,०००/-रु. |

यानुसार मे. आयव्हरी ट्रेडर्स यांचे मान्य दरानुसार दरपत्रक मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरुभवन स्टेजवर नविन पडदे बसविण्यांच्या कामासाठी दरपत्रक धारकासह झालेल्या वाटाघाटीनुसार मे. आयव्हरी ट्रेडर्स यांचेकडुन खाली दर्शविलेल्या दराने पडदे खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | कामाचे विरण | वाटाघाटी अंती आयव्हरी ट्रेडर्स यांचे मान्य दर. |
|---|---|---|
| १ | साईक | रु. ४०००/- |
| २ | विंग्ज (दोन बाजुस ८ नग) | रु. १२००/- प्रतिनग |
| ३ | फ्लाईज | रु. १३,०००/- |
| ४ | मुख्यपडदा (वेलवेट) | रु. ३२,९००/- |
| ५ | स्टील रॉड | रु. ३०००/- |
| ६ | मंडपी | रु. ८०००/- |
| ७ | पडदा उघडणे व बंद करण्यासाठी इ. ऑटोमॅटीक मोटार | रु. ४०,०००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४६/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शिवशक्ती कॉलनी, रघुवीरनगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. ३,१२,३१५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ९ (नऊ) कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त दोन (२) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | ३८.००% | कमी |
| २. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | १९.९९% | कमी |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३८.००% कमी आहेत. तरी मे. मॉस्कॉट कं. यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३८.००% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद**

**श्री. विखारोद्यीन :** ३८.००% कमी दराची निविदा आहे. काम योग्य होईल काय.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी चांगल्या प्रतीचे काम होईल अशी कार्यवाही करावी. प्रस्ताव मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिवशक्ती कॉलनी, रघुवीरनगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३८% कमी दराच्या मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४७/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, देशमुखनगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. ४,९०,४६८/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली. असता निविदापत्रके विक्रिच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण नऊ (९) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त चार (४) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | ३८.००% | कमी |
| २. | मे. व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन | ३७.७९% | कमी |
| ३. | श्री. डी. अजितसिंग | २५.९१% | कमी |
| ४. | श्री. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | २४.००% | कमी |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. मास्कॉट कं. यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३८.००% कमी आहेत. तरी मे.

मॉस्कॉट कं. यांच्या कडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३८.००% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे देशमुखनगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३८% कमी दराच्या मास्कॉट कंन्स्ट्रक्शन यांचे निविदेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४८/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संत एकनाथ को.ऑप. हॉऊसिंग सोसायटी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ४,४३,२६१/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली, असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण नऊ (९) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन (३) निविदापत्रक दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | ३६.८६% | कमी |
| २. | श्री. डी.अजितसिंग | २५.९१% | कमी |
| ३. | श्री. मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | २१.९९% | कमी |

वरील प्राप्त निविदापैकी मे. मास्कॉट कं. यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.८६% कमी आहेत. तरी मे. मास्कॉट कं. यांच्याकडे सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.८६% कमी दराने करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ को.ऑप. हॉसिंग सोसायटी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रक दरापेक्षा ३६.८६% कमी दराच्या मास्कॉट कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४९/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, विद्यानिकेतन कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ४,२४,१२३/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत

एकुण नऊ (९) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त चार (४) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. के.बी. पाथ्रीकर | ३९.१५% | कमी |
| २. | मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | ३८.००% | कमी |
| ३. | मे.ए.एस. कंन्स्ट्रक्शन | ३२.००% | कमी |
| ४. | श्री. अदिनाथ कंन्स्ट्रक्शन | २३.००% | कमी |

वरील प्राप्त निविदापैकी श्री.के.बी. पाथ्रीकर यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३९.१५% कमी आहेत. तरी श्री. के.बी. पाथ्रीकर यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३९.१५% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद**

**श्री. देशमुख व्ही.व्ही. :** या प्रस्तावात खुपच कमी दराने निविदा आलेली आहे. चांगले काम होईल याची खात्री करावी. अधिकारी जबाबदार राहतील याची इतिवृत्तात नोंद व्हावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी चांगले काम होईल यांची दक्षता घ्यावी. विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विद्यानिकेतन कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३९.१५% कमी दराच्या श्री. के.बी. पाथ्रीकर यांचे दरपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळीचे विषय*

**विषय क्र. ४५०/१ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गजाननगर येथे १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन काढुन खोल करुन २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी सन ९८-९९ च्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याचे दरसुची दराने र.रु. १,५७,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आल आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १,५७,१००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतच्या प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गजाननगर येथे १५० मी.मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे व १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन काढुन खोल करुन २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी र.रु. १,५७,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५१/२ :**

लोकमत टाऊन सिडको येथे १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जल. वाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक र.रु. ३,१९,५००/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रक र.रु. ३,१९,५००/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सन ९८-९९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असुन या कामावर होणारा खर्च पाणीपुरवठा देखभाल दुरुस्ती सन ९९-२००० च्या आर्थिक तरतुदीतुन करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे.

तरी लोकमत टाऊन सेंटर येथे जलवाहिनी टाकण्याचे अंदाजपत्रक र.रु. ३,१९,५००/- चे स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लोकमत टाऊन सिडको येथे १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी र.रु. ३,१९,५००/- अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५२/३ :**

कार्यकारी अभियंता पा.पु.व.ज.नि. यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नवीन फारोळा पंपगृह येथे ६३० के.वि.ए./३०३ के.वि./४३३ वि. क्षमतेचा ट्रान्सफॉमर च्या दुरुस्तीच्या कामासाठी चे अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी दि. ८-१२-९९ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

अंदाजपत्रकाच्या किंमत र.रु. १,१२,६७५/- एवढी आहे. या कामासाठी होणारा खर्च देखभाल व दुरुस्ती या शिर्षकाखाली टाकण्यात येईल. तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फारोळा नविन पंपगृह येथील ६३० के.वि.ए. ३०३ के.वि./४३३ वि. क्षमतेच्या ट्रान्सफॉमरच्या दुरुस्तीसाठी र.रु. १,१२,६७५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५३/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गारखेडा सर्व्हे क्रं.५९ येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे खेळणी बसविणे बेंचेस बसविणे बाबत कामाचे अंदाजपत्रक र.रु. ३,१३,०००/- चे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दरसुची सन ९८-९९

नुसार बनविण्यात आले असुन त्यास मा. आयुक्तांची दि. ७-१२-९९ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदरचा खर्च विकास योजने अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या लेखाशिर्षा अंतर्गत प्रस्तावित करण्यात आला आहे.

करिता गारखेडा स.न. ५९ येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षितभिंत बांधणे खेळणी बसविणे, बेंचेंस बसविणेच्या अंदाजपत्रक र.रु. ३,१३,०००/- च्या खर्चास विकास योजने अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या लेखाशिर्षा अंतर्गत स्थायी समितीच्या मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा स.न.५९ येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे, खेळणी बसविणे, बेचेंस बसविणे च्या कामासाठी र.रु. ३,१३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५४/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, स.न. १८/१ शहानुरवाडी शांतीनाथ को.ऑ.सोसायटी येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे बाबतचे अंदाजपत्रक र.रु. २,४८,१००/- चे सार्वजनिक बांधकाम दरसुची सन ९८-९९ नुसार बनविण्यात आले असुन त्यास मा. आयुक्तांची दि. ७-१२-९९ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदरचा खर्च भुखंडाचे संरक्षण या लेखाशिर्षा अंतर्गत प्रस्तावित करण्यात आला आहे.

करिता स.न.१८/१ शहानुरवाडी येथील शांतीनाथ को.ऑ.हौ. सोसायटी येथील खुल्या जागेस संरक्षितभिंत बांधणेच्या अंदाजपत्रक र.रु. २,४८,१००/- च्या खर्चास विकास योजने अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या लेखाशिर्षका अंतर्गत स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स.न. १८/१ शहानुरवाडी येथील शांतीनाथ सोसायटीच्या खुल्या जागेस भिंत बांधणेच्या कामासाठी र.रु. २,४८,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५५/६ :**

शिक्षणाधिकारी महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शिक्षण विभागाचे अंतर्गत फर्निचर खरेदी व दुरुस्ती या लेखाशिर्षाखाली सन ९९-२००० या आर्थिक वर्षाकरिता र.रु. ९.०० लाखाची तरतुद करण्यांत आली आहे. सदर लेखाशिर्षाखाली अंतर्गत डब्बल डेस्क (सागवानी लाकुड ॲगल फेम) खरेदी करण्यासाठी दि. २४-६-९९ रोजी स्थानिक वृत्तपत्रातुन निविदा प्रसिध्द करण्यात आल्या एकुण ३ (तीन) निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदेत दर्शविलेल्या अटी.शर्ती व तांत्रिक अहवालानुसार मे. वर्षा मेटल वर्क्स, औरंगाबाद यांचे नमुना दर निश्चित करण्यांत आले ते खालीप्रमाणे.

| डयुअल डेस्क तपशील | (सागवानी) | | | |
|---|---|---|---|---|
| | लांबी | रुंदी | जाडी | दर |
| सीट फळी | ०१ मी. | २५ से.मी. | ०२ से.मी | |
| टॉप फळी | ०१ मी. | २५ सेमी | ०२ से.मी. | १९७५/- प्रतिनग |
| बुक कंपार्टमेट | | | | |
| उभी फळी | ०१ मी. | २५ से.मी. | ०२ से.मी. | |
| आडवी फळी | ८५ से.मी. | २० से.मी. | ०२ से.मी. | |
| लोखंडी ॲगल साईज | ३२X३२X४ | | | |
| लोखंडी फ्रेम साईज | ८०X९५ से.मी. तळाशी | | | |
| सटिची उंची | ४० से.मी. | | | |
| टॉपची उंची | ७० से.मी | | | |

उपरोक्त तपशिलानुसार दर निश्चित करण्यासाठी प्रसताव स्थायी समिती विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिक्षण विभागाकरिता खालील आकारमानाचे डयुअल डेस्क खरेदी करिता मे. वर्षा वर्क्स औरंगाबाद यांचे नमुनादरास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

| डयुअल डेस्क तपशील | (सागवानी) | | | |
|---|---|---|---|---|
| | लांबी | रुंदी | जाडी | दर |
| सीट फळी | ०१ मी. | २५ से.मी. | ०२ से.मी | |
| टॉप फळी | ०१ मी. | २५ सेमी | ०२ से.मी. | १९७५/- प्रतिनग |
| बुक कंपार्टमेट | | | | |
| उभी फळी | ०१ मी. | २५ से.मी. | ०२ से.मी. | |
| आडवी फळी | ८५ से.मी. | २० से.मी. | ०२ से.मी. | |
| लोखंडी ॲगल साईज | ३२X३२X४ | | | |
| लोखंडी फ्रेम साईज | ८०X९५ से.मी. तळाशी | | | |
| सटिची उंची | ४० से.मी. | | | |
| टॉपची उंची | ७० से.मी | | | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५६/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, राममंदिर ते आझाद चौक रस्त्यावर कॉक्रीटचे दुभाजक करुन त्यावर लोखंडी ग्रिल बसविण्याच्या कामासाठी दिनांक २२-६-९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. १६९/३३ अन्वये अंदाजपत्रक र.रु. ५,८१,६०० ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/२९/९९ दि. २-७-९९ चे निविदा सुचनेव्दारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (२०) वीस निविदा विक्री झाल्या त्यापैकी स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण (पाच) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. संधु कंन्स्ट्रक्शन कं. | १८.१% | कमी दराने |
| २. | श्री. एजाज अहमद | १७.८६% | --//-- |
| ३. | मे. ए.आर. कंन्स्ट्र.कं. | १६% | --//-- |
| ४. | जय मातादी कंन्स्ट्रक्शन | १३.८% | --//-- |
| ५. | मे. हरीओम कंन्स्ट्र. | २१.०१% | (निविदेसोबत ई.एम.डी.न दिल्यामुळे या निविदेचा विचार करता येत नाही.) |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १८.०१% कमी दराने मे. संधु कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असुन मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राममंदिर ते आझाद चौक रस्त्यावर कॉक्रिटचे दुभाजक तयार करुन त्यावर लोखंडी ग्रिल बसविण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १८.०१% कमी दराच्या मे. संधु कंन्स्ट्रक्शन यांचे निविदापत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५७/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जालनगर येथे पथदिव्याकरिता विद्युतीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ४,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रक विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण विस (२०) कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त पाच निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर भरुन प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. ओमशांती इलेक्ट्रीकल | २६.११% | कमी |
| २. | मे. दानिश सेल्स कार्पोरेशन | २२.७८६% | --//-- |
| ३. | मे. प्रगत इलेक्ट्रीकल | १९.११% | --//-- |
| ४. | मे. लुना इलेक्ट्रीकल | १८.००% | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | मे. गजानन इलेक्ट्रीकल | १६.०६% | --//-- |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. ओमशांती इलेक्ट्रीकल यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.११% कमी आहेत.

तरी मे. ओमशांती इलेक्ट्रीकल यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.११% कमी दराने करुन घेण्याबाबतचा विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालनगर येथे पथदिव्यांच्या विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २६.११% कमी दराच्या मे. ओमशांती इलेक्ट्रीकल यांचे निविदापत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५८/९ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. ब्राम्हणगल्ली बेगमपुरा येथे ४५० मी.मी. व्यासाची अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक र.रु. १,९७,२८५/- ला स्थायी समितीने दि. १८-१०-९९ च्या सभेमध्ये ठराव क्र. ३००/४२ ने मंजुरी मिळालेली आहे. त्यानुसार बी-१ निविदा जा.क्र. मनपा/लेखा/नि/३२/९९ दि. २५-१०-९९ अन्वये बी-१ नमुन्यात वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविल्या असता एकुण १९ (एकोणाविस) निविदा विक्री झाल्या. त्यापैकी नऊ (९) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. गुलाम रसुल | ३०.३१% | कमी दराने |
| २. | मे. कम्फर्ट कंन्स्ट्रक्शन | २०% | --//-- |
| ३. | श्री. प्रकाश जाधव | १९.५०% | --//-- |
| ४. | श्री. काझी मो. सिराजद्दीन | १५% | --//-- |
| ५. | मे. कल्याणी कंन्स्ट्रक्शन | १५% | --//-- |
| ६. | श्री. अब्दुल खलील | १५% | --//-- |
| ७. | श्री. राजु कोलते | -- | अंदाजपत्रकी दराने |
| ८. | श्री. राजेंद्र वर्धे | १०% | कमी दराने |
| ९. | श्री. शेख फिरोज | १२% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.११% कमी दराची श्री. गुलाम रसुल यांची निविदा आहे. सदरील निविदेस मा. आयुक्तांनी दि. २-१२-९९ रोजी मंजुरी दिलेली आहे.

करिता प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. ब्राम्हणगल्ली बेगमपुरा येथे ४५० मी.मी. व्यासाची अर्धगोलाकार गटार बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व

अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ३०.११% कमी दराच्या श्री. गुलाम रसुल यांच्या निविदापत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५९/१० :**

कार्यकारी अभियंता पा.पु.व.ज.नि. यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. आसिफबाग दिलरस सोसायटी जवळ असलेल्या रेखांकनात १५० मी.मी. व २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक र.रु. २,२१,८२५/- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन ९७-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असुन सदरील कामास विषय क्र. ११०/११ दि. ९-६-९९ अन्वये स्थायी समिती मंजुरी दिलेली आहे. सदरील कामाची बी-१ नमुन्यात जा.क्र. मनपा/लेखा/नि/१९/९९ दि. २९-६-९९ अन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देवुन निविदा मागविल्या असता एकुण २१ निविदा विक्री झाल्या व त्यापैकी ८ (आठ) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. रियाजोद्दीन नन्हेखॉ | ३०% | अं.प. दरापेक्षा कमी |
| २. | श्री. बसरा कंन्स्ट्रक्शन | २८.२८ % | --//-- |
| ३. | श्री. स.फैजुल हक | २७.८६% | --//-- |
| ४. | श्री. बी.ए. काल्डा | २७.८५% | --//-- |
| ५. | श्री. अफजलखॉन | २४.८६% | --//-- |
| ६. | श्री. गुलाम रसुल | २३.८६% | --//-- |
| ७. | श्री. सिद्दीकी मो. अजिमोद्दीन | ७.८६% | --//-- |
| ८. | श्री. गुलाम अझहर | -- | निविदा दर दर्शविलेला नाही. |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०% कमी दराची निविदा श्री. रियाजोद्दीन नन्हेखॉ यांची निविदा आहे. तरी सदरील निविदा विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आसिफबाग दिलरस सोसायटी जवळील रेखांकनात १५० मी.मी. व २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३०% कमी दराच्या श्री. रियाजोद्दीन नन्हे खॉ यांचे निविदापत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६०/११ :**

कार्यकारी अभियंता पा.पु.व.ज.नि. यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. हर्षनगर बौध्द विहाराजवळील अस्तित्वात असलेली १५० मी.मी. एस.डब्ल्यु.जि. काढुन २५० मी.मी. आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता अंदाजपत्रक र.रु. २,२९,९७०/- ला स्थायी समितीने दि. १८-१०-९९ च्या सभेमध्ये ठराव क्र. ३१६/५८ ने मंजुरी मिळालेली होती.

त्यानुसार बी-१ निविदा जा.क्र. मनपा/लेखा/नि/३२/९९ दि. २५-१०-९९ अन्वये बी-१ नमुन्यात वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविल्या असता एकुण १८ निविदा विक्री झाल्या व त्यापैकी ७ निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शेख सिकंदर | ३७.१% | अं.प. दरापेक्षा कमी दराने |
| २. | बसरा कंन्स्ट्रक्शन | २५% | --//-- |
| ३. | गुलाम रसुल | ३०.३०% | --//-- |
| ४. | फाईव्ह स्टार कंन्स्ट्रक्शन | २५.१% | --//-- |
| ५. | एस.एम. सज्जाद | २५% | --//-- |
| ६. | अब्दुल सलाम | १९.५% | --//-- |
| ७. | एस कंन्स्ट्रक्शन | -- | निविदा दर दर्शविलेला नाही. |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.१% कमी दराची निविदा शेख सिकंदर यांची आहे. कामाच्या दर्जा बाबत विशेष दक्षता घेण्यात यईल. सदरील निविदेस मा. आयुक्तांनी दि. २-१२-९९ ला मंजुरी दिलेली आहे.

तरी प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्षनगर बौध्द विहाराजवळील अस्तित्वात असलेली १५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन काढुन २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ३७.१% कमी दराची शे. सिकंदर यांच्या निविदापत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६१/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिलकमिल कॉलनी येथे खड्डी रस्ता तयार करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९७-९८ च्या दरसुचीनुसार र.रु. १,०१,०३९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च "नविन खांडकी" रस्ते या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल.

तरी र.रु. १,०१,०३९/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिलकमिल कॉलनी येथे खड्डी रसता तयार करण्याच्या कामासाठी र.रु. १,०१,०३९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६२/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेतर्फे शिवाजी मैदान (आमखास) येथे बांधण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रामध्ये अतिथीगृह बांधणेच्या

कामाचे सन ९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या पहिल्या टप्याच्या रु. ७,६१,५००/- च्या एकत्रित अंदाजपत्रकास दिनांक ६ जुलै ९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीमध्ये ठराव क्र. २१८/२९ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

पैकी रु. ६,२१,१४०/- च्या कामासाठी निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/२७/९९ दि. २१-९-९९ अन्वये निविदा मागविण्यात आल्या. विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण १४ निविदा विक्री झाल्या व सिकृतीच्या तारखेपर्यंत ०३ तीन निविदा प्राप्त झाल्या त्या दि. २२-१०-९९ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. असता खालीलप्रमाणे निविदा दर भरुन प्राप्त झाल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. राजेंद्र वर्दे | ७% | जास्तीचे दर |
| २. | श्री. स.सुजात हाश्मी | ८.५०% | जास्तीचे दर |
| ३. | री. साईबाबा कंन्स्ट्रक्शन | १.५०% | जास्त दर (ई.एम.डी. नाही.) |

गुत्तेदारांच्या प्राप्त दरांबाबत सन १९९९-२००० च्या जिल्हा दरसुचीप्रमाणे तुलना करता व गुत्तेदारांशी झालेल्या वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% (अक्षरी पाच टक्के) जास्तीच्या दराने निविदेस मा. आयुक्त हयांनी मान्यता दिलेली असुन त्यास गुत्तेदाराने लेखा संमती दिलेली आहे. करिता राजेंद्र वर्दे हयांची सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% (पाच टक्के) जास्तीच्या दराची निविदा मान्यतेस्वत सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिवाजी मैदान (आमखास) येथे बांधण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रामध्ये अतिथिगृह बांधण्याच्या निविदा धारकासह झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम श्री. राजेंद्र वर्दे यांचेकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६३/१४ :**

प्र. कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. बुढ्ढीलाईन येथे कॉक्रीट रस्ते तयार करण्याकरिता अंदाजपत्रक र.रु. १,३६,९००/- चे सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुचि सन ९८-९९ अनुसार तयार करण्यात आली असुन त्यास मा. आयुक्तांनी दि. २०-१२-९९ रोजी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर काम महानगरपालिका अर्थसंकल्प ९९-२००० लेखाशिर्ष नविन खड्डी रस्ते कलर्वट मध्ये ठेवण्यात आलेली तरतुद मधुन खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बुढ्ढीलाईन येथे कॉक्रीट रस्ते तयार करण्याच्या कामासाठी र.रु. १,३६,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६४/१५ :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश योजने अंतर्गत दरवर्षी गणवेश दिल्या जातात. यावर्षी बहुतांश संस्थानी, जिल्हा परिषदेनी शालेय विद्यार्थ्यांना तयार गणवेश दिल्याचे धोरण अवलंबविले. याच धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेने मनपाच्या विद्यार्थ्यांना तयार गणवेश पुरविण्याचे निश्चित केले होते. १९९९-२००० च्या अर्थसंकल्पात रु. ४० लाख एवढी आर्थिक तरतुद केली आहे. तयार गणवेश खरेदी करुन व गतवर्षीचे निळे कापड उपयोगात आणल्यानंतर एकुण ६ ते ७ लाखांचा आर्थिक फायदा मनपास यामुळे होऊ आणल्यानंतर एकुण ६ ते ७ लाखांचा आर्थिक फायदा महानगरपालिकेस यामुळे होऊ शकेल, व शालेय विद्यार्थ्यांना गणवेश पुरविता येतील.

करिता दिनांक १८-१०-९९ च्या बैठकीत विषय क्र. ५४ अन्वये स्थायी समितीचे मान्यतेस्तव सादर केलेला प्रस्ताव खालील प्रमाणे पुर्न विचारार्थ सादर.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत पांढरा शर्ट खाकी हाफपॅन्ट, निळा शर्ट व पांढरा ब्लाऊज व निळा सलवार व पांढरा पंजाबी असे गणवेश मनपा शालेय विद्यार्थ्यांना पुरवावयाचे आहेत. सदर तयार गणवेश देऊन मागविण्यात आल्या होत्या एकुण अकरा निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी चार निविदा सर्व अटीची पुर्तता करणाऱ्या होत्या. १) महाराष्ट्र राज्य लघुउद्योग महामडळ २) वासवानी ट्रेडर्स पुणे ३) क्रिसटल ॲपरलस ४) महिला आर्थिक विकास मंडळ निविदा धारकांनी दाखल केलेल्या नमुन्यांच्या पाहणीसाठी व निवडीसाठी मा. महापौ सर्व पदाधिकारी तसेच मा. आयुक्त यांनी एकत्रितरित्या नमुना पाहणी केली. प्राप्त दर व गणवेश नमुना यावर सर्वानुमते वासवानी ट्रेडर्स पुणे यांचे गणवेश निवड करण्यात आले. त्यानुसार निविदा धारकांच्या दराबाबत प्रत्यक्ष पुरवठा धारकाबरोबर चर्चा करुन वाटाघाटी अंती अंतिम केलेले नमुन्याचे दर खाली प्रमाणे (सोबत तक्ता जोडण्यात आलेला आहे.)

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश योजना मध्ये झालेल्या वाटाघाटीचा सविस्त तक्ता.**

| अ. क्र. | तपशिल/वय गट | निविदा दर | वाटाघाटी अंती दर | रु. प्रतिनग |
|---|---|---|---|---|
| १. | वय ५-६ प्रकल्प<br>बालवाडी | ३१<br>३१ | ३०.५०X२२१०<br>३०.५०X४२९ | ६७४०५.००<br>१३०८४.५० |
| २. | ६-७ | ३३ | ३२.४५X२४१० | ७८२०८.५० |
| ३. | ७-८ | ३५ | ३४.४५X२६०५ | ९२१५३.७५ |
| ४. | ८-९ | ३७ | ३६.४०X२५७० | ९३५४८.०० |
| ५. | ९-१० | ३९ | ३८.३५X२५१० | ९६२५८.५० |
| ६. | १०-११ | ४५ | ४४.२५X१६५० | ७३०१२.५० |
| ७. | ११-१२ | ५१ | ५०.१५X१४७० | ७३७२०.५० |
| ८. | ११-१२ | ५१ | ५०.१५X११५० | ५७६७२.५० |
| ब) | मुलांसाठी पांढरा हाफ शर्ट प्रकल्प बालवाडी | नमुन क्र. ११४०<br>३२ | ३४.८५X४२९ | १४५०.६५ |
| १. | ५-६ | ३६ | ३४.८५X२२१० | ७७०१८५.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | ६-७ | ४० | ३८.७५X२४१० | ९३३८७.५० |
| ३. | ७-८ | ४४ | ४२.६०X२६७५ | ११३९५५.०० |
| ४. | ८-९ | ४८ | ४६.५०X२५७० | ११९५०५.०० |
| ५. | ९-१० | ५२ | ५०.३५X२५१० | १२३७८.५० |
| ६. | १०-११ | ६० | ५८.१०X१६५० | ९५८६५.५० |
| ७. | ११-१२ | ६८ | ६५.८५X१४७० | ९६७९९.०० |
| ८. | ११-१२ | ६८ | ६५.८५X११५० | ७५७२७.५० |
| क) | मुलीसाठी निळा स्कर्ट | नुमना क्र. ११६२ | | |
| १. | ०.५<br>प्रकल्प बालवाडी | ७०<br>७० | ६७.००X२०३०<br>०७.००X४८० | १३६०१०.००<br>३२१६०.०० |
| २. | ५-६ | ७५ | ७१.७५X२४८ | १७८२९८.७५ |
| ३. | ६-७ | ८० | ७७.४०X२५५५ | १९७७५७.०० |
| ४. | ७-८ | ८५ | ८१.३५X२५७६ | २०५५७.६० |
| ५. | ८-९ | ९० | ८६.१५X१६८५ | १४१६२.७५ |
| ड) | मुलींसाठी पांढरे ब्लाऊज | नुमना क्र. ११२१ | | |
| १. | ०-५<br>प्रकल्प बालवाडी | २६<br>२६ | २५.१०X२०३०<br>२५.१०X४८० | ५०९५३.००<br>१२०४८.०० |
| २. | ५-६ | २८ | २६.९०X२४८५ | ६६८४४.५० |
| ३. | ६-७ | ३० | २८.८५X२५५५ | ७३७११.७५ |
| ४. | ७-८ | ३२ | ३०.७५X२५७६ | ७९२१२.०० |
| ५. | ८-९ | ३४ | ३२.७०X१६८५ | ५५०९९.५० |
| इ) | मुलीसाठी निळा सलवार | नुमना क्र. ११४७ | | |
| १. | ९-१० | ६० | ५९.००X४१३ | २४३६७.०० |
| २. | १०-११ | ६५ | ६३.९० | |
| ३. | ११-१३ | ७० | ६८.८५ | |
| ई) | मुलींसाठी पंजाबी | नमुना क्र.११४१ | | |
| १. | ९-१० | ६० | ५९.००X६०० | ३५४००.०० |
| २. | १०-११ | ६५ | ६३.९०X१६०० | १०२२४०.०० |
| ३. | ११-१३ | ७० | ६८.८५X१५४० | १०६०२९.०० |
| ४. | ११-१३ | ७० | ६८.८५X१२२५ | ८४३४.२५ |

निविदेमध्ये नमुद केल्यानुसार कामधेनु योजने अंतर्गत (शा. नि.क्र.जी.इ.एन. १०९५/१६२/३४५ दिनांक १३-७-९५) नगर विकास विभाग मंत्रालय निर्गमित आदेशानुसार ५०% काम पंजीकृत महिला उद्योजक तथा मंडळ यांना देणे आवश्यक आहे. त्यानुसार प्राप्त निविदेतील अटीची पुर्तता करण्याऱ्या महिला आर्थिक विकास महामंडळ यांना पत्र देऊन निवडलेले नमुने व वाटाघाटीअंती अंतिम करण्यात आलेले दर यास अधिन राहुन पुरवठा करण्या संदर्भात विचारणा केली होती. त्यानुसार त्यांनी सदरील काम करण्यास संमती दर्शविलेली आहे.

वरील प्रमाणे गणवेश खरेदीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश योजनेअंतर्गत बालवाडी ते इयत्ता ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश पुरविण्यासाठी सन ९९-२००० या आर्थिक वर्षात रु. ४० लाख तरतुद करण्यांत आली आहे.

गतवर्षी खरेदी करण्यात आलेल्या शिल्लक निळया रंगाच्या कापडातुन सर्वसाधारणपणे ४६३७ एवढे सलवार नग शिवुन तयार होऊ शकतात त्यानुसार मुळ मागणीतील तयार सलवार खरेदीतुन हे नगर वगळुन उर्वरित ४२३ नग तयार सलवार नगाचे आदेश देणेत येतील. गतवर्षीच्या महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ औरंगाबाद यांचे सलवार शिलाईचे मान्य दरानुसार ज्या एजन्सी मार्फत गणवेश शिलाई करणेत आली त्यांचेकडुन रु. ७.७० प्र. नग प्रमाणे उरोक्त सलवार नग शिवुन घेतले जातील व कापड उपयोगात आणल्या जाईल. एकुण तयार गणवेश खरेदीचे ५०% पुरवठा आदेश मे. वासवानी ट्रेडर्स पुर्ण व ५०% गणवेश पुरवठयाचे आदेश महिला आर्थिक विकास मंडळास देणेत येतील.

उपरोक्तनुसार सन १९९९-२००० या वर्षातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश योजने अंतर्गत गणवेश खरेदीचा प्रस्ताव मा. स्थायी सिमती समोर ठेवण्याची शिफारस मा. आयुक्तांनी केली आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त तयार गणवेश तयार गणवेश खरेदी साठी रु. ३३,२७,२२९,९०/- (प्रकल्प विभाग बालवाडी सहीत) व शिलाईसाठी रु. ३५,७०५/- (सलवार) असा एकुण रक्कम रु. ३३,६२,९३५/- अर्थात रु. ३३,६३,०००/- रुपये खर्चाचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद**

**मा. सभापती :** दरवर्षी आपण महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश योजने अंतर्गत गणवेश दिल्या जातो. मागील दिनांक १८-१०-९९ च्या बैठकीत विषय आलेला होता. सध्या विद्यार्थ्यांना कपडा घेऊन शिलाई करुन ड्रेस वाटप करण्यास वेळ परत नाही. म्हणुन मा. आयुक्त यांनी वरील दिनांकाच्या विषयावर पुन्हा फेरविचार करण्यासाठी विनंती प्रस्ताव सादर केलेला आहे. सभागृहाने याबाबत निर्णय घ्यावा.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** सभागृहाने निर्णय घेतला की, रेडीमेड कपडे न घेता कपडा घेऊन शिलाई करुन कपडे वाटप करण्यांत यावे. निविदा येण्यास वेळ लागेल विदयार्थी गणवेशापासुन वंचीत राहतील पहिलाच यास उशीर झालेला आहे. मा. आयुक्तांनीच प्रस्ताव सादर केल्यानुसार त्यांचा मान राखणे आवश्यक आहे. ठराव मंजुर करुन ताबडतोब विदयार्थ्यांना गणवेश वाटप होण्याची कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** दिनांक १८-१०-९९ च्या स्थायी समितीमध्ये प्रस्ताव रेडीमेंड कपडे विदयार्थांना वाटप करण्याबाबतचा होता. त्या प्रस्तावानुसार कार्यवाही वाटप करण्याबाबतच्या होता. त्या प्रस्तावानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. प्रशासनातर्फे टिप्पणी सादर करण्यांत आली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत ९९-२००० या आर्थिक वर्षात बालवाडी ते ७ वी पर्यंतच्या महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना पुरविण्यांत येणाऱ्या पांढरा शर्ट खाकी हाफ पॅन्ट, निळा शर्ट व पांढरा ब्लाऊज व निळा सलवार व पांढरा पंजाबी गणवेश पुरविण्याबाबत प्राप्त निविदाधारका सोबत झालेल्या वाटाघाटीनुसार कामधेनु योजने अंतर्गत मंत्रालयाकडुन निर्गमित केलेल्या आदेशानुसार एकुण कामापैकी ५०% काम पंजीकृत महिला उद्योजक तथा मंडळ यांना देणे आवश्यक असल्याने महिला आर्थिक विकास मंडळ यांचेकडुन गतवर्षी खरेदी करण्यांत आलेल्या शिल्लक निळया रंगाचे कापडातुन महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ औरंगाबाद यांचे मंजुर दराने म्हणजेच प्रतिनग रु. ७=७० प्रमाणे अंदाजे ४६३७ एवढे सलवार नग शिवून घेणे आणि उर्वरित ४२३ नग तयार करुन घेण्यासाठी आणि मे. वासवानी ट्रेडर्स पुणे यांचेकडुन ५०% काम वाटाघाटीत ठरलेल्या दरानुसार (डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश योजना मध्ये झ ाालेल्या वाटाघाटी बाबत प्रस्तावित तक्तातील दरानुसार) तयार गणवेश खरेदी करुन वाटप करण्यास व त्यासाठी रक्कम रु. ३३,६३,०००/- च्या खर्चास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६५/१६ :**

श्री. बी.जे. देवकर, इमारत निरिक्षक प्रशासकीय विभाग यांनी प्रशासनाच्या दिनांक १७-७-१९९७ च्या निलंबन आदेशा विरुध्द स्थायी समितीकडे अपील केले होते. या अपिलावर दिनांक २४-१२-९८ च्या स्थायी समितीत चर्चा होवून श्री. बी.जे. देवकर इमारत निरिक्षक यांना न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहुन कामावर रुजु करुन घेण्याबाबतचा निर्णय ठराव क्रमांक ४३१/१६ अन्वये सर्वानुमते घेण्यात आला. तथापी प्रशासनातर्फे स्थायी समितीचा निर्णय दिनांक १३-१२-९९ च्या सर्वसाधारण सभेसमोर विषय क्र. १३३/५ अन्वये विचारार्थ ठेवण्यात आला असता सदरचे प्रकरण पुन्हा स्थायी समितीक्डे पाठवावे व स्थायी समितीने फेर चौकशी करुन निर्णय घ्यावा असा सर्वानुमते निर्णय घेण्यांत आला असल्याने सर्वसाधारण सभेच्या निर्णयाच्या अनुषंगाने प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद**

**मा. सभापती :** श्री. देवकर, दुय्यम अवेक्षक यांचे अपील आलेले आहे. मंजुर करण्यांत येते.

**ठराव :**

श्री. बी.जे. देवकर, इमारत निरिक्षक प्रशासकीय विभाग, यांनी प्रशासनाच्या दिनांक १७-७-९७ च्या निलंबन आदेशा विरुध्द स्थायी समितीकडे अपिल सादर केले असता सदर अपिलावर दिनांक २४-१२-९८ च्या स्थायी समिती ठराव क्र. ४३१/१६ अन्वये संबंधितास न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहुन कामावर रुजु करुन घेण्याबाबत सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली होती. तथापी प्रशासनातर्फे सदरचा ठराव दिनांक १३-१२-९९ रोजीच्या सर्वसाधारण सभेसमोर विषय क्रमांक १३३/५ अन्वये निर्णयार्थ ठेवण्यात आला होता. सर्वसाधारण सभेने सदर प्रकरण स्थायी समितीकडे परत निर्णयार्थ ठेवण्यात आला होता. सर्वसाधारण सभेने प्रकरण स्थायी समितीकडे परत निर्णयार्थ पाठविल्यानुसार स्थायी समितीने सदर प्रकरणात फेर चौकशी करुन दिनांक २४-१२-९९ रोजी पारीत केलेला ठराव क्रमांक ४३१/१६ मधील निर्णय कायम ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. श्री. बी.जे.

देवकर, इमारत निरिक्षक यांचे निलंबन न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहुन रद्द करण्यांत येते. संबंधितास कामावर रुजु करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. प्रस्ताव स्विकृतीसह मंजुर करण्यांत येतो.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६६/१७ :**

श्री. आर.एस. राचतवार, इमारत निरिक्षक प्रशासकीय विभाग यांनी प्रशासनाच्या दिनांक ७-६-९९ च्या निलंबन आदेशाविरुध्द स्थायी समितीकडे अपिल सादर केले होते. या अपिलावर दिनांक २२-६-९९ च्या स्थायी समितीत चर्चा होऊन श्री. आर.एस. राचतवार, इमारत निरिक्षक यांना न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहुन कामावर रुजु करुन घेण्यात आला होता. तथापी प्रशासनातर्फे स्थायी समितीचा निर्णय दिनांक १३-१२-९९ च्या सर्वसाधारण सभेसमोर विषय क्र. ९९/१३ अन्वये विचारार्थ ठेवण्यात आला असता सदरचे प्रकरण पुन्हा स्थायी समितीकडे पाठवावे व स्थायी समितीने फेर चौकशी करुन निर्णय घ्यावा असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला असल्याने सर्वसाधारण सभेच्या निर्णयाच्या अनुषंगाने प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** श्री. राचतवार, इमारत निरिक्षक यांचे अपिल आलेले आहे. मंजुर करण्यांत येते.

**ठराव :**

श्री. आर.एस. राचतवार, इमारत निरिक्षक, प्रशासकीय विभाग यांनी प्रशासनाच्या दिनांक ७-६९९ च्या निलंबन आदेशाविरुध्द स्थायी समितीकडे अपील सादर केला असता सदर अपिलावर दिनांक २२-६-९९ च्या स्थायी समितीत ठराव क्र. १८६/५३ अन्वये संबंधितास न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहुन कामावर रुजु करुन घेण्याबाबत सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली होती. तथापि प्रशासनातर्फे सदरचा ठराव दि. १३-१२-९९ रोजी सर्वसाधारण सभेसमोर विषय क्र. ९९/१३ अन्वये निर्णयार्थ ठेवण्यात आला होता. सर्वसाधारण सभेने सदर प्रकरण स्थायी समितीकडे परत निर्णयार्थ पाणीनुसार स्थायी समिती प्रकरणात फेर चौकशी करुन दिनांक २३-६-९९ रोजी पारित केलेला ठराव क्र. १८६/५३ मधील निर्णय कायम ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. श्री. आर.एस. राचतवार इमारत निरिक्षक यांचे निलंबन न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहुन रद्द करण्यांत येते. संबंधितास कामावर रुजु करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. प्रस्ताव स्विकृतीसह मंजुर करण्यांत येतो.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# सभागृहातील चर्चा

**सौ. लता दलाल :** औरंगाबाद शहराची झपाटयाने वाढ होत असुन, लवकरच सिडको आणि हाडको येथील व्यवस्था हस्तांतरीत होणार असल्याने विद्युत विभागात केबल जॉर्न्डटरची आवश्यकता भासत आहे. कारण दिवसेदिवस केबल जॉईटरच्या विद्युत विभागात मोठया प्रमाणात तक्रारी दाखल होत असतात आणि त्यांचे निराकारण वेळेवर करणे गरजेचे असते. विद्युत विभागातील कामाचा व्याप लक्षात घेता विभागातील कामे सुरळीत चालण्याच्या दृष्टीने महानगरपालिका अस्थापनेवर रिक्त असलेल्या विद्युत लाईनमन पदापैकी एक पद वर्ग करुन एका दरास "केबल जॉइन्टर" पदनामाने संबोधण्यात यावे. कारण सदरची पदाची वेतनश्रेणी ही लाईनमन पदाचीच असल्याने महानगरपालिकेवर कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोजा पडणार नाही. तसेच सध्या महानगरपालिका मध्ये दैनिक वेतनावर काम करित असलेल्या केबल जॉईन्टरचे कामाचा अनुभव व शैक्षणिक पात्रता लक्षात घेता त्यांना केबल जॉईन्टर पदी नियुक्ती करण्यांत यावी. त्यामुळे विद्युत विभागातील तक्रारीचे केवळ निराकरण होईल. करिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ५१ (२) अन्वये विचार व्हावा.

**मा. सभापती :** स. सदस्या सौ. लता दलाल यांनी सुचविल्याप्रमाणे केबल जाईन्टर बाबतचा प्रस्ताव प्रशासनाने सभागृहासमोर सादर करावा.

**विषय क्र. ४६७/१८ :**

प्र. कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. इंदिरानगर बायजीपुरा स्लम वार्ड क्र. २४ मध्ये रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत कामाचे अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेमध्ये दिनांक १९-६-९९ रोजी मंजुरी प्राप्त झालेली आहे. प्रस्तावित कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकुण १९ निविदा विकल्या गेल्या निविदा व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ८ निविदा प्राप्त झाल्या. व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या अं.प. रक्कम १३,२१,२१६=०० आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. डी.अजितसिंग | ३८.९१% | कमी |
| २. | मॉस्कॉट कं. | ३६.८६% | कमी |
| ३. | व्यंकटेश कं. | ३४.९१% | कमी |
| ४. | महमंद अहमद सिद्यीकी | २६.२% | कमी |
| ५. | पाटील कं. | २५.२५% | कमी |
| ६. | अदिनाथ कं. | २२.११% | कमी |
| ७. | गुरुनानक इंडस्ट्रीज | २०.००% | कमी |
| ८. | जग्गी कं. | १५.००% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३८.९१% कमी दराची असलेली श्री. डी. अजितसिंग यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला इंदिरनगर बायजीपुरा स्लम वॉर्ड क्र. २४ मध्ये रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३८-९१% कमी दराच्या श्री. डी. अजितसिंग यांचे निविदापत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद**

**मा. सभापती :** श्री. प्रविण पवार नावाच्या कॉन्ट्रॅक्टरला दि. ६-६-९९ रोजी एक परीपत्रक काढुन काळया यादीत समाविष्ठ केले होते. त्यानुसार त्यांनी काळया यादीतुन नाव रद्द करण्यासाठी स्थायी समितीकडे विनंती अर्ज दिलेला आहे. यानुसार स्थायी समिती असा निर्णय घेते की, त्यांचे काळया यादीतून नाव रद्द करण्यांत येते. तशी संबंधित अधिकारी यांनी अंमलबजावणी करावी.

तसेच महापालिका ठेकेदार यांनी असोसीएशनचे पत्र आलेले आहे. श्री. मौला अलीयार खॉन यांना एका कामाच्या संदर्भात काळया यादी त नाव समाविष्ठ केले होते. परंतु ऑक्टोबर ९७ च्या स्थायी समितीमध्ये त्यांचे नाव काळया यादीतुन कमी करण्यात यावे असा ठराव झालेला असुन संबंधित प्रकरणाची चौकशी झालेली असुन त्यांना यापुढे कामे देणे बाबत असोशिएशनचे पत्र आलेले आहे. ठरावानुसार कार्यवाही करावी.

**सौ. तळेकर राधाबाई :** सुरक्षारक्षक यांना वेतनश्रेणी देण्याबाबत काय निर्णय घेतला खुलासा करावा.

**मा. सभापती :** पुढच्या बैठकीत निर्णय घेण्यात येईल.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** महानगरपालिका सार्वजनिक निवडणुकीची आचारसंहिता लागणार आहे. आचारसंहिता मध्ये नेमकी कोणती कामे करता येतील, कोणती करता येणार नाही. कधीपासुन आचारसंहितेचा अंमल होणार याचा सविस्तर खुलासा प्रशासनाने करावा. आतापर्यंत जे इस्टीमेंट तसेच जे टेंडरस् काढलेले आहे व जे प्रोजेकस हाती घेतलेले आहे अशी सर्व कामे करता येतील काय तसेच २००० चे बजेट कुणाच्या अध्यक्षतेखाली मंजुर करणार आहे.

**सौ. लता दलाल :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मुख्यलेखा परिक्षक :** निर्माण झालेली परिस्थिती ही विशेष आहे. या संदर्भात निवडणुक आयोगाकडुन मार्गदर्शन घ्यावे लागेल.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** वृत्तपत्रात ८ दिवसापुर्वीच बातमी प्रकाशित झालेली आहे की, आचार संहिता लागणार, तर ८ दिवसाच्या कालावधीमध्ये संबंधित अधिकारी यांनी निवडणुक आयोगाकडे पत्र देऊन खुलासा मागविलेला आहे काय? माझी विनंती की अशी जी जी इस्टीमेंटस्ची विकास कामे मंजुर झालेली आहे ती आचार संहितेच्या काळात थांबवू नयेत. याची काळजी प्रशासनाने घ्यावी.

याच बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | सभापती स्थायी समिती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ०७-०१-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**शुक्रवार दि. ०७-०१-२००० रोजी मा. सभापती श्री. नरसिंग ढगे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ३.०० वाजता "वदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्ग याच्यासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | स.सदस्य |
| २) | स.स.श्री. बचाटे राजकुमार (मामा) | --//-- |
| ३) | स.स.श्री. स.अ.एकबालोद्यीन स.मो. कुतुबुद्दीन | --//-- |
| ४) | स.स.सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ५) | स.स.श्री. विखारोद्यीन पिता खुदबोद्यीन | --//-- |
| ६) | स.स.श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ७) | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| ८) | स.स.श्री. वसंत विनायकराव देशमुख | --//-- |
| ९) | स.स.सौ. लता दलाल श्रीनिवास | --//-- |
| १०) | स.स.श्रीमती. पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाल | --//-- |

**संवाद :**

**श्री. देशमुख व्ही.व्ही. :** भारताचे माजी राष्ट्रपती स्व. डॉ. शंकर शर्मा यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे. त्या निमित्त सभागृहात दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

**श्री. विखारोद्यीन :** तसेच हजरत मौलाना सय्यद अबुल हसन अली हसनी नदवी (आलीमीयॉ) हे माहान तत्वज्ञानी होते. तसेच त्यांनी पगामे इन्सानीयत या चळवळी अंतर्गत सहिष्णुता, बंधुभाव व राष्ट्रीय एकात्मता यासाठी पुर्ण आयुष्य अर्पण केले त्यांचे नुकतेच निधन झाल्याने त्यांनाही सभागृहात श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

**सौ. लता दलाल, श्री. बचाटे राजकुमार :** यास आमचे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :** ठिक आहे स. सदस्यांच्या सुचनेनुसार माजी राष्ट्रपती स्व.डॉ. शंकर दयाळ शर्मा तसेच हजरत सय्यद अबुल हसन अली हसनी नदवी (आलीमीयॉ) यांचे निधन झाल्याने ०२ मिनिटे श्रध्दांजली वाहण्यांत येते.

यांचेवेळी भारताचे माजी राष्ट्रपती स्व. डॉ. शंकर दयाळ शर्मा तसेच हजरत सय्यद अबुल हसन अली हसनी नदवी (आलीमीयॉ) धर्मगुरु यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्धता पाळुन श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली

**सौ. दलाल लता :** अधिकारी वर्ग उपस्थित नाही त्यांना सभेची वेळ माहिती नव्हती काय?

**मा. सभापती :** आजच्या बैठकीत निषयपत्रिकेवरील विषयावर चर्च करावी विषय क्र. १ इतिवृत्त मंजुर करण्या बाबतचा असुन यानंतरच बैठकीत या विषयावर चर्चा करावी. विषय क्र. २ पासुन सुरुवात करावी तसेच बरेचशे अधिकारी आजच्या सभेला उपस्थित नाही. यानंतर सुरक्षारक्षक कर्मचाऱ्यांनी

स.सभासदरा व्यतिरिक्त कुणालाही सभागृहात प्रवेश करु नये. त्यानुसार अनुपस्थित असलेल्यावर कार्यवाही करता येईल.

**सौ. लता दलाल :** विषयावर चर्चा करण्या अगोदर एक छोटासा प्रश्न उपस्थित करु इच्छिते. महानगरपालिकेतर्फे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय सुरु झालेले आहे या संग्रहालयात श्री. गुणवान यांच्याकडुन वेळेवर ५२१ नाणी मिळालेली आहे. त्याबाबत अदयाप त्यांच्याशी ॲग्रीमेंट केलेले नाही. ते कशामुळे थांबले, खुलासा करावा.

**श्री. बचाटे राजकुमार :** दै. मापदंड वृत्तपत्रात श्री. पुरवार यांच्या बाबतीत बदनामी कारक बातमी प्रकाशित झालेली होती. त्याची दखल घेण्यात यावी. अशा बातम्यामुळे कुणाला त्रास होणार नाही. तसेच महानगरपालिकेची यात बदनामी होऊ नये एवढेच आमचे ध्येय आहे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांना श्री. गुणवान यांच्याकडुन नाणी घेण्याच्या संदर्भात लवकरात लवकर ॲग्रीमेंट करुन घ्यावे. तसेच स. सदस्य श्री. बचाटे यांनी केलेल्या सुचनेचीही दखल घेण्यात यावी. यानंतर विषयावर चर्चा करावी.

**विषय क्र. ४६८/१ :**

दिनांक १०-१२-९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

**मा. सभापती :** येणाऱ्या बैठकीमध्ये विषय क्र. १ वर चर्चा करावी. विषय क्र. २ वर बोलावे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरचा प्रस्ताव आगामी स्थायी समिती समोर ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ४६९/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, नारळीबाग औरंगाबाद जिल्हा परिषद कर्मचारी निवासस्थान येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. १,९८,५११/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च "खासदार निधी" (डांबरीरस्ते) या लेखाशिर्षाखाली ठेवण्यात आलेल्या तरतुदीतुन करण्यात यईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद**

**श्री. देशमुख व्ही.व्ही. :** प्रस्तावात खासदार निधीतुन डांबरीकरण करण्याबाबत नमुद केलेले आहे. तसे पत्र आपल्याकडे आलेले आहे काय? अशी कामे खासदार निधितुन करता येतात काय?

**श्री. विखारोद्यीन :** जिल्हाधिकारी यांनी काम करण्याबाबतचे पत्र आपल्या विभागाकडे आलेले आहे काय? तसेच प्रस्तावात दर्शविलेली रक्कम ही आलेली आहे काय? खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** मा. जिल्हाधिकारी यांच्याकडुन तसे पत्र आलेले असेल त्यानुसारच संबंधित अधिकारी यांनी प्रस्ताव ठेवलेला आहे. खासदार निधीतुन संपुर्ण शहरात विकास कामे करु शकतात. त्याचे इच्छेनुसार बी. ॲन्ड.सी. विभागामार्फत कामे करुन घेण्याची आहे व मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसारच रकमे बाबत पुढील कार्यवाही होईल. प्रस्तावास मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारळीबाग औरंगाबाद येथील जिल्हा परिषद निवासस्थान भागात अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी र.रु. १,९८,५११/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७०/३ :**

प्र.कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. चिकलठाणा येथे सी.सी. रस्ते तयार करणे कामाबाबत सा. बांधकाम खाते यांचे वर्ष ९८-९९ च्या दरसुचीनुसार र.रु. ६,३३,८०६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "१८ खेडी विकास" या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २४-१२-९९ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

करिता सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र.रु. ६,३३,८०६/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. चिकलठाणा येथे सी.सी. रस्ते तयार करणेच्या कामाचे र.रु. ६,३३,८०६/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७१/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जिन्सी जलकुंभ येथील जलवाहीनी शिप्ट करावयाची आहे. सदरील ठिकाणी जिन्सी सम्प हाऊसचे काम प्रगतीपथावर आहे व या ठिकाणी अस्तित्वात असणारी ३०० मी.मी. व्यासाची सी.आय. जलवाहिनी ही या खोदकामात बाधीत होत आहे. त्यामुळे हे काम लवकर करणे आवश्यक आहे त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसुची ९८-९९ नुसार अंदाजपत्रक र.रु. ३,१७,३३३/- चे एवढयाचे तयार करण्यांत आले आहे. करिता प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिन्सी जलकुंभ येथील जलवाहिनी स्थलांतर करावयाची असल्याने त्यासाठी अस्तित्वातील ३०० मी.मी. व्यासाची सी.आय. जलवाहिनी खोदकामात बाधीत होत असल्यामुळे सदर कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. ३,१७,३३३/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७२/५ :**

कार्यकारी अभियंता पा.पु.व.ज.नि. यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला उस्मानपुरा येथे एस.बी. कॉलनी मध्ये श्री. पांडव यांचे घरापासुन नाल्यापर्यंत १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन बंद करुन २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी सन ९८-९९ च्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या दरसुचीनुसार र.रु. १,२९,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. १,२९,२००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. उस्मानपुरा येथे एच.बी.एच.कॉलनी श्री. पांडव यांच्या घरापासुन नाल्यापर्यंत १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन बंद करुन २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी र.रु. १,२९,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७३/६ :**

हर्सुल येथील लेखापरिक्षक हाऊसिंग सोसायटी येथे जलवाहीनी टाकण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु. ७,६७,७१७/- चे महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांच्या सन १९९८-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले होते. सदर अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्रमांक १९३/४ दि. ६ जुलै १९९९ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. त्या अनुषंगाने वृत्तपमान पत्रातुन निविदा मागविल्या असता विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत १४ निविदा विक्री झाल्या व स्विकारण्याच्या अंतिम तारखेला एकुण चार निविदा प्राप्त झाल्या व त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुरेश बी. साधवानी | १५.१% | कमी दराने |
| २. | एस.आर. थोरात | ९.९% | जास्त दराने |
| ३. | श्री. एस.कंन्स्ट्रक्शन | ३०.०१% | कमी दराने |
| ४. | श्री. एजाज अहेमद | २०.११% | कमी दराने |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त निविदामध्ये कमी दराची निविदा एस. कंन्स्ट्रक्शन यांची असुन अंदाजपत्रकापेक्षा ३०.०१% कमी दराची आहे.

तरी एस.कंन्स्ट्रक्शन यांची सर्वात कमी दराची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.०१% कमी दराने निविदा स्विकृती बाबतच्या प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल येथील लेखापरिक्षक गृह निर्माण संस्था येथे जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात

कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.०१% कमी दराची श्री. एस.कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७४/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, दशमेशनगर येथील "५०" फुट विकास रस्त्यावरील डॉ. पानसे यांच्या दवाखान्याजवळील नाल्याचे व्हेट वाढविणे कामासाठी तयार करण्यात आले र.रु. १,८६,२२०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण अकरा कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण फक्त चार निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्याम आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. पी.ए. काल्डा | २५.५०% | कमी दराने |
| २. | मे. फाईव्ह स्टार कंन्स्ट्रक्शन | २५.१०% | --//-- |
| ३. | श्री. अब्दुल सलाम | २१.००% | --//-- |
| ४. | श्री. ए.एम. लांबा | १५.००% | --//-- |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री. बी.ए.काल्डा यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.५०% कमी आहेत.

तरी श्री. बी.ए. काल्डा यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.५०% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दशमेशनगर येथील ५० फुट रुंद विकास योजना रस्त्यावरील डॉ. पानसे यांच्या दवाखान्याजवळील नाल्याचे व्हेट वाढविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.५०% कमी दराची श्री. बी.ए. काल्डा यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७५/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, बुढीलेन मुग्रीनाला ते लोटाकांरजा भागातील गल्ल्यात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी दिनांक २२-६-९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. १७२/४३ अन्वये अंदाजपत्रक र.रु. ३,८७,३१५/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/ लेखा/नि/२१/९९ दि. २-७-९९ चे निविदा सुचनेव्दारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (१२) बारा निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या तुलनात्मक नियोजित तारखेस एकुण (४) चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. राणा कंन्स्ट्रक्शन | ३२.३६% | कमी दराने |
| २. | श्री. अजिमोद्दीन सिद्दीकी | २५.७८६% | --//-- |
| ३. | श्री. मझहर सिद्दीकी | २५% | --//-- |
| ४. | श्री. सैय्यद फजुल हक्क | २०% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३२.३६% कमी दराने मे. राणा कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असुन मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बुढ्ढीलेन मुग्रीनाला, लोटाकांरजा भागातील गल्ल्यात शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३२.३६% कमी दराचे मे. राणा कं. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७६/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, महेश कॉर्नर ते गादिया पार्क या मुख्य रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रिल बसविणेच्या कामासाठी दि. ६-७-९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. १७५/४२ अन्वये अंदाजपत्रक र.रु. ३,९१,०००/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/२९/९९ दि. २-७-९९ चे निविदा सुचनेव्दारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण २१ (एकवीस) निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण (७) सात निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.ए. आर. कंन्स्ट्रक्शन कं. | २२.२% | कमी दराने |
| २. | मे. कम्पर्ट कंन्स्ट्रक्शन कं. | १९.९०% | --//-- |
| ३. | श्री. सुजात हाश्मी | १३.७८% | --//-- |
| ४. | मे. ज मातादी कंन्स्ट्रक्शन | १३.३% | --//-- |
| ५. | श्री. शेख मसुद | ९.७२% | --//-- |
| ६. | श्री. एस.एम. मंडोरे | १५.१०% | --//-- |
| ७. | मे. हरीओम कंन्स्ट्रक्शन | १५.०१% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीचे दरापेक्षा २२.२% कमी दराने मे. ए.आर. कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महेशकॉर्नर ते गादिया पार्क या मुख्य रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रिल बसविणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात

कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.२% कमी दराची मे. ए.आर. कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७७/१० :**

उपआयुक्त (म.) यांचेकडुन स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वित्तीय वर्ष सन २००० ते २००१ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तावरील मालमत्ता कराचे दर मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ व कलम ९९ अन्वये महापालिकेने दिनांक २०-२-२००० रोजी किंवा त्यापुर्वी निश्चित करणे व मंजुर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सन २०००-२००१ या वित्तिय वर्षासाठी खालील प्रमाणे दर प्रस्तावित आहे.

खालील दर कर योग्य मुल्यांवर आकरले जातील.

**महानगरपालिकेचे दर :-**

| अ. क्र. | कराचे नांव | सन ९९-२००० चे दर | दर | सन २०००-२००१ चे प्रस्तावित दर. | |
|---|---|---|---|---|---|
| | | कर योग्य मुल्य | दर | कर योग्य मुल्य | दर. |
| १) | सामान्य कर | कोणत्याही कर योग्य | | | |
| | | १ ते १००० | २३% | ११ ते १००० | २३% |
| | | १००१ ते १०,००० | २४% | १००१ ते १०००० | २४% |
| | | १०००१ ते २०००० | २५% | १०००१ ते २०००० | २५% |
| | | २०००१ ते ५०,००० | २७% | २०००१ ते ५०००० | ३०% |
| | | ५०००१ ते १००००० | २८% | ५०००१ ते १००००० | ३३% |
| | | १००००० ते पुढे | २९% | १००००० ते पुढे | ३५% |
| २) | साफसफाई कर काणत्याही कर योग्य मुल्या वर | | | | |
| अ) | निवासी वापर | --//-- | ३% | --//-- | ३% |
| ब) | निवासेत्तर वापर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | ६% | --//-- | ८% |
| ३. | वृक्ष कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ४. | अग्निशमन कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ५. | म.न.पा. शिक्षण कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ६. | पथ कर | --//-- | १% | --//-- | २% |
| ७. | जलनि:सारण कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ८. | जललाथ कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ९. | मोकळया जागेच्या कर सामान्य कराच्या दराने आकारण्यात येतील. | | | | |

ब) तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी उपकर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मुल्यावर आकारण्यात येतील.

**संवाद**

**मा. सभापती :** या विषयाबाबत माहिती घ्यावी लागणार आहे. मालमत्ता करा संबंधि हा विषय असुन सध्या स्थगित ठेवण्यात येऊन सविस्तर महिती घेऊन पुढच्या बैठकीत चर्चा करुन निर्णय घेता येईल.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सदर विषय स्थगित ठेवून सविस्तर माहितीसह पुढील ठेवण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ४७८/१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गौतम नगर घाटी बहुउद्देशिय हॉल बांधणेकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९८-९९ चे जिल्हा दरसुचीनुसार र.रु. ४,६८,५२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २९-१२-९९ अन्वये स्थायी समिती समोर निर्णयास्तव ठेवणेस आदेशित केलेले आहे.

उपरोक्त कामाचा खर्च सन ९९-२००० या आर्थिक वर्षाअंतर्गत विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखा शिर्षाअंतर्गत तरतुद संपुष्टात आली असल्याकारणाने प्राप्त निविदा बचत रकमेतुन करण्यात येईल. तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक र.रु. ४,६८,५२५/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गौतमनगर घाटी येथे बहुउद्देशिय हॉल बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेले र.रु. ४,६८,५२५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७९/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, राहुल नगर बनेवाडी येथे मंगल कार्यालय बांधण्यासाठी सा.बां. खात्याचे सन ९८-९९ जिल्हा दरसुचीनुसार र.रु. ६,८४,५१४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्तांनी स्थायी समितीसमोर निर्णयास्तव ठेवण्यास आदेशित केलेले आहे.

उपरोक्त कामाचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत सन ९९-२००० या आर्थिक वर्षा अंतर्गत इतर कामाचा बचतीमधुन करण्यांत येईल. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक र.रु. ६,८४,५१४/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राहुलनगर बनेवाडी येथे मंगल कार्यालय बांधण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. ६,८४,५१४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८०/३ :**

कार्यकारी अभियंता पा.पु.व.ज.नि. यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, अस्मिती पार्क एन-७ सिडको येथे १०० व १५०० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकण्यासाठी अं.प.र.रु.

१,४८,७५१/- चे तयार करण्यांत आले असुन सदरील अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या सन ९८-९९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असुन सदरील कामावर होणारा खर्च हा पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती सन ९९-२००० या आर्थिक वर्षातील तरतुदीतुन करण्यांत येणार आहे. या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची मंजुरी मिळालेली आहे.

तरी प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आस्मिती पार्क एन-७ सिडको येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. १,४८,७५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८१/४ :**

मा. आयुक्त यांच्या मंजुरीनुसार मालमत्ता अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. मालजीपुरा समर्थनगर येथील न.भु.क्र. २०६४८ च्या उत्तर पश्चिम बाजुस व विद्यमान ३० फुट रस्ता या मधील ३०X१० या आकाराची मनपाच्या मालकीची उपलब्ध असलेली सहान जागा भारतीय साप्ताहिक वृत्तपत्र संपादक व पत्रकार संघटना (असोशिएशन) औरंगाबाद यांना देण्यात आली आहे. सदर देण्यात आलेल्या जागेच्या दक्षिणेस बाजुस २०X१० सहान जागा असुन ती जागा त्याच संस्थेने मागणी केलेली आहे. पुर्वी देण्यांत आलेली जागा संस्थेस अपुरी असल्याने वरील जागा ३० वर्षाच्या लिजवर मागणी केलेली आहे.

करिता सदर जागा नेहमीच्या अटी शर्तीस अधिन राहुन संस्थेस ३० वर्षाकरिता भाडे पट्टयावर देण्याचा प्रस्ताव सादर प्रस्ताव मान्यतेस्तव करारनामा करुन घेऊन जागा हस्तांतर करण्यात येईल. भाडे समितीने निश्चित केलेले भाडे संस्थेस भरावे लागेल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. मालजीपुरा समर्थनगर येथे न.भु. क्र. २०६४८ पैकी भारतीय साप्ताहीक वृत्तपत्र संपादक व पत्रकार संघटना (असोशिएशन) यांना यापुर्वी देण्यांत आलेल्या जागेच्या दक्षिणेस २०X१०=२०० चौ.फुट सहान जागा ३०(तीस) वर्षाच्या भाडेतत्वावर (लिजवर) नेहमीच्या अटी व शर्तीस अधिन राहुन तसेच भाडे समितीने निश्चित केलेले भाडे भरण्याच्या अटीवर व इतर नेहमीच्या अटी शर्तीवर सदर संस्थेस जागा देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८२/५ :**

मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पोर्टेबल फायर किर्लोस्कर पंपकेग पी.एफ-१६०० सह पुर्ण सेट खरेदीचा प्रस्ताव मा. आयुक्त यांची मंजुरी दिनांक २९-१०-९९ नुसार निविदा मागविण्यांत आल्या होत्या. त्यानुसार तीन निविदा प्राप्त झाल्या आहे.

प्राप्त झालेल्या तीन निविदापैकी निविदाधारक किर्लोस्कर ब्रदर्स पुणे यांचे दर कमी असुन मा. आयुक्त यांच्या दालनात दि. १-१-२००० रोजी झालेल्या वाटाघाटीनुसार किर्लोस्कर ब्रदर्स लि.पुणे यांनी प्राप्त दरापेक्षा २.५% (अडीच टक्के) कमी दराने पुरवठा करण्याचे मान्य केले आहे.

| अ. क्र. | साहित्य | प्राप्त रु. | २.५% र.रु. | २.५% र.कमी करुन आलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | पोर्टेबल फायर किर्लोस्कर पंप के.पी. एफ.१६०० सह पुणे सेट | ९,२९,४१५/- | २३,२३५/- | ९,०६,१८०/- |

(अक्षरी नऊ लाख सहा हजार ऐशी रु. फक्त) या रक्कमेपैकी पुरवठा धारकास आदेश सोबत ३०% रु. ॲडव्हास म्हणुन द्यावी लागेल.

करिता र.रु. ९,०६,१८०/- चा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन कार्यालयासाठी पौटेबल फाय किर्लोस्कर पंप के. जी.एफ-१६०० सह पुर्ण सेट खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी निविदाधारक किर्लोस्कर ब्रदर्स लि.पुणे यांच्याशी झालेल्या वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५% कमी दराने करुन र.रु. ९,०६,१८०/- मध्ये खरेदी करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. तसेच मे. किर्लोस्कर लि.पुणे यांनी निविदे सोबत दिलेल्या अटी प्रमाणे पुरवठा धारकास पुरवठा आदेशासोबत ३०% रु. अग्रीम म्हणुन देण्यास मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८३/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, आमखास मैदान येथे मागासवर्गीचे विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह बांधण्याचे कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार र.रु. २०.०० लाखाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले त्यास मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र. ११७/३ दि. २०-९-९६ अन्वये जा.क्र. मनपा/लेखा/नि/४/९७ दि. ९-१-९७ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन यांची सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प. दरापेक्षा ७.७८६% कमी दराची निविदा प्राप्त झालेली होती. त्यास मा. स्थायी समितीने ठराव क्र. ६६४/११ दि. १३-१२-९७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तद्‌नंतर मा. स्थायी समितीने विषय क्र. ४५०/३९ दि. २६-१२-९७ च्या इतिवृत्तान्वये उर्वरित कामाकरिता ९.९५ लाखाच्या वाढीव तरतुदीस मान्यता दिलेली होती आता उर्वरित कामाकरिता म्हणजे स. भिंत, जिना, कोलॅपशी, बलगेट व इतर किरकोळ कामे करणे करिता र.रु. ५,३३,१९०/- च्या वाढीव तरतुदीस मान्यता घेणेस्तव मा. आयुक्त महोदय यांनी स्थायी समिती समोर ठेवणे बाबत आदेशीत केलेले आहे.

त्यानुसार आता वाढीव कामाचे र.रु. ५,३३,१९०/- च्या सुधारित प्रस्ताव विचारार्थ तसेच वाढीव काम मुळ गुत्तेदारांकडुन मंजुर दरानुसार म्हणजेच अं.प. दरापेक्षा ७.७८६% कमी दराने करुन घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आमखास मैदान मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहाचे उर्वरित व वाढीत कामासाठी तयार करण्यात आलेले र.रु. ५,३३,१९०/- चे अंदाजपत्रकास व वाढीव काम हे मुळ गुत्तेदाराकडुन मुळ मंजुर दराने म्हणजेच अं.प. दरापेक्षा ७.७८६% कमी दराने कामे करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८४/७ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मुंकुदवाडी स्मशानभुमीस सुविधा पुरविणेच्या कामाच्या अंदाजपत्रकास दि. १८-१०-९९ च्या स्थायी समितीमध्ये र.रु. ३,०५,६७०/- मान्यता प्राप्त झाली त्यानुसार निविदा क्र.मनपा/लेखा/नि/३६/९९ दि. २०-१२-९९ अन्वये निविदा मागविल्या असता विक्रीच्या तारखेला १७ (सतरा) निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेला तीन (३) निविदा प्राप्त झाल्या त्या उघडण्यात आल्या असता दिलेले दर पुढील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. जावेद खॉन मुझफर खॉन | ५% | जास्त दराने |
| २. | श्री. एस.बी. साधावानी | १०% | जास्त दराने |
| ३. | श्री. एस.बी. इंगळे | १२% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने श्री. जावेदखॉन मुझफरखॉन यांची निविदा होती त्यास मा. आयुक्तांनी ५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने दि. २८-१२-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. करिता श्री. जावेदखॉन मुझफरखॉन यांची ५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराची निविदा स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. मुंकुदवाडी स्मशानभुमीस सुविधा पुरविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री. जावेदखॉन मुझफरखॉन यांचे सह झालेल्या वाटाघाटीनुसार वरील काम त्यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८५/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव दिला की, धनगरवाडा (सिल्कीमिल कॉलनी) येथे रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,८२,१९२/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागवण्यात आली असता निविदापत्रके विक्रीची अंतिम तारखेपर्यंत एकुण नऊ (९) कोरी

निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन (३) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | ३८% | कमी दराने |
| २. | मे. डि.अजितसिंग | ३१.३०% | कमी दराने |
| ३. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | १९.९९% | कमी दराने |

वरील प्राप्त निविदापैकी मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३८% कमी दराचे आहेत. तरी मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३८% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे धनगरवाडा (सिल्कमिल कॉलनी) येथे रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याकामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३८% कमी दराची मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदा स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८६/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, गारखेडा येथील आपुल्लकी अपार्टमेंट ते छत्रपतीनगर श्री. गुर्जर यांच्या घरापर्यंतचा १५.०० मी. रुंद रस्त्याचे विकास रस्त्याचे आलेल्या र.रु. ५,२०,०१०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण बारा कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त दोन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. कुलवंतसिंग | ०.२०% | कमी |
| २. | मो. अहमद सिद्यीकी | ४% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री. कुलवंतसिंग यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ०.२०% कमी आहेत. तरी निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा येथील आपुलकी अपार्टमेंट ते छत्रपतीनगर श्री. गुर्जर यांच्या घरापर्यंतचा १५.०० मो. रुंद विकास रस्त्याचे खडीकरण व सरफेस ड्रेसिंग करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व

अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२०% कमी दराची श्री. कुलवंतसिंग याची निविदा स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८७/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, दलालवाडी परिसरात रफ शहाबाद फरशी बसविणे व खांडकी दुरुस्ती करणेच्या कामासाठी दि. ६-११-९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ३२८/९ अन्वये अंदाजपत्रक र.रु. ३,९८, ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/३६/९९ दि. २०-११-९९ चे निविदा सुचनेव्दारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण तेवीस (२३) निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकृतीच्या नियोजित तारखेस एकुण पाच (५) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एस.ए. नवाब | २६.१७% | कमी |
| २. | मे. फाईव्हस्टार कंन्स्ट्रक्शन | २६.११% | --//-- |
| ३. | श्री. सै. फेजूल हक | २२% | --//-- |
| ४. | श्री. शे. एम.ए. साजेद | २०.१% | --//-- |
| ५. | मे. बसरा कंन्स्ट्रक्शन | ११.११% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अं.प. दरापेक्षा २६.१७% कमी दराची श्री. एस.ए. नवाब यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दलालवाडी परिसरात रफ शहाबाद फरशी बसविणे व खांडकी दुरुस्त करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.१७% कमी दराची श्री. एस.ए. नवाब यांची निविदेस स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८८/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जालना रोडवरील वाहतुक संकेतांकाचे लम्पहेड बदलणे बाबतच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ५,०१,३००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी दोन दर भरुन प्राप्त झाल्या. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. निक्लीऑनिक्स पुणे | ०.०५% | कमी |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | मे. फर्रानी इले. | ५% | जास्त दराने |

वरील प्राप्त दरापैकी मे. निक्लीऑनिक्स पुणे यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी आहे. करिता निविदा स्विकृतीच्या प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालनारोड वरील वाहतुक संकेतांकाचे लम्पहेड बदलणे बाबतच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी दराची निविदा मे. निक्लीऑनिक्स पुणे यांची निविदेस स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देणांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८९/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हॉटेल अंजठा ॲम्बेसिडीर चौक जालना रोड येथे वाहतुक संकेतांक बसविणे बाबतच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ५,२३,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन कोरी निविदा विकल्या गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन्ही निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | निक्लीऑनिक्स, पुणे | ०.०४% | कमी दर |
| २. | मे. फर्रानी इले. | ४.०९% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. निक्लीऑनिक्स पुणे यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०४% कमी आहेत तरी निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल अंजठा ॲम्बेसीडर चौक जालना रोड येथे वाहतुक संकेतांक बसविणे बाबत च्या कामाकरिता प्राप्त झाले निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमील व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०४% कमी दराची मे. निक्लीऑनिक्स पुणे. यांची निविदेस स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९०/१३ :**

प्र.कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. आंबेडकर नगर (स्लम) येथे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता अ.प. र.रु. ५,७६,२१६/- चे तयार करण्यात आले असुन स्थायी समिती सभा दि. १०-१२-९९ रोजी त्यास मंजुरी मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकुण चार (४) निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. डी. अजितसिंग | ५% | जास्त |
| २. | श्री. एम.ए. सिद्दीकी | १०% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प. दरापेक्षा ५% जास्त दराची निविदा श्री. डी. अजितसिंग यांची आहे. परंतु हे दर कार्यालयास जास्त वाटल्याने ठेकेदारास वाटाघाटीसाठी बोलवले असता संबंधित ठेकेदारांनी हे काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास तयारी दर्शविली असुन मा. आयुक्तांनी त्यास मंजुरी दिलेली आहे. तरी श्री. डी. अजितसिंग यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आंबेडकरनगर (स्लम) येथे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री. डी. अजितसिंग यांचेसह झालेल्या वाटाघाटीप्रमाणे सदरील काम त्यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन नेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९१/१४ :**

प्र.कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. बनेवाडी गांव (स्लम) येथे डांबरी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक र.रु. ३,४२,१३३/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रकास स्थायी समितीत दि. २८-१०-९९ रोजी मंजुरी मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकुण चार निविदा विकल्या गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकच निविदा प्राप्त झाली असुन ती श्री. डी.अजिसिंग यांची अं.प. दराची निविदा आहे. तरी निविदा स्विकारण्याच्या प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. बनेवाडी गांव (स्लम) येथे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेली श्री. डी.अजितसिंग यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९२/१५ :**

प्र. कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी कॉक्रीट रस्ते तयार करणे बाबत अंदाजपत्रक र.रु. ७,२०,४७९/- तयार करण्यांत आले आहे. सदरील अंदाजपत्रकास स्थायी समितीतदि. १०-१२-९९ रोजी मंजुरी मिळालेली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखेनंतर एकुण २८ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शेख शरीफ | ५% | जास्त दराने. |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | मो. सलीम | १०% | --//-- |
| ३. | एस.बी. इंगळे | २०% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प. दरापेक्षा ५% जास्त असलेली निविदा श्री. शे. शरीफ यांची आहे. परंतु हे दर कार्यालयात जास्त वाटल्याने ठेकेदारास दराच्या वाटाघाटीबाबत बोलविले असता संबंधित ठेकेदार श्री. शे. शरीफ यांनी हे काम अं.प. दराने करण्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेलीआहे.

करिता अं.प. दराची असलेली श्री. शे. शरीफ यांची निविदा मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. नारेगांव (स्लम) येथे कॉक्रीट रस्ते तयार करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री. शेख शरीफ यांची सह झालेल्या वाटघाटीनुसार सदरचे काम त्यांचे कडुन ५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९३/१६ :**

कार्यकारी अभियंता पा.पु.व.ज.नि. यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. कैलासनगर येथे १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु. २,५३,४००/- च्या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याच्या सन ९८-९९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत येऊन स्थायी समितीच्या दि. ३-१२-९९ च्या बैठकीत विषय क्र. ३६८/१० अन्वये मंजुरी घेऊन जा.क्र. मनपा/लेखा/नि/४८/९९ दि. १६-१२-९९ अन्वये "बी-१" नमुन्यात निविदा सुचना वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविल्या असता एकुण सतरा (१७) निविदा विक्री झाल्या व त्यापैकी फक्त तीन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | बी.एम. कंन्स्ट्रक्शन | ०.१०% | कमी दराने |
| २. | राणा कंन्स्ट्रक्शन | ४% | अं.प. दरापेक्षा जास्त. |
| ३. | मे. विपुल कंन्स्ट्रक्शन | ५% | अं.प. दरापेक्षा जास्त. |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प. दरापेक्षा ०.१०% कमी दराची निविदा मे. बी. एम. कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. मा. आयुक्तांनी सदरील निविदेस प्रशासकीय मंजुरी दि. ४-१-२००० ला दिलेली आहे. तरी सदरील प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. कैलासनगर येथे १५० मी.मी. व्यासाची एस.डब्ल्यु.जी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची मे. बी.एम. कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १२-०१-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**बुधवार दिनांक १२-०१-२००० रोजी मा. सभापती श्री. नरसिंग ढगे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ४.०० वाजता "वदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्ग याच्यासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | स.सदस्य |
| २) | मा.श्री. बचाटे राजकुमार (मामा) | --//-- |
| ३) | मा.श्री. किशोर बाबुलाल तुळशीबागवाले | --//-- |
| ४) | मा.श्री. स.अ.एकबालोद्यीन स.मो. कुतुबुद्दीन | --//-- |
| ५) | मा.सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ६) | मा.श्री. विखारोद्यीन पिता खुदबोद्यीन | --//-- |
| ७) | मा.श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ८) | मा.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| ९) | मा.श्री. वसंत विनायकराव देशमुख | --//-- |
| १०) | मा.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | --//-- |
| ११) | मा.श्री. लहोट रमेश दिपचंद | --//-- |
| १२) | मा.सौ. लता दलाल श्रीनिवास | --//-- |
| १३) | मा.श्रीमती. गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | --//-- |

**संवाद :**

**श्री. स.अ. इकबालोद्यीन :** वार्डात टेलिफोन विभागातर्फे बऱ्याच ठिकाणी खोदकाम होत आहे. नविन डांबरीकरण केलेले रस्त्यावर खड्डे पडत आहे. अधिकारी यांना सर्व माहिती असतांना डोळेझाक होत आहे. एकतर रस्ते दुरुस्ती होत नाही. आहे ते रस्त्याचे खोदकाम होऊन रस्त्यांची दुरावरच्या होत असेल तर योग्य नाही.

**मा. सभापती :** या संदर्भात मागील बैठकीत चर्चा झालेली होती. परवानगी घेतली खोदकाम करण्यास करण्यास हरकत नसावी. संबंधित विभागाने परवानगी घेतलेली आहे काय खुलासा करावा.

**उप अभियंता (इ) :** संबंधित विभाग परवानगी न घेता खोदकामे करत आहे, ज्या ज्या ठिकाणी खोदकामपाचे प्रकार आढळून आले त्यानुसार अगोदर परवानगी घ्या व नंतर खोदकामे करा असे सांगण्यात आले, परंतु संबंधित विभागाचे कर्मचारी रात्रीही खोदकामे करत आहे. ज्या ज्या वेळी असे आढळुन आल्यास सामान जप्त करण्यात येत आहे. आताच काही कर्मचारी मी खोदकामाच्या ठिकाणी पाठवले आहे.

**मा. सभापती :** ज्या ठिकाणी काम करावयाचे आहे. त्यासंबंधि महापालिकेकडे पैसे भरुन परवानगी घेतलेली असेल तर ठिक आहे. नसता संबंधित विभागावर कार्यवाही करावी. आतापर्यंत टेलिफोन विभागाने किती रस्त्याच्या दुरुस्तीसाठी महापालिकेकडे पैसे भरलेले आहेत. व ज्या ज्या ठिकाणी विना

परवनगी खोदकामे चालु आहे. अशा ठिकाणचे सर्व सामान जप्त करण्यात यावे. असा निर्णय मागच्या बैठकीतच आलेला होता. त्यानुसार कार्यवाही करावी.

**श्री. स.अ. एकबालोद्यीन :** दिवसा खोदकामे होत आहे. संबंधित अधिकारी यांनी किती रक्कम भरावयाची हे दाखवले असतांना सुध्दा पैसे न भरावयाची हे दाखवले असतांना सुध्दा पैसे न भरता खोदकाम करत आहे. परवानगी घेऊन सुध्दा खोदकाम केल्यास ताबडतोब ते बुजविण्यात आले पाहिजे.

**मा. सभापती :** विना परवानगीने तसेच नियमाने पैसे भरले नाही व खोदकामे केली तर संबंधित विभागावर कार्यवाही करावी.

**श्री. राजकुमार बचाटे :** याच पध्दतीने सिंधी कॉलनी येथेही टेलीफोन विभागामार्फत खोदकाम होत आहेत. त्या बाबतही कार्यवाही करावी.

**सौ. लता दलाल :** डिसेंबर्‌ ९९ मध्ये पत्र देऊन स्वेच्छा निधीतुन २५ हजार रुपयांची मागणी केलेली होती. या निधीतुन अभ्यासिका केंद्र संगणक तसेच एका पुस्तिकेचे प्रकाशन इ. कामे करण्यात येणार आहे. शालेय पध्दतीच्या कार्यक्रमातुन लोकांसमोर कशी माहिती पुरविता येईल त्या संबंधिची माहिती या पुस्तिकेत नमुद केलेली आहे. याबाबतचे उद्‌घाटन लवकरच होणार आहे. या कामाचे टेंडर निघालेले होते परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी उणिवा काढल्यामुळे सदरचे काम लांबणीवर पडत आहे. उणिवा काढल्यानुसार शिक्षणाधिकारी यांनी लेखाधिकारी यांना सविस्तर माहिती दिलेली आहे. लेखाधिकारी वित्त आयोगाच्या बैठकीस जाणार आहे छापण्यासाठी २-३ दिवस वेळ लागेल. ज्यांनी फायनल केले त्यांनीच ज्या उणिवा बाकी आहे. त्यांची पुर्तता करुन ताबडतोब ऑर्डर देऊन कार्यवाही करावी. येणाऱ्या २२ जानेवारी पासुन आचार संहिता लागणार आहे.

**मा. सभापती :** शिक्षणाधिकारी यांनी खुलासा करावा.

**प्र. शिक्षणाधिकारी :** मुख्य लेखाधिकारी यांची मंजुरी नसल्यामुळे मा. आयुक्तांकडे पाठवता येत नाही.

**उप. आयुक्त (प्र.) :** सभा संपल्यानंतर संचिका मागवून घेवून कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. रविंद्र इंगळे :** स्वेच्छानिधी बाबतच्या बऱ्याच संचिका थांबवून आहेत.

**मुख्य लेखाधिकारी :** दोन दिवसापुर्वी संबंधित संचिका माझ्याकडे आलेली आहे. या संचिके व्यतिरिक्त कोणतीही संचिका माझ्याकडे स्वेच्छानिधी बाबतची पेडिंग नाही.

**मा. सभापती :** येत्या १७ तारखेपर्यंत या कार्यक्रमाचे उद्‌घाटन होणार आहे. संबंधित अधिकारी यांनी लवकरात लवकर वर्क ऑर्डर काढुन कार्यवाही करावी.

**श्री. स.अ. एकबालोद्यीन :** ज्या प्रस्तावास मंजुरी मिळालेली असुन टेंडर काढलेले आहे अशा सर्व कामाच्या वर्क ऑर्डर देण्यांत देण्यांत याव्या माझ्या मते लिपिक वर्गातील कर्मचारी संचिका थांबवून ठेवतात.

**मा. सभापती :** १५-२० दिवसा पुर्वीच्या स्थायी समिती व सर्वसाधारण सभेच्या बैठकीतील ज्या ज्या प्रस्तावास मंजुरी होऊन टेंडर निघालेले आहे व ज्यांचे निविदा स्विकारणेस मंजुरी होऊन टेंडर निघालेले आहे व ज्यांचे निविदा स्विकारणेस मंजुरी झाली आहे अशा सर्व कामांचे कार्यादेश काढण्यात यावेत यानंतर दि. २०-२१ ला आखणी एक बैठक आपण घेणार आहोत.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** स.सदस्या सौ. दलाल यांनी केलेल्या सुचनेनुसार कशाची पुस्तिका छापणार खुलासा करावा.

**सौ. लता दलाल :** यात वचनपुर्ती वगैरे काही नाही पंचायत राज ७४ वी घटना दुरुस्ती अन्वये शालेय समित्या, पालक, नागरिक, विद्यार्थी यांच्या सुसंवाद असावा असे धोरण आहे. उदा. शिक्षक रजेवर असतांना वर्गात कसे शिकवले, मराठी-इंग्रजीची पुस्तके वाटली शालेय विद्यार्थ्याचे हित लक्षात घेऊन जे शक्य होते तेवढेच दिले. आगळा वेगळा उपक्रम म्हणुन एकत्रित माहिती होण्यासाठी पुस्तक रुपाने आपण प्रकाशित करत आहोत.

**श्री. विखारोद्यीन :** सिल्कमिल कॉलनी येथील महापालिकेच्या दवाखान्या३ डॉक्टर आहे. या दवाखान्यात दररोज १५० ते २०० पेशंट उपचारासाठी येतात. मागील बैठकीतही या संबंधी मी चर्चा केलेली होती काही कार्यवाही झालेली नाही. एक्सरे मशिनचे टेंडर आले आहे. म्हणता, तीन बैठकी पासुन चर्चा होत आहे. अद्याप कार्यवाही झाली नाही.

**प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** एकुण २०० पेशंट साठी दोन डॉक्टर पुर्ण होतात. सदर दवाखान्यात डॉ. पांडे व डॉ. पाडळकर डॉ. पाडळकर यांना काही काळासाठी बन्सीलालनगर येथील दवाखान्यात पाठविण्यात आले होते, तेथील डॉ. कुलकर्णी हे सुट्टीवर होते.

**श्री. विखारोद्यीन :** आठवडयातुन ३ दिवस डॉक्टर उपस्थित नसतात. १०० पेशंटला एक डॉक्टर तर २०० पेशंटसाठी दोन डांक्टर हे नियमित उपस्थित नसतात.

**मा. सभापती :** सदर बाबत ही प्रशासकीय असुन प्रशासनाचे असे मत आहे की, १०० पेशंटसाठी १ डॉक्टर पुरेशे आहे, त्याप्रमाणे दोन डॉक्टर या दवाखान्यात आहेत.

**उप आयुक्त (प्र.) :** कोणतेही पेशंट परत जाणार नाही याची पुरेपुर दक्षता प्रशासन घेईल.

**श्री. विखारोद्यीन :** एक्सरे मशीन बाबत काय झाले खुलासा करावा.

**प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** त्याबाबतची मला नेमकी माहिती सध्या तरी देता येणार नाही.

**मा. सभापती :** एक्सरे मशीन बाबतची संचिका कोठे आहे बघुन ताबडतोब कार्यवाही करावी.

**श्री. विकास जैन :** महानगरपालिकेच्या बऱ्याच दवाखान्यामध्ये औषधी कमी पडते. मागील दोन तीन बैठकी पासुन औषधी खरेदी बाबतचे टेंडर काढले होते. ६ महिन्यापासुन या विषयावर चर्चा होते, सभागृहात पुरेपुर माहिती प्रशासनाच्या माध्यमातुन का देण्यांत येत नाही. खुलासा करावा.

**प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** याबाबतची संचिका लेखा विभागाकडे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. देशपांडे असतानाच पाठवलेली आहे.

**मा. सभापती :** निविदा निघाल्यापासुन वर्क ऑर्डर देण्यासाठी काही मर्यादा असतात. एक तर ऐनवेळी प्रस्ताव सभागृहात सादर होतो. २-२-३-३ महिन्याचा कालवधी निघुन जातो. तरीही अधिकारी कार्यवाही करत नाही. ९० दिवसांच्या वर कालावधी निघुन गेल्यानंतर संबंधित ठेकेदार नियमाने काम करण्यास तयार नसेल तर यास कोण जबाबदार राहणार आहे. यापुढे असे प्रकार होता कामा नये.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सिडको-हाडको भागातील पाणी पुरवठा बिले माफ करण्यासंदर्भात मी बऱ्याच वेळेस उपस्थित केलेला असुन तशा तक्रारी नागरिकांकडुनही आलेल्या आहेत. पाणी दिले नसतांना त्या लोकांना बिले दिलेली आहे. यासंदर्भात एकुण ५२ लाख रुपयांचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यात येईल असे नेहमीच सभागृहात मुद्दा उपस्थित केल्यावर सांगण्यात येते. परंतु अद्यापपर्यंत ५२ लाखाची बिले माफ करण्या बाबत प्रस्ताव स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आलेला नाही. प्रशासन वसुली बाबत कडक धोरण अवलंबिते, ज्याठिकाणी पाणी देवून वसुली होत नाही ती वसुली व्हावसाय पाहिजे ज्याठिकाणी पाणी न देता बिले देवून वसुली न भरल्या बाबत नोटीसा देणे प्रशासनाचे धोरण योग्य वाटत नाही. या संदर्भात बऱ्याच नागरिकांनी १९८७ पासुन विभागीय अधिकारी यांचेकडे विनंती अर्ज दिलेले आहे. परंतु अद्याप कार्यवाही झाली नाही. नेमके कुणाला या बाबत न्याय मागावा काही समजत नाही. सभागृहात चर्चा केली तर या संदर्भात सर्वसाधारण सभेपुढे तसा प्रस्ताव घेण्यात येईल असे सांगितले जाते. याबाबतीत मा. महापौर, तसेच स्थायी समिती सभागृहाच्या वतीने आपणही रुलिंग दिलेली आहे. कुठपर्यंत कार्यवाही झाली याची आजच्या बैठकीमध्ये माहिती मिळावयास पाहिजे.

**मा. सभापती :** या संबंधी सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव ठेवणार होते संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** पाणीपट्टी माफ करण्यात संदर्भात दोन प्रकरणे आहेत. झोन अधिकारी यांच्या मार्फत एका प्रकरणाची छाननी करुन दोन दिवसापुर्वीच माझ्याकडे आलेले आहे एक प्रकरण बाकी आहे. जे आले आहे ते येत्या सर्वासाधारण सभेमध्ये सादर करणार आहे.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** संबंधित अधिकारी १-२ प्रकरणाची माहिती सांगत आहे. एकुण ५२ लाख रुपये पाणीपट्टी माफ करण्याबाबतचा निर्णय घेण्यासाठी माहिती विचारली आहे. वैयक्तिक एका प्रकरणासाठी नाही. सर्व लोकांसाठी एक सामायीक निर्णय व्हावा यासाठी मुद्दा मांडलेला आहे. १९८७ पासुन येथील नागरिक नळ कनेक्शन घेण्यासाठी अर्ज करतात. परंतु त्यांना तोंडी असे सांगण्यात येते की, आपण थकीत रक्कम भरल्या शिवाय आपणांला नविन दुसरे नळ कनेक्शन देण्यात येणार नाही. एकुण १२ वर्षापासुन कार्यवाही चालु असतांना झोन अधिकारी पत्रव्यवहार करत नाही. नागरिकांनी मांडलेल्या तक्रारीची झोन अधिकारी कार्यवाही करीत नाही. हे प्रशासनाचे धोरण योग्य नाही.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** एन-११ एम-२ वेगवेगळे नाही पुर्ण एकच संचिका आहे. यात एकुण १५०-२०० नळ कनेक्शनची संचिका माझ्याकडे आलेली आहे. येत्या सर्वसाधारण सभेमध्ये याबाबत निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव ठेवण्यात येईल. व्यक्तिगत कुणी नळ कनेक्शनसाठी मागणी केली असेल तर ही बाब झोन अधिकारी यांच्या कक्षेत येते. त्यांनी तशी कार्यवाही करावयास पाहिजे.

**मा. सभापती :** एका प्रकरणा बाबत २ बैठकी पुर्वी आपण चर्चा केलेली होती ती संचिका संबंधित अधिकारी यांनी आणुन दाखववी.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** या प्रकरणा बाबत आजच निर्णय घ्यावा. एन-७ येथील नेबरवुड मधील ३०० घरांना स्टॅन्ड पोस्ट नळ कनेक्शन दिलेले आहे. सर्वांनाच नळ कनेक्शन गृहीत धरुन बिले आकारली आहे. बिले आकारतांना किती गाळधारकांना नळ कनेक्शन दिलेले आहे. याची पडताळणी करावयास पाहिजे. ती झाली नाही. १९८५ ला पाणीपुरवठा महानगरपालिकाकडे स्थलांतरीत झाला, त्यावेळी गाळेधारकांची यादी घेतली. सरकारी, निवासी, वणिज्य वर्गवारी न करता सर्वाना नळ कनेक्शन आहे असे गृहीत धरुन पाणीपट्टीची आकारणी केली. १०'X१०' क्षेत्राची एकुण ४०० घरे दुर्षल घटकासाठी देण्यास सिडकोने १९७७ ला स्किम काढलेली होती. या गाळे धारकांना नळ कनेक्शन दिले किंवा काय या बाबतची माहिती सिडको कार्यालयाने पत्र दिल्यावर करता येईल असे सांगितले जात होते. परंतु सिडको कार्यालयाकडुन दि. ६-५-९९ ला एक पत्र देऊन कळविले आहे की, आम्ही कुणाही गाळेधारकांना नळ कनेक्शन दिलेले नाही. (तसे पत्र वाचुन दाखवतात) ३०० घरे आहेत ४ घरांना १ प्रमाणे सार्वजनिक नळ खांब दिले आहे अशी माहिती आलेली असतांनाही पुढील कार्यवाही महापालिका मार्फत करण्यात आलेली नाही. ३०० घरांना ४ घरात स्टॅडपोस्ट आहे. त्यांनाही बिले आकारण्यात आली ती आकारण्यात येऊ नये १९९६ ला संपुर्ण घरांना ४ (इंच) व्यासाची पाईप लाईन टाकुन दिली होती. १९९४ ला २-४ लाईनचे काम झालेले होते. ज्यावेळेस पाईप लाईन टाकण्यात आली पाणी देण्यात आले त्या कालावधी पासुन बिले आकारण्यात यावी.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी पत्र वाचुन दाखवले, दुर्बल घटक गाळे धारकांना स्टॅन्ड पोस्ट बिले आकारता येत नाही.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** सहकारी घर असेल तर बिल आकारु शकत नाही. सिडकोने ४ घरांना एक नळ कनेक्शन दिले असेल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** ७ महिण्यापुर्वी सिडको कार्यालयाने पत्र देऊन कळविले आहे. निश्चित काय भुमिका आहे. कळावयास मार्ग नाही.

**कार्य. अभियंता (पा.पु.) :** नळ कनेक्शन आपण दिले नाही सिडको हस्तांतरण झाले त्यानुसार सिडकोने यादी आपणाकडे पाठवली त्यानुसार बिल देण्यांत येतात.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** सिडको कार्यालयाने पत्र दिलेले आहे. बिल कसे आकारता येईल.

**मा. सभापती :** अशा प्रकारची तफावत येत असेल तर सिडको कार्यालयाकडुन बिले वसुल करावे.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** जी. बिले देण्यांत आलेली आहे ती १९८५ च्या नंतरची आहे. १९९४ ला त्या भागात पाईप टाकली. त्या लोकांना नळ कनेक्शन घ्यावयाचे आहे, त्यांच्यावर मागील वसुलीची रक्कम ४-५ हजार रुपये प्रत्येकी काढण्यात आलेली आहे. मुद्दामहुन अडवणुक करण्यांत येत आहे. असा त्याचा अर्थ होतो आहे.

**मा. सभापती :** १९९४ नंतर पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे. त्यानंतरचे बिले आकारण्यात यावी व नविन कनेक्शन देण्यांत यावे. कुणावर अन्याय व्हावयास नको. सिडको कार्यालयाकडुन नळ कनेक्शन दिले असेल तर त्या संबंधिची वसुली त्यांच्या कडुन वसुल करण्यात यावी.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** दुर्बल घटकासाठी जी घरे देण्यांत आली व त्याठिकाणी जेव्हा पाईप लाईन टाकण्यात आली तेंव्हा पासुनची देण्यांत आलेली बिला बाबतची रक्कम वसुल करावी. १९८५ ला रुपये १५० व १९९२ पर्यंत ४०० रुपये १९९२ नंतर जास्त पाणी पट्टी बिलाची रक्कम वाढलेली आहे. त्या लोकांवर अन्याय होऊ नये अशाप्रकारे निर्णय घेवून अंमलबजावणी करावी. सिडको हडको भागात एकुण १२२ एम.डी. पाणी येते. एकुण २८ हजार कनेक्शन असुन २२ ते २५ एमएलडी पाणी मिळते इतर पाण्याचा कुठे वापर करण्यात येतो अशा बाबी निदर्शनास आणुन न देता ज्यांना पाणी दिले नाही अशा लोकांना बिले आकारावयाचे हे धोरण योग्य नाही.

**मा. सभापती :** स.सदस्य, श्री. कोकाटे श्री. राजु इंगळे यांनी उपस्थित केलेल्या सुचनेनुसार स्टॅण्डपोस्ट असलेल्या घरांना बिले आकारु नये.

**श्री. राजु इंगळे :** ज्या जया ठिकाणी शहरात पाणपोई स्वच्छानिधीमधुन महापालिकेने बांधलेल्या आहेत यानंतर देखभाल, दुरुस्तीसाठी स्वेच्छानिधी उपलब्ध नसणार करिता महापालिकेचे या पाणपोईची सुरक्षिततेची व देखभाल ठेवण्याची जबाबदारी घ्यावी.

**मा. सभापती :** ज्या घरांना स्टॅण्ड पोस्ट प्रमाणे पाणी पुरवठा होते होता त्यांना बिले आकारु नये १९९५-९६ नंतर भागामध्ये पाईप लाईन टाकली त्यानंतरचे बिलापोटी रक्कम येईल तेवढीच रक्कम वसुली करावी.

**सौ. लता दलाल :** कर्मचाऱ्यांना वाढीव वाहन भत्ता देण्याबाबत १९८९ ठराव झालेला होता. रु. ३००/- वाहन भत्ता ऐवजी १२००/- रुपये वाहन भत्ता दरमहा देण्यांत यावा अशी मागणी होती त्यावेळी १२००/- रुपये करण्याऐवजी ५००/- रुपये करण्यात आलेले आहे कर्मचाऱ्यांनी असे मत मांडले की, पेट्रोलचे आताचे दर ३० रुपये असुन दराचा विचार करता त्या संबंधित कर्मचाऱ्यांनी ८९ च्या ठरावात जी मागणी केली होती तीच मागणी प्रमाणे दर महा १२००/- वाहन भत्ता देण्याबाबत निवेदन दिलेले आहे. या बाबत निर्णय व्हावा.

**मुख्यलेखाधिकारी :** या संबंधिचे निवेदन माझ्याकडे आलेले नाही, परंतु एका कॅडरच्या कर्मचाऱ्यांना दिल्यास सर्वच विभागातील कॅडरच्या कर्मचाऱ्यांना लागु करावे लागेल. प्रत्येक कॅडरच्या कर्मचाऱ्यांना वेगळा वेगळा वाहन भत्ता दिला जातो.

**मा. सभापती :** १९८९ ला ३०० रुपये संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना वाढीव वाहन भत्ता देण्या बाबत तात्काळ कार्यवाही करावी कुणावर अन्यय होणार नाही याची दखल घेण्यात यावी.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** दि. २८-१०-९७ च्या बैठकीत क्रिडा अधिकारी, सांस्कृतिक अधिकारी, जनसंपर्क अधिकारी तसेच आणखी दोन पदावरील असे एकुण पाच अधिकारी संवर्गात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी वाढ करण्यात यावी अशी चर्चा झालेली आहे. प्रशासनाने अशा खुलासा केला होता की, पुढच्या बैठकीत या संबंधित प्रस्ताव सादर करण्यात येईल. परंतु बऱ्याच बैठका पार पडल्या अद्याप प्रस्ताव सदर कर्मचाऱ्यांना कर्मचाऱ्यांच्या बाबतीत झाले. खुलासा करावा. आणता येत नसेल तर तसे प्रशासनाने खुलासा करावा.

**मा. सभापती :** तीन चार वेळेस हा मुद्दा स. सदस्यांनी बैठकीत उपस्थित केलेला आहे. यात जनसंपर्क अधिकारी, सांस्कृतिक अधिकारी तसेच क्रिडा अधिकारी तसेच

आणखी दोन-तीन अधिकारी संवगा्रतील कर्मचारी येतात. याबाबत प्रशासनाने तसा प्रस्ताव मंजुरीसाठी आणवयास पाहिजे. होता. स्थायी समिती कलम ५१(४) अन्वये हा निर्णय घेऊ शकते की कर्मचाऱ्यांना वेतन, भत्ते व ज्या ज्या वेळेस आर्थिक बाबींचा समस्या येईल त्या संदर्भात स्थायी समितीने घेतलेला निर्णय प्रशासनाने ग्राहय धरावा व तशी अंमलबजावणी करावी. या संबंधी मा. सर्वोच्च न्यायालयाने सुध्दा निर्णय दिलेला आहे. स्थायी समितीने घेतलेला निर्णय प्रशासनातर्फे अंमलबजावणी होत नसेल तर आमच्या निर्णयावर गदा आणल्यासारखे होईल. असा त्याचा अर्थ होतो. प्रशासनाला खेदाने सांगावेसे वाटते की, नियमाप्रमाणे घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. तरी प्रशासनाने ८ दिवसात कार्यवाही करावी.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** आतापर्यंत जे जे निर्णय स्थायी समितीने घेतलेले आहे त्या सर्व प्रकरणांची अंमलबजावणी प्रशासनाने करावी.

**मा. सभापती :** येणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीपर्यंत प्रशासनाने स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करावी. पाणीपट्टी माफ करण्याबाबतची एक संचिका एन-२ ची कोर्टाच्या आदेशामुळे आपण निर्णय घेतला. आणखी एक संचिके बाबत संबंधित अधिकारी यांनी सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी ठेवून पुढील कार्यवाही करावी.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** पाणीपट्टी बिले माफी बाबतचा सिडको येथील घेतलेला निर्णयाबद्दल आपले व प्रशासनाचे अभिनंदन करतो.

**सौ. लता दलाल :** पाणपोई मधील पाणपोई नळांना पाणी येत नाही. याची देखभाल सुरक्षिततेबाबत काय निर्णय घेतला आहे.

**मा. सभापती :** स्वेच्छानिधीतुन पाणपोई बांधल्यानंतर प्रशासन देखभाल तसेच सुरक्षिततेबाबत काळजी घेऊ शकेल काय? खुलासा करावा.

**श्री. राजु इंगळे :** पाणपोईना रंगरंगोटी, देखभालीची तरी काळजी महापालिकेने घ्यावी.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** पाणी पुरवठा विभागातुन ड्रेनेज लाईन फुटल्यानंतर ज्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात येते त्याचप्रमाणे महिन्यातुन १-२ वेळेस ज्याठिकाणी पाणीपाई आहत त्याठिकाणी पाहणी केली तरी चालेले.

**मा. सभापती :** स्वेच्छानिधीमधुन ज्या ज्या ठिकाणी पाणीपाई बांधण्यात आलेल्या आहेत ज्या ज्या झोन कार्यालया अंतर्गत पाणपाई येतात त्यांची देखभाल दुरुस्ती संबंधित झोन अधिकारी व त्या झोन कार्यालया अंतर्गत येणाऱ्या पाणी पुरवठा कर्मचाऱ्यांनी त्या पाणपाईच्या टाकीमध्ये पाणी पुरविण्याची कार्यवाही करावी.

**सौ. लता दलाल :** वाचनालयातील जे कर्मचारी दैनिक वेतनावर होते त्यांच्या वेतना बाबत निर्णय घेतलेला नाही म्हणुन त्या कर्मचाऱ्यांनी जुन -९९ पासुन वेतन उचलेले नाही. याबाबत मागील बैठकीत चर्चा झालेली होती. निर्णय घेण्यात येईल असे सांगितले होते. खुलासा करावा.

**प्र. शिक्षणाधिकारी :** या संबंधी मुख लेखाधिकारी यांच्याशी चर्चा झालेली आहे. त्यांनी असे सुचविले की, मा. आयुक्तांशी चर्चा करावी. मा. आयुक्त यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा/अदयाप झालेली नाही.

**मा. सभापती :** मागील बैठकीतच याबाबत निर्णय झालेला होता. दैनिक वेतनावरुन ठराविक वेतन रु. ७०० वर या कर्मचाऱ्यांना घेतलेले आहे. त्यांचा दैनिक

वेतनाप्रमाणेच पगार मिळावा संबंधित अधिकारी यांनी मा. आयुक्तांशी चर्चा करुन तशी कार्यवाही व्हावी.

**सौ. लता दलाल :** तसेच दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांकडुन आणि कायम कर्मचाऱ्यांकडुन ही कार्यालयीन वेळेच्या व्यतिरिक्त जास्त वेळ कामे करुन घेतली जातात उदा. वसुली विभाग, जन्म-मृत्यू नोंद विभाग आणखी बऱ्याच विभागामध्ये कर्मचाऱ्यांकडुन वेळेच्यावर जास्त वेळ कामे करुन घेतली जातात. अशा कर्मचाऱ्यांना जास्तीच्या कामाचा मोबदला का देण्यांत येत नाही. त्यांना साप्ताहिक सुट्टी देखील दिली जात नाही.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** दिवाळीच्या वेळेस स्थायी समितीची बैठक चालु असतांना कर्मचाऱ्याना जास्तीच्या कामाचा मोबदला मिळाला नाही म्हणुन सभागृहापुढे धरणे केले होते. दर महिन्याला जास्तीच्या कामाचा मोबदला देता येत नसेल तर एकत्रित तीन-तीन महिनेचे वेतन देण्यात यावे जे जास्तीचे कामे करतात त्याच्या विचार व्हावयास पाहिजे.

**मा. सभापती :** विविध विभागामध्ये दैनिक वेतनावर कर्मचारी कार्यरत आहेत. उदा. तांत्रिक विभाग, वाहनचालक, सफाई कामगार तसेच पाणी पुरवठा, नगरसचिव विभागामध्ये सुध्दा दैनिक वेतनावर कर्मचारी आहे. माझ्या गाडीवरील वाहन चालक दैनिक वेतनावर असुन १० ते ११ तास डयुटी होते. तरी जास्तीचा कामाचा मोबदला देण्याबाबत विचार होत नाही. सर्वच विभागातील दैनिक वेतनावरील (डेलीव्हिजेस्) लिपीक-टंकलेखक संवर्गातील, व इतर पदावरील कर्मचारी यांनी जर कार्यालयीन वेळेच्या व्यतिरिक्त जास्तीचे काम केलेले असेल तर त्या कामाचा मोबदला त्यांना मिळण्याबाबत प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** आपण केलेले आदेशनुसार प्रशासन अंमलबजावणी करत नाही.

**मा. सभापती :** आजच्या सभेला मा. आयुक्त उपस्थित नाही. त्यांच्याजागी प्र. आयुक्त म्हणुन श्री. कांबळे साहेब आहे. त्यांना सुचना करुन इच्छितो की, आजच्या बैठकीत झालेल्या सर्व निर्णयाची प्रशासनाने कार्यवाही करावी. सभागृहातील सर्व घेतलेल्या निर्णया संबंधिची माहिती त्यांनी मा. आयुक्त यांच्या कानावर घालावी व पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री. विकास जैन :** खोकडपुरा येथील महापालिकेच्या शाळेवर श्रीमती जनाबाई वाहुळे हया मुख्याध्यापक पदावर कार्यरत असतांना त्यांना सन ९४ ला ध्वजारोहन करण्यास विलंब झाल्या कारणाने निलंबन केले होते. निलंबन काळात त्यांना अर्धा पगार देण्यात येत होता. वरील प्रकरणामुळे त्यांचे सन ९५ चे एक वार्षिक वेतनवाढ थांबवून ठेवलेली असुन ती वेतनवाढ होण्यासाठी व त्यानुसार थकीत बाकी मिळणेसाठी त्यांनी विनंती निवेदन सादर केलेले आहे. संबंधित शिक्षिका येत्या मे-२००० मध्ये सेवानिवृत्त होणार आहे. त्यांनी चांगल्याप्रकारे महापालिकेची सेवा केलेली आहे. याबाबत निर्णय व्हावा.

**मा. सभापती :** संबंधित मुख्याध्यापक यांना दि. १-५-९४ ला ध्वजारोहण करण्यास विलंब झाल्याच्या कारणावरुन निलंबन केले होते. निलंबन काळ त्यांचा एकुण १७२ दिवस असुन वरील निलंबनामुळे सदरील प्रकरण न्यायाप्रविष्ठ झाले व न्यायालयाने त्यांना निर्दोष केलेले आहे. त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री. व्ही.व्ही. देखमुख :** महापालिका फंडामधुन बऱ्याच इमारती बांधण्यात आलेल्या आहे. त्यात आरोग्य केंद्र, अभ्यासिका केंद्र आहेत. त्या इमारती निर्माण करणे मागे प्रशासनाची काय भुमिका आहे. खुलासा व्हावा. इमारती बांधतांना लाखो रुपये खर्च होतात. तेथे सुविधा, तसेच देखभाल दुरुस्त्याची जबाबदारीची भुमिका महापालिकेने चांगल्या प्रकारे पार पाडली पाहिजे. जागा देतांना योग्य ठिकाणी दयाव्यात. माझ्या वार्डात आरोग्य केंद्र अभ्यासिका केंद्र तसेच वाचनालय तयार होत आहे. त्या ठिकाणी पाणीपुरवठा साफसफाई नसेल तर काय उपयोग उदा. यापुढे काचा फुटतील, दरवाजे तुटतील आणखी दुरावस्था होईल. या इमारतीत अदयाप मिटर बसविलेले नाही. येत्या १७-तारखेला उद्घाटन करावयाचे ठरले होते. याबाबत निर्णय घ्यावा.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी मांडलेली सुचना योग्य आहे. बऱ्याच मोकळया जागेवर महापालिकेमार्फत इमारती बांधण्यात आलेल्या असुन उदाहरण दयावयाचे झाल्यास खोकडपुरा येथे एक इमारत ३ वर्षापासुन उभी आहे. परंतु या इमारतीत महानगरपालिका काहीही उपयोग करुन घेत नाही या इमारती उपयोगात आणाव्या व आवश्यक कर्मचारी भरावा इमारतीची दुरावस्था होणार नाही याची प्रशानाने काळजी घ्यावी व सद्यस्थितीमध्ये ज्या ज्या इमारतीचे बांधकाम चालु आहेत त्या इमारती ज्या कामासाठी बांधण्यात आलेल्या त्या उपक्रमाचा त्याठिकाणी उपयोग करुन घ्यावा. स.सदस्य यांनी सुचविले की १७ तारखेला उद्घाटन आहे. त्यानुसार लागणारा कर्मचारी वर्ग व इतर खर्च बाबींची प्रशानाने पुर्तता करावी तसेच स. सदस्या सौ. लता दलाल यांच्याही वार्डात अभ्यासिका केंद्र वाचनालय आहेत तेथेही कर्मचारी देण्याची कार्यवाही व्हावी.

**श्री. व्ही.व्ही. देशमुख :** इमारती बांधकाम झाल्यानंतर महापालिका सांभाळु शकत नसेल तर मुंबई कामगार कार्यालयाने पाठविलेल्या प्रस्ताव नुसार कार्यवाही व्हावी. कामावर कल्याण केंद्र वाचनालय, अभ्यासिका केंद्र सोयीसुविधा देण्यासाठी घेत असेल तसेच प्रशानाचे मत असेल तर देण्यास हरकत नाही.

**मा. सभापती :** वसंतभुवन येथील इमारत मधील वरचा मजला आपण कामागार कल्याण मंडळास चालवण्याकरिता दिलेली आहे. एक प्रकरणाचा अपवाद सोडला तर स्थायी समिती सर्व शहरातील इमारती इतरांना चालवण्यासाठी देण्याबाबतचा निर्णय घेऊ शकत नाही सर्वसाधारणतः सर्वासाठीच निर्णय घ्यावयाचा असेल तर ही बाब सर्वसाधारण सभेसमोर मांडावी.

**श्री. देशमुख व्ही.व्ही. :** एक वर्षापासुन कामागार कल्याण मंडळाचा प्रस्ताव आलेला होता. त्यानुसार इमारती इतरांना चालविण्यासाठी देण्यात यावे किंवा कसे तसा प्रस्ताव संबंधित अधिकारी यांनी सभागृहामध्ये मांडावयास पाहिजे. त्यांना आपण आदेश करावे तसेच जकात वसुली जास्त होण्याच्या दृष्टीने मी माहिती विचारली होती. शहरातील सद्यस्थितीत किती रस्त्याचे डांबरीकरणाची कामे आहे. किती रस्त्याचे डांबरीकरण चालु आहेत व या रस्त्यांना लागणारे साहित्य उदा. डांबर, खडी माती दररोज किती ट्रक्स शहरात येतात याची माहिती अदयाप दिली नाही.

**मा. सभापती :** स. सदस्य यांनी मागील बैठकीत हा मुद्दा उपस्थित केलेला होता. म्हणणे असे की, डांबरीकरण होत असतांना नाक्यावरुन येणारे साहित्य हे सकाळी

एक ट्रक्स भरुन आल्यावर ज्यावेळी सकाळी पावती घेतली जाते. तीच पावती दिवसभर ट्रॅक्स मालवाहतुक करतांना वापरली जाते. जकात अधिक्षक यांनी खुलासा करावा.

**जकात अधिक्षक :** एकाच पावतीवर दिवसभर ट्रक्स ट्रिप्स करु शकत नाही. देण्यात येणाऱ्या पावतीवर वेळ टाकण्यात येतो. त्यामुळे एक ट्रक्स दिवसभर एकाच पावतीवर ट्रिपा करु शकत नाही.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** स. सदस्य यांच्या वार्डात डांबरीकरण कामे चालु असेल त्यांना त्याबद्दल नेमकी माहिती पाहिजे असेल तर ती देण्यांत यावी.

**श्री. स.अ.एकबालोद्यीन :** आमखास मैदान जवळ हायमस्ट दिवा लावण्याबाबत मागील बैठकीत चर्चा केलेली होती. काय कार्यवाही झाली.

**मा. सभापती :** रिवाईजड बजेटमध्ये याबाबत निर्णय घेण्यात येईल. विषय क्र. १ वर चर्चा करावी.

**विषय क्र. ४९४/१ :**

दिनांक १०-१२-९९ व २१-१२-९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

**श्री. विखारोद्यीन :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ६ वर ४८ जकात वसुलीचे उदिष्ट आहे त्यातील फक्त २८.८० कोटीची वसुली झालेली आहे. बाकीची वसुली उर्वरित कालावधीत वसुल होईल. काय याचा खुलासा करावा.

**मा. सभापती :** जकात अधिक्षक यांनी खुलासा करावा.

**जकात अधिक्षक :** आजपर्यंतची वसुली ३३ कोटी ३५ लाख जकात वसुली झालेली आहे.

**श्री. विखारोद्यीन :** उर्वरित ७५ दिवस (अडीच महिने) बाकी राहिलेले आहे. ३३ कोटी २५ लाख वसुली झालेली आहे. असे सांगण्यात येते. बाकीची वसुली म्हणजे एकुण १४ कोटीची वसुली अडीच महिण्यात होणार आहे काय याचा खुलासा व्हावा. पुर्ण वसुली होण्यास प्रशासनाने काय उपाययोजना केली.

**मा. सभापती :** सभागृहात मागील बैठकीत या संदर्भात चर्चा झालेली होती. त्या नुसार संबंधित अधिकारी यांनी जकात वसुली वाढ होईल यासाठी काही उपाय केले आहेत काय?

**जकात अधिक्षक :** या वर्षात दोन वेळेस संप झालेले आहेत २ तारखेपासुन मुंबईला संप चालु आहे. या कालावधीत आवक-कमी झाल्याने सुमारे २ कोटी रुपये कमी वसुल होईल ४६ कोटीची वसुली राहिलेल्या वेळेस पुर्ण होईल.

**मा. सभापती :** जे. उद्दिष्ट ठेवले आहेत ते पुर्ण कसे करता येईल तशी प्रशासनाने उपाययोजना करावी.

**सौ. तळेकर राधाबाई :** विनायकनगर येथील श्री. केशर चौधरी यांनी केलेल्या महापालिकेच्या जागेवरील अतिक्रमणाबाबत सर्व कार्यवाही झालेली असतांना काढण्यात आलेले नाही. विलंब लागलेला आहे. खुलासा करावा.

**प्र. प्रशासकीय अधिकारी :** सदर प्रकरणाची संचिका नगररचना विभागामध्ये योग्य अभिप्राय घेण्यासाठी पाठविण्यात आलेली आहे. तेथील संबंधित अभियंता श्री. के.आर.

कुलकर्णी यांची बदली झाली. मा. उपसंचालक नगररचना यांचेसह चर्चा केली त्यांनी अभिप्राय दिल्यानंतर कार्यवाही करण्यांत येईल.

**उपसंचालक नगररचना :** शाखा अभियंता श्री. कुलकर्णी कालच आलेले आहे. सिमाकंन दाखवण्यांत आलेले आहे. संचिका पाठविण्यांत येत आहे.

**मा. सभापती :** उद्या रिपोर्ट घ्यावा जर जागा महापालिकेच्या मालकीची असेल तर चौधरी नावाच्या व्यक्तींला नोटीस न देता २ दिवसात अतिक्रमण काढण्याची कार्यवाही व्हावी.

**श्री. तुळशी बागवाले किशोर :** रंगारगल्ली भागात रस्त्यावर दुकानधारकांनी जास्तीच्या जागेवर अतिक्रमण केलेली आहे. याबाबतची मागील बैठकीत चर्चा केली होती. कार्यवाही झाली नाही.

**सौ. लता दलाल :** निरालाबाजार येथील अतिक्रमणाबाबत मी ९९ च्या सुरुवाती पासुन तक्रार मांडत आहेत. तसेच कुंभारवाडा येथील अतिक्रमणाबाबत १५ दिवसांपुर्वीच्या बैठकीत तक्रार केली. अतिक्रमण बाबत नेहमी सभागृहात कोणते ना कोणते कारण दाखवून अतिक्रमण काढण्याची कार्यवाही होत नाही. मागील आठवडयात ठिक आहे ईदचा सण होता. गरीब लोक हातगडया दुकाने मांडुन बसलेली होती. ईदचा सन संपला आतातरी अतिक्रमणे काढण्याची कार्यवाही व्हावी. संबंधित प्रशासकीय अधिकारी काय करतात. स. सदस्या तळेकर यांचा प्रश्न ६ महिन्यापासुन सभागृहात उपस्थित होतो आहे. अदयाप का कार्यवाही केली नाही माहिती विचारल्यास नगररचना विभाग, मालमत्ता विभाग तसेच प्रशासकीय विभागातील अधिकारी हे एक दुसऱ्या विभागाची ती कार्यवाही आहे अशी देतात याचा अर्थ सभागृहाची उघडपणे अधिकारी दिशाभुल करत आहे. याबाबत प्रशासनाने गांर्भियाने विचार करावा.

**मा. सभापती :** कुंभारवाडा येथील रस्त्यावर बरीच दुकाने अतिक्रमणामध्ये येतात. अशा रस्त्यावरील अतिक्रमे तात्काळ काढली पाहिजे. संबंधित अधिकारी यांनी वर्दळीच्या ठिकाणी जास्त लक्ष दयावे शहराच्या बाहेरच्या भागात बघण्यात येते. शहराच्या अतिल भागात देखील काळजी घेण्यात यावी.

**श्री. स.अ. एकबालोद्दीन :** गरीब लोक कुंभारवाडा येथील रस्त्यावर भाजीपाला विकत आहेत. पोटापाण्याचा प्रश्न असुन सर्वावरच तात्काळ कार्यवाही करणे योग्य होणार नाही.

**श्री. व्ही.व्ही. देशमुख :** सत्य परिस्थितीनुसार सभागृहात आरोप आम्ही करतो. अधिकारी कार्यवाही करत नाही. याचा अर्थ आपण कुठेतरी कमी पडतो सभागृहातील निर्णयाची अंमलबजावणी अधिकारी करत नसतील तर पदाधिकारी त्यांना सहाकार्य करतात काय? पदाधिकारी प्रशासनाची बाजु होते काय? अशी शंका निर्माण होते. मा. सभापतीनी दिलेल्या आदेशाचे पालन होत नाही यास स. नगरसेवक जबाबदार असुन शकत नाही. यातील जास्त वाटा पदाधिकारी याचा आहे.

**मा. सभापती :** अधिकारी सभागृहात झालेल्या निर्णयानुसार पालन करत नाही. याबाबत बऱ्याच वेळा चर्चा झालेली आहे. अधिकारी यांनीही सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन झालेल्या निर्णयाचे बाबत कार्यवाही करावी. सभागृहातील घेतलेले निर्णय आपण सर्वासाठीच घेतलेले आहे. यात विकास कामाबाबतचे

बरेच निर्णय झालेले आहेत. त्यानुसार अधिकारी यांनी कार्यवाही केली पाहिजे.

**श्री. विखारोद्दीन :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ९ वर स्मशानभुमीच्या कामास कधी सुरुवात होणार रिवाईजड बजेट मधुन करणार होते. वादग्रस्त प्रकरण (वेगळे) आहे. याबाबत मी श्री. खैरे साहेब पालकमंत्री असतांना त्यांच्या कानावर २-३ वेळेस घातले होते. त्यांनीही सांगितले हे काम लवकरात लवकर करुन घ्यावे. तात्काळ केले नाही तर पोलिस मध्ये तक्रार करावी लागेल. त्या ठिकाणी पुर्ण काम झालेले नाही. अर्धवट काम केलेले आहे. एकुण ५-७ लाखाचे टेंडर होते. माझ्या मते यातील काही रक्कम बाकी आहेत. त्यामधुन कामास सुरुवात करावी.

**शहर अभियंता :** स्मशानभुमीचे ७०% (टक्के) काम झालेले आहे. या जागेबाबत न्यायालयात वाद चालु होता. त्यामुळे काम बंद पडले संबंधित ठेकेदाराची कामाची वेळ संपलेली आहेत नविन रेट प्रमाणे काम दया असे त्याचे म्हणणे आहे. त्यानुसार कार्यवाही करावी लागणार आहे.

**श्री. विखारोद्दीन :** या ठिकाणी चौकीदार देणार होते त्याबाबत काय कार्यवाही केली.

**मा. सभापती :** पुढच्या बैठकीत खुलासा करण्यात येईल.

**श्री. देशमुख व्ही.व्ही. :** नारेगांव येथील स्मशान भुमी गोसावी समाजाच्या लोकांना दिलेली आहे. या स्मशानभुमी मधील एक वेळेस अतिक्रमण मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आलेले होते. सदर स्मशाभुमी आपल्याकडे हस्तांतर केलेली आहे. त्याठिकाणी वाचमन नाही. त्यामुळे अतिक्रमण होते अतिक्रमण झाले तर कोण जबाबदार राहील.

**प्र.प्रशासकीय अधिकारी :** अतिक्रमण झालेले पुन्हा काढावयाचे आहे. पोलिस बंदोबस्त नव्हता मा. उपआयुक्त यांची मंजुरी घेतलेली आहे.

**सौ. लता दलाल :** आपल्या विभागातील पोलिस काय काम करतात खुलासा व्हावा.

**श्री. व्ही.व्ही. देशमुख :** आपल्या कडील पोलिस कर्मचारी कोणत्या कामासाठी वापरतात. शहरात नागरिकांना सुखसोयी पुरविण्यास येणाऱ्या अडचणी तसेच ज्याठिकाणी वादात झेंडे, पुतळे अतिक्रमण म्हणुन महापालिकेच्या जागेवर होतात अशावेळी सक्षम अधिकारी यांनी पुढाकार घेऊन पोलिस कर्मचाऱ्यांचा उपयोग करुन घ्यावयास पाहिजे.

**श्री. विखारोद्दीन :** माझ्या वार्डातील लाईट बाबतचे अंदाजपत्रक १ वर्षापासुन थांबवून आहेत. संबंधित अधिकारी यांच्याकडुन मी सभागृहात मुद्दा उपस्थित केल्यास असे सांगण्यात येते की, शासकीय अनुदानातुन सदरचे काम करण्यात येईल कधी सांगतात संचिका परत गेली आहे. उडवाउडवीची उत्तरे मिळतात. खुलासा व्हावा. शासकीय अनुदानातुन कोणकोणती कामे करण्यात येतात.

**मा. सभापती :** वार्डातील सगळेच कामे होणे शक्य आहे. स. सदस्यांनी विचार करावा. माझ्याही वार्डातील बरीच कामे होण्याची बाकी आहे. सगळीच कामे तात्काळ होणार नाही कामे करतांना अडचणी येतातच त्यामुळे वेळ लागतो.

**श्री. विखारोद्दीन :** माझ्या वार्डातील सर्व कामे माझ्या स्वेच्छानिधीतुन करण्यात आलेली आहे. दुसऱ्या वार्डातील रस्त्याची सुधारित कामे शासकीय अनुदानातुन होत आहे. माझ्याच वार्डातील कामे शासकीय अनुदानातुन होण्यास उशीर का लागतो.

इस्टीमेंटस् होऊन १ वर्षे झाले तरी अधिकारी कार्यवाही करत नाही. एकुण ५ ते ७ कामे तशीच थांबवून आहेत.

**उप अभियंता (वि.) :** स.सदस्य श्री. विखारोद्यीन यांच्या वार्डातील २ कामे मंजुर झालेले आहे. एक काम शासकीय अनुदानातुन होणार आहे.

**मा. सभापती :** सर्वच स. सदस्यांच्या भावना आहे की, आमच्याच वार्डातील कामे व्हावीत. सर्वच कामाना प्राधान्य देवुन नियमाने कार्यवाही व्हावी. अधिकारी यांनी शक्य होत नसेल तर रिवाईजड बजेट मधुन कामे करावी.

**उपअभियंता :** उर्वरित राहिलेली कामे रिवाईजड बजेट मधुन करण्यात येईल.

**मुख्यलेखाधिकारी :** सध्या तरतुद उपलब्ध नाही. मार्च नंतर कार्यवाही करता येईल वसुली कमी होत आहे. त्यामुळे कामे ही कमी होतात.

**श्री. विखारोद्यीन :** एका कामासाठी २.८० लाखाची मंजुरी घेऊन काम करतो. असे सांगितले होते. माझ्या वार्डातील कामाच्या इस्टीमेंट नंतर बरेच कामाचे इस्टिमेंटस् मंजुर होऊन कामे केलेली आहे.

**मा. सभापती :** पुढील बजेटमध्ये मंजुर संमावेश करुन स. सदस्य श्री. विखारोद्यीन यांच्या वार्डातील कामे करण्याबाबत कार्यवाही व्हावी विषय क्र. १ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

दि. १०-१२-९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. व दि. २१-१२-९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त आगामी सभेपुढे ठेवण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४९५/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, देवानगरी ते प्रतापनगर स्मशानभुमीपर्यंत खड्डी रस्ता व नाल्यावर पाईप कलर्वट बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तेवीस कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त आठ निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुखबीरसिंग | ३६.०९% | कमी |
| २. | श्री. प्रकाश जाधव | ३५.०१% | कमी |
| ३. | मे. बसरा कंन्स्ट्र. | ३१.०६% | कमी |
| ४. | श्री. स.अथर हुसैनी | २३.७८६% | कमी |
| ५. | श्री. खान मुजाहेद | २३.००% | कमी |
| ६. | श्री. एस.एम. मंडोरे | २०.८६% | कमी |
| ७. | श्री. एस.एम. पाथ्रुड | ५% | कमी |
| ८. | मे. पटेल कंन्स्ट्रक्शन | १५% | कमी |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री. सुखबिरसिंग यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.०९% कमी आहेत.

तरी श्री. सुखबिरसिंग यांच्याकडुन सदरील काम अं.प. दरापेक्षा ३६.०९% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद**

**मा. सभापती :** विषय क्र. २ मधील श्री. सुखबिरसिंग यांनी सर्वात कमी म्हणजे ३६.०९% कमी दराने काम करुन देण्याची संम्मती दर्शविली आहे. विषय क्र. ३ मध्येची त्यांचीच निविदा सर्वात कमी म्हणजे ४६.५०% कमी दराने काम करण्याची आहे. सदर काम त्यांच्या अंगावर आले असावे म्हणुन ते विषय क्र. ३ मधील १६.५०% कमी दराच्या निविदेमधील काम करण्यास आजारी आहे असे सांगतात. त्यांनी वर नमुद केलेल्या दोन्ही विषयातील कामे करावीत नसता त्यांना काळया यादीत समाविष्ट करावेत व दुसऱ्या क्रमांकाचे कमी दराचे निविदाधारकांना काम देण्यात यावे असा निर्णय स्थायी समिती घेत आहे.

**ठराव :**

प्रसतवात दर्शविल्याप्रमाणे देवानगरी ते प्रतापनगर स्मशान भुमिपर्यंत खड्डी रस्ता व नाल्यावर पाईप कलवर्हट बांधण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.०९% कमी दराची श्री. सुखबिरसिंग यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते.

तसेच रेल्वेस्टेशन ते भाजीमंडी ते अजिज गुत्तेदार यांच्या घरापर्यंत ४० फुट रुंद विकास योजना रस्त्याचे रुंदीकरण करण्याच्या कामासाठी त्यांची सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४६.५०% कमी दराची निविदा असुन त्यांनी हे काम करण्यास वैद्यकीय कारणामुळे असमर्थतता दर्शविली आहे. तरी त्यांनी सदरचे काम करण्याचे तयारी दर्शविल्यानंतरच त्यांना प्रस्तावात नमुद केलेले कामाचे निविदा स्विकारण्यास मंजुरी देण्यात येते. त्यांनी ४६.५०% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराचे निविदा अंतर्गत काम करण्यास असमर्थतता दर्शविली तर वरील दोन्ही कामे दुसऱ्या क्रमांकाचे कमी दर असलेले निविदाधारकास देण्यास व श्री. सुखबिरसिंग यांना काळया यादीत समाविष्ट करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९६/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, रेल्वेस्टेशन भाजी मंडी ते अजित गुत्तेदार (बन्सीलालनगर) यांच्या घरापर्यंत ४० फुट वि.यो.रस्ता रुंदीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ४,०४,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (१७) सतरा कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त (५) पाच निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुखबिरसिंग | ४६.५०% | कमी |
| २. | श्री. कुलवंतसिंग | ३९.८६% | कमी |
| ३. | श्री. एच.डी. पडुळ | ३६.३७% | कमी |
| ४. | श्री. मो. सलीम | ३५.००% | कमी |
| ५. | श्री. मेराज अली | २७.८७% | कमी |

वरील प्राप्त निविदापैकी श्री. सुखबिरसिंग यांना अं.प. दरापेक्षा ४६.५०% कमी दराने काम मिळाले होते. परंतु त्यांनी पत्र देऊन कळविले की, मी आजारी असल्यामुळे सदरील काम करु शकत नाही, असे लेखी कळविले आहे. याच कामासाठी दुसऱ्या क्रमांकाचे कमी दर असलेले श्री. कुलवंतसिंग यांना विचारले असता श्री. कुलवंतसिंग यांनी त्यांचे निविदापत्रकात नमुद केलेल्या दराने म्हणजे अं.प. दरापेक्षा ३९.८६% कमी दराने सदरील काम करण्याची तयारी दर्शविली आहे.

तरी श्री. कुलवंतसिंग यांच्याकडुन सदरील काम अं.प.दरापेक्षा ३९.८६% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन भाजीमंडी येथे अजित गुत्तेदार यांच्या घरापर्यंत ४० फुट रुंद विकास योजना रस्ता रुंदीकरणाच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४६.५०% कमी दराचे श्री. सुखबिरसिंग यांची निविदा असुन त्यांनी वैद्यकीय कारणास्तव काम करण्यास असमर्थता दर्शविली आहे. तथापी विषय क्रमांक ४९५/२ मधील कामास त्यांनी ३६.०९% कमी दराने करण्याचे तयारी दर्शविलेली दिसते. तरी सदरचे काम त्यांनी ४६.५०% कमी दराने करुन घेण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच त्यांनी हे काम करण्यास त्यांनी असमर्थता दर्शविली तर सदरचे काम व विषय क्र. ४९५/२ मधील काम देखील त्यांना न देता दुसऱ्या क्रमांकाचे कमी दर असलेले निविदाधारकास देण्यास व श्री. सुखबिरसिंग यांना काळया यादीत समाविष्ट करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९७/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, फुलेनगर येथे बहुउद्देशीय हॉल बांधणेकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९६-९७ चे जिल्हा दरसुचीनुसार र.रु. ७,०१,५७५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ८-७-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा. स्थायी समितीने विषय क्र. २ दि. १८-१०-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र. मनपा/लेखा/नि/३६/९९ दि. २०-११-९९ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १४ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ३ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. १७-१२-९९ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सिद्यीकी मो. अजिमोद्यीन | १२.७८६% | कमी दराने |
| २. | इंडियन कंन्स्ट्र. | १०.७८६% | कमी |
| ३. | सपना कंन्स्ट्र. | ५% | कमी दराने |

तुलनात्मदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प. दरापेक्षा १२.७८६% कमी दराची निविदा श्री. सिद्यीकी मो. अजिमोद्यीन यांची प्राप्त झालेली आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २४-१२-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार श्री. सिद्यीकी मो. अजिमोद्यीन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.७८६% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फुलेनगर येथे बहुउद्देशिय हॉल बांधण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.७८६% दराची श्री. सिद्यीकी मोहम्मद अजिमोद्यीन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९८/५ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, चुनाभट्टी येथे साचलेले सांडपाणी व पावसाचे पाणी वाहुन नेण्यासाठी ६०० मी.मी. व ३०० मी मी. व्यासाची आर.सी.सी. पाईपलाईन टाकणे बाबत अं.प. रक्कम रु. २,३४,०००/- ला स्थायी समितीचे मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देवून मागविल्या असता निविदा विक्रीच्या शेवटच्या तारखेपर्यंत एकुण १३ (तेरा) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ५(पाच) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शेख एम. वाय. | ३५.०१% | कमी |
| २. | श्री. बाबुलाल चौडीया | २९.९९% | कमी |
| ३. | श्री. जी. आर. चौधरी | १७.०१% | कमी |
| ४. | श्री. मजहर सिद्यीकी | ११.११% | कमी |
| ५. | श्री. ग्रॅन्ड कंन्स्ट्रक्शन | ५.००% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.०१% कमी दराची निविदा श्री. शेख एम.वाय. यांची आहे.

करिता निविदा स्विकृतीची प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चुनाभट्टी येथील खदानातील साचलेले सांडपाणी व पावसाचे पाणी वाहुन नेण्याकरिता ६०० मी.मी. ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. पाईप लाईन टाकणे बाबत कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.०१% कमी दराची श्री. शेख एम.वाय. यांनी निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९९/६ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्कमिल कॉलनी येथे २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता र.रु. १,७४,००६/- च्या अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार वर्तमापत्रतात जाहिरात देवुन निविदा मागविल्या असता १८ (अठरा) कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ४ (चार) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एल.जी. लघाने | ३५.४४% | कमी |
| २. | श्री. राजु कोलते | २८.२८% | कमी |
| ३. | श्री. सिद्यीकी मो. अजिमोद्यीन | २५.७८६% | कमी |
| ४. | श्री. बी.ए. काल्डा | २०.२५% | कमी |

तुलनात्मकदृष्टया प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री. एल.जी. लघाने यांची असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.४४% कमी दराची आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्कमिल कॉलनी येथे २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.४४% कमी दराची श्री. एल.जी. लघाने यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ५००/१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रेल्वेस्टेशन ते प्रिन्ट्रव्हल रस्त्याच्या मध्यभागी दुभाजक टाकणेच्या कामासाठी सन ९८-९९ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचीनुसार र.रु. ३,९०,३९८/- चे तयार करण्यात आले असुन सदरील खर्च सन ९९-२००० च्या शहर सौदर्यीकरण या लेखाशिर्षातुन करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन ते प्रिन्ट्रव्हल रस्त्याच्या मध्यभागी रस्ता दुभाजक टाकण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेले र.रु. ३,९०,३९८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०१/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, खाराकुऑ, धावणीमोहल्ला, अंगुरीबाग, मछलीखडक येथील रस्त्याचे पुर्नःडांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेले सन ९८-९९ चे सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजत्रक र.रु. १,९०,३०९/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च ९९-२००० या सालकरिता ठेवण्यात आलेल्या पुर्नः डांबरीकरण या लेखाशिर्षाखाली करण्यात येईल.

करिता प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खाराकुऑ, धावणीमोहल्ला, अंगुरीबाग मछलीखडक, येथील रस्त्याच्या पुर्नःडांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार केलेले र.रु. १,९०,३०९/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०२/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हनुमाननगर गारखेडा येथील खड्डी रस्ता तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,९२,५४८/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम एकुण १८ (अठरा) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन (३) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. बबन हिवाळे | २६.६७% | कमी दराने |
| २. | मे. फइव्हस्टार कं. | १७.५१% | --//-- |
| ३. | श्री. नंदकुमार घोडेले | १२.१०% | --//-- |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री. बबन हिवाळे यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.६७% कमी दराचे आहेत.

तरी श्री. बबन हिवाळे यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.६७% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हनुमाननगर गारखेडा येथे खड्डी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.६७% कमी दराची श्री. बबन हिवाळे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०३/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कैलासनगर येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करण्याच्या कामासाठी दि. ३-१२-९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ३९८/४० अन्वये अंदाजपत्रक र.रु. ९,९९,५००/- ला मान्यता मिळालेली आहे. सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/४१/९९ दि. १०-१२-९९ चे निविदा सुचनेव्दारे एकुण बारा (१२) निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण चार ४ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्यांच्या तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. के. बी. पाथ्रीकर | -- | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे. जग्गी कंन्स्ट्र. | ११% | जास्त दराने |
| ३. | श्री. डी. अजितसिंग | ११% | जास्त दराने |
| ४. | श्री. आदिनाथ कंन्स्ट्र. | १३% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया व अंदाजपत्रकीय दराने श्री. के.बी. पाथ्रीकर यांची निविदा असुन प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैलासनगर येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. के.बी. पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०४/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, लोटाकारंजा भागातील रस्त्याचे पुर्न:डाबरीकरण करण्याच्या कामासाठी दि. १०-१२-९९ च्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र. ४१८/१ अन्वये अंदाजपत्रक र.रु. ३,७७,०६०/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/४५/९९ दि. १४-१२-९९ च्या निविदा सुचनेव्दारे प्रगट निविदा मागविल्या असता विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण ३ (तीन) निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस २ (दोन) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | -- | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | १०% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लोटांकारजा भागातील रस्त्याचे पुर्नःडांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापत्रकापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराची मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०५/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, यशोधराकॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि. ६-११-९९ च्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र. ३३/१५ अन्वये अंदाजपत्रक र.रु. ३,४५,०००/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/३६/९९ दि. २०-११-९९ निविदा सुचनेव्दारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण ५ (पाच) निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकाणेच्या नियोजित तारखेस ४ (चार) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | -- | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | ५% | जास्त दराने |
| ३. | के.बी. पाथ्रीकर | ६% | --//-- |
| ४. | श्री. डी. अजितसिंग | ७.५०% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराने मे. मॉस्कॉट कं. यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे यशोधरा कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापत्रकापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरांची मे. मॉस्कॉट कं. यांची निविदा स्विकारणसे सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०६/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सुराणानगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी दि. ६-११-९९ च्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र. ३३१/१२ अन्वये अंदाजपत्रक ३,५३,८०१/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/३६/९९ दि. २०-११-९९ चे निविदा सुचनेव्दारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण सहा (६) निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित

तारखेस (३) तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | -- | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | ५% | जास्त दराने |
| ३. | श्री. डी. अजितसिंग | ७.५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराने मे. मॉस्कॉट कं. यांची निविदा असुन प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुराणानगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणाच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची मे. मास्कॉट कं. याची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०७/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पडेगांव कत्तलखाना रस्ता भावसिंगपुरा ते कत्तलखान्यापर्यंतच्या रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि. ३-१२-९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ४०१/४२ अन्वये अंदाजपत्रक ९,९८,७५२/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/४१/९९ दि. १०-१२-९९ चे निविदा सुचनेव्दारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण ११ (अकरा) निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण २ (दोन) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | ०५% | जास्त दराने |
| २. | श्री. मो.एम.ए.सिद्यीकी | १४% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०५% जास्त दराने मे. मॉस्कॉट कं. याची निविदा आहे. ठेकेदाराने निविदेत अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०५% जास्त दर दिल्यामुळे त्यांना दराच्या वाटाघाटीसाठी बोलावले असता त्यांनी ०५% दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यासाठी संमती दिलेली आहे.

करिता तुलनात्मकदृष्टया मे. मास्कॉट कं. याची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पडेगांव कत्तलखाना रस्ता व भावसिंगपुरा ते कत्तलखान्यापर्यंतच्या रस्त्याचे पुर्नःडांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची मे. मास्कॉट कं. यांची निविदा आहे. त्याच्या सोबत झालेल्या वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०५% जास्त दराऐवजी त्यांनी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास संमती दिलेली आहे. मे. मॉस्कॉट कं. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०८/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, अहिंसानगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि. ६-११-९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ३३३/१४ अन्वये अंदाजपत्रक र.रु. ४,९४,२०१/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/३६/९९ दि. २०-११-९९ व्दारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण ५ (पाच) निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या तारखेस एकुण ४(चार) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मकदृष्टया तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. डी. अजितसिंग | -- | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | ५% | जास्त दराने |
| ३. | के.बी. पाथ्रीकर | ५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दराने श्री. डी. अजितसिंग यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अहिंसानगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची श्री. डी.अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०९/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हर्सुल ते कोकणवाडी पर्यंत मजबुतीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि. ३-१२-९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ३६७/९ अन्वये अंदाजपत्रक र.रु. ७,०५,०००/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/४१/९९ दि. १०-१२-९९ चे निविदा सुचनेव्दारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण बारा (१२) निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण ४ (चार) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. डी. अजितसिंग | -- | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | ७% | जास्त दराने |
| ३. | के.बी. पाथ्रीकर | ११% | --//-- |
| ४. | मे. जग्गी कंन्स्ट्र. | ११% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराने श्री. डी.अजितसिंग यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल ते कोकणवाडी पर्यंत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची श्री. डी. अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१०/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, खासगेट ते जिनिंग मिलपर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी दि. ३-१२-९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ४०३/४५ अन्वये अंदाजपत्रक र.रु. ८,५०,२१९/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/४१/९९ दि. १०-१२-९९ चे निविदा प्रगट मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण ११ (अकरा) निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण चार (४) निविदा दर भरुन प्राप्त झाल्यापासुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अदिनाथ कंन्स्ट्र. | ४.५% | जास्त दराने |
| २. | श्री. एम.ए. सिद्यीकी | १०% | --//-- |
| ३. | श्री. डी. अजितसिंग | ११% | --//-- |
| ४. | श्री. नंदकुमार घोडेले | ११% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५% जास्त दराने मे. आदिनाथ कं. यांची निविदा आहे. परंतु ठेकेदाराने निविदेत दर जास्त दिल्यामुळे त्यांना दराच्या वाटाघाटीसाठी बोलविले असता जास्त ठेकेदाराने ४.५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यासाठी संम्मतीपत्र दिलेले आहे.

करिता तुलनात्मकदृष्टया मे. आदिनाथ कं. यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खासगेट ते जिनिंग मिल रस्त्यापर्यंत डांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५% जास्त दराची मे. आदिनाथ कं. याची निविदा आहे.

त्यांच्यासह झालेल्या वाटाघाटीप्रमाणे ४.५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास त्यांनी संमती दिली असल्याने त्यांची अंदाजपत्रकीय निविदा सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५११/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दिलरस कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी दि. १०-१२-९९ च्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र. ४२०/३ अन्वये अंदाजपत्रक र.रु. ६,१८,२५०/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/४५/९९ दि. १४-१२-९९ च्या निविदा सुचनेव्दारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण ९ (नऊ) निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण ३ (तीन) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या आहेत. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अदिनाथ कंन्स्ट्र. | -- | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. डी. अजितसिंग | ११% | जास्त दराने |
| ३. | मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | १५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराने श्री. आदिनाथ कंन्स्ट्र. यांची निविदा असुन प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिलरस कॉलनी रस्त्याचे पुर्नःडांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराची श्री. आदिनाथ कंन्स्ट्र. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१२/१३ :**

जायकवाडी व फारोळा पॉवर पॉडटर वाढविण्यासाठी एच.टी. ११० के.व्ही. ए.आर.कॅपसिटर चा पुरवठा करण्यासाठीचा निविदेला मा. आयुक्त यांनी अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ५% दर कमी करुन मंजुरी देण्यांत आली आहे. यांचे तुलनात्मक विवरण खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. रेणुका इलेक्ट्रीकल औरंगाबाद | ३०% जास्त | क्र. ३१९५०६=०० |
| २. | मे. अंबका इलेक्ट्रीकल औरंगाबाद | ५%जास्त | क्र. ३२५७१०=०० |
| ३. | मे. लुना इलेक्ट्रीकल औरंगाबाद | -- | क्र. ३१०२००=०० |

अंदाजपत्रकीय र.रुपये ३,१०,२००/- एवढी आहे यावरुन सर्वात कमी दर हे मे. लुना इलेक्ट्रीकल औरंगाबाद यांचे असुन ते रु. ३१,०२००/- एवढी आहे. मे. लुना इलेक्ट्रीकल

यांच्याकडुन कॅपसिटर घेण्याबाबत मा. आयुक्तांनी ५% दर कमी करुन दि. ७-१२-९९ अन्वये रु. २,९४,६९०/- एवढया रक्कमेला मंजुरी दिलेली आहे.

तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जायकवाडी फारोळा येथील ११० के.व्ही.ए.आर.कॅपासिटरचा पुरवठा करण्यासाठी प्राप्त निविदा पैकी सर्वात कमी मे. लुना इलेक्ट्रीकल औरंगाबाद यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा असुन त्यांच्याशी झालेल्या वाटाघाटीनुसार ५% दर कमी करुन र.रु. २,९४,६९०/- एवढया रक्कमेत पुरवठा करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१३/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जाफरगेट येथे ए.पी.एम.जी. कार्यालयासमोर संपादित केलेल्या जागेवर व्यापारी संकुल व आरोग्य केंद्र बांधणे व विभाग क्र. ८ साठी कार्यालयीन इमारत बांधणे करिता सा.बां. खात्याचे सन ९८-९९ चे जिल्हा दरसुचीनुसार र.रु. ४८,९०,२९९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. त्यास मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र. ८८/२ दि. १३-१२-९९ च्या इतिवृत्तान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/४५/९९ दि. १४-१२-९९ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण २३ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ३ (तीन) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. २७-१२-९९ गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एस.ए. हुसैनी | ५.१०% | जास्त दराने |
| २. | एलोरा कंन्स्ट्रक्शन | १२% | --//-- |
| ३. | स. सुजात हाश्मी | १५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अ. दरापेक्षा ५.१०% जास्त दराची निविदा एस.ए. हुसैनि यांची प्राप्त झालेली आहे. परंतु मा. मुख्य लेखाधिकारी यांचे अभिप्रायानुसार संबंधित गुत्तेदाराकडुन दर विश्लेषण मागवून सादर केले असता मा. आयुक्त यांनी सदरील निविदा ५.१०% जास्त ऐवजी अं.प. दरापेक्षा ३% जास्त दराने मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार एस.ए.हुसैनि यांची अ.प.पेक्षा ५.१०% जास्त दराऐवजी अं.प.दरापेक्षा ३% जास्त दराची निविदा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाफरगेट ए.पी.एम.सी. कार्यालयासमोर संपादित केलेल्या जागेवर व्यापारी संकुल व आरोग्य केंद्र बांधणे बाबत व वि.क्र. ८ साठी कार्यालयीन इमारत बांधणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.१०% जास्त दराची श्री. एस.ए.हुसैनी यांची निविदा आहे. त्यांच्याशी झालेल्या वाटाघाटीप्रमाणे ५.१०% जास्त ऐवजी अं.प. दरापेक्षा ३% जास्त दराने त्यांनी काम

करण्यास मान्य केले असल्याने त्यांची अं.प. दरापेक्षा ३% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१४/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गारखेडा सुतगिरणी चौक ते शिवाजीनगर या मुख्य रस्त्यावरील पोल शिफ्ट करुन विद्युतीकरणाचे काम करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ६,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण चौदा (१४) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत ३ तीन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अदित्य इलेक्ट्रीकल | ५.००% | जास्त दराने |
| २. | मे. लुना इलेक्ट्रीकल | -- | अंदाजपत्रकीय दराने |
| ३. | मे. सिटीजन इलेक्ट्रीकल | २.०५% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. लुना इले. यांचे निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरा ऐवढे आहेत.

तरी मे. लुना इले. यांच्याकडुन सदरील अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा सुतगिरणी चौक ते शिवाजीनगर या मुख्य रस्त्यावरील पोल शिफ्ट करुन विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची मे. लुना इलेक्ट्रीकल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१५/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, म्हाडाकॉलनी महाविर चौक रस्त्याचे पुर्नःडांबरीकरणर करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,६१,६४८/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ९ (नऊ) कोरी निविदापत्रके विकल्या गेली निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण २ (दोन) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | ५% | जास्त दराने |
| २. | श्री. मो. अहमद सिद्दीकी | ८% | --//-- |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे मास्कॉट कं. याची निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त आहेत. ठेकेदाराने दिलेले जास्त दर वाटत असल्याने त्यांना दराच्या वाटाघाटीस्तव बोलावले असता त्यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने काम करण्याची तयारी दर्शविली आहे.

तरी मे. मास्कॉट कं. यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबतच्या प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे म्हाडा कॉलनी महाविर चौक जवळील रस्त्याचे पुर्नः डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची मे. मास्कॉट कं. यांची निविदा असुन त्याच्यासह झालेल्या वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दरा ऐवजी अंदाजपत्रकीय दराने सदर काम करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१६/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे. गारखेडा येथील सर्व्हे न. ५४ काबरानगर (अल्प उत्पन्न गट बिडा कामगार हाऊसिंग सो.) येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ९,५९,३५७/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १२ (बारा) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी दोन (२) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | ५% | जास्त दराने |
| २. | मे. व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन | -- | दर दिलेले नाही. |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. मास्कॉट कं. यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त आहेत. ठेकेदाराने दिलेले दर जास्त वाटत असल्याने त्यांना वाटाघाटीस्तव बोलविले असता सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्याची तयारी दर्शविली आहे. तरी मे. मास्कॉट कं. यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा स.नं. ५४ काबरानगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची मे. मास्कॉट कं. याची निविदा असुन

त्यांच्यासह झालेल्या वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने सदर काम करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१७/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की पंचशिलनगर, विष्णुनगर, अरिहंतनगर रस्त्याचे पुर्नःडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ९,९९,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ११ अकरा कोरी निविदापत्रके विकल्या गेली निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखपर्यंत यापैकी चार (४) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | ४.५०% | जास्त दराने |
| २. | मे. अहमद सिद्यीकी | १०.००% | --//-- |
| ३. | मे. डी. अजितसिंग | ११.००% | --//-- |
| ४. | श्री. नंदकुमार घोडेले | १७.५५% | --//-- |

वरील प्राप्त निविदापैकी मे. आदिनाथ कं. यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५०% जास्त आहेत.

ठेकेदाराने दिलेले दर जास्त वाटत असल्याने त्यांना दराच्या वाटाघाटीस्तव बोलविले असता त्यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५०% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्याची तयारी दर्शविली आहे.

तरी मे. आदिनाथ कं. यांच्या कडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पंचशिलालनगर विष्णुनगर, अरिहंतनगर भागातील अंतर्गत रस्त्याचे पुर्नःडांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५०% जास्त दराची मे. आदिनाथ कं. याची निविदा असुन त्यांच्यासह झालेल्या वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५०% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने सदर काम करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१८/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, खोकडपुरा कामागार सोसा. सब्जीमंडी येथील रस्त्याचे पुर्नःडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ७,१६,०१७/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ११ (अकरा) कोरी निविदपत्रके विकल्या गेली निविदापत्रके

स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण चार ४ निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. डी. अजितसिंग | | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | ७% | जास्त दराने |
| ३. | मे. जग्गी कंन्स्ट्रक्शन | ११% | --//-- |
| ४. | श्री. के.बी. पाथ्रीकर | ११% | --//-- |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री. डी. अजितसिंग यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्कमदृष्टया सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराचे आहेत.

तरी श्री.डी. अजितसिंग यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खोकडपुरा कामगार सोसा. सब्जीमंडी येथील रस्त्याचे पुर्नःडांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापत्रकापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. डी. अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१९/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कोकणवाडी चौक ते देवगिरी कॉलेज वस्तीगृहापर्यंत रस्त्यास डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,८३,९०४/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता. निविदापत्रके विक्रीच्या अंतिमतारखपर्यंत एकुण नऊ कोरी निविदापत्रके विकल्या गेली निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत चार (४) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. के.बी. पाथ्रीकर | -- | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | ५% | जास्त दराने |
| ३. | मे. डी. अजितसिंग | ११% | --//-- |
| ४. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | १२% | --//-- |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री. के.बी. पाथ्रीकर यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने आहेत.

तरी श्री. के.बी. पाथ्रीकर यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोकणवाडी चौक ते देवगिरी कॉलेज वस्तीगृहापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. के.बी. पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळी सभागृहात सादर केलेले विषय*

**विषय क्र. ५२०/१ :**

कार्यकारी अभियंता पा.पु.व.ज.नि. यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संजयनगर बायजीपुरा प्रभाग क्र. ३० मध्ये १००,२५०,मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी र.रु. ३,५२,८१०/- ऐवढयाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. २९२/३४ दि. १८-१०-९९ क्र. मनपा/लेखा/नि/३२/९९/बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण आठ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण ३ (तीन) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एस.कंन्स्ट्रक्शन | २८% | कमी दराने |
| २. | ए.एच. आग्रे | १३% | कमी दराने |
| ३. | मन्नानखॉन | ८% | कमी दराने |

वरीलप्रमाणे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा एस.कंन्स्ट्रक्शन यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८% कमी असा दर दिलेला आहे. करिता वरीप्रमाणे एस.कं. याची २८% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**संवाद**

**श्री. कोकाटे काशिनाथ :** बायजीपुरा येथील भागात जलकुंभ होण्याबाबतचे ३ ते ३.५० लाखाचे अंदाजपत्रक मंजुर झालेले होते. भुमीपुजन कधी होणार आहे. सध्या तेथील कामाची परिस्थिती काय आहे. खुलासा करावा.

**श्री. देशमुख व्ही.व्ही. :** सदरील भाग हा जुने असुन याठिकाणी जलकुंभ व्हावे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** जलकुंभाचे काम चालु आहे.

**मा. सभापती :** स. सदस्य यांनी केलेल्या सुचनेनुसार कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर बायजीपुरा प्रभाग क्र. ३० मध्ये १००,२००,२५० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८% कमी दराची एस.कंन्स्ट्रक्शन यांची निविदा सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२१/२ :**

कार्यकारी अभियंता पा.पु.व.ज.नि. यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जलशुध्दीकरण केंद्र हर्सुल येथे पाणी शुध्दीकरणासाठी लागणारी ब्लिचिंग पावडर खरेदी करावयाची आहे. त्यासाठी र. ९,७९,५००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. १९६/७ दि. ६-७-९९ जी की दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवुन "डी फार्मवर" निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन (३) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेपर्यंत एकुण (३) सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. फोनेक्स केमीकल्स् | ४१९.०० | प्रतिबॅग (२५ किलोची) |
| २. | मे. एस.व्ही. मुरुमकर | ४५१.०० | --//-- |
| ३. | मे. एस.बी. सर्व्हीसेस | ४२७.०० | --//-- |

वरीलप्रमाणे दराच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा मे. फोनेक्स केमिकल यांनी दिलेला आहे. म्हणजेच ४१९.०० प्रतिबॅग असा दर दिलेला आहे. परंतु सदर दर हा जास्तीचा असल्यामुळे अंदाजपत्रकात दिलेला दर रु. ३९१.९० हया दरास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी ब्लिचिंग पावडर खरेदीसाठी ३९१.९० प्रति बॅग या दराने मे. फोनेक्स केमिकल्स् यांची निविदा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद**

**सौ. लता दलाल :** ब्लिचिंग पावडर ऐवजी लिकवीड वापरता येईल का? सन ९३ पासुन ते ९६ ९७ पर्यंत वापरण्यात आले आहे. ब्लिचिंग पावडर आय.एस.आय. मार्क आहे का व त्यामध्ये क्लोरिन चे किती टक्के प्रमाण आहे.

**कार्यकारी अभियंता :** आतापर्यंत आपण ब्लिचिंग पावडर व क्लोरिन गॅसच वापरलेले आहेत.

**मा. सभापती :** निविदा काढण्यात आली ग्रासिक मोदी, उत्पादन बंद आहे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** ३ निविदा प्राप्त झाल्या आय.एस.आय. मार्क आहे क्लोरिनचे प्रमाण ३३% आहे. त्याशिवाय घेत नाही आपण केव्हाही तपासणी केली तर हे प्रमाण मिळेल.

**मा. सभापती :** मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलशुध्दीकरण केंद्र हर्सुल येथे पाणी शुध्दीकरणासाठी लागणारे ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यासाठी डी. फार्मवर मागविण्यात आलेल्या निविदानुसार प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच रु. ३९१.९० प्रतिबॅग या दराची मे. फोनेक्स केमिकल्स् यांची निविदा सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२२/३ :**

कार्यकारी अभियंता पा.पु.व.ज.नि. यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, लक्कडमंडी मोंढा येथे १५० मी.मी. व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकावयाची आहे त्या बाबतचे अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. २८८/३० अन्वये मान्यता घेतली आहे. कार्यलयाची निविदा सुचना क्र. ३२/९९ जी की दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात देऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १२ बारा कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत २ (दोन) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सफुरा इंटरप्रायजेस | १.५५% | कमी दराने |
| २. | सुरेश बी. साधवानी | ७.५५% | जास्त दराने |

वरीलप्रमाणे तुलनात्मदृष्टया कमी दर हा सफुरा इंटरप्रायजेस यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.५५% कमी असा दर दिलेला आहे.

करिता सफुरा इंटरप्रायजेस यांची कमी दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लक्कडमंडी मोंढा येथे १५० मी.मी. व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकण्याची कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.५५% कमी दराची सफुरा इंटरप्रायजेस यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२३/४ :**

कार्यकारी अभियंता पा.पु.व.ज.नि. यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जलशुध्दीकरण केंद्र हर्सुल येथे पाणी शुध्दीकरणासाठी लागणारी तुरटी खरेदी करावयाची आहे. त्यासाठी र.रु. ३,३६,५९३/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. १९४/५ दि. ६-७-९९ अन्वये मान्यता देण्यांत आलेली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्र. ३४/९९ जी की दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देऊन "डी फार्मवर" निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन (२) निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण दोन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. फोनेक्स केमिकल्स् | ३८९७.०० | प्र.मे. टन |
| २. | मे. एस.व्ही. मुरुपकर | ४२२०.०० | प्र.मे. टन |

वरीलप्रमाणेच्या दराच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा मे. फोनेक्स केमिकल्स यांनी दिलेला आहे. म्हणजेच ३८९०.०० प्र.मे.टन असा दर दिलेला आहे. परंतु सदरचा दर हा जास्तीचा असल्यामुळे अंदाजपत्रकात दिलेला दर रु. ३३६६.०० प्र.मे. टन या दराने मे. फोनेक्स केमिकल्स याची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलशुध्दीकरण केंद्र हर्सुल येथे पाणी शुध्दीकरणासाठी लागणारी तुरटी खरेदी करण्याकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी रु. ३८९०.०० प्र.मे. टन या दराची मे. फोनेक्स केमिकल यांची निविदा आहे. परंतु सदरचा दर जास्तीचा असल्यामुळे अंदाजपत्रकात दिलेला दर रु. ३३६६.०० प्र.मे. टन तरी मे. फोनेक्स केमिकल यांना ३३६६.०० प्र.मे.टन यादराने पुरवठा करण्यास सर्वानुमतके स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२४/५ :**

उप. आयुक्त (म.) यांच्याकडुन स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वित्तीय वर्ष सन २००० ते २००१ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तावरील कराचे दर हे मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ व कलम ९९ अन्वये महापालिकेने दि. २०-२-२००० रोजी किंवा त्यापुर्वी निश्चित करणे व मंजुर करणे आवश्यक आहे.

त्याप्रमाणे सन २०००-२००१ या वित्तीय वर्षासाठी खालील प्रमाणे दर प्रस्तावित आहेत. खालील दर हे योग्य करमुल्यांवर आकारले जातील.

**महानगरपालिकेचे दर**

| अ. क्र. | कराचे नांव | सन ९९-२००० चे दर | दर | सन २०००-२००१ चे प्रस्तावित दर. | |
|---|---|---|---|---|---|
| | | कर योग्य मुल्य | दर | कर योग्य मुल्य | दर. |
| १) | सामान्य कर | कोणत्याही कर योग्य | | | |
| | | १ ते १००० | २३% | ११ ते १००० | २३% |
| | | १००१ ते १०,००० | २४% | १००१ ते १०००० | २४% |
| | | १०००१ ते २०००० | २५% | १०००१ ते २०००० | २५% |
| | | २०००१ ते ५०,००० | २७% | २०००१ ते ५०००० | ३०% |
| | | ५०००१ ते १००००० | २८% | ५०००१ ते १००००० | ३३% |
| | | १००००० ते पुढे | २९% | १००००० ते पुढे | ३५% |
| २) | साफसफाई कर काणत्याही कर योग्य मुल्या वर | | | | |
| अ) | निवासी वापर | --//-- | ३% | --//-- | ३% |
| ब) | निवासेत्तर वापर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | ६% | --//-- | ८% |
| ३. | वृक्ष कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ४. | अग्निशमन कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ५. | म.न.पा. शिक्षण कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ६. | पथ कर | --//-- | १% | --//-- | २% |
| ७. | जलनि:सारण कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ८. | जललाथ कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ९. | मोकळया जागेच्या कर सामान्य कराच्या दराने आकारण्यात येतील. | | | | |

ब) तसेच राज्य शिक्षण कर रोजगार हमी उपकार, व मोठया निवासी क्षेत्रातील कर शासन नियमाप्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मुल्यावर आकारण्यात येतील.

**संवाद**

**मा. सभापती :** मालमत्ता कर वाढ संदर्भातील विषय मागील बैठकीत विषय क्र. १० वर नमुद केलेला होता या बैठकीत सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल असे ठरले होते.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** मालमत्ता कर वाढ करणे योग्य होणार नाही. मागीलप्रमाणे पुर्ण वसुली होते आहे काय? याचा खुलासा अगोदर व्हावा. माझ्यामते मागील वसुली ३०% पर्यंत आहे. त्याचे कारण असे की संबंधित विभागात कायमस्वरुपी सेवेत कुणीही अधिकारी नसल्यामुळे कुणावरही फिक्स जबाबदारी नाही. गेल्या ७-८ वर्षात शहरात बऱ्याच ठिकाणी ३-३,४-४ मजली इमारती झालेल्या आहेत. या सर्वबिल्डींगचा मागील वर्षापर्यंतचा कर वसुल झालेला आहे काय दुसरे एक कारण असे की या विभागात कर्मचाऱ्याच्या बदल्या करते वेळी नगररचना विभागातील कर्मचारी देण्यात येऊ नये. नेहमी याच विभागातील कर्मचारी देण्यात येतात. त्यामुळे कर वसुली कमी होते. असे माझे मत आहे. प्रशासनाने याची दखल घ्यावी.

**सौ. लता दलाल :** मालमत्ता कर वसुल न होण्याबाबत काही त्रुटया आढळुन येतात. जी करवाढ प्रस्ताव मांडला प्रस्तावात दर्शविलेली मागील वर्षीचे दर आहेत. ते जशाच्या तसे ठेवण्यात यावे. कुठली करवाढ करण्यात येऊ नये कर वसुली बाबत अनेक प्रकरणे घडली. अनेक न्यायालयात गेलेले आहेत. योग्य पध्दतीने कर वसुली केली तर चांगल्याप्रकारे कर वसुली होऊ शकते. जो कर वाढ करण्याबाबत प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे. तो अमान्य आहे.

**श्री. विकास जैन :** वसुली योग्य पध्दतीने जासतीत जास्त कशी कमेटी तयार करुन प्रशासनाला सुचना दयाव्यात. झोनवाईज कमेटी तयार करुन नागरिकांशी सुसंवाद केला तर वसुली जास्त होऊ शकते. अनेक लोक न्यायालयात गेलेले आहेत. लवकर निर्णय लागत नाही. त्यामुळे वसुली ची कोटयावधी रक्कम नागरिकांकडे बाकी आहे. लोक पैसे भरण्यास तयार असतात विभागाचे अधिकारी नेहमीच बदलत असतात. त्याचाही परिणाम होऊ शकतो. वसुली जास्तीत जास्त कशा पध्दतीने येईल याबाबत ठोस धोरण घ्यावे. किंवा ठरावावे.

**मा. सभापती :** या विभागात सध्या उपअभियंता काम करतात. ते हेरिंग होऊ शकत नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** करमुल्य निर्धारण अधिकारी यांना हेरिंग घेता येत नसेल तर महसुल विभागाचे उप. आयुक्त यांनी आढवडयातुन एक वेळेस झोनवाईज बैठक घेऊन कार्यवाही केली तर वसुलीत वाढ होऊ शकते.

**मा. सभापती :** सभागृहाच्या भावना लक्षात घेता या वर्षासाठी कुठलीही मालमत्ता करवाढ न करता जशाच्या तशा प्रस्ताव मंजुर करुन सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी शिफारस करण्यात येतो. स. सदस्यांनी सुचविल्यानुसार आतापर्यंत मालमत्ता वसुली २७% च झालेली आहे. तसेच पाणीपट्टीची वसुली २८% झाली वसुली कमी का होते. यासाठी प्रशासनाला सभागृहाच्या संमतीने अशा सुचना देऊ इच्छितो की, प्रशासनाने जास्तीत जास्त वसुली वाढविण्याकरिता वेगळी यंत्रणा व स्वतंत्र अधिकार त्या-त्या विभागातील संबंधित अधिकारी यांना दयावा.

**सौ. लता दलाल :** बरेच नागरिक कर भरण्यास येतात. परंतु त्यांच्याकडे कमी रक्कम असते म्हणुन त्यांना झोन कार्यालयातुन त्यांना परत केले जाते. यामुळेही वसुली कमी होऊ शकते. यासाठी भरण्याबाबत नागरिकांना वर्षातील ४-५ हप्ते प्रमाणे पैसे भरण्यास सवलत दिल्यास योग्य ठरेल.

**श्री. विकास जैन :** महापालिका मार्फत वृत्तपत्रात जाहिर नोटिस देऊन झोनवाईज नागरिकांबरोबर चर्चा केली तर वसुली वाढेल व सदस्यही नाराज राहणार नाही.

**श्री. स.अ. इकबालोद्दीन :** नागरिकांवर जास्त दवाब ठाकु नये योग्य पध्दतीने वसुली करण्याचा प्रयत्न करावा.

**मा. सभापती :** मालमत्ता कर वाढ बाबतचा प्रस्तावात जसा प्रस्ताव आहेत तसाच सर्वसाधारण सभेस मंजुरीसाठी शिफारस करण्यास पाठवित आहे कुठल्याही प्रकारच्या या वर्षाचा कर वाढ स्थायी समितीने केलेला नाही. प्रशानाने जास्तीत जास्त कर वसुली वाढविण्यासाठी काय उपाययोजना करता येईल त्या कराव्यात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०००-२००१ या वर्षासाठी मालमत्ता कर आकारणीबाबत प्रशासनातर्फे सामान्य कर व उपकरात वाढ करण्याचा प्रस्ताव सभागृहासमोर दाखल केला असला तरी ही सभागृह सन २०००-२००१ या वर्षासाठी मालमत्ता करात कोणत्याही प्रकारची वाढ न सुचविता सन १९९९-२००० यावर्षातील दराने मालमत्ता कराची आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यांत येते.

**मा. सभापती :** आजच्या बैठकीत श्री. अफसर सिद्यीकी, उपअभियंता, श्री. बी.के. जैस्वाल, सब ओव्हरसिअर, श्री. ए.बी. देशमुख , सुनिल जोशी, श्री.डी.डी. कालेले, सौ. जनाबाई वाहुळे, मु.अ. प्रा.शाळा खोकडपुरा मनपा औरंगाबाद व श्री. ए.आर.गिरी क. लिपीक यांचे अपिल आलेले असुन सर्व अपिलांना मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ५२५/६ :**

श्री. अफसर सिद्यीकी उपअभियंता यांचे आदेश क्र. मनपा/आ/स्वीस/२०००/०२ दि. १ जाने. २००० वर्षासाठी गोठवण्यात आलेल्या वेतनवाढी अपिलावर विचार करुन निर्णय घेणे.

**ठराव :**

उपअभियंता श्री. अफसर सिद्यीकी यांनी प्रस्तावित अपिल विहित मुदतीच्या आत स्थायी समितीकडे सादर केलेले असुन कार्यालयीन आदेश क्र. मनपा/आ/स्वीस/कादनो/९८/६५२ दि. ४-१२-९८ चा खुलासा विचारात घेता कार्यालयीन आदेश क्र. मनपा/आ/स्वीस/२०००/०२ दिनांक १ जानेवारी २००० अन्वये अपिलकर्ता यांची एक वर्षासाठी गोठविण्यात आलेली वार्षिक वेतनवाढ शिथिल करण्यास हे सभागृह सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देत आहे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२६/७ :**

श्री. बी.के. जैस्वाल, बांधकाम निरिक्षक (सब ओव्हरसिअर) यांचे कार्यालयीन आदेश क्र. मनपा/अस्था-१/९९/२७७६ दिनांक ३०-६-९६ च्या आदेशाविरुध्द सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अपिलकर्ता श्री. बी.के. जैस्वाल, बांधकाम निरिक्षक यांनी अपिलासाठी दिले कन्डोनेशन बाबत केलेली विनंती मान्य करुन अपिलकर्ता यांना न्यायालयातर्फे निर्दोष सोडलेले असल्यामुळे कार्यालयीन आदेश क्र. मनपा/अस्था-१/९९-२७७६ दि. ३०-६-९६ अन्वये अपिलकर्ता यांची देय वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्याचे आदेश शिथील करण्यास हे सभागृह सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देत आहे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२७/८ :**

श्री. ए.बी. देशमुख, श्री. सुनिल जोशी, श्री. डी.डी. कालेले शाखा अभियंता, मनपा यांना आदेश क्र. मनपा/मआ/स्वीस/९९-५०१ दि. २६-८-९९ अन्वये करण्यात आलेल्या रु. १००/- दंड माफ करणे बाबतचे अपिलावर विचारनिनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

**ठराव :**

श्री. ए.बी. देशमुख श्री. सुनिल जोशी, श्री. डी.डी. कालेले, सर्व शाखा अभियंता, मनपा औरंगाबाद यांना विना परवानगी गैरहजर राहिल्याने १००/- रुपये दंड करण्यात आलेला आहे. परंतु त्यांनी अपील करुन सदरील दंड माफ करण्याबाबत केलेली विनंती मान्य करण्यात येते. उपरोक्त तीनही कर्मचाऱ्यांना कार्यालयातर्फे लेखी समज देण्यात यावी व त्यांना केलेला दंड माफ करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२८/९ :**

सौ. जनाबाई उत्तमराव वाहुळे, मु.अ.प्रा.शा. खोकडपुरा मनपा यांची वेतनवाढ पुर्ववत चालु करण्याबाबतच्या अपिलावर विचार निनिमय करुन निर्णय देणे बाबत.

**ठराव :**

सौ. जनाबाई उत्तमराव वाहुळे यांनी केलेले अपिलास मान्यता देण्यात येते. त्यांनी केलेली सेवा लक्षात घेता व त्याचा सेवा निवृत्तीचा कालवधी विचारात घेऊन त्यांची रद्द करण्यात आलेली वेतनवाढ पुन्हा चालु करण्यास तसेच थकीत बाकी देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२९/१० :**

श्री. ए.आर.गिरी, कनिष्ठ लिपीक, मनपा यांचे निलंबन काळ हा "सेवाकाळ" म्हणुन गृहीत धरण्याबाबतचे अपिलावर विचार विनियम करुन निर्णय घेणे बाबत.

**ठराव :**

श्री. अशोक रामराव गिरी, क. लिपीक यांना न्यायालयाने दोषमुक्त केल्याने त्यांनी केलेले अपिल मंजुर करण्यात येऊन त्यांचा निलंबन काळ हा सेवाकाळ म्हणुन समजण्यात यावा. सदरील ठरावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३०/११ :**

कार्यकारी अभियंता पा.पु.व.ज.नि. यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. तक्षशिलानगर येथे १५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन काढुन २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता अंदाजपत्रक रक्कम रु. १,४१,७००/-चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याच्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन स्थायी समितीने विषय क्र. ३२१/२ दि. ३-१२-९९ रोजी सदरील कामास मंजुरी दिलेली आहे. सदरील कामाकरिता बी-१ नमुन्यात कोरी निविदापत्रके जा.क्र.मनपा/लेखा/नि/३६/९९ दि. २०-११-९९ अन्वये वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्दीस देऊन निविदा मागविल्या असता एकुण सोळा (१६) निविदा विक्री झाल्या व त्यापैकी सात (७) निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मधु राठोड | ३५% | कमी |
| २. | श्री. ए.एच. आंग्रे | ३३.०७% | कमी |
| ३. | श्री. असलम पटेल | ३१.९७% | कमी |
| ४. | श्री. बी.एम. कन्स्ट्रक्शन | ३०.३% | कमी |
| ५. | मे. संधु कंन्स्ट्रक्शन | २९.९% | कमी |
| ६. | श्री. राजु कोलते | २८.२८% | कमी |
| ७. | श्री. सय्यद नासेर | २४.८% | कमी |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प. दरापेक्षा ३५% कमी दराची श्री. मधु राठोड यांची निविदा आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे तक्षशिलानगर येथे १५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन काढुन २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५% कमी दराची श्री. मधु राठोड यांची निविदा सर्वानुमते स्विकारणेस मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३१/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, भवानीनगर दत्तनगर अंतर्गत रस्त्याचे पुर्नःडांबरीकरण करण्याच्या कामासाठी दिनांक ६-११-९९ च्या स्थायी समितीच्या सभेमधे विषय क्र. ३४४/२५ अन्वये अंदाजपत्रक र.रु. ५,७६,५००/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/३६/९९ दि. २०-११-९९ चे निविदा सुचनेव्दारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या तारखेस

एकुण पाच (५) निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण चार (४) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. के.बी. पाथ्रीकर | -- | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | ६% | जास्त दराने |
| ३. | श्री. डी.अजितसिंग | ७.५% | --//-- |
| ४. | मे. आदिनाथ कंन्स्ट्र. | ५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराने श्री. के.बी. पाथ्रीकर यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भवानीनगर, दत्तनगर अंतर्गत रस्त्याचे पुर्नःडांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची निविदा श्री. के.बी. पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३२/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्तवा सादर करीत आहे की, रोहिदासपुरा, भवानीगर भागा अंतर्गत रस्त्याचे पुर्नःडांबरीकरण करणेच्या कामासाठी दि. ६-११-९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ३५६/३७ अन्वये अंदाजपत्रक र.रु. ५,५८,८००/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/३६/९९ दि. २०-११-९९ चे निविदा सुचनेव्दारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (५) निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण (४) चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | -- | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे. मास्कॉट कंन्स्ट्र. | ५% | जास्त दराने |
| ३. | श्री. के.बी. पाथ्रीकर | ७% | जास्त दराने |
| ४. | श्री. डी. अजितसिंग | ७.५०% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराची मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असुन प्रस्तव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोहीदासपुरा, भवानीनगर भागा अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराची मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. याची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | सभापती स्थायी समिती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २१-०१-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**शुक्रवार दिनांक २१-०१-२००० रोजी मा. सभापती श्री. नरसिंग मुरलीधर ढगे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक संपन्न झाली तिचे इतिवृत्त बैठकीची सूुरुवात "वंदे मातरम्" या गिताने दुपारी ४.०० वाजता महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे झाली. बैठकीस अधिकारी वर्ग व खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स..श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | स.सदस्य |
| २) | स.स.श्री. बचाटे राजकुमार (मामा) | --//-- |
| ३) | स.स.श्री. किशोर बाबुलाल तुळशीबागवाले | --//-- |
| ४) | स.स.श्री. स.अ.एकबालोद्दीन स.मो. कुतुबुद्दीन | --//-- |
| ५) | स.स.सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ६) | स.स.श्री. विखारोद्दीन पिता खुदबोद्दीन | --//-- |
| ७) | स.स.श्री. अजिजखॉ गणीखॉ | --//-- |
| ८) | स.स.श्री. विकास रतनलाल जैन | --//-- |
| ९) | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| १०) | स.स.श्री. वसंत विनायकराव देशमुख | --//-- |
| ११) | स.स.श्री. लहोट रमेश दिपचंद | --//-- |
| १२) | स.स.सौ. लता दलाल श्रीनिवास | --//-- |
| १३) | स.स.सौ. विमलताई नंदकुमार मुंडलिक | --//-- |
| १४) | स.स.श्रीमती. गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | --//-- |

**संवाद :**

**श्री. वसंत देशमुख :** माझ्या वार्डात अभ्यासिका केंद्राची इमारत तयार झाली असुन अभ्यासिका केंद्र चालविणेसाठी केंद्राची इमारत तयार झाली असुन अभ्यासिका केंद्र चालविणेसाठी कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे वॉचमनची आवश्यकता आहे. सदरची इमारत दुमजली असुन तळमजला हा या भागातील चौकीसाठी द्यावी असा प्रस्ताव पोलिस विभागाकडुन आलेला आहे. कारण या ठिकाणच्या प्लॉट लोकवर्गणीतुन दिलेला असुन लोकांची मागणी अशी आहे की, त्याठिकाणी पोलिस चौकीसाठी महानगरपालिकेने इमारत द्यावी त्याचा दुसरा फायदा असा होईल की, येथे वॉचमनची गरज पडणार नाही. व इमारतीची देखरेख होऊन इमारत चांगली राहील.

**मा. सभापती :** स.स.च्या सुचनेनुसार आणि लोकांच्या मागणीनुसार त्याठिकाणच्या तळमजल्यावर पोलिस चौकीसाठी इमारत द्यावी असा प्रस्ताव आहे व यासाठी पोलिस कार्यालयातर्फे पत्र सुध्दा दिलेले आहे.

**उप आयुक्त(प्र.) :** याबाबतचा प्रस्तावा प्रशासनाकडे प्राप्त झालेला असुन मंजुरीस्तव मा. आयुक्त यांचेकडे सादर करण्यांत येतो.

**सौ. राधाबाई तळेकर :** माझ्या वार्डातील चौधरी नामक व्यक्तींच्या बाबतीत गेल्या ९७-९८ पासुन जागेवर अतिक्रमण करुन राहत असल्याबाबत तक्रारी केलेल्या आहेत

व सतत पाठपुरावा करीत आहे. त्या जागेभोवती भाजी मार्केट चालु होत. आता ते तेथून हालविण्याचे कार्यवाही आहे. त्याबाबत प्रशासनाचे डोळेझाकपणा असु नये.यासाठी त्या जागेभोवती वॉल कंपाऊंड तातडीने बांधणे आवश्यक आहे. कारण संबंधित व्यक्ती असा म्हणतो की मी तेथील घर स्वतःहुन १-२- महिन्यात पाडणार होतो. परंतु महानगरपालिकेने पाडते या कामी ५ ते १० हजार रु. वाचले. आता पुन्हा कोणत्याही परिस्थितीत त्याठिकाणी अतिक्रमण होणार नाही. याकडे प्रशासकीय अधिकारी कारण यांनी लक्ष द्यावे. व शहर अभियंता या विभागाने तातडीने बजेटमध्ये याठिकाणी वॉल कंपाऊड बांधणेसाठी तरतुद करुन कंपाऊड बांधावी कारण सदरील व्यक्तींने अनेक भागात महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमणे करुन दादागिरी चालविली होती. त्यापैकी ही जागा महानगरपालिकेच्या ताब्यात मिळाली त्यामुळे महानगरपालिकेचा लाखो रुपयाचा फायदा झाला आहे. संबंधित व्यक्तींने भानुदासनगर येथे राहतो व विनायकनगर या भागात अनाधिकृत अतिक्रमणे केलेले आहे. आता सध्या या जागेवर तार कुंपनचे काम चालु असुन यामध्ये कोणत्याही प्रकारचे अडथळे येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

**मा. सभापती :** स.स.सौ. तळेकर यांच्या पाठपुराव्यामुळे महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण करुन राहत असलेल्या व्यक्तीचे घर पाडले व जागा महानगरपालिकेच्या ताब्यात मिळालेली या जागेचे निश्चितपणे महानगरपालिका प्रशासनाने संरक्षण करण्याची कार्यवाही करावी व या जागेवर पुन्हा अतिक्रमण होणार नाही याची दखल घ्यावी.

**सौ. राधाबाई तळेकर :** याठिकाणी महानगरपालिकेतर्फे शॉपिंग सेंटर काढावे व काम करीत असतांना पोलिस संरक्षनार्थ करावे. म्हणजे कोणत्याही प्रकारचे अडथळे येणार नाही.

**श्री. विकास जैन :** स.स.सौ. तळेकर यांनी गेली २-३ वर्षापासुन सतत पाठपुरावा करुन महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण करुन हडप करण्याचा प्रयत्न करण्याऱ्या व्यक्तीला हाकलून लावून जागा महानगरपालिका परत मिळवून दिली याबाबत त्यांचे सभागृहात अभिनंदन करावे.

**श्री. बचाटे राजकुमार :** गेली २-३ वर्षापासुन सौ. तळेकर यांनी सतत पाठपुरावा करुन जिद्दीने काम घेतले व महानगरपालिकेस आपली जागा ताब्यात मिळवून दिली त्यांचे अभिनंदनास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :** सौ.तळेकर यांचे सभागृहात याबाबत अभिनंदन करण्यात येते त्याप्रमाणे प्रशासनाचेही या कमी सहकार्य लाभले त्यांचेही अभिनंदन.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** मा. आयुक्त हे गेले ४-५ बैठकापासुन स्थायी समितीच्या बैठकीत उपस्थित राहत नाहीत व त्यांचे प्रतिनिधीत्व उपआयुक्त (प्र.) हे करतात. सर्वसाधारण जनेतेचे प्रश्न तातडीने सोडविल्या गेले पाहिजे त्यांना न्याय मिळाला पाहिजे. परंतु झोन कार्यालयातुन कोणत्याही प्रकारच्या न्याय मिळत नाही. एका व्यक्तींने गेली ८७ पासुन म्हणजे दिनांक ४-२-८७ पासुन आतापर्यंत सतत अर्ज देत आहे की, माझे महानगरपालिकेचे नळ नाही आहे व तरीही पाणीपट्टी देयके दरवर्षी येत आहे ते माफ करुन मला नविन कनेक्शन द्यावे. परंतु द्यावे. परंतु झोन कार्यालय याकडे दुर्लक्ष करते व

कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली दिसुन येत नाही. याबाबतच्या झेरॉक्स प्रती मी उपआयुक्त (प्र.) यांचेकडे दिलेल्या आहेत याबाबत मी सतत सभागृहात चर्चा करीत आहे. चर्चा करुनही प्रशासन गभीरतेने घेत नाही. झोन -७ मधील कर्मचारी व इतर झोनमधील कर्मचारी हे काय काम करतात, कामाच्या पध्दती काय आहे. याकडे डोळेझाक करतात व कामास विलंब लावतात याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** स.स.च्या सुचनेनुसार झोन -७ मधुन पाणीपट्टी बाबतची वैयक्तीक संचिका कालच माझकडे प्राप्त झाली याबाबत २/३ दिवसांत संपुर्णपणे शहानिशा करुन निर्णय घेणेची कार्यवाही होईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** कोणत्याही व्यक्तींचे काम असेल तरी झोनमधील कर्मचाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करावी.

**श्री. राजु इंगळे :** पाणीपट्टी बिल माफीची प्रकरणे अनेक आहेत माझ्या वार्डातील जवळपास ७००/८०० प्रकरणे आहेत या बाबतही कार्यवाही व्हावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सिडको भागात दोन घरांना एकच नळ कनेक्शन दिलेला आहे व त्याव्दारे अर्धा अर्धा इंचमधुन पाणी पुरवठा होतो. परंतु त्यापैकी एका व्यक्तींने नळ कनेक्शनची गरज नाही. म्हणुन अर्ज दिलेला आहे व तो ४-२-९७ पासुन सतत पाठपुरावा करित आहे. तरीही याबाबत कार्यवाही झालेली नाही. अशा प्रकारचे प्रश्न इतरांचे असल्यास एकत्रित प्रकरणे दाखल करावे.

**श्री. देशमुख वसंत :** १) स्थायी समितीमध्ये स. सदस्यांनी आपआपल्या वार्डातील समस्यांबाबत भांडणे या सभागृहात सक्षमता असणे आवश्यक आहे. प्रत्येक बाब उपअभियंता यांचेकडे सोपविले जातात ते त्यांच्या हिशेबाने कामे करतात मात्र आम्ही सतत कामाचा पाठपुरावा करित असतो.प्रत्येक संचिका मंजुर होणेसाठी मा. आयुक्त साहेब याठिकाणी कायम असणे आवश्यक आहे. २) शहरातील बऱ्याच भागात अनाधिकृत मटनाची दुकाने आहेत याबाबत अनेक वेळा प्रशासनास या बाबीं निदर्शनास आणुन दिल्या वर्तमान पत्रात बातम्या छापुन आल्या परंतु त्यावर काहीही कार्यवाही नाही. नियमाप्रमाणे शहरातील अनाधिकृत मटनाची दुकाने एक तर हटविली जावीत नाही तर अधिकृतरित्या करुन त्यांचेकरिता विविध ठिकाणी मार्केट/दुकाने बांधुन द्यावीत. ३) विविध ठिकाणी जाहिराती बोर्ड लावले जातात परंतु ते बोर्ड काढले नंतर ज्या पोलवर बोर्ड लावलेले असतात ते पोल हटविले जात नाही. यांचे कारण काय?

**मा. सभापती :** स.स.च्या सुचनेनुसार ज्या ज्या भागात जाहिराती बोर्ड नियमाप्रमाणे लावले जातात. त्या ठिकाणचा कालवधी संपल्यानंतर तो बोर्ड काढत असतांना तेथील पोलही संबंधित जाहिरात धारकांनीच काढावे. याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे.

**श्री. विखारोद्दीन :** महानगरपालिका हद्दीतील झोन निहाय म्युनिसिपल क्रमांक देणे आवश्यक आहे. कारण याबाबतची मागणी बऱ्याच दिवसांपासुन असुन क्रमांक असल्यास घरपट्टी व पाणीपट्टी वसुली होण्यास प्रशासनास मदत होईल. याबाबतचे प्रशासनाने आदेश द्यावेत अन्यथा सर्वसाधारण सभेमध्ये विचारणा करण्यांत येईल.

**श्री.स.अ.एकबालोद्यीन :** रंगारगल्ली व कुंभारवाडा येथील रस्त्यावरील अतिक्रमणे काढली परंतु एकच जातीच्या लोकांचे (मुसलमानांचे) अतिक्रमण हटविले बाकीचे नाहीत असे का?

**मा. सभापती :** महानगरपालिका हद्दीत म्युनिसिपल घर क्र. देणे आवश्यक आहे. पुढील वर्षापासुन प्रशासनाने याबाबत कार्यवाही करावी. जेणेकरुन मालमत्तावर व पाणीपट्टी वसुली होण्यास मदत होईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** माजी आयुक्त भोगे असतांना प्रशासनाने कार्यवाही केलेली होती.

**मा. सभापती :** अशा प्रकारचा ठराव झालेला असल्यास प्रशासनाने कार्यवाही करावी.

**विषय क्र. ५३३/१ :**

दिनांक २१ डिसेंबर १९९९ रोजी संपन्न झालेल्या आणि दिनांक ७-१-२००० व दिनांक १२-१-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

**श्री. विखारोद्यीन :** दिनांक २१-१२-९९ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ५ मध्ये कडबा कटरची जागा भाडयाने देण्याबाबत दर रु. ८ वरुन रु. ५/- करावे व सर्वसाधारण सभेपुढे ठेवावे अशी चर्चा झाली होती. बजेटच्या मिटींगमध्ये वाढ करण्यात आली होती.

**मा. सभापती :** अर्थसंकल्पाची बैठक होईल त्यावेळी निर्णय घेण्यात येईल.

**श्री. विखारोद्यीन :** दिनांक १२-१-२००० चे इतिवृत्त पृष्ठ क्र. ३ मागील बैठकीत चर्चा केल्यानुसार माझ्या वार्डातील दवाखान्यातील एक्सरे मशीन बाबत काय कार्यवाही झाली याची माहिती द्यावी.

**मा. सभापती :** प्रशासकीय अधिकारी वैद्यकीय अधिकारी उपस्थित नाहीत.

**मा. आयुक्त :** पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** महानगरपालिकेतर्फे औषधी खरेदीसाठी कार्यवाही केल्या जाते. परंतु निविदाही काढल्या जात नाहीत मात्र औषधी खरेदी व्यवस्थित होते. काही व्यक्तींना वैद्यकीय मदत म्हणुन किडणी खराब झाल्यामुळे स.स. च्या स्वेच्छा निधीतुन रु. २५/- हजाराचे आर्थिक मदत जवळपास ३ व्यक्तींना देवु केली याबाबतचा प्रस्ताव सर्वसामान्य सभेत मंजुर झाला तरी याबाबत कार्यवाही झालेली दिसत नाही. नेमके कुठे अडथळे येत आहेत. संबंधित अधिकारी या ठिकाणी उपस्थित नाही.

**मा. सभापती :** महानगरपालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे अनेक तक्रारी आहेत गेल्या २/३ महिण्यापासुन औषधी खरेदीबाबत २७-१०-९९ ला लोकमत जाहिरात देवुन टेंडर उघडले मात्र ते टेंडरची संचिका कुठे आहे याची काहीही कल्पना नाही. शहरातील महानगरपालिका दवाखान्यात औषधांचा पुरवठा होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे इतर काही बाबी संबंधी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या अनेकांच्या तक्रारी असुन त्यांचे बाबतीत निश्चितपणे प्रशासनाने कार्यवाही करावयास पाहिजे.

**श्री. विखारोद्यीन :** यास जबाबदार कोण आहे. यांची चौकशी करुन कार्यवाही व्हावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** कोणत्याही अधिकाऱ्यांचा अपमान करावयाचा उद्देश नाही परंतु किडणीचे ऑपरेशनसाठी रु. २५/- हजाराची आर्थिक मदतीबाबत

महापालिकेच्या स.सदस्याच्या स्वेच्छा निधीतुन सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनुसार गेल्या १ १/२ महिन्यापासुन प्रस्ताव मंजुर झालेला आहे. परंतु त्याबाबत वैद्यकीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही ही बाब गंभीर असुन प्रस्तावाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. संबंधित अधिकारी जर रजेवर गेले असतील तर त्यांच्या जागी प्रभारी आरोगय वैद्यकीय अधिकारी यांनी कार्याभार सांभाळुन जबाबदारीने कार्य करावयाचे असते. जर किडणी रोगी ऑपरेशनच्या पुर्वीच मुत्यु पावला तर त्यास जबाबदार कोण? तेव्हा याबाबत प्रशासनाने जागृतता दाखवुन तातडीने कार्यवाही करावी. आम्हास भावनाप्रधान होण्याची वेळ येऊ देवू नये. वेळोवेळी आम्ही सुचना करतो विचारणा करतो त्यावर अंमलबजावणी होत नसेल तर ही पध्दत चुकीची आहे. कुणीही अधिकारी आपली जबाबदारी टाळत असल्यास त्यांना वठणीवर आणल्याशिवाय आम्हाला गत्यंतर नाही असे वाटते.

**श्री. वसंत देशमुख :** प्रत्येक स.स. आपआपले प्रश्न पोटनिकडीने मांडतो, काही कामांचे बाबतीत संचिकेचे नंबर घेऊन त्या त्या विभागात फिरतो तरीही अधिकाऱ्यांना यांची जाणीव नसते.

**उप आयुक्त (प्र.) :** औषधी खरेदी बाबतच्या प्रस्तावाची संचिकेबाबत प्रशासन पुर्णपणे शहानिशा करुन त्याचा अहवाल पुढील बैठकीत ठेवण्यात येईल.

**श्री. विखारोद्दीन, श्री. काशिनाथ कोकाटे :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी किती दिवसाच्या रजेवर गेले आहेत याची माहिती द्यावी कोणतेही अधिकारी रजेवर गेल्यानंतर त्याचे काम साभांळण्यासाठी इतर अधिकाऱ्यांना चार्ज दिला जातो. मात्र त्या संबंधित अधिकाऱ्याचे काम असते. की, ज्या काही तातडीच्या संचिका आहेत त्या पाहुन त्वरेने कार्यवाही करावी. जर संबंधित अधिकारी जबाबदारी पेलवत नसेल तर इतरांकडे काम द्यावे. परंतु किडणी ग्रस्त रुग्णाला तातडीने मदत देणे आवश्यक आहे. एवढा विलंब झाला आहे की, आता घरपोच मदत नेऊन द्यावी.

**मा. सभापती :** प्रभारी आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे राष्ट्रीय कार्यक्रम पल्स पोलिओ साठी गेलेल्या आहेत त्या कार्यालयात उपस्थित नाहीत.

**श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. विखारोद्दीन :** संबंधित आरोग्य वैद्यकीय अधिकारी या सध्या कार्यालयातच आहेत.

**उप आयुक्त (प्र.) :** औषधी खरेदीची संचिका सापडत नाही ही बाब गंभीर असुन याची सखोल चौकशी होईल. डॉ. देशपांडे आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे अमेरिकेला गेले असुन ते ३० जानेवारी -२००० पर्यंत रजेवर आहेत.

**श्री. विकास जैन :** चौकशी करुन पुढील बैठकीत अहवाल द्यावा.

**(प्रभारी) आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** तुमचे काम सांभाळुन आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे काम पहावे असा आदेश आहे.

**सौ. लता दलाल :** संबंधित अधिकारी म्हणतात स्वतःचे काम सांभाळुन आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे काम पहावे म्हणजे कोणते काम करावयाचे यांची माहिती द्यावी.

**उपआयुक्त (प्र.) :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे पुर्ण काम करायचे.

**सौ. दलाल लता :** जर संबंधित प्रभारी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना कोणते काम करावयाचे हे माहित नसेल तर त्यांनी कुणा वरिष्ठ अधिकाऱ्याकडे विचारणा का केली नाही.

**मा. सभापती :** स.स.श्री. कोकाटे यांनी केलेल्या चर्चेनुसार ज्या किडणीगृस्त रुग्नास महानगरपालिकेच्या स्वेच्छा निधीतुन रु. २५/- हजाराची आर्थिक मदत देणे आहे ती तातडीने कार्यवाही करुन द्यावी. व जो औषध खरेदीची संचिका आहे त्या बाबतीत तातडीने कार्यवाही व्हावी.

**श्री. विखारोद्दीन :** दिनांक १०-१-२००० चे इतिवृत्तातील पृष्ठ क्र. १२ मध्ये जकातीचे बाबतीत ४८ कोटीचे उद्दिष्टानुसार आतापर्यंत ३२ कोटीचे जकात उत्पन्न आहे उर्वरित उद्दिष्ट दोन महिन्यात पुर्ण होईल काय याची माहिती द्यावी.

**मा. सभापती :** या संदर्भात सर्वसाधारण सभेत चर्चा झालेली होती. २ ते ३ कोटी जकात या वर्षीच्या उद्दिष्टापेक्षा कमी होईल असे सांगितले होते. आतापर्यंत ३४ कोटीची जकात उत्पन्न झालेले असुन ते ७१% वसुली होते. गेल्या वर्षापेक्षा १.७८ कोटी जास्तीची आहे. मागील ३-४ महिन्यापुर्वी ३ वेळेस झालेला संप व समान विक्रीकर याबाबत जकातीवर परिणाम होतो. परिणामी उद्दिष्टापेक्षा ४४ ते ४५ कोटीपर्यंत जकात उत्पन्न मार्च अखेर पर्यंत होईल. सध्या बि-बियानेच्या जकातीवर स्टे आल्याने जवळपास ८० लाखाचे नुकसान झाले आहे.

**श्री. विखारोद्दीन :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. १४ मध्ये माझ्या वार्डातील स्मशनाभुमीच्या कामाचा बाबतीत अद्यापही काही कार्यवाही नाही तेंव्हा रिव्हाईज्ड बजेट मध्ये तशी तरतुद झाली असेल तर कार्यवाही का सुरु झाली नाही.

**उप अभियंता (बां.) शहर अभियंता :** रिव्हाईज्ड अंदाजपत्रक रु. २.०७ लक्षचे तयार करुन लेखा विभागाकडे पाठविले आहे मंजुरी झाल्यास कार्यवाही होईल.

**मा. सभापती :** हमालवाडा येथील या पुर्वीचे काम रु. १.७२ लाखाचे काम सुरु झालेले होते.

**शहर अभियंता :** सन १९९६-९७ मध्ये या ठिकाणचे काम रु. १.७२ लाखचे होते. त्यामध्ये चबुतरा व शेड बांधण्याचे कामाचा समावेश होता परंतु यात त्या स्थळी काही वाद झाल्याने प्रकरण कोर्टात गेले. तद्नंतर विधी सल्लागार यांचे मत मागवून प्रकरण संपले. मागील कामाच्या मंजुरीनुसार या कामासठी रु. २.०७ लक्षाची तरतुद होती त्यातुन रु. १.०० लक्ष शिल्लक असुन रिव्हाईज्ड बजेटमध्ये काम करुन घेता येईल.

**श्री. विखारोद्दीन :** रुपये १.०० लाख शिल्लक आहे. त्यामधुन कामास मंजुरी घेऊन कामास सुरुवात करावी.

**मा. सभापती :** ठिक आहे. रु. १.०० लाख शिल्लकीतुन संबंधित काम सुरु करावे.

**श्री. विखारोद्दीन :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. १४ मध्ये कब्रस्तानासाठी चौकीदारांची नेमणुक बाबत अदयापही मंजुरी झाली नाही. असे समजले की सदरील संचिका उपआयुक्त (प्र.) यांचेकडे असुन ते स्वाक्षरी करण्यास विलंब करीत आहे.

**उप आयुक्त (प्र.) :** संचिका प्राप्त झाली तपासणी करुन मा. आयुक्त यांचेकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येईल.

**मा. सभापती :** कब्रस्तानच्या जागा वफ्फ बोर्डाच्या असतात, आहेत त्यामुळे वफ्फ बोर्डाच्या जागेत एन.ओ.सी. मिळाल्यावर कार्यवाही करण्यात येते.

**श्री. विखारोद्दीन :** माझ्या वार्डात विद्युत बाबतचे रु. ३.९५ लक्षचे कामाची तरतुद केली परंतु त्याबाबत अदयापही कार्यवाही दिसत नाही. याबाबत मी सारखी विचारणा करित असतो. बजेटमध्ये करटेन का होते. जापर्यंत स्थायी समितीची मंजुरी मिळत नाही तोपर्यंत प्रशासनाने बजेट करटेन करु नये.

**उपअभियंता (विद्युत-१) :** रिव्हाईज्ड बजेटमध्ये याबाबत कार्यवाही होईल.

**मा. सभापती :** २४ जानेवारी २००० ला रिव्हाईज्ड बजेटची बैठक आयोजित केली आहे त्यामध्ये चर्चा करुन निर्णय होईल.

**श्री. विखारोद्दीन :** बजेट करटेन करण्याचे अधिकार कुणास आहेत. पदाधिकारी की अधिकारी याठिकाणी चुकीचा निर्णय घेण्यात येऊ नये. शासनाकडील अनुदान येतात ते विभाग प्रमुखांकडुन कामाच्या यादीनुसार लेखा विभागास तरतुदी करुन पदाधिकारी यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे कार्यवाही होते.

**मा. सभापती :** शासनाकडुन जे अनुदान महापालिकेस मिळतात त्याबाबतचा खर्च प्रशासन ज्या कामांची यादी तयार करते त्यानुसार खर्च होतो.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** शासनाकडील अनुदानाचा खर्च मागील वर्षीच्या पालकमंत्री यांनी केलेल्या सुचनेनुसार खर्च करण्यात आलेला आहे. माझ्या वार्डात रु. ७५/- लाखाचे काम झाले.

**श्री. विखारोद्दीन :** शासनाकडील अनुदान डी.पी. रोडच्या कामासाठी खर्च करण्यासाठी होता मात्र लहान लहान कामासाठी प्रशासनाने खर्च केलेला आहे ही दिशाभुल होय.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** पालकमंत्री कोणत्याही पक्षाचे असोत ते शासनाचे प्रतिनिधीत्व करतात यासाठी आपण गाऱ्हाणे व अनुदानासाठी शासनाकडे धाव घेता. पालकमंत्र्याच्या सहमीशिवाय कोणतेही कामे होत नाही. तेव्हा उर्वरित काही कामासाठी रिव्हाईज्ड बजेट करुन स्थायी समितीने मंजुरी दयावी.

**श्री. स.अ. इकबालोद्दीन :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. २ मध्ये हायमास्ट बाबत अदयापही कार्यवाही नाही.

**मा. सभापती :** रिव्हाईज्ड बजेटमध्ये याबाबत विचार करण्यात येईल.

**श्री.स.अ. एकबालोद्दीन :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ३ मध्ये विद्युत लाईनमन व वाहनचालक यांना रु. ७५/- दै. वेतनचा दरापेक्षा जास्त मिळणेबाबत संचिका सुरु आहे. याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** या संदर्भात उपआयुक्त (प्र.) यांचे अभिप्राय घेऊन लेखा विभागात संचिका पाठविली आहे. आता विषय क्र. १ मंजुर करण्यात येते.

**ठराव :**

दिनांक २१-१२-९९,७-१-२००० आणि १२-१-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ५३४/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औंरगाबाद टाईम्स् कॉलनी, पिरगैब कॉलनी राहत कॉलनी, येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ४,१२,२२९/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके

विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण नऊ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन (३) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | -- | अंदाजपत्रकीय दरोन |
| २. | श्री. डी. अजितसिंग | ११.००% | जास्त दराने. |
| ३. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | १०.००% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. मास्कॉट कंन्स्ट्र. यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे आहेत. करिता निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद टाईम्स कॉलनी, पिरगैब कॉलनी राहत कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापत्रकापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची मे. मॉस्काट कंन्स्ट्र. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३५/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नारायणनगर, आजम कॉलनी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ४,९८,९३०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण बारा (१२) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त एकच निविदा मे मास्कॉट कंन्स्ट्र. यांची अं.प. दरापेक्षा ५.००% जास्त दराची प्राप्त झाली.

ठेकेदाराने दिलेले दर जास्त वाटत असल्याने त्यांना दराच्या वाटाघाटीस्तव बोलवले असता वाटाघाटीअंती त्यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्याची तयारी दर्शविली आहे.

तरी मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारायणनगर, आजम कॉलनी, येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची एकच निविदा प्राप्त झाली. त्यांच्यासह वाटाघाटी केली असता अं.प. दरापेक्षा ५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार असल्याने मे. मास्कॉट कं. यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३६/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, रेल्वेस्टेशन समोरिल चौकात ३० मीटर उंचीचा हायमास्ट पोल व फिटींगचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १०,००,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण आठ (८) कोरी निविदापत्रके विकल्या गेली निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखपर्यंत एकुण सहा (६) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. रॉयल इलेक्ट्रीकल पुणे | ३.३०% | जास्त दराने |
| २. | मे. फिलिप्स इं. लि. मंबई | ३.३०% | कमी दराने |
| ३. | मे. हिंद इले. कं. औरंगाबाद | २.००% | --//-- |
| ४. | मे. दानिश सेल्स कॉर्पो मुंबई | ४.७०% | --//-- |
| ५. | मे. क्रॉम्पटन ग्रीव्हज लि.कं.मुंबई | ५.९१% | --//-- |
| ६. | मे. बजाज इले. कंपनी पुणे | ७.३०% | --//-- |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. बजाज इलेक्ट्रीकल कंपनी पुणे, यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.३०% कमी आहेत.

करिता निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव मंजुरी तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन समोरील चौकात ३० मीटर उंचीचा हायमॉस्ट व पोल व फिटींगच्या कामाकरिता कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापत्रकापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.३०% कमी दराची मे. बजाज इलेक्ट्रीकल पुणे यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३७/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, टि.व्ही. सेंटर चौकात ३० मीटर उंचीचा हायमास्ट पोल व फिटींगचे काम करण्याकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १०,००,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण आठ कोरी निविदापत्रके विकल्या गेली निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिमतारखेपर्यंत यापैकी सहा निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. रॉयल इलेक्ट्रीकल पुणे | ३.३०% | जास्त दराने |
| २. | मे. हिंद इले. कं. औरंगाबाद | २.००% | कमी दराने |
| ३. | मे. फिलिप्स इं. लि. मंबई | ३.००% | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | मे. दानिश सेल्स कॉर्पो मुंबई | ४.७२३% | --//-- |
| ५. | मे. बजाज इले. कंपनी पुणे | ६.१४% | --//-- |
| ६. | मे. क्रॉम्पटन ग्रीव्हज लि.कं.मुंबई | ७.२०% | --//-- |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. कॉम्पटन ग्रीव्हज लि.के. मुंबई यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ७.२०% कमी दराचे आहेत.

करिता निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टि.व्ही. सेंटर चौकात ३० मीटर उंचीचा हायमास्ट व पोल फिटींगचे काम करण्याकरिता प्राप्त निविदापत्रकापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.२०% कमी दराची मे. क्रॉम्पटन ग्रिव्हज कं. लि. मुंबई यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळीचे विषय*

**विषय क्र. ५३८/१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, शिवशंकर कॉलनी व बौध्दनगर भागातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ६,९३,७१०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विकल्या गेली. व निविदापत्रके विक्रच्या अंतिम तारखेपर्यंत १०(१०) कोरी निविदापत्रके विकल्या गेली. व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिमतारखेपर्यंत यापैकी फक्त १ (एक) निविदापत्रक दर भरुन प्राप्त झाली प्राप्त निविदापत्रक उघडण्यात आले असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | ५% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रक मे. मास्कॉट कंन्स्ट. यांचे निविदापत्रकाचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराचे आहेत. ठेकेदाराने दिलेले दर जास्त वाटत असल्याने त्यांना वाटाघाटीस्तव बोलविले असता वाटाघाटीअंती त्यांना सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराऐवजी सदरील दराने करण्याची तयारी दर्शविली आहे.

तरी मे. मास्कॉट कंन्स्ट्र. यांच्याकडुन सदरील काम दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिवशंकर कॉलनी, बौध्दनगर भागातील अतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. याची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची एकच निविदा प्राप्त झाली असुन त्यांच्यासह वाटाघाटी केल्यानंतर ते

अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार असल्याने त्यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दराने काम करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३९/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, भावसिंगपुरा येथील स्मशानभुमीस भिंत बांधणेच्या कामाच्या अंदाजपत्रकास स्थायी समितीमध्ये दि. १०-१२-९९ च्या विषय क्र. ४३५/१८ र.रुपये ३,१९,०००/- ला मान्यता प्राप्त झाली त्यानुसार निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/४५/९९ दि. १४-१२-९९ अन्वये निविदा मागविल्या असता विक्रीच्या तारखेस १६(सोळा) निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेला ३ (तीन) निविदा प्राप्त झाल्या त्या उघडण्यांत आल्या असता त्यांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एल.बी. चव्हाण | ५% | जास्त दराने |
| २. | श्री. मजहर सिद्दीकी | १०% | --//-- |
| ३. | श्री. राजेंद्र वर्दे | १५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने श्री. एल.बी. चव्हाण यांची निविदा होती. मा.आयुक्तांनी ५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने दि. ५-१-२००० अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यास गुत्तेदाराने लेखी संमती दिली असुन अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार आहे.

करिता श्री. एल.बी. चव्हाण यांची ५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराची निविदा स्थायी समितीच्या विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा येथील स्मशानभुमीस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची श्री.एल.बी. चव्हाण यांची निविदा असुन त्यांच्यासह वाटाघाटी केली असता त्यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास संमती दिल्याने त्यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने काम करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४०/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहानुरवाडी येथील शहानुरमिर्या दर्गा जवळील कब्रस्तानास संरक्षित भिंत व तार कुंपन करणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु. ४,३१,८५६/- स्थायी समिती सभा दि. १८-१०-९९ च्या सभेमध्ये विषय क्र. २६४/६ अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर कामासाठी निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/९९/४० दि. ८-१२-९९ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या तारखेला एकुण २६ (सवीस) निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या तारखेला एकुण (चार) निविदा प्राप्त झालया त्या उघडण्यात आल्या असता दिलेले दर पुढील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.एम. मंडोरे | ३.३०% | जास्त दराने |
| २. | श्री. एस.एच.असोशिएटस् | ८% | --//-- |
| ३. | श्री. विपुल कंन्स्ट्रक्शन | १०% | --//-- |
| ४. | श्री. मु.के. पंडीत | १२% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.३०% जास्त दराने श्री. एस.एम. मंडोरे यांची निविदा आहे. त्यास मा. आयुक्तांनी दि. ५-१-२०० अन्वये अंदाजपत्रकीय दराने मंजुरी दिलेली आहे. परंतु श्री. मंडोरे यांनी दि. १०-१-२००० अन्वये लेखी संमती दिलेली आहे.

करिता श्री. एस.एम. मंडोरे यांची अंदाजपत्रकीय दराने निविदा स्थायी समितीच्या विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी येथील शहानुरमियॉ दर्गा जवळील कब्रसतानास संरक्षित भिंत व तयार कुंपन करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.३०% जास्त दराचे श्री. एस.एम. मंडोरे यांची निविदा असुन त्यांच्यासह वाटाघाटीनंतर त्यांनी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास संमती दिल्याने श्री. एस.एम. मंडोरे यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दराने काम करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांची घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २८-०१-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**शुक्रवार दिनांक २८-०१-२००० रोजी मा. सभापती श्री. नरसिंग मुरलीधर ढगे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक संपन्न झाली तिचे इतिवृत्त बैठकीची सूरुवात "वंदे मातरम्" या गिताने दुपारी ४.०० वाजता महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे झाली. बैठकीस अधिकारी वर्ग व खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. बचाटे राजकुमार (मामा) | --//-- |
| २) | स.स.श्री. किशोर बाबुलाल तुळशीबागवाले | --//-- |
| ३) | स.स.श्री. स.अ.एकबालोद्यीन स.मो. कुतुबुद्दीन | --//-- |
| ४) | स.स.सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ५) | स.स.श्री. विखारोद्यीन पिता खुदबोद्यीन | --//-- |
| ६) | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| ७) | स.स.श्री. वसंत विनायकराव देशमुख | --//-- |
| ८) | स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | --//-- |
| ९) | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | --//-- |
| १०) | स.स.सौ. विमलताई नंदकुमार मुंडलिक | --//-- |
| ११) | स.स.श्रीमती. गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | --//-- |

**संवाद :**

**श्री. स.अ. एकबालोद्यीन :** महानगरपालिकेतील एका कर्मचाऱ्याने कर्क रोगासाठी रुपये ५० हजार अगाऊ रक्कम मागितली होती. कर्मचाऱ्यांना अगाऊ रक्कम म्हणुन रुपये ६० हजार देय होते मात्र प्रभारी वैद्यकीय अधिकारी यांनी रुपये ५ हजाराचीच शिफारस केलेली आहे. (यावेळी सभागृहात संचिका दाखवतात.

**मा. सभापती :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी जे रजेवरुन आल्यानंतर त्यांनी या संदर्भात त्वरील कार्यवाही करावी.

**श्री. स.अ. एकबालोद्यीन :** महानगरपालिकेच्या वाचनालयामध्ये काही कर्मचारी पुर्वी रुपये ५० प्रति महा व आता रुपये २०० प्रति महाप्रमाणे काम करत होते. आता त्यांना मागील सात महिन्यापासुन त्यांना मोबदला मिळत नाही. याबद्दल खुलासा करावा. (स. सभासद मा. सभापतीना या संदर्भातील पत्र दखवतात.

**मा. सभापती :** मा. आयुक्तांनी या प्रकरणात लक्ष घालावे व प्रभारी शिक्षणाधिकारी यांनी खुलासा करावा.

**प्र. शिक्षणाधिकारी :** कार्यालयीन वेळेनंतर रिडींग रुममध्ये महानगरपालिकेचे कर्मचारी दोन तास काम करतात. त्यांना प्रतिमहा रुपये २०० देण्यात येत. आहे या संदर्भात माझ्याकडे अर्ज प्राप्त झालेला नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** गेल्या अनेक बैठकीपासुन मा. आयुक्त स्थायी समितीच्या बैठकीला उपस्थित राहत नाही ही सहावी बैठक आहे. मा. आयुक्तांनी सभेत हजर राहु नये असे काही परिपत्रक आहे काय? मा. आयुक्त नसतील तर प्रशासनाच्या बाबींवर कोण निर्णय घेतात याबद्दल खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** तत्कालीन आयुक्त श्री. पवार हे आजारी होते आणि आताचे आयुक्त श्री. बलदेवसिंह हे वित्त आयोगाच्या बैठकीत गेलेले होते. आज ते आजारी असल्याने येऊ शकले नाही. त्यांनी परवानगी मागितली होती तशी त्यांना परवानगी देण्यात आलेली आहे.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** मा. आयुक्तांनी हजर राहवे किंवा न राहणे याबद्दल काहीही वाद नाही. सभागृहात झालेल्या निणर्याची अंमलबजावणी व्हावी.

**उपआयुक्त (म.) :** मा. आयुक्त परवानगीने सभेला गैरहजर आहेत. सभेत जो खुलासा मागविला जातो. त्यासंबंधी सभा संपल्यानंतर मा. आयुक्तांना अवगत करण्यात येते.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** मागील अनेक बैठकीपासुन पाच अधिकाऱ्यांचे वेतनश्रेणी बाबतचा प्रस्ताव तसेच सुरक्षा रक्षक वेतनवाढीचा प्रस्ताव सभागृहात चर्चा होऊनही प्रशासनामार्फत ठेवण्यात आलेला नाही. मागील तीन बैठकीपासुन झोन ७ मधील अर्जाची माहिती येणे बाकी आहे. नेहमी पुढच्या बैठकीत खुलासा करण्यात येईल. असे सांगण्यात येते. आचारसंहिता लागण्याची वाट पाहतात असे दिसते. कोणत्याही अवमान करण्याचा आमचा उद्देश नाही. परंतु प्रश्नाचे उत्तर मिळत नाही आमच्या कडुन चुकून कळत न कळत काही झाले तर आम्ही जबाबदार राहणार नाही. यास प्रशासन जबाबदार राहील.

**मा. सभापती :** स.सदस्य श्री. कोकाटे यांनी केलेली सुचना योग्य वाटते. मागील बैठकीत त्यांनी माहिती देण्याबाबत सुचना केली होती. त्या बैठकीत उपआयुक्त (प्र.) उपस्थित होते त्यांनी सांगितले की, त्या संबंधीची संचिका त्यांच्या टेंबलवर आहे. आजच्या बैठकीला ते उपस्थित नाही. उपआयुक्त (म.) आहेत. या संबंधीचे उत्तर कुणी दयावे. स.सदस्यांना नेहमी नेहमी तेच प्रश्न बैठकीत उपस्थित करावे लागतात.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** एखादया मुद्दयावर पुढील बैठकीत खुलासा होईल असे अधिकारी सांगतात. तर पुढच्या बैठकीत ते अधिकारी उपस्थित नसतात अशी टाळाटाळ करणे योग्य नाही. मा. सभापतीच्या म्हणण्याला किंमत नाही असे होऊ नये.

**मा. सभापती :** मागील बैठकीत अधिकारी यांनी सांगितलेले असेल किंवा स्थायी समितीमध्ये आदेश दिलेले असेल ते पुढील बैठकीत माहिती देण्यात यावी अशा वेळी येणाऱ्या बैठकीमध्ये ज्यांना गैरहजर राहवयाचे असेल त्यांनी दुसऱ्या एकादया अधिकाऱ्यांकडे त्या संबंधीची माहिती दयावयास पाहिजे. सभागृहात विचारलेल्या प्रश्नाबाबत अधिकाऱ्यांनी एकमेकांवर ढकलून टाळाटाळ करणे योग्य नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** आचार संहिता व निवडणुक संदर्भ घेऊन आणि निवडणुकीचे कारण व्यवस्थित माहिती मिळत नाही. मागील पाच वर्षात असे भासले नाही. आचारसंहिता लागल्यानंतर कशाप्रकारे कामे करुन घ्यावयाची याची सर्व जाणीव आम्हास आहे. आपण गेल्या वर्षीच्या अंदाजपत्रकात कोणत्या लेखाशिर्षावर किती तरतुद केली व किती खर्च झाला पाणीपुरवठा देखभाल दुरुस्तीवर व जलनि:सारण वर किती तरतुद ठेवली याची माहिती दयावी.

**मुख्यलेखाधिकारी :** पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती आणि जायकवाडी पंप मशीनरी देखभाल दुरुस्तीसाठी ३ कोटी रुपये व पाणी पुरवठा भाडवली खर्चासाठी रुपये ४ कोटी अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आलेली आहे.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** वर्ष संपण्यास फारच थोडे दिवस राहिलेले आहे भांडवली खर्च चार कोटीचे व देखभाल दुरुस्ती मधुन किती खर्च झाला व किती शिल्लक आहे. तसेच खर्च होत नसेल तर इतर वळती करण्यात यावे माझ्या मते चार रुपये खर्च झाले नाही. किती खर्च झाला व किती प्रमाणात झाला याचा खुलासा करण्यात यावा.

**मुखलेखाधिकारी :** ५.६० कोटीची बुकींग झालेली आहे. २.०५ लाख सिडकोसाठी ठेवलेली आहे. यात शासकीय अनुदानाचा देखील समावेश आहे. सुमारे दोन कोटी खर्च झाला असुन ३१ मार्च पर्यंत १ कोटी होईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** एस.आर. साठी का विलंब लागला सहा महिन्यापुर्वी का केलेले नाही. मी पेपरमध्ये वाचले आहे की, मा. आयुक्तांनी पुढील पाच वर्षाचा आराखडा तयार करीत आहे. परंतु आज एक वर्षाची माहिती देण्यात येत नाही.

**कार्य. अभियंता :** चालु आर्थिक वर्षात पाणीपुरवठा भांडवली खर्चासाठी ४ कोटी रुपयाची तरतुद करण्यात आलेली आहे. २ कोटी सिडको अंतर्गत पाईपलाईन वाढीव पाणीपुरवठा व एस.आर. साठी ठेवलेले आहे. त्यासाठी सर्वेक्षण करणे, लेव्हल घेणे. प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणे इ. कामे करावी लागतात. हर्सुल धरणामधुन पाणी घेण्याच्या ५ कोटीचा प्रकल्पाची योजना मेरी नाशिकला पाठविली आहे. मेरी नाशिक यांच्या सम्मती शिवाय धरणाची क्षमता वाढवता येत नाही. १ कोटीचे टेंडर काढले दोन दिवसांत फायनल होईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** अर्थसंकल्पाच्या वेळेस पाण्याची टाकी बांधवयाची हे माहित नव्हते काय. जाधववाडी येथे एस.आर. बांधण्याचे काम का झाले नाही ५ कोटीची योजना केली त्याबद्दल धन्यवाद मा. भोगे साहेब आयुक्त असतांना सर्व्हे झाला आहे. यास ४-५ वर्ष झाले आहे. मात्र आज मेरीचे कारण सांगत आहात. हे योग्य वाटत नाही.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** याच वर्षात हर्सुल धरणाची क्षमता वाढवण्याचे प्रस्ताव पाठवण्यात आला मा. भोगे साहेब आयुक्त असतांना गाळ काढण्यात आला होता मेरीची संम्मती मिळाल्या शिवाय कामाला सुरुवात करता येणार नाही.

**मा. सभापती :** स.सदस्यांचे म्हणणे आहे की, सिडको मध्ये व्यवस्थित पाणी पुरवठा व्हावयास पाहिजे. ४ कोटी भांडवजी खर्च पैकी मिती खर्च झाला.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** आता पर्यंत प्रोजेकट का केला नाही. मेरीचा संबंध नाही. टेंडरला का वेळ लागला आपणाकडे जमिन उपलब्ध नाही काय?

**कार्यकारी अभियंता :** पाण्याचे नियोजित करणे आवश्यक आहे.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** वृत्तमान पत्रात निविदा वाचली एन-७ संप बांधणार व त्याला पाईप टाकुन सप्लाय करणार या ठिकाणी पर्यायी व्यवस्था होती त्यामुळे निविदा काढली. एन-७ येथे जायकवाडीवरुन पाणी मिळणार आहे. हर्सुल धरणा पासुन घेण्याचा दुसरा पर्याय आहे त्यास किती वेळ लागणार.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** एक वर्षाचा कालावधी लागेल मुळ संकल्पना अशी आहे की, आपले मालकीचे जलस्त्रोत असता जायकवाडीवर अवलंबुन राहिल्यास

ऐनर्जी चार्ज वाढत जाईल सध्या हर्सुलधरणाची क्षमता १० एम.एल.डी. ची असुन २० एम.एल.डी. वाढवण्याचा प्रस्ताव मेरीला पाठवलेला आहे. त्याची संम्मती मिळण्यास थोडा वेळ लागेल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** कमी अंतराहुन पाण्याची व्यवस्था व्हावी हर्सुल तलाव १० वर्षानंतर यावर्षी भरला त्यातुन ७-८ एम.एल.डी. पाणी घेण्यात येत असावे. स्वच्छ पाणी मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी आहेत.

**श्री. स.अ. एकबालोद्दीन :** हर्सुलहुन पुरवठा होणारे पाणी पिवळया रंगाचे येते. त्यामुळे आलंग बरोबर टाकण्यात येत नाही. फारच कमी दाबाने पाणी येते. माच्र एप्रिल मध्ये गढुळ पाणी येईल. जेव्हा तपासणी साठी जातात त्यादिवशी स्वच्छ पाणी येते त्यानंतर पिवळे पाणी येते. तक्रार केल्यानंतर दोन दिवस जायकवाडीचे पाणी देण्यात येते.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** आपण पाणी पुरवठा चालु असतांना पाहणी करु

**मा. सभापती :** स. सदस्य श्री. स.अ. एकबालोद्दीन यांनी केंव्हा जावयाचे ठरवून घ्यावे. त्यानुसार आपण जाऊ व नमुने घेवून तपासणीसाठी पाठवू.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** लवकरात लवकर प्रश्न सोडवावा अशी अपेक्षा आहे. ड्रेनेजचे किती बजेट आहे. व किती खर्च झालेला आहे याची माहिती दयावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** ड्रेनेज भांडवली कामासाठी १.५० कोटी व देखभाल दुरुस्तीसाठी ७५ लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे. ६० टक्के खर्च झालेला असेल.

**मुख्यलेखाधिकारी :** १.५० कोटीपैकी ८० लाख रुपये खर्च झालेले आहे. कामे चालु आहेत. ३१ मार्च पर्यंत संपुर्ण खर्च अपेक्षित आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** चालु कामाची यादी तयार केलेली असली पाहिजे.

**श्री. विखारोद्दीन :** पुढच्या बैठकीत संपुर्ण माहिती देण्यात यावी. बजेट किती स्पील ओहर किती, भांडवली कामामध्ये किती, ८० लाखाचे काम झालेले आहे. ७० लाख रुपये शिल्लक असुन देखील संचिकेवर बजेट नाही असा शेरा येतो.

**मुख्यलेखाधिकारी :** १.५० कोटीची तरतुद आहे. ३१ डिसेंबर ८० लाख खर्च झालेला आहे. उर्वरित खर्च ३१ मार्च पर्यंत होण्याची अपेक्षा आहे.

**श्री. विखारोद्दीन :** शिल्लक कामे कोणकोणती आहे कोणकोणते काम होणार नाही. या वर्षात पुर्ण बजेट करणार आहेत काय? झाल्टा ट्रेटप्लॅनसाठी १ कोटीचे बजेट ठेवले होते.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** चिकलठाणा झाल्टा येथील ऑक्सीडेशन प्लॅनसाठी १ कोटीचे बजेट ठेवलेले होते. कार्यकारी अभियंता यांनी सांगितले होते की, सिडको येथे एस.टी.पी. प्लॅनटसाठी लेव्हल मिळत नाही. नविन प्लॅन करणे गरजेचे आहे असे कार्यकारी अभियंता यांनी पटवुन दिले होते. वर्षभरात का झाले नाही.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** चिकलठाणा झाल्टा परिसरात सिडको एम.आय.डी.सी. व इतर खेडीसाठी सिव्हरेस ट्रिटमेंट प्लॅनचे नियोजन ठेवले. नियोजन करण्यात आले असुन त्यासाठी १.२ कोटीची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. दोन वेळेस निविदा मागविण्यात आल्या त्याला रिस्पॉन्स मिळत नाही. दोन्ही वेळा अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करुन मंजुरीसाठी पाठवण्यात आलेले आहे.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** कोणत्या तारखेला निविदा काढण्यात आली त्याचा कालावधी काय? त्याचा कालवधी सहा, १२० दिवस, १८० दिवस ९० दिवस आहे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** निविदा काढुन किमान ४ माहिने झाले असतील तंतोतंत सांगता येणार नाही. निविदेचा ९० दिवसाचा कालावधी असतो. त्यांना निविदा संदर्भात खुलासा मागविण्यात आला होता. खुलासा प्राप्त झाल्यानंतर ९० दिवसाचा कालावधी धरण्यात येईल.

**सौ. राधाबाई तळेकर :** जवाहरकॉलन येथे ७-८ ठिकाणी पाण्याची गळती होते. कार्यकारी अभियंता यांनी सांगितले तसेच कनिष्ठ अभियंता श्री. विटेकर यांनाही फोन करुन माहिती दिली. हेगडेवार दवाखान्याजवळ गुडघ्या इतके पाणी साचते. सदर कामासाठी बजेट नाही व त्याला १५ ते २० हजार खर्च येईल. संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी सांगितले. मग हे पाणी असेच वाहु दयावयाचे का? ८ ते १० ठिकाणी गळती आहे. कार्य अभियंता व रामटेके यांनी दुरुस्त करुन देतो म्हणुन सांगितले होते. परंतु कार्यवाही झाली नाही.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** तीन इंचीच्या लाईनचे साहित्य दोन वर्षाहुन भांडारात उपलब्ध नाही. काल दुरुस्तीचे कामे सुरु केले. विरसावरकर चौक येथे मोठे दुरुस्तीचे काम केले. साहित्य नव्हते. म्हणुन का थांबलेले होते.

**सौ. तळेकर राधाबाई :** ४ इंच व्यासाच्या पाईपलाईन असुन शास्त्रीनगर येथे गळती होते. मट्रेल नसेल तर वाहुन जाऊ देणार काय? पत्र ही दिलेले आहे. जेथे चार इंच व्यासाची पाईपलाईन आहे हेगडेवार दवाखान्याच्या लोकांनी पाण्याच्या लाईनच्या वरती ड्रेनेज लाईन टाकली आहे.

**मा. सभापती :** गळती काढण्याचे प्रमाण कमी दिसते माझ्याही प्रभाग लिकेजस आहेत. घाण पाणी साचल्याने रोगराई पसरेल. गळती लवकर काढण्यात यावी. उदया पाहणी करण्यात यावी तीन दिवसात पुर्ण करावी तसेच ड्रेनेज लाईन व पाण्याची लाईन एकाच ठिकाणी नसावी याची काळजी घेण्यात यावी.

**श्री. विखारोद्यीन :** शासनाकडुन मिळालेल्या ३ कोटी अनुदानात कोणत्या कामावर खर्च झाला. कुणाच्या आदेशाने झाला. तीन कोटीसाठी कुणी मंजुरी दिली.

**मा. सभापती :** जे काम महत्वाचे वाटले ते प्रशासनाकडुन ठेवण्यात आले ३ कोटीच्या निविदापण निघालेल्या आहेत.

**श्री. विखारोद्यीन :** कोणत्याही इमारतीचे भुमीपुजन झाल्यानंतर कोनशिला किती वर्षाने लागते माझ्या वार्डातील दवाखान्याचे भव्य भुमीपुजन होऊन एक वर्ष झाले अदयाप कोनशिल लावण्यात आले नाही.

**शहर अभियंता :** दगड लावलेला होता कुणी घेऊन गेले असतील.

**मा. सभापती :** कोनशिला लावली नसेल तर लवकरात लवकर लावून घ्यावी. करविंग करुन लावण्यात यावी.

**विषय क्र. ५४१/१ :**

दिनांक २१ जानेवारी २००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

**श्री. विखारोद्दीन :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ४ वर कडबा कटरची जागा भाडयाने देण्याबाबत दर कमी करावे या संदर्भात चर्चा झाली होती. सर्वसाधारण सभेत तसा प्रस्ताव ठेवण्यात येईल असे सांगितले होते. काय कार्यवाही केली.

**मा. सभापती :** त्याच बैठकीत मी रुंलीग दिलेले आहे की, याबाबतचा निर्णय अर्थसंकल्पाच्या बैठकीत घेता येईल.

**श्री. विखारोद्दीन :** माझ्या वार्डातील दवाखान्यातील एक्सरे मशीन बाबत इतिवृत्तातील पृष्ठ ५ वर चर्चा केलेली होती व त्यानुसार या बैठकीत सविस्तर माहिती देणार होते.

**मा. सभापती :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. देशपांडे रजेवर गेलेले आहे. प्र. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना एक्सरे संचिकेबाबत माहिती नसावी.

**श्री. विखारोद्दीन :** एक्सरे मशीन बाबतचे टेंडर झालेले आहेत काय एवढी सुध्दा माहिती प्र. अधिकारी यांनी घेतलेली नाही. बैठक होऊन सात दिवस झालेले आहे. तरी माहिती देऊ शकत नाही. अशा प्रभारी पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना हटवले पाहिजे. कधी येणार आहे. आता आचारसंहिता लागेल नंतर तात्काळ कार्यवाही होणार नाही.

**मा. सभापती :** संबंधित आरोग्य वैद्यकीय अधिकारी रजेवरुन आल्यानंतर त्यांना उपस्थित असलेले उपआयुक्त (म.) शिंदे साहेब यांनी या एक्सरे मशीन बाबत माहिती दयावी. या संदर्भात बऱ्याच वेळा सभागृहात चर्चा झालेली असुन सदर आरोग्य विभाग उपआयुक्त(म.) यांच्याकडे असल्याने त्यांनी या संदर्भात कार्यवाही करणे योग्य होईल.

**श्री. विखारोद्दीन :** पान क्र.७ वर स्मशानभुमीचे काम सुरु होईल असे सांगितले होते. परंतु अदयाप काम सुरु झाले नाही.

**शहर अभियंता :** आठ दिवसात काम होईल असे सांगितले नाही. संबंधित ठेकेदारास पाहिले रेट मान्य नसल्यामुळे कामास उशीर होणार आहे.

**श्री. विखारोद्दीन :** महानगरपालिकेतील चार अधिकाऱ्यांना यादया तपासणीसाठी नियुक्ती दिली आहे. यासाठी महानगरपालिका सक्षम आहे की, जिल्हाधिकारी सक्षम आहे याबद्दल माहिती देण्यात यावी. अशी माहिती मिळाली की, १९९९ च्या यादीप्रमाणे काम चालु आहे. परंतु १९९५ ला मनपा च्या निवडणुका झाल्या त्या यादीवर निवडणुक व्हावी. १९९५ यादीत नाव होते त्यापैकी बरीच नावे आताच्या लोकसभा विधानसभाच्या यादीत नाहीत.

**उपआयुक्त (म.) :** निवडणुकीच्या कायदयाप्रमाणे मागची विधानसभासाठी तयार करण्यात आलेली मतदार यादी वापरली जाते. मतदार यादीत काय बदल करावयाचे ते काम मा. जिल्हाधिकारी यांचे आहेत. त्यासाठी मुदत देण्यात आलेली होती. आता विधान सभेची मतदार यादी तुन वार्डनिहाय मतदार यादया तयार करण्याचे काम चालु आहे.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** अधिकाऱ्यांमार्फत वार्ड रचनेप्रमाणे यादया तयार करण्यात येते. त्यात कुणाच्या हस्तक्षेप होऊ नये जेथील मतदार आहे तेथेच जावे जेवढे विधानसभा भाग क्रमांक होते त्यांच्या यादया केल्या काही भाग ग्रामीण मधले आहेत. त्याचे यादयांचे काय करणार ४६२ या यादीत ६०० मतदार शहरातील व ७०० मतदार ग्रामीण मधील आहेत.

**मा. सभापती :** या निवडणुकीच्या बाबी आपण मा. मुख्य निवडणुक आयुक्तांच्या निदर्शनास आणुन दयावे.

**श्री. विखारोद्दीन :** १९९५ ची यादी मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे का पाठविली नाही. ९५ च्या यादीत जी नावे होती ती यामध्ये सामील झाली पाहिजे.

**श्री. देशमुख व्ही.व्ही. :** गजानन महाराज मंदिर व गजाननगर भागात मटनाची दुकाने लिगल पध्दतीने परवानगी दिली का? अनाधिकृत टपऱ्या व मागे व त्याच भागातील ३ मजली इमारत पाडली आज त्या भागात १०x१० फुटाचे दुकाने उभारली जात आहे. त्यालाही आक्षेप आहेत बांधकाम परवानगी घेतलेली असेल तर ठिक आहे. अन्यथा याबाबत उपाययोजना करणार आहात काय? बकरा मटन दुकाने यापुर्वी काढण्यात आलेली होती. रस्त्यात मुत्री आणुन ठेवली त्या मुत्रीच्या लागुन टपरा बसविला आता निवडणुकीच्या कालामध्ये याबाबत दखल घेण्यात यावी व उपाययोजना करण्यात यावी.

**मा. सभापती :** लिगल असेल तर वाद नाही. इनलिगल असेल तर उठविण्यात यावे.

**उपआयुक्त (म.) :** अनाधिकृत बसलेले आहे परवानगी दिलेली नाही. पुर्वी काढण्यात आले होते. बसले असतील तर पुन्हा काढण्याची कार्यवाही होईल.

**श्री. देशमुख व्ही.व्ही. :** भु-विकास बॅक ते उच्चन्यायालय या रस्त्यावरील रस्ता दुभाजकावरील सुंदर औरंगाबाद, असलेले बोर्ड काढण्यात आलेले नाही. त्या बोर्डमुळे रहदारीस अडथळा निर्माण होतो.

**उपआयुक्त (म.) :** १०० बोर्ड काढण्यात आलेले आहेत.

**सौ. तळेकर राधाबाई :** नुसते बोर्ड काढण्यात येऊ नये ॲगल सहीत काढण्यात यावे.

**मा. सभापती :** ॲगल सहित काढावे उपआयुक्तांनी कार्यवाही करावी विषय क्र.१ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

दिनांक २१ जानेवारी २००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ५४२/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, टॉऊन हॉल येथील पोस्ट ऑफिस मागील कब्रस्तान विकसित करणे बाबतच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु. ७,४२,८००/- स्थायी समिती सभा दि. १८-१०-९९ च्या सभेमध्ये विषय क्र. ३०७/४९ अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर कामासाठी निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/३६ दि. २०-११-९९ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या तारखेला एकुण (१९) एकोणाविस निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या तारखेला एकुण सहा (६) निविदा प्राप्त झाल्या त्या उघडण्यात आल्या असता दिलेले दर पुढीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सिद्दीकी मो. अजिमोद्दीन | २७.७८६% | कमी दराने |
| २. | श्री. सय्यद फैजुल्हक | २७% | कमी दराने |
| ३. | श्री. फाईव्ह स्टार कंन्स्ट्रक्शन | १८.६०% | कमी दराने |
| ४. | श्री. असलम पटेल | १७.१८% | कमी दराने |
| ५. | श्री. बसरा कंन्स्ट्रक्शन | १३.१५% | कमी दराने |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | श्री. एस.ए. देशमुख | ११.३% | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.७८६% कमी दराने श्री. सिद्दीकी मो. अजिमोद्दीन यांची निविदा आहे.

करिता सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.७८६% कमी दराची श्री. सिद्दीकी मो. अजिमोद्दीन यांची निविदा स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टॉऊन हॉल पोस्ट ऑफिस मागील कब्रस्तान विकसित करणेच्या कामाचे संदर्भात प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.७८६% कमी दराची श्री. सिद्दीकी मो. अजिमोद्दीन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४३/३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेवरील जायकवाडी येथे (व्हक्युम कॉन्ट्रक्टर) चा पुरवठा करणे बसविणे व चाचणी देणे या कामाची निविदा मागविण्यात आली असुन दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यांचे तुलनात्मक विवरण खालीलप्रमाणे आहेत. अंदाजपत्रकीय रक्कम रु. ६,४५,२२४/-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. कॅपको एजन्सी औरंगाबाद | २% जास्त | रु. ६,५८,१२८/- |
| २. | मे. अमित इंजिनिअर्स औरंगाबाद | १.६%जास्त | रु. ६,५५,५४८/- |

यावरुन सर्वात कमी दर हे मे. अमित अंजिनिअर्स औरंगाबाद यांचे असुन हे दर अंदाजपत्रकीय दराच्या १.६% ने जास्त आहे. म्हणजेच निविदाची रक्कम रु. ६,५५,५४८/- एवढी आहे. सदरील एजन्सी सोबत वाटाघाटी करुन सदरील काम अंदाजपत्रकीय रक्कमेवर रु. ६,४५,२२४/- च्या किंमतीवर काम करण्यास तयार आहे.

तरी मे. अमित इंजिनिअर्स औरंगाबाद यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्थायी समितीच्या विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेवरील जायकवाडी येथे (व्हक्युम कॉन्स्ट्रक्टरचा पुरवठा करणे बसविणे व चाचणी देणे) या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.६% जास्त दराची मे. अमित इंजिनिअर्स औरंगाबाद यांची निविदा असुन त्यांच्याशी वाटाघाटी केल्यानंतर ते अंदाजपत्रकीय म्हणजेच रु. ६,४५,२२४/- या किंमतीवर काम करण्यास तयार आहे तरी त्यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दरावर काम करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळीचे विषय*

**विषय क्र. ५४४/१ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको भागातील सेक्टर एन-४ एफ-१ या भागात १०० मी.मी. आणि १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक र.रु. ४,५४,४५८/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या सन ९८-९९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले होते. त्या अनुषंगाने सदर अंदाजपत्रकास स्थायी समितीने ठराव क्र. ३६०/२ दि. ३-१२-९९ अन्वये मंजुरी मिळाली त्याअनुषंगाने निविदा मागविण्यात आल्या. निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा विक्री झाल्या व स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत तीन निविदा प्राप्त झाल्या त्या पुढीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. पी.पी. फुलवरे | ८% | जास्त दराने |
| २. | श्री. जी.एम. हनुमते | १०% | जास्त दराने |
| ३. | श्री. एम.के. राठोड | ०.१०% | कमी दराने |

उपरोक्त प्रमाणे सर्वात कमी दराची निविदा श्री. एम.के. राठोड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराने होती सदरील निविदा सर्वात कमी दराची असुन ०.१०% दर हे स्पर्धात्मक नसल्यामुळे गुत्तेदार यांना खुलासा मागविला असता संबंधित गुत्तेदार श्री. एम.के. राठोड हे ५% कमी दराने काम करण्यास पत्राव्दारे खुलासा केला आहे.

तरी एन-४ या भागात जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी श्री. एम.के. राठोड यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने स्विकृतीचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको भागातील सेक्टर एन-४ एफ-१ या भागात १०० मी.मी. १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री. एम.के. राठोड यांची निविदा आहे. त्यांच्याशी तडजोड केल्यानंतर ते अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने काम करण्यास तयार असल्याने त्यांचेकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने काम करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४५/२ :**

कार्यकारी अभियंता(पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको एन-७ येथील जलकुंभाच्या आणि एन-७ येथे बांधण्यात आलेल्या जी.एस.आर.ची संरक्षण भितीची उंची वाढविण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु. ४,९१,५००/- चे महाराष्ट्र जि. प्राधीकरण यांच्या ९८-९९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन सदरील अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. २९४/३६ दि. १८-१०-९९ अन्वये मंजुरी मिळालेली असुन त्यानुसार निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण तीन निविदा

विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत तीन निविदा प्राप्त झाल्या त्या पुढीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. रमेश रुढसमुद्र | १.५% | जास्त दराने |
| २. | श्री. संतोष मोटेगावकर | ३.४०% | जास्त दराने |
| ३. | श्री. एस.टी. विखे | -- | अंदाजपत्रकीय दराने |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त निविदामध्ये सर्वात कमी दराची निविदा श्री.एस.टी. विखे यांची असुन अंदाजपत्रकीय दराची आहे. तरी सदरील कामासाठी गुत्तेदार एस.टी. विखे यांची सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकृतीच्या प्रस्ताव स्थायी समितीचा विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-७ येथील जलकुंभ च्या आणि एन-७ येथील बांधण्यात आलेल्या जी.एस.आर. संरक्षण भिंतीची उंची वाढविण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची श्री. एस.टी. विखे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४६/३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. बाबर कॉलनी हत्तेसिंगपुरा स.न.३० मध्ये नविन २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता अंदाजपत्रक र.रु. ८,८०,८१०/- चे परिसर अभियांत्रिकी व बांधकाम विभागाच्या ९६-९७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. मा. स्थायी समितीने दि. १०-१२-९९ ला मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदरील कामाची बी-१ कोरी निविदापत्रके जा.क्र. मनपा/४५/९९/ दि. १४-१२-९९ अन्वये वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्दीस देऊन निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिमतारखेपर्यंत (एकोनाविस) १९ निविदा विक्री झाल्या व त्यापैकी दोन (२) निविदा प्राप्त झाल्या. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एस.चंद्रपाल | ५% | अं.प. दरापेक्षा जास्त दराने. |
| २. | श्री. राजेंद्र वर्दे | १०% | अं.प. दरापेक्षा जास्त दराने. |

तुलनात्मदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्तीच्या दराने श्री. ए.चंद्रपाल यांची निविदा आहे.

परंतु सदरील दर जास्तीचे असल्याने मा. आयुक्तांनी सदरील कामास अंदाजपत्रकीय दराने करण्यास दि. ९-१-२००० रोजी मंजुरी दिलेली आहे. तसेच सदरील गुत्तेदार एस.चंद्रपाल यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास लेखी संमती दिली आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. बाबर कॉलनी हत्तेसिंगपुरा स.न. ३० मध्ये नविन २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची श्री. एस.चंद्रपाल यांची निविदा आहे. त्यांच्यासह झालेल्या वाटाघाटीनुसार ते अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार असल्याने कडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४७/४ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मकसुद कॉलनी येथील वितरण व्यवस्थे साठी १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी र.रु. ४,३६,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात येवुन त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. ४४१/२४ दि. १०-१२-९९ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

कार्यालयाची निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/४५/९९ जी की दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १३ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. सपना कंन्स्ट्रक्शन | ०.५% | कमी दराने |
| २. | श्री. सुरेश बी. साधवानी | २% | जास्त दराने |
| ३. | श्री. राजेंद्र वर्दे | ५% | जास्त दराने |

वरीलप्रमाणेच्या कमी दर हा मे. सपना कंन्स्ट्र. यांचा आहे. परंतु त्यांनी दिलेला दर जास्तीच्या वाटत असल्याने मा. आयुक्त यांनी २% कमी या दराने मान्यता दिलेली आहे. तरी मे. सपना कंन्स्ट्र. यांची निविदा ही अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी या दराची निविदा स्विकृतीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मकसुद कॉलनी येथील वितरण व्यवस्थेसाठी १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी दराची मे. सपना कंन्स्ट्र. यांची निविदा असुन त्यांच्यासह झालेल्या वाटाघाटीनुसार ते अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराने काम करण्यास तयार असल्याने त्यांचेकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराने काम करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४८/५ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पाणीपुरवठा देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी लागणारे सी.आय.स्पेशल खरेदी करावयाचे आहे. त्यासाठी र.रु. ५,६७,९७१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यास स्थायी समितीचा ठराव क्र.

२९१/३३ दि. १८-१०-९९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. निविदा सुचना क्र. ४३/९९ जी की वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून "डी" फार्मवर निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्याखालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. ॲकवाइक्युप इंजिनिअर्स | ०.३२४% | जास्त दराने |
| २. | मे. सुरज इन्टरप्राजेस | २१.३०% | जास्त दराने |
| ३. | श्री. सुरेश बी. साधवानी | ३१.४७% | जास्त दराने |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया कमी दर हा मे. ॲक्वाइक्युप इंजिनिअर्स यांनी दिलेला आहे. परंतु सदरचा दर जास्तीचा वाटत असल्यामुळे मा. आयुक्त यांनी अंदाजपत्रकीय दरानुसार मान्यता दिलेली आहे.

तरी मा. आयुक्त यांनी मान्यता दिल्यानुसार मे. ॲक्वाइक्युप इंजिनिअर्स यांची निविदा अंदाजपत्रकीय दरानुसार स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा देखभाल दुरुस्तीच्या कामाकरिता लागणारे सी.आय.स्पेशल खरेदी करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.३२४% जास्त दराची मे. ॲकवाइक्युप इंजि. यांची निविदा असुन वर प्रस्तावात प्रस्तावित केल्यानुसार मे. ॲक्वाइक्युप इंजि. यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने सी.आय. स्पेशल खरेदी करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४९/६ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शिवाजीनगर जलकुंभापासुन ते इंदिरानगर झोपडपट्टी पर्यंत २५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी र.रु. ५,९६,०७०/- अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास स्थायी समितीची मान्यता ठराव क्र. २८६/२८ दि. १८-१०-९९ नुसार मान्यता देण्यात आली निविदा सुचना क्र. मनपा ३६/९९ जी की दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण चौदा निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. एस.कन्स्ट्रक्शन | ०.०५% | कमी दराने |
| २. | श्री. एजाज अहमद | २% | जास्त दराने |
| ३. | श्री. सुरेश बी साधवानी | ४% | जास्त दराने |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया कमी दर हा मे.एस.कंन्स्ट्रक्शन यांचा आहे. परंतु दिलेला दर जास्तीचा वाटत असल्यामुळे मा. आयुक्त यांनी ५% कमी दराने मान्यता दिलेली आहे. मे. एस.कंन्स्ट्र. यांनी त्यास लेखी मान्यता दिलेली आहे.

करिता मे. एस.कंन्स्ट्र. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी या दराची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावा दर्शविल्याप्रमाणे शिवाजीनगर जलकुंभापासुन ते इंदिरानगर झोपडपट्टी पर्यंत २५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०५% कमी दराची मे. एस.कंन्स्ट्र. यांची निविदा असुन त्यांच्यासह झालेल्या वाटाघाटीनुसार त्यांचेकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने कामे करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५०/७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बारी कॉलनी येथे १०० ते २०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी र.रु. ४,६६,६२९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यास स्थायी समितीची मान्यता घेण्यात आली आहे. निविदा सुचना क्र. ४५/९९ जी की दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या निविदा विक्रीच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण चौदा निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. नंदकुमार घोडेले | ४.९९% | जास्त दराने |
| २. | श्री. बी.ए. काल्डा | ८% | जास्त दराने |

वरीलप्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया कमी दर हा श्री. नंदकुमार घोडेले यांचा आहे. परंतु त्यांनी दिलेली दर कार्यालयास जास्तीचा वाटत असल्यामुळे मा. आयुक्त यांनी अंदाजपत्रकीय दरानुसार असा दर मान्य केला असुन त्यास ठेकेदार श्री. नंदकुमार घोडेले यांनी लेखी संमती दिलेली आहे.

तरी श्री. नंदकुमार घोडेले यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकृतीस्तव विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बारी कॉलनी येथे १०० व २०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची श्री. नंदकुमार घोडेले यांची निविदा असुन त्याच्यासह झालेल्या वाटाघाटीनुसार सदरचे काम त्यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५१/८ :**

मालमत्ता अधिकारी महानगरपालिका मा. आयुक्तांच्या मंजुरीने प्रस्ताव सादर करतात की, मो. संजयनगर गल्ली नं अ-७ मधील अभ्यासिका केंद्राचे इमारतीचा तळमजला पोलिस चौकीसाठी भाडयाने देणे बाबत मा. आयुक्तांची मंजुरी झाली असुन सदरील इमारतीचे तळमजल्याचे क्षेत्र पोलिस चौकी साठी मा. उप. संचालक नगररचना जे भाडे निश्चित करतील ते भाडे महानगरपालिकेकडे भरावे लागेल. या अटीवर संजयनगर गल्ली नं. अ-७ ची अभ्यासिका केंद्र पोलिस चौकीसाठी भाडयाने देणे बाबत प्रस्ताव स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. संजयनगर गल्ली नं. अ-७ मधील महानगरपालिकेचे अभ्यासिका केंद्राच्या इमारतीतील तळमजला मा. उपसंचालक नगररचना यांनी निश्चित करण्यात येणाऱ्या भाडयास अधिन राहुन पोलिस चौकीसाठी भाडयास देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५२/९ :**

नियोजित महात्मा फुले गृहानिमार्ण संस्था, एसटी कॉलनी जाधववाडी येथे १०० व १५० मी.मी. ए.सी. जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक र.रु. १,७१,८१५/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या सन ९८-९९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामावर होणारा खर्च हा स. नगरसेवक स्वेच्छानिधीतुन करण्यात येत आहे. सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी महात्मा फुले गृहनिर्माण संस्था एस.टी. कॉलनी जाधववाडी येथे जलवाहिनी टाकण्याचे अंदाजपत्रक र.रु. १,७१,८१५/- चे मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नियोजित महात्मा फुले गृहनिर्माण संस्था एस.टी. कॉलनी जाधववाडी येथे १०० मी.मी. व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता स. नगरसेवक स्वेच्छानिधीतुन करण्यात येणाऱ्या कामासाठी तयार करण्यात आलेले र.रु. १,७१,८१५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५३/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, विद्युत कॉलनी बेगमपुरा येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ७,०६,४६५/- च्या अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली असून सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविण्यात आली असता नऊ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिमतारखेपर्यंत यापैकी फक्त तीन निविदापत्रके दर भरुन प्राप्त निविदापत्रके दि. २७-१२-९९ रोजी उघउण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. डी. अजितसिंग | ५.००% | जास्त दराने |
| २. | मे. मास्कॉट कंन्स्ट्र. | १०.००% | जास्त दराने |
| ३. | मे. आदिनाथ कंन्स्ट्र. | १०.००% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापैकी श्री. डी. अजितसिंग यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ५% ने जास्त आहेत. सदरील दर जास्त वाटत असल्याने संबंधित गुत्तेदाराला दराच्या वाटाघाटीस्तव बोलावले असता वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे संबंधित गुत्तेदाराने सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्याची तयारी दर्शविली आहे.

तरी श्री. डी. अजितसिंग यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबतच्या प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विद्युत कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची श्री. डी. अजितसिंग यांची निविदा असुन त्यांच्यासह झालेल्या वाटाघाटीनुसार त्यांच्याकडुन सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५४/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, न्यु.एस.टी. कॉलनी कटकटगेट येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ६,९९,५९१/- च्या अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाली असुन सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण बारा कोरी निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी चार निविदा दर भरुन प्राप्त झाल्या प्राप्त निविदापत्रके दि. २२-१२-९९ रोजी उघडण्यात आल्या असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. व्यंकटेश कंन्स्ट्र. | ०.०१% | कमी दराने |
| २. | मे. आदिनाथ कंन्स्ट्र. | ८% | जास्त दराने |
| ३. | मे. जग्गी कंन्स्ट्र. | ९.९९% | जास्त दराने |
| ४. | श्री. के.बी. पार्थीकर कंन्स्ट्र. | १०% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ०.०१% कमी दराची मे. व्यंकटेश कंन्स्ट्र. यांची निविदा आहे.

करिता निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न्यु एस.टी. कॉलनी कटकटगेट येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची श्री. मे. व्यंकटेश कंन्स्ट्र. यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळी सभागृहात सादर केलेला विषय.*

**विषय क्र. ५५५/१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सादीया मार्केटच्यावर बहुउद्देशिय सभागृह बांधावयाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९८-९९ चे जिल्हा दरसुचीनुसार र.रु. १८,३०,८७९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी मा. सर्वसाधारण सभेसमोर सादर करणेस्वत शिफारस केलेली आहे. त्यानुसार मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र. ७६/८ दि. २५-११-९९ च्या इतिवृत्तान्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार कार्यलयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/४५/९९ दि. १४-१२-९९ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण वीस निविदा विक्री झाल्या.

व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण एक निविदा दर भरुन प्राप्त झाली सदरील निविदा दि. २७-१२-९९ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आली त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मोहमंद सलीम | १२.०१% | कमी दराने |

अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.०१% कमी दराची निविदा श्री. मोहमंद सलीम यांची प्राप्त झालेली होती. त्यानुसार मान्यतेस्तव मा. आयुक्त यांचेकडे प्रकरण पाठविले असता मा. आयुक्त महोदय यांनी खालील मुद्याचा विचार करुन निर्णय घेणेस्तव मा. स्थायी समितीकडे पाठविण्याचे आदेश केलेले आहे.

१. एकुण २० निविदा विक्री अंती फक्त एकच निविदा दर भरुन प्राप्त झाली याचाच अर्थ की योग्य स्पर्धा झालेली नाही.
२. एकच निविदा प्राप्त झाली असल्याने जाहीर निविदा सुचना देऊनही निविदा भरण्यात अनियमितता असल्याने कळते.
३. जरी भरलेली निविदा कमी दर भरलेली असली तरी योग्य स्पर्धा होण्याच्या दृष्टीकोनातुन फेर निविदा काढणे योग्य ठरेल.
४. करिता वरील बाबींचा विचार विनिमय होऊन निर्णय घेणेबाबत मा. स्थायी समिती समोर सादर करण्यात यावे. असे आदेशित केलेले आहे.

त्यानुसार योग्य त्या निर्णयास्तव प्रकरण सादर.

**संवाद**

**मा. सभापती :** सादिया मार्केटच्या वर बहुउद्देशिय सभागृह बांधावयाचे रुपये १८,३०,८७९/- चे अंदाजपत्रकावर निविदा मागविण्यात आल्या आहे या कामासाठी २०

निविदा विक्री झाल्या व निविदा भरुन एकच (१) निविदा प्राप्त झाली. सदर ठेकेदार १२.०१ कमी दराने काम करुन देणार आहे. एकाच निविदा प्राप्त झाल्यामुळे मा. आयुक्तांनी स्थायी समितीकडे निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव पाठविलेला आहे. सभागृहाने निर्णय घ्यावा.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** शहर अभियंता यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.०१ टक्के कमी दराची निविदा प्राप्त झालेला अहवाल सादर केला असेल तर निर्णय घेण्यात यावा.

**शहर अभियंता :** २० निविदा विकल्या गेल्या, व एकच निविदा दर भरुन प्राप्त झाली. स्पर्धा झाली नाही. त्यामुळे स्थायी समितीसमोर निर्णयास्तव प्रस्ताव सादर केलेला आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** स्पर्धा झाली किंवा नाही ही बाब वेगळी आहे आर.सी.सी. च्या दुसऱ्या मजल्यावरील काम आहे. १२.०१ टक्के कमी दराने निविदा आहे. व आपण काम करुन घेणार असाल व महानगरपालिकेच्या हिताचे असेल तर मंजुर करण्यात यावे.

**श्री. विखारोद्दीन :** यापुर्वी आपेक्षा जास्त कमी दराने आरसीसीचे कामे करण्यात आलेली आहे. निविदा बी-१ प्रमाणे या प्रस्तावास मंजुरी देण्यास हरकत नाही. आपण हे काम करुन घेऊ शकतो.

**श्री. देशमुख व्ही.व्ही. :** आपण हे काम करु शकतो का याबद्दल शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

**शहर अभियंता :** आपण अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.१५% कमी दराचे काम करुन घेतलेली आहे.

**मा. सभापती :** प्रस्तावातील निविदा १२.०१ कमी दराची आहे. या अगोदर बरीच कामे कमी दराने करुन घेतलेली आहे. चांगले काम होईल याकडे संबंधित अधिकारी यांनी दक्षता घ्यावी प्रस्ताव मंजुरी करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सदिया मार्केटच्यावर बहुउद्दशिय सांस्कृतिक सभागृह बांधण्याच्या कामासाठी प्राप्त झालेली श्री. मो. सलीम यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.०१% कमी दराची निविदा आहे. सदर प्रस्तावावर सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने व त्या अनुषांगाने सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार श्री. मोहमंद सलिम यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.०१% कमी दराची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या नंतर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ०४-०२-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**मा. सभापती स्थायी समिती श्री. नरसिंग ढगे यांचे अध्यक्षतेखाली दि. ४-२-२००० रोजी स्थायी समितीची सभा संपन्न झाली तिचे इतिवृत्त. सभेची सुरुवात "वंदेमातरम्" गिताने दुपारी ठिक ०४.०० वाजता झाली. सभेस खालीलप्रमाणे स.सभासद तसेच अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| २) | स.स.श्री. बचाटे राजकुमार (मामा) | --//-- |
| ३) | स.स.श्री. किशोर तुळशीबागवाले | --//-- |
| ४) | स.स.श्री. स.अ.एकबालोद्दीन स.मो. कुतुबुद्दीन | --//-- |
| ५) | स.स.सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ६) | स.स.श्री. विखारोद्दीन पिता खुदबोद्दीन | --//-- |
| ७) | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| ८) | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | --//-- |
| ९) | स.स.सौ. लता श्रीनिवास दलाल | --//-- |
| १०) | स.स.सौ. विमलताई नंदकुमार मुंडलिक | --//-- |
| ११) | स.स.श्रीमती. गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | --//-- |

**संवाद :**

**सौ. लता दलाल :** माझ्या वार्डात औरंगपुरा येथे उर्दु व मराठी माध्यमाची शाळा आहे. ही शाळा गेल्या १५.२० वर्षापासुन जि.प. शाळेत महानगरपालिकेची शाळा भरत आहे. परंतु ८-१५ दिवसापासुन महानगरपालिकेचे विद्यार्थीना या शाळेबाहेर झाडाखाली बसुन वर्ग भरवितात ही बाब खेदाची असुन याबाबत निषेध नोंदवावा. या शाळेतील मुख्यध्यापिका या मुलींना बाहेर हाकलुन वर्ग भरवितात यांचे कारण काय? याबाबत महानगरपालिका कोणती भुमिका घेणार आहे. शाळेची इमारत जि.प. आहे. परंतु गेल्या कित्येक वर्षापासुनची शाळा भरत असुन महानगरपालिका व जि.प. यांच्यात काय बोलणी झाली याची माहिती द्यावी कारण जि.प. चे विद्यार्थीनी वर्गात बसतात परंतु महानगरपालिकाचे विदयार्थी याच वर्गाचे बाहेर झालाखाली बसण्याचे कारण काय? माझ्या पाहणीत या शाळेत अर्धे वर्ग रिकामे राहत होते. या शाळेचे मुख्याध्यापक यांनी विदयार्थीनीला बाहेर हाकलुन वर्ग भरविणे हा बाब अतिशय खेदाची व लंछनास्पद होय.

**मा. सभापती :** याबाबत शिक्षणाधिकारी यांनी माहिती दयावी.

**प्र. शिक्षणाधिकारी :** या शाळेची इमारत जि.प. ची आहे. गत वेळेस या शाळेचे शिक्षक हस्तांतर झालेले होते. या शाळेचे मुख्याध्यापक यांनी माझ्याकडे लेखी तक्रार केलेली नाही त्यामुळे मला काही करता आले नाही.

**मा. सभापती :** याबाबत मा. आयुक्त यांनी चौकशी करुन मुलांना न्याय मिळेल याची व्यवस्था करावी.

**सौ. राधाबाई तळेकर :** मी गेल्या २-३ वर्षापासुन ज्या जागेबाबत चर्चा करीत आहे. तेथील जागा महानगरपालिकाने रिकामी केली आहे. परंतु त्या जागेवर संबंधित चौधरी नामक व्यक्तींच्या पत्नीचे नावे बोर्ड लागलेला आहे. याबाबत कार्यवाही व्हावी. ही जागा आपली आहे ते सिध्द झाले मग आपण त्याठिकाणी तारकुंपन का करु शकत नाही. सदरची जागा महानगरपालिकेची आहे काय? किंवा सदरची जागा कोणत्या कोणत्या एखादया संस्थेची आहे काय व ती हस्तांतरीत केलेली आहे काय? त्या जागेचे चतु: सिमा काय आहेत. त्याबाबतच्या नोंदी नगररचना व मालमत्ता विभागात नाहीत काय? महानगरपालिकेने या ठिकाणचे अतिक्रमण हटवून काय साधले. या जागेची मालकीहक्क कुणाची आहे या बाबत खुलासा का होत नाही या जागेभोवती पोलिस फोर्स लावून तार कुंपन रोवला का जात नाही. एखादया मुख्यमंत्र्याचे नातेवाईकाचे घर पाडले जाते परंतु दादागिरी करणारे व्यक्तीचेसाठी अतिक्रमण विभाग काहीही करीत नाही तेंव्हा याबाबत महानगरपालिकाने सक्षम राहुन कार्यवाही करावी.

**उपसंचालक नगररचना :** या विभागाने मालमत्ता अधिकारी यांना सिमांकन करुन दिलेले आहे. आता तार फेन्सींग करुन कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** कालच श्री. चौधरी माझ्याकडे आले होते व मी सदरील जागा मनपाची असल्याने सिध्द झाल्याचे त्यांना सांगितले हया ठिकाणी कोणत्याही प्रकारे अतिक्रमण आता होणार नाही व संबंधित स्थळी असलेले मटेरियल काढुन घेऊन तार फेन्सींग करणे आवश्यक आहे.

**सौ. राधाबाई तळेकर :** शिवाजीनगर गारखेडा येथे नाथ प्रांगण या ठिकाणी महानगरपालिकेची तार कुंपन होते. परंतु एका व्यक्तींने ते तोडून बांधकाम चालु केले आहे त्याठिकाणी प्लॉट पाडुन विक्री केली व बांधकाम चालू आहे. याबाबत महापालिकेने परवानगी दिलेली आहे काय? मालमत्ता अधिकारी व अतिक्रमण हटाव पथकास याची कल्पना नाही काय?

**मा. सभापती :** नाथ प्रांगण सर्व्हे नं. ५१/५२ या भागात खुली जागा आहे. त्याठिकाणी महापालिकातर्फे तार फेन्सींग करणेबाबत शहर अभियंता यांना कळविले होते. परंतु नंतर काय कार्यवाही केली याची माहिति दयावी.

**प्रभारी प्रशासकीय अधिकारी :** नाथ प्रांगण ओपन जागेवर काही लोकांनी अतिक्रमण केलेले होते ते अतिक्रमण पाडुन पोलिस पंचनामे करुन बांधकाम पाडण्यात आलेले आहेत व पोलिस कार्यवाही केलेली असल्याने आता त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचे अनाधिकृत बांधकाम चालू नाही.

**सौ. लता दलाल :** प्रशासकीय अधिकाऱ्यांना सर्व बाबतीत कल्पना असते. त्यांनी जाणीपुर्वक या कमी कानाडोळा केलेला आहे व केलेला खुलासा दिशाभुल करणारा आहे.

**मा. सभापती :** नाथ प्रागंण या खुल्या जागेबाबत कोणत्याही प्रकारे संस्थेने महापालिकास हस्तांतर केलेले नाही.

**उप संचालक नगररचना :** सन १९८६-८७ स्थानिक वर्तमान पत्रात जाहिर प्रगटन दिलेली होती की, या ठिकाणची ओपन जागा मनपाकडे हस्तांतरीत झालेली नाही ती महानगरपालिकाकडे हस्तांतर करावी जर त्यांनी हस्तांतर केली नाही तर ती महापालिकाकडे आपोआप निहीत होईल.

**सौ. राधाबाई तळेकर :** या जागेवर मनपाने आपली नावांची पाटी का लावली नाही व तार फेन्सींग कधी करणार?

**शहर अभियंता :** एका आठवडयात संबंधित जागेवर तार फेन्सींग करण्याचे काम सुरु होईल व महानगरपालिकाची पाटी लावण्यात येईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** महानगरपालिकांच्या बऱ्याचशा शाळेत वॉल कंपाऊड व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सिडको एन-७ या शाळेत पाण्याची व्यवस्था नाही. तेव्हा आता उन्हाळा सुरु होणार असुन ज्या ज्या शाळेत पिण्याच्या पाण्याची व टाकीची व्यवस्था नसेल त्याठिकाणी व्यवस्था पुर्ण करावी व १५ दिवसात कार्यवाही होईल अशा प्रकारचे आदेश व्हावेत.

**मा. सभापती :** ज्या शाळेत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही तेथे तातडीने व्यवस्था करावी त्याचप्रमाणे औरंगपुरा व नागेश्वरवाडी या भागातील शाळेत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होणेसाठी संबंधित कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी काळजी घ्यावी व संबंधित झोनमधील कनिष्ठ अभियंता यांना सुचना दयाव्यात.

**श्री. स.अ. एकबालोद्दीन :** माझ्या वार्डातील सिटी कल्ब समोरील हायमॉस्ट बाबत काय झाले.

**मा. सभापती :** शासकीय निधी महानगरपालिकास रु. ५.०० कोटी मिळणार आहे. त्यामधुन पाहिल हे काम करावे. सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर झालेला आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** पाणी पुरवठा विभागातील कार्यरत असणारे सबओव्हर रसिअर व कनिष्ठ अभियंता कर्मचारी हे साईटपर काम करीत असतात. स्वत:चे वाहन वापरतात परंतु त्यांना पेट्रोल भत्ता वाढवून मिळणेची मागणी आहे त्या कर्मचाऱ्यांना सध्याच्या महागाईप्रमाणे व वाढती पेट्रोल दरवाढ लक्षात घेता शहरातील विविध भागात काम करीत फिरणे परवडत नाही. तेव्हा याबाबत चर्चा होऊन निर्णय व्हावा.

**मा. सभापती :** संबंधित कर्मचाऱ्यांना सन १९८९ ला पेट्रोल भत्ता रु. ३००/- देण्यात येत होता. त्यानंतर सन १९९६ ला स्थायी समितीने चर्चा करुन रु. ५००/- मंजुरी दिली होती. आता मात्र रु. १२००/- देणेबाबत प्रशासनाने विचार करावा.

**सौ. लता दलाल :** कनिष्ठ अभियंता यांनी माझ्याकडे निवेदन दिलेले आहे व तेच निवेदनाच्या प्रती संबंधित पदाधिकारी मार्फत प्रशासनाकडे शिफारशीने जातात. तेव्हा त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** कनिष्ठ अभियंता यांचे वाहन भत्ता मिळणेबाबतचे निवेदन यापुर्वीच दिलेले आहे.

**मा. सभापती :** सब ओव्हरसिअर/कनिष्ठ अभियंता व प्रशासनातील कर्मचारी यांचे पेट्रोल भत्ता वाढवून मिळणेचे निवेदने वारवांर दिलेले आहेत. सध्या पेट्रोल दरवाढ लक्षात घेता कर्मचाऱ्यांना न परवडणारा भत्ता आहे. यासाठी १२००/- प्रतिमहा वाहन भत्ता म्हणुन मंजुरी देणेची शिफारस स्थायी समिती करिता असुन याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे जे ठराविक वेतनावरील वाचनालयात काम करणारे कर्मचारी आहेत त्यांना दैनिक वेतनाचा दर देणे बाबत प्रशासनाकडे शिफारस करण्यात येते.

**सौ. लता दलाल :** वाचनालयात काम करणारे दैनिक वेतनावरील वरील कर्मचारी गेल्या १४ वर्षापासुन कार्यरत आहेत ते देनंदिन ४/५ तास काम करतात. तरीही ते अंशकालीन म्हणुन आहेत. त्यांचेकडुन पुर्ण दिवस भरावे काम घेवून दैनिक वेतनाचा दर लागू करावा.

**मुख्यलेखाधिकारी :** बालवाडी शिक्षिकांना मानधन म्हणुन रु. ७००/- दिले जाते तोच दर या कर्मचाऱ्यांना दिला जातो. कारण या कर्मचाऱ्यांचा काम करण्याचा अवधी फक्त ४ ते ५ तासाचा असतो.

**सौ. लता दलाल :** वाचनालयातील कर्मचाऱ्यांना दैनंदिन ८ तास करवून घ्यावे व त्यांना दैनिक वेतनाचा दर लागू करावा कारण गेली १३ ते १४ वर्षापासूनचे हे कर्मचारी काम करीत आहेत व सध्या कर्मचारी फिक्स पे वर काम करतात. त्यांना दैनिक वेतनाचा दर लागू करावा.

**मा. सभापती :** सर्वसाधारण सभेमध्ये असा प्रस्ताव मंजुर झालेला आहे की, जे कर्मचारी फिक्स पे वर काम करतात त्यांना दैनिक वेतनाचा रेट देण्यात यावा.

**प्र.शिक्षणअधिकारी :** महापालिकेच्या तीन वाचनालयातील कर्मचारी ८/८ तास वाचनालयात काम करतात. माजी उपआयुक्त (म.) यांना मी सांगितले होते. परंतु ते त्यांनी ऐकुन घेतलेले नाही.

**मा. सभापती :** वाचनालयातील कर्मचारी जे ३ ठिकाणी ८/८ तास काम करतात. त्यांना दैनिक वेतनाचा दर लागू करावा.

**सौ. राधाबाई तळेकर :** जवाहर कॉलनी येथील शाळेत विद्यार्थी/विद्यार्थीनसीसाठी शौचालये नाहीत ते बांधण्याची व्यवस्था व्हावी.

**शहर अभियंता :** याबाबत अंदाजपत्रकात तरतुद केलेली असून काम होणार आहे.

**सौ. राधाबाई तळेकर :** माझ्या वार्डातील १५/२० घरांना पाणी पुरवठा व्यवस्थित मिळत नाही. याबाबत कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी कार्यवाही करावी व पाईपलाईन ४ टाकून द्यावी सध्या उन्हाळा येत आहे. याबाबत दुर्लक्ष होता कामा नये.

**मा. सभापती :** ठिक आहे कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी कार्यवाही करावी.

**सौ. लता दलाल :** माझ्या वार्डातील दोन कामे ड्रेनेजचे ए-१ ची आहेत याबाबत कार्यवाही व्हावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सिडकोतील संप हाऊसचे उद्घाटन २६ जानेवारी रोजी झाले परंतु त्याबाबत अदयापही कार्यवाही झाले नाही. याठिकाणी ८० ते ८५ लाखाचा खर्च महापालिकास होता परंतु महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने पैसे न भरुन घेता ४ दिवसात कार्यवाही करुन पाण्याच्या प्रश्नामुळे मानवतेच्या दृष्टीने विचार करुन कनेक्शन दिला. परंतु महापालिकाने अदयापही कनेक्शन चार्जेस भरलेले नाही. व टाळाटाळ केली जाते ही बाब दुदैवी आहे. याचा खुलासा व्हावा.

**कार्यकारी अभियंता :** संप हाऊस बाबतचे महराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने देवू केलेले कनेक्शन बाबत जे चार्जेस भराावयाचे राहीले असून ते तातडीने भरण्यात येतील.

**प्र.उपअभियंता (वि.) :** रु. ७०/- हजाराचे कोटेशन विद्युतमंडळाचे असल्याने कळाले आमच्याकडे आले नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सिडको भागातील जवळपास २५ हजार लोकांना प्रश्न असुन या भागात १/२ तासापेक्षा जास्त वेळ पाणी पुरवठा होत नाही. महाराष्ट्र राज्य

विद्युत मंडळाने पैसे भरण्याची जबाबदारी महापालिकेची नाही काय? रु. ७०/- हजाराचे कोटेशन नसुन रु. २७/- हजाराचे कोटेशन आहे. जवळपास ३.५० लाखाचे होते ते कमी करण्यात आलेले आहे.

**मा. सभापती :** विद्युत मंडळाचे संप हाऊसचे कनेक्शन चार्जेस रु. २७/- हजाराचे तिन दिवसात भरणा करण्याची कार्यवाही संबंधित विभागाने करावी. आता विषय क्र. १ ला सुरुवात करावी.

**विषय क्र. ५५६/१ :**

दिनांक २८-०१-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

**श्री. विखारोद्यीन :** मागील इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ६ मध्ये चर्चा केल्यानुसार माझ्या वार्डातील आरोग्य केंद्राचा कोनशिला झाला परंतु आरोग्य केंद्रामध्ये गेल्या वर्षभरापासुन एक्स-रे मशीन आलेली नाही याबाबतचे टेंडर झालेले आहे. परंतु आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी अद्यापही काहीच केलेले दिसत नाही. व ते स्वतः रजेवर आहेत. कधी येणार आहेत. या महिन्यात ३० तारखेला येणार होते का आले नाही? त्याचप्रमाणे माझ्या वार्डातील रु. ३.५० लाखाचे कामाचे रु. २७ हजाराचे एवढे कमी क्वोर्टशन तयार केलेले आहे. येथील काम माझे वार्डातील प्रलंबीत आहे. सारखे विचारणा करुनही संबंधित अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देतात याबाबत ठोस भुमिका घ्यावी.

**मा. सभापती :** संबंधित कामाचे निविदा प्राप्त झाली आहे. आता निगोशिएशन ला संबंधित एजन्सीजला बोलविले आहे येत्या २० तारखेपर्यंत काम होईल.

**शहर अभियंता :** हमालवाडा स्मशानभुमीतील वाढीव कामाचे अंदाजपत्रक तयार करुन मंजुरीस्तव पाठविले आहे.

**मा. सभापती :** हमालवाडा स्मशानभुमी येथील थाबंलेले कामातुन रु. १.७० हजार शिल्लक राहिलेले होते. तसेच पुन्हा रु. १.०० लाखाचे वाढीव काम मंजुरीस्तव तयार करुन कामास सुरुवात करावी.

**सौ. लता दलाल :** मागील सभेत स.स.सौ. तळेकर यांनी प्रश्न उपस्थित केला होता की, शहरातील होर्डींग्ज एंग्ल्स जे आहेत ते मुदतीनंतर काढुन घ्यावे ते अद्यापही काढलेले नाही व होर्डींग काढीत असतांना तेथील एंगल्स सहीत काढावेत. नसता एंगल्स राहिल्यानंतर पुन्हा त्याठिकाणी विना परवाना होर्डींगस बसविल्या जातात. या कामी संबंधित अधिकारी यांनी योग्य ती दखल घ्यावयास हवी. तसेच केबल जाईन्टर संबंधी पद निर्मिती करण्यास मंजुरी व्हावी.

**सौ. राधाबाई तळेकर :** मेहेरसिंग नाईक, गजाननगर येथील होर्डींगजचे परवानगी आहे काय? जर मुदत संपलेली असल्यास अथवा विना परवनगी असल्यास त्या तातडीने काढावीत. त्यासोबतच खांबासहीत काढण्याची कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** होर्डींगज काढुन घेण्याबाबतची कार्यवाही मालमत्ता अधिकारी यांचे मार्फत होते. त्यांनी याबाबत तातडीने कार्यवाही करावी. व एंगल्स सहीत काढावे

अशा सुचना उपआयुक्त (म.) यांना देण्यात येतात. केबल जाईन्टरचे पद निर्मिती करुन ते भरण्याची कार्यवाही प्रशासनाने करावी.

**ठराव :**

दिनांक २८-१-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ५५७/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महावीर चौक ते रेल्वेस्टेशन या मुख्य रस्त्यावरील सेंट्रल पथदिव्याकरिता विद्यूतीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ९,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली असुन या कामाकरिता निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक २७-१२-९९ रोजी उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. महाराष्ट्र इलेक्ट्रीकल | ३.००% | जास्त दर |
| २. | मे. प्रगत इलेक्ट्रीकल | ४.००% | जास्त दर |
| ३. | मे. शाम इलेक्ट्रीकल | ५.००% | जास्त दर |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. महाराष्ट्र इलेक्ट्रीकल यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.००% जास्त आहेत. सदरील दर जास्त वाटत असल्याने संबंधित ठेकेदारास दराच्या वाटाघाटीस्तव बोलवले असता वाटाघाटी ठरल्याप्रमाणे ठेकेदाराने सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.००% जास्त दराऐवजी सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्याची तयारी दर्शविली आहे.

तरी मे. महाराष्ट्र इलेक्ट्रीकल यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महावीरचौक ते रेल्वेस्टेशन या मुख्य रस्त्यावरील सेंट्रल पथदिव्याकरिता विद्युतीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची मे महाराष्ट्र इलेक्ट्रीकल यांची निविदा असुन त्यांचेसह झालेल्या वाटाघाटीप्रमाणे सदरचे काम त्यांचेकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५८/३ :**

कार्यकारी अभियंता पा.पु.व.ज.नि. यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, उत्तमनगर येथे त्रिमुर्ती हॉस्पीटल मागील गल्लीत १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन साफ करुन टाकणे व २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण १५ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण ५ पाच निविदा प्राप्त झाल्या त्याचा निविदा दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. ए.एच. आग्रे | ३७.२९% | कमी दराने |
| २. | मे. संधु कंन्स्ट्रक्शन | ३१.३३% | कमी दराने |
| ३. | श्री. शेख सलीम अहेमद | २८.३६% | कमी दराने |
| ४. | श्री. बी.ए. काल्डा | २५.८०% | कमी दराने |
| ५. | मे. युनायटेड कंन्स्ट्रक्शन | २२.२०% | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा श्री. ए.एच. आग्रे यांची असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.२९% कमी दराने आहे.

तरी निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दर्शविल्याप्रमाणे उत्तमनगर येथे त्रिमुर्ती हॉस्पीटल मागील गल्लीत १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे व २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.२९% कमी दराची श्री. ए.एच. आग्रे याची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५९/४ :**

कार्यकारी अभियंता पा.पु.व.ज.नि. यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन ९९-२००० च्या उन्हाळयाकरिता नागरी क्षेत्रात तातडीच्या पाणी पुरवठा योजने अंतर्गत शासनाने प्रस्ताव पाठविण्याबाबत कळविले होते. त्याअनुषंगाने शहराच्या विविध भागात एकुण ८५ विंधन विहिरी खोदुन त्यावर हातपंप बसविण्यासाठी शासनाचे अनुदान प्राप्तीकरिता प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

एकुण ८५ हातपंप कामासाठी रु. २४,०२,६२५/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा ठराव क्र. ८९/३ दिनांक १३-१२-९९ अन्वये मान्यता मिळाल्यानंतर वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्दीस देण्यात येवून निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या शेवटच्या तारखेपर्यंत एकुण ११ अकरा निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेपर्यंत ८ आठ निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यांच्या तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. नंदकुमार घोडेले औरंगाबाद | १८% | कमी दराने |
| २. | मे. उज्वल बोअरवेल्स नाशिक | १७% | कमी दराने |
| ३. | लोहिया बोअरवेल्स बीड | १३.७% | कमी दराने |
| ४. | बैनगंगा बोअरवेल्स नाशिक | १३.५% | कमी दराने |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | अनुराग बोअरवेल्स औ.बाद. | १०% | कमी दराने |
| ६. | मे. प्रशांत रायकर औरंगाबाद | ९% | कमी दराने |
| ७. | मे. बी.आर. डागा बिड | ६.५५% | कमी दराने |
| ८. | मे. मयुर बोअरवेल्स जिंतूर | -- | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्टया मे. नंदकुमार घोडेले औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% कमी आहे. तरी सर्वात कमी दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन ९९-२००० या उन्हाळयाकरिता नागरिक्षेत्रात तातडीच्या पाणीपुरवठा योजने अंतर्गत ८५ विंधन विहीरी खोदून त्यावर हातपंप बसविण्यासाठीच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% कमी दराची श्री. नंदकुमार घोडेले यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ५६०/१ :**

प्र. कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मी सादातनगर स्लम भागातील नाल्यास खांडकी लायनिंग करणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते यांच्या वर्ष सन ९८-९९ च्या दरसुचीनुसार रु. १६,४५,०८३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले सदरील कामा "शासकीय अनुदान" या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरचा अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळालेली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखेपर्यंत एकुण ३६ निविदा विकल्यागेल्या व स्विकारणेच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्या खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अब्दुल सलाम | २२.३% | कमी दराने |
| २. | बसरा कंन्स्ट्रक्शन | १४.९९% | कमी दराने |
| ३. | श्री. डी. अजितसिंग | १०% | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.३% कमी दराची असलेली श्री. अब्दुल सलाम यांची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला सादातनगर स्लम भागातील नाल्यास खांडकी लायनिंग करणे बाबत कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.३% कमी दराची श्री. अब्दुल सलाम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६१/२ :**

प्र. कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. भिमनगर भावसिंगपुरा स्लम येथील नाल्यास महाजन क्लिनिक पासुन श्री. एकनाथ भालेराव यांच्या घरापर्यंत संरक्षित भिंत बांधणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते यांच्या वर्ष ९७-९८ च्या दरसुचीनुसार रु. ४६,७५,९००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम हे शासकीय अनुदानातुन करण्यात येईल. सदरच्या कामाकरिता सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळालेली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता अंतिमतारखेपर्यंत एकुण २५ निविदा विकल्या गेल्या व स्विकारणेच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण पाच निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्या खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अब्दुल सलाम | १८.३% | कमी दराने |
| २. | नंदकुमार घोडेले | २.३३% | कमी दराने |
| ३. | अशोक कन्स्ट्रक्शन | ७.८६% | जास्त दराने |
| ४. | एलोरा कंन्स्ट्रक्शन | ८.८६% | जास्त दराने |
| ५. | खर्डीकर कंन्स्ट्रक्शन | १०.१% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.३% कमी दराची असलेली श्री. अब्दुल सलाम यांची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भिमनगर भावसिंगपुरा स्लम येथील नाल्यास महाजन क्लिनिक पासून श्री. एकनाथ भालेराव यांच्या घरापर्यंत संरक्षित भिंत बांधणे बाबतच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.३% कमी दराची श्री. अब्दुल सलाम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६२/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम ९९-२०० अंतर्गत छत्रपतीनगर गारखेडा येथे मा. आमदार श्री. बसयै बंन्धु यांचे निधीतुन सांस्कृतिक सभागृह बांधणेच्या सा.बां. विभागाचे सन ९८-९९ चे दरसुचीनुसार र.रु. ५,०१,०५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त यांनी दि. २४-११-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार वरील कामास्तव कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/३५/९९ दि. २०-११-९९ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण १८ अठरा निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण २ दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एस.एम. सज्जाद | ६% | जास्त दराने |
| २. | सुरेश साधवानी | १३% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प. दरापेक्षा श्री. एस.एम. सज्जाद यांची ६% जास्त दराची निविदा प्राप्त झाली आहे. परंतु सदर निविदा अं.प. दरापेक्षा जास्त दराची असल्याकारणाने मा. आयुक्त यांनी आदेशित केल्यानुसार सदर गुत्तेदारास वाटाघाटीस बोलवले असता गुत्तेदाराने अं.प. दरापेक्षा १% कमी दराने काम करण्याची तयारी दर्शविली आहे. व त्यास मा. आयुक्त यांनी दि. २९-१-२००० अन्वये मान्यता दिलेली आहे. सबब श्री. एस.एम. सज्जाद यांची अं.प. दरापेक्षा ६% जास्त दराऐवजी दराचे वाटाघाटीनुसार अं.प. दरापेक्षा १% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम ९९-२००० अंतर्गत छत्रपतीनगर गारखेडा येथे मा. आमदार श्री. बसैय्ये बंधू यांचे निधीतून सांस्कृतिक सभागृह बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६% जास्त दराची श्री. एस.एम. सज्जाद यांची निविदा असून त्यांचेसह झालेल्या वाटाघाटीप्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराने त्यांचेकडुन सदरचे काम करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६३/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संत एकनाथ रंगमंदिर येथे दुरुस्त्या करणे बाबत सा.बां. विभागाचे सन ९८-९९ चे दरसुचीनुसार रक्कम रु. ४,९७,०८६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त यांनी दि. ८-१२-९९ अन्वये मान्यता दिलेली असून मा. स्थायी समितीने विषय क्र. ४४०/२३ दि. १०-१२-९९ चे इतिवृत्तान्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/४६/९९ दि. १५-१२-९९ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १९ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | हुसेन अली | १०% | जास्त दराने |
| २. | नंदकुमार घोडेले | ४.९९% | जास्त दराने |
| ३. | राजेंद्र वर्दे | ७% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प. दरापेक्षा ४.९९% जास्त दराची निविदा श्री. नंदकुमार घोडेले यांची प्राप्त झाली आहे. परंतु सदर दर जास्त वाटत असल्याकारणाने गुत्तेदारास वाटाघाटीस्तव बोलावले असता मा. आयुक्त यांनी दिनांक २८-१-२००० अन्वये अंदाजपत्रकीय दराने मान्यता दिलेली आहे.

सबब श्री. नंदकुमार घोडेले यांची अं.प. दरापेक्षा ४.९९% जास्त ऐवजी दराचे वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकीय दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदिर येथे दुरस्ती करणेच्या कामाकरिता मागविण्यात आलेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची श्री. नंदकुमार घोडेले यांची निविदा असुन त्यांचेसह झालेल्या वाटाघाटीप्रमाणे त्यांचेकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने काम करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६४/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, चिश्तीया कॉलनी चौकात वाहतुक नियत्रंक बसविण्यासाठी वाहतुक शाखेतर्फे अनुदान प्राप्त झाले आहे. त्यानुसार सदरील चौकात सिग्नल बसविण्याचे अंदाजपत्रक तयार केले असून ते र.रु. ३,८८,०००/- चे आहे करिता अंदाजपत्रक प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याल्याप्रमाणे चिश्तीया कॉलनी चौकात वाहतुक नियत्रंक बसविण्याचे कामाकरिता र.रु. ३,८८,०००/- तयार केलेले अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६५/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, स्टेट बॅक ऑफ इंडिया चौकात वाहतुक नियत्रंक बसविण्यासाठी वाहतुक विभागातर्फे सन ९९-२००० साठी अनुदान प्राप्त झाले आहे. त्यानुसार या चौकात वाहतुक सिग्नल बसविण्याचे अंदाजपत्रक तयार केले असून ते र.रु. ३,८८,०००/- चे आहे तरी प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्टेट बॅक ऑफ इंडिया चौकात वाहतुक नियत्रंक बसविण्यासाठी कामाकरिता तयार करण्यात आलेले र.रु. ३,८८,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६६/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, तोतला हॉस्पिटल ते व्यंकटेशनगर या रोडवर पथदिवे बसविण्याकरिता व विदयुतीकरण करण्याच्या कामाची निविदा रु. ४.०० लक्षची मे. विटा इलेक्ट्रीकल औ.बाद यांना २३.६६% कमी दराने मंजुर करण्यात आले आहे. मे विटा इले. यांना सदरील कामाचे २% रक्कम भरणे बाबत समरणपत्र देऊन पण पैसे भरल्या नसल्यामुळे या निविदेतील व्दितीय क्रंमाकाची निविदा मे

लुना इलेक्ट्रीकल औरंगाबाद यांची आहे. त्यांनी बीटा इले. यांच्या दरावर २३.६६% कमी या दरावर काम करण्याची तयारी दर्शविली आहे.

तरी मे. लुना इले. यांना मंजुरी देणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे तोतला हॉस्पीटल ते व्यंकटेशनगर या रोडवर पथदिवे बसविणे व विद्युतीकरण करणेच्या कामासाठी मे. विटा इलेक्ट्रीकल यांची निविदा स्विकारण्यात आली होती. त्यांना सदरील कामाचे २% रक्कम भरणे बाबत स्मरण पत्र देवून ही त्यांनी पैसे न भरल्याने व्दितीय क्रमांकाचे निविदाधारक यांनी बिटा इलेक्ट्रिकल यांचेच दरावर म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.६६% कमी दराने काम करण्याची तयारी दर्शविल्याने सदरचे काम मे लुना इलेक्ट्रीकल यांचेकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.६६% कमी दराने काम करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६७/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, विविध स्लम विभागात सोडीयम व फिक्चर लावण्यासाठी विदयुत साहित्य खरेदी करण्याकरिता निविदा मागविण्यात आल्या. असता प्रामुख्याने तीन कंपनीच्या निविदा प्राप्त झाल्या. १. बजाज कंपनी २. फिलिप्स कंपनी ३. क्राम्पटन कंपनी या कंपन्याचे निविदापत्रके प्राप्त झाले आहेत. तुलनात्मकदृष्टया खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ. क्र. | विदयुत साहित्य | एकुण नग अं. पत्रक | मे. बजाज इले. कंपनी. | मे फिलिप्स इं. कंपनी | मे. क्राम्पटन ग्रिव्हज कंपनी |
|---|---|---|---|---|---|
| १. | १५० वॅट एच.पी.एस.बी. फिटींग | १८० | २२८९=०० | २७९९=०० | १८००=०० |
| २. | १५० वॅट एच.पी.एस.वी. लॅम्प | १००० | ५२४=०० | ५४०=०० | ५१०=०० |
| ३. | ४-४० वॅट फिक्चर | ९०० | ६७८=०० | ८१९=०० | ६४०=०० |
| ४. | ४-४० वॅट टयुब | ९०० | ४१=०० | ४०=०० | ४२=०० |

वरील दर्शविलेल्या तुलनात्मक दरानुसार अ.क्र. १,२,३ विदयुत साहित्याचा पुरवठा करिता मे. क्रॉम्पटन ग्रीव्हज कं. दर सर्वात कमी आहेत. अ.क्र. ४ विदयुत साहित्य पुरवठा करिता मे. फिलिप्स कं. दर सर्वात कमी प्राप्त आहेत तरी वरील दोन्ही कंपनीच्या दरास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव सादर व रु. १० लक्षचा प्रस्तावास मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विविध स्लम विभागात सोडियम व फिक्चर लावण्यासाठी विद्युत साहित्य खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दरानुसार अनुकमांक १,२,३ विद्यूत साहित्याच्या पुरवठा करिता मे. क्राम्पटन ग्रिव्हज व अनुक्रमांक व विद्यूत साहित्य पुरवठा करिता मे. फिलिप्स कंपनीचे दर सर्वात कमी असल्याने वरील दोन्ही

कंपनीच्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच प्रस्तावित रु. १० लक्षच्या प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६८/९ :**

उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत प्राणी संग्रहालयातील सर्पाधानाची खाद्य खर्चासह सर्पाची देखभाल करणे करिता सन २०००-२००१ या एका वित्तीय वर्षाकरिता वार्षिक ठेका मासिक पध्दतीने देण्याबाद्दलचे वर्तमान पत्राव्दारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. पैकी एक निविदा प्राप्त झाली.

| अ. क्र. | निविदा धारकाचे नांव | दर |
|---|---|---|
| १. | श्री. बबनराव रावजी उजिवाल | पतिमहा/प्रति सर्प (खाद्याखर्चासह) रु. १४०.०० |

वरील प्रमाणे एकच निविदा प्राप्त झाल्याने सदर निविदाधारक सोबत झालेल्या वाटाघाटीनंतर गत वर्षीप्रमाणे प्रतिमहा/प्रतिसर्प (खाद्यखर्चासह) रु. १२०.०० (रु. एकशेविस फक्त) देण्याचे मान्य केले आहे.

तरी वरील प्रमाणे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत प्राणी संग्रहालयातील सर्पालयातील खाद्य खर्चासह सर्पाची देखभाल करणे करिता एकच निविदा प्राप्त झाला. निविदा धारक श्री. बबनराव रावजी यांचेसह झालेल्या वाटाघाटीनुसार मागील दर म्हणजेच रु. १२०/- प्रतिसर्प, प्रतिमहा (खाद्य खर्चासह) या दरास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६९/१० :**

उप-आयुक्त (म.) महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका अंतर्गत प्राणी संग्रहालयासाठी सन २०००-२००१ या एका वित्तीय वर्षाकरिता बीफ (खन्नी) लुसर्नधास, शाळु, कडबा, कडबा, बाटुक, मासोळी, उस यांच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत. प्राप्त निविदापैकी निविदाधारकाचे नांव व त्यांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

१) **बीफ खन्नी :-** बीफ खन्नी करिता (४) कोऱ्या निविदांची विक्री झाली असुन (४) निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याखालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | अब्दुल हमीद शेख हनीफ सिल्लेखाना, औरंगाबाद. | दर/ किलो. रु. २०.०० |
| २. | फेरोजखॉन अ. रहेमानखॉन सिल्लेखाना औरंगाबाद | रु. ३२.०० |
| ३. | शे. खलील शे. चॉद सिल्लेखाना, औरंगाबाद | रु. ३४.०० |
| ४. | मुसा अ. करीम सिल्लेखाना औरंगाबाद | रु. ३६.०० |

तुलनात्मकदृष्टीने अब्दुल हमीद शेख हनीफ औरंगाबाद यांचे दर प्रतिकिलो रु. २०.०० हे कमी आहेत. परंतु त्यांनी निविदेची छायाप्रत काढुन त्याचेवर आपले दर भरले असल्याने त्यांची निविदा विचारात घेतली गेली नाही.

दुसऱ्या क्रमांकाचे श्री. फेरोजखॉन अ. रहेमान खॉन यांचेशी वाटाघाटी केल्यानंतर बीफ खन्नीचे दर रु. २०.०० प्रतिकिलो गत वर्षाप्रमाणे पुरवठा करण्यास तयार असल्यामुळे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

२) **मासोळी : -** मासोळी करिता (१) कोरी निविदा विक्रीस गेली असून (१) निविदा विक्रीस गेली असून (१) निविदा प्राप्त झाली आहे. त्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | दर रु. पै/किलो |
|---|---|---|---|
| १. | श्री. मुमताज अहमद औरंगाबाद | कतला | ६३.५० |
| | | राहु | ६३.५० |
| | | मिरगळ | ६३.५० |

तुलनात्मकदृष्टीने एकच निविदा प्राप्त झाल्याने यांचेशी झालेल्या चर्चेनंतर श्री. मुमताज अहमद यांचे मासोळीचे दर रु. ५७.५० प्रतिकिलो गतवर्षी प्रमाणे करण्यास तयार असल्याने प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

३) **लुर्सनघास :-** या करिता (४) कोऱ्या निविदापत्रकाची विक्री झाली असुन (३) निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यांचे दर खालीप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | निविदाधारकाचे नांव | प्रति किलो. |
|---|---|---|
| १. | जनार्दन कोंडाजी शेळके, अब्दीमंडी | १.६४ |
| २. | रावसाहेब सखाराम नवपुते | १.६९ |
| ३. | संताराम बंडुजी नवपुते | १.९५ |

तुलनात्मकदृष्टीने श्री. जनार्धन कोडाजी शेळके अब्दीमंडी यांचे लुर्सनधासाचे दर प्रतिकिलो रु. १.६४ कमी दराची निविदा मान्य करण्यास हरकत नाही. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

४) **शाळु कडबा व कडबा बाटुक :-** याकरिता एकुण (४) कोऱ्या निविदांची विक्री झाली असून (३) निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | शाळु ज्वारी बाटुक | शाळु ज्वारी कडबा |
|---|---|---|---|
| १. | जनार्दन शेळके, अब्दीमंडी | रु. ६१००.०० प्रतिटन | रु. ४९००.०० प्रतिटन |
| २. | शेख रशीद शहबुद्दीन | रु. ६४००.०० | रु. ५२०० प्रतिटन |
| ३. | शेख इसाक शेख फकीर रा. जांभाळी. | रु. ६५००.०० प्रतिटन | रु. ५०००.०० प्रतिटन |

तुलनात्मकदृष्टीने श्री. जनार्दन शेळके यांचे दर कमी आहेत. यांचेशी झालेल्या चर्चेनंतर श्री. जनार्दन शेळके यांची शाळु कडबा प्रतिटन रु. ४१५०/- व शाळु वाटुक प्रतिटन रु. ५०००/- गतवर्षाप्रमाणे पुरवठा करण्यास तयार आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

५) **ऊस:-** याकरिता (१) कोरी निविदा विक्रीस गेली असून (१) निविदा प्राप्त झाली आहे. त्याचे दर खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. जनार्दन शेळके अब्दीमंडी | रु. १३००=०० प्रतिटन |

तुलनात्मकदष्टीने (१) निविदा प्राप्त झाल्याने यांचेशी झालेल्या चर्चेनंतर श्री. जनार्दन शेळके यांचे उस प्रति टन रु. १२००=०० गतवर्षी प्रमाणे पुरवठा करण्याचा करार असल्याने प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका प्राणी संग्रहालयासाठी सन २०००-२००१ या वित्तीय वर्षात लागणारे बीफ लुसनघास शाळु कडबा, शाळु बाटुक, मासोळी, ऊस इत्यादी पुरवठा करणेसाठी

१) बीफ पुरवठयासाठी दुसऱ्या क्रमांकाचे श्री. फेरोजखॉन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार प्रतिकिलो रु. २०.०० दराचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.
२) मासोळी पुरवठयासाठी पुरवठा धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार प्रतिकिलो रु. ५७=०० या दराने श्री. मुमताज अहमद यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.
३) लुर्सनघास पुरवठयासाठी श्री. जनार्धन कोंडाजी शेळके, अब्दीमंडी यांचे प्रतिकिलो रु. १=६४ या दराने निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.
४) शाळु कडबा व शाळु बाटुक पुरवठयासाठी पुरवठा धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार शाळु कडब्याकरिता प्रतिटन रु. ४१५० आणि शाळु बाटुक करिता प्रतिटन रु. ५०००/- दराचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
५) उस पुरवठयाकरिता पुरवठा धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार प्रतिटन रु. १०००/- या दराने श्री. जनार्धन शेळके यांचे निविदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७०/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गजानन महाराज चौकात वाहतुक संकेताक बसविण्यासाठी वाहतुक विभागातर्फे सन ९९-२००० साठी अनुदान प्राप्त झाले आहे या चौकात सिग्नल बसविण्यासाठी अंदाजपत्रक रुपये ३,९८,०००/- चे तयार केले आहे तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गजानन महाराज चौकात वाहतुक संकेताक बसविण्यासाठी तयार करण्यात आलेले र.रु. ३,९८,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७१/१२ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, श्रीमत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयाचे संचालक म्हणुन दिनांक ७-११-९९ रोजी पुराणवस्तु संग्रहालयाच्या संचालक पदावर श्री. प्रकाश शंकरलाल पुखार याची नियुक्ती करण्यात यावी व त्यांना प्रतिमाह रु. ५०००/- मानधन देण्यांत यावे असा निर्णय पुराणवस्तु संग्रहालयाच्या सर्वोच्च समितीने घेतलेला आहे.

तरी श्री. प्रकाश शंकरलाल पुरवार यांची श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयाच्या संचालक पदावर नियुक्त करणे व त्यांना प्रतिमाह र.रु. ५०००/- मानधन देणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयाचे संचालक म्हणुन दिनांक ७-११-९९ पासुन प्रतिमहा रु. ५०००/- मानधना दर श्री. प्रकाश शंकरलाल पुरवार याची नियमाप्रमाणे नियुक्ती करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७२/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, औरंगपुरा बलवंत वाचनालय ते सतिश मोटार्स पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. १९,९७,३३५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण अकरा कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त सहा निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. डी. अजितसिंग | ३३.८१% | कमी दराने |
| २. | मे. पाटील कंन्स्ट्रक्शन | ३१.०१% | कमी दराने |
| ३. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | २५.११% | कमी दराने |
| ४. | मे. जग्गी कंन्स्ट्रक्शन | २५.००% | कमी दराने |
| ५. | मे. गुरुनानक इंडस्ट्रिज | २५.००% | कमी दराने |
| ६. | मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | २१.००% | कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री. डी. अजितसिंग यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.८१% कमी आहेत.

तरी श्री. डी. अजितसिंग यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.८१% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दर्शविल्याप्रमाणे बलवंत वाचनालयात ते सतिश मोटार्स निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.८१% कमी

दराची श्री. डी. अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७३/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, राहुलनगर बनेवाडी येथे मंगल कार्यालय बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९८-९९ चे जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. ६,८४,५१४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त महोदय यांनी ३१-१२-९९ अन्वये मा. स्थायी समितीमध्ये ठेवण्यात यावे असे आदेशित केले त्यानुसार मा. स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर केला असता मा. स्थायी समितीने विषय क्र. ४७९/२ दिनांक ७-१-२००० चे इतिवृत्तान्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र. मनपा/लेखा/नि/५७/२००० दिनांक १५-१-२००० अन्वये एकुण २८ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १० निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एम.एम. काझी | १६% | जास्त दराने |
| २. | अे.आर. कंन्स्ट्रक्शन | १०% | कमी दराने |
| ३. | मो. सिराजोद्दीन सिद्दीकी | ५% | जास्त दराने |
| ४. | एस.पी. सरोदे | १२% | कमी दराने |
| ५. | एस.ए. नवाब | १६% | कमी दराने |
| ६. | मोना कंन्स्ट्रक्शन | १५% | कमी दराने |
| ७. | राजेंद्र वर्दे | १०% | कमी दराने |
| ८. | एस.एच. असो. | १०% | कमी दराने |
| ९. | इंडियन कंन्स्ट्रक्शन | १४.७८६% | कमी दराने |
| १०. | ए.एम. फरुकी | १४१९- | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराची निविदा श्री. एस.ए. नवाब यांची आहे. व त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक ३-२-२००० अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार श्री. एस.ए. नवाब यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ५७३/१४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राहुलनगर बनेवाडी येथे मंगल कार्यालय बांधणेसाठीच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराची श्री.एस.ए. नवाब यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७४/१५ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा सर्व्हे क्र. ५९ येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे, खेळणी, बसवणे, बेचेंस बसवणे च्या

कामाच्या अंदाजपत्रकास दिनांक २१-१२-९९ च्या स्थायी समितीमध्ये विषय क्र. ४ रक्कम रुपये ३,१३,०००/- मान्यता प्राप्त झाली त्यानुसार निविदा क्र. मनपा/लेखा/नि/५६ दि. १३-१-२००० अन्वये निविदा मागविल्या असता विक्रीच्या व तारखेला एकुण २७ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेला एकुण तीन (३) निविदा प्राप्त झाल्या त्या उघडण्यात आल्या असता दिलेले दर पुढील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. फाईव्हस्टार कंन्स्ट्रक्शन | ३% | कमी दराने |
| ३. | श्री. जावेदखान मुज्जफखॉन | -- | अंदाजपत्रकीय दराने |
| ३. | श्री. राजेंद्र वर्दे | १०% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% कमी दराने श्री. फाईस्टार कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.

करिता श्री. फाईव्हस्टार कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% कमी दराची निविदा स्थायी समितीच्या विचारार्थ तथा आदेशार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा सर्व्हे नं. ५९ येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेस संरक्षण भिंत बांधणे खेळणी बसविणे, बेंचस बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% कमी दराची श्री. फाईव्हस्टार कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७५/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्कमिल कॉलनी येथील रुग्णालयात संरक्षित भिंत बांधण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९८-९९ चे जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. ४,८५,७७५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक ७-१२-९९ अन्वये मान्यता दिली असुन मा. स्थायी समितीने विषय क्र. ४४४/२७ दिनांक १०-१२-९९ चे इतिवृत्तान्वये अंदाजपत्रक मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र. मनपा/लेखा/नि/४६९९ दिनांक १५-१२-९९ तारखेपर्यंत एकुण १९ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ७ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कुलवंतसिंग | १५% | कमी दराने |
| २. | मो. अजिमोद्यीन सिद्यीकी | १८.७८६% | कमी दराने |
| ३. | हयात कंन्स्ट्रक्शन | १४.९९% | कमी दराने |
| ४. | मोना कंन्स्ट्रक्शन | ३६.९९% | कमी दराने |
| ५. | इंडियन कंन्स्ट्रक्शन | १८.७८६% | कमी दराने |
| ६. | फाईव्ह कंन्स्ट्रक्शन | १२.१०% | कमी दराने |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | मोहमद सलीम | २२.७८६% | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.९९% कमी दराची निविदा मोना कंन्स्ट्रक्शन यांची आहे व त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक ३-२-२००० अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मोना कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.९९% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्कमिल कॉलनी येथील रुग्णालयास संरक्षितभिंत बांधण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.९९% कमी दराची मोना कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७६/१७ :**

मा. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. आरीफ कॉलनी पार्ट "अ" अंतर्गत असलेली ड्रेनेज लाईन अप्रुटींग करण्याच्या कामाकरिता रक्कम रु. ८,९२,९२०/- चे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या सन ९८-९९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामास मा. स्थायी समितीने दिनांक १०-१२-९९ ला मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदरील कामची बी-१ नमुन्यात कोरी निविदापत्रके जा.क्र./मनपा/लेखा/नि/४६/९९, दिनांक १५-१२-९९ अन्वये मागविल्या असता एकुण एकोणावीस (१९) निविदा विक्री झाल्या व त्यापैकी चार (४) निविदा प्राप्त झाल्या, त्याचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. आसाराम मारु | ३५.३५% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने |
| २. | श्री. जयश्री कंन्स्ट्रक्शन | ०.५% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने |
| ३. | श्री. मो. जावेद | १% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने |
| ४. | श्री. सुरेश साधवानी | ५% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने |

तुलनात्मदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 35.35% कमी दराची श्री. आसाराम मारु यांची निविदा आहे.

तरी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. आरेफकॉलनी पार्ट "अ" अंतर्गत असलेली ड्रेनेज लाईन अप्रुटींग करणेचया कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.३५% कमी दराची श्री. आसाराम मारु यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७७/१८ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र इमारतीच्या तळमजल्यासाठी पी.व्ही.सी मारबलेक्स् फ्लोरींग करणे बाबतच्या कामाचे अंदाजपत्रकास दि. ६-११-९९ च्या स्थायी समितीमध्ये विषय क्र. २३८/१९ रक्कम रुपये ३,०९,२५०/- मान्यता प्राप्त झाली. त्यानुसार निविदा क्र./मनपा/लेखा/नि/३८ दि. २-१२-९९ अन्वये कोटेशन मागविण्यात आले असता कोटेशन स्विकृतीच्या तारखेला एकुण (३) तीन कोटेशन दरपत्रक प्राप्त झाले व ते उघडण्यात आले असता त्यांनी दिलेले दर पुढील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. कलर क्रॉप्ट | रु. ३८५/- | प्रति चौ मिटर |
| २. | श्री. क्लासीक डेकोरेटर्स | रु. ३९०/- | प्रति.चौ.मीटर (इएमडी नाही) |
| ३. | श्री. वजीही ब्लाइंन्डस | रु. ३९५/- | प्रति.चौ.मीटर (इएमडी नाही) |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने म्हणजे रुपये ३८५/- दराचे कलर क्राप्ट याचे कोटेशन दरपत्रक आहे. करिता कलर क्राप्ट यांचे अं.प. दराचे म्हणजेच रु. ३८५/- प्रति चौ.मी. दराने कोटेशन दरपत्रक स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा आदेशास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र इमारतीच्या तळ मजल्यासाठी पी.व्ही.सी. मारब्लेक्स् प्लोरींग करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या दरपत्रकानुसार तुलनात्मदृष्टया सर्वात कमी व अं.प. दराचे म्हणजे रु. ३८५/- प्रती चौ.मी. श्री. कलर क्राप्ट यांचे दर मंजुर करण्यात सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७८/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मित्रनगर मनपा उद्यान आकाशवाणीच्या पाठीमागे सांस्कृतिक सभागृह बांधणे करिता सा.बां. विभागाचे सन ९८-९९ चे जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. ५,०१,०५०/- चे अं.प. तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २४-११-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर काम हे डी.पी.डी.सी. फंडा अंतर्गत करण्यात येणार आहे. त्यानुसार सदर कामाच्या तारखेपर्यंत एकुण २१ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ४ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. ९-१२-९९ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सुरेश बी. साधवाणी | १०% | जास्त दराने |
| २. | एस.एम. मंडोरे | १५% | जास्त दराने |
| ३. | मुजाहिदखॉन | -- | अं.प. दराने |
| ४. | एस.एम. सिद्यीकी | १२.४७% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची निविदा श्री. मुजहिदखॉन यांची प्राप्त झालेली आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ७-१-२०००

अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार श्री. मुजाहिदखॉन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मित्रनगर महानगरपालिका उद्यान आकाशवाणी पाठीमागे सांस्कृतिक सभागृह बांधण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची श्री. मुजाहेदखॉन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७९/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सिध्दार्थ जलतरण तलाव येथील हेल्थ क्लब (व्यायाम शाळा) करिता लागणारे व्यायामाचे सहित्य खरेदी करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात आली असता एकुण पाच कोरी दरपत्रके विकल्या गेली व दरपत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन दरपत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त दरपत्रके दिनांक ४-१-२००० रोजी उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ. क्र. | साहित्याचे नांव | | रणवीर इंजिनिअरिंग | अल्टीमेंट कंपनी | वर्षा मटेल |
|---|---|---|---|---|---|
| १) | मल्टी जीम | ७५ किलो | | | |
| | बेच प्रेस | ७० किलो | | | |
| | लेग प्रेस | ७० किलो | | | |
| | सिटेड कर्ल | ७० किलो | | | |
| | आर्म कर्ल | | | | |
| | स्टॅण्डींग कर्ल | | | | |
| | लेग कर लेग एक्सटेशन | ७० किलो | १,४४,९३०=०० | १,४८,०००=०० | १,४९,०००=०० |
| | क्रॉचेस बेंच | | | | |
| | डिपिंग स्टॅण्ड | | | | |
| | चिनप | | | | |
| | हाफ अॅप डोमन बोर्ड | | | | |
| | फोराम | ६० किलो | | | |
| | सोल्डर प्रेस | ७० किलो | | | |
| २) | लेग प्रेस | ८० किलो | २२७९०=०० | २९६००=०० | २९७००=०० |
| ३) | पेकडेक | ८० किलो | २२९००=०० | २३५००=०० | २३१००=०० |
| ४) | फ्लॅट बेंच | | ४४६०=०० | ४८००=०० | ४९=०० |
| ५) | डिक्लाईन | | ५२५०=०० | ५४००=०० | ५५००=०० |
| ६) | इनक्लाईन बेंच | | ४९६०=०० | ५१५०=०० | ५१००=०० |
| ७) | हाफ मुन बेंच | | ५६६०=०० | ५४५०=०० | ५६८०=०० |
| ८) | टवीस्टर विस स्टॅन्ड | | ६१५०=०० | ६२००=०० | ६५००=०० |
| ९) | अॅपडोमॅन विस स्टॅन्ड | | ७५९०=०० | ७८००=०० | ७८००=०० |
| १०) | रोमन चेअर | | ५४४०=०० | ५४४०=०० | ५५००=०० |
| ११) | सायकल | | ३७७००=०० | ४०८०=०० | ४०००=०० |
| १२) | एक्सर रायडर | | ३९००=०० | ७०००=०० | ७०००=०० |
| १३) | जॉगर वॉकर | | ९८५०=०० | १०११०=०० | १००००=०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४) | व्हायब्रेटर बेल्ट | १४०५०=०० | १४९००=०० | १५०००=०० |
| १५) | मसाजर | १५६००=०० | १५५००=०० | १६०००=०० |
| १६) | वेट बार क्रोम प्लेटींग-२ ग | २८००=०० | २९५०=०० | २९००=०० |
| १७) | वेट बार क्रोम प्लेटींग छोटे -२ नग | २५००=०० | २६००=०० | २५००=०० |
| १८) | वेट बार इ-झेड २ नग | ३२००=०० | ३३५०=०० | ३३००=०० |
| १९) | मिनी स्टेपर | ५५००=०० | ५९००=०० | ५५००=०० |
| २०) | वेट प्लेट (वेगवेगळीसाईज) १६० किलो | १२८००=०० | १२९५०=०० | १२९००=०० |
| २१) | उम बेल्स (वेगवेगळी साईज) १२० किलो | १०२००=०० | १०५००=०० | १०३५०=०० |
| | एकुण | ३२३४३०=०० | ३३१२११=०० | ३३२३३३०=०० |

वरील प्राप्त दरपत्रकापैकी मे. रणवीर इंजिनिअरींग यांची दिलेले दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे वरील दर्शविल्याप्रमाणे र.रुपये ३२३४३०=०० इतके आहेत. परंतु सदरील एजन्सी समवेत झालेल्या दराच्या वाटाघाटी अन्वये ॲटम क्र. १ चे दर रक्कम रु. १,४४,९३०=०० ऐवजी र.रु. १२५,०००=०० व ॲटम क्र. २ ते २१ चे दर दिलेल्या दरापेक्षा २५% कमी करण्यात आले आहेत.

तरी ॲटम क्र. १ ला र.रु. १,२५,०००/- मध्ये व ॲटम क्र. २ ते २१ हे वरील दर्शविल्याप्रमाणे दरात २५% कमी करुन जे दर येतील त्या दराने मे रणवीर इंजिनिअरींग यांच्याकडुन खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ जलतरण तलाव येथील हेल्थ क्लब (व्यायाम शाळा) करिता लागणारे व्यायामाचे साहित्य खरेदी करण्याचे साहित्य मागविण्यात आलेल्या दरपत्रकानुसार तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी मे. रणवीर इंजिनिअरींग यांचे दर असुन त्यांच्यासह झालेल्या वाटाघाटीनुसार ॲटम क्र. १ चे दर र.रु. १,४४,९३०/- ऐवजी र.रु. १,२५,०००/- आणि ॲटम क्र. २ ते २१ चे दर २५% कमी करुन जे दर येतील त्यादराने त्यांचेकडुन व्यायामाचे साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८०/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गौतमनगर घाटी येथे बहुउद्देशिय हॉल बांधण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९८-९९ चे जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. ४,६८,५२५/- चे अं.प. तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २९-१२-९९ अन्वये स्थायी समिती समोर निर्णयास्तव ठेवणे करिता आदेशित केलेले होते. त्यानुसार मा. स्थायी समितीने विषय क्र. ४७८/१ दि. ७-१-२००० इतिवृत्तान्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र. मनपा/लेखा/नि/५७/२००० दि. १७-१-२००० अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण २० निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ३ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. २१-१-२००० रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | राजेंद्र वर्दे | ९०५% | जास्त दराने |
| २. | स. सईदउल्ला हुसैनी | १०% | जास्त दराने |
| ३. | एम.के. कंन्स्ट्रक्शन | ८% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प. दरापेक्षा ८% जास्त दराची निविदा मे. एम.के. कंन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. परंतु दराबाबतच्या वाटाघाटी अंती मा. प्र. आयुक्त महोदय यांनी अं.प. दरापेक्षा ८% जास्त दराऐवजी अं.प. दरापेक्षा ५% कमी दराने सदर निविदेस मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार एम.के. कंन्स्ट्रक्शन यांची अं.प. दरापेक्षा ८% जास्त दराऐवजी ५% कमी निविदा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गौतमनगर घाटी येथे बहुउद्देशिय हॉल बांधण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प. दरापेक्षा ८% जास्त दराची मे. एम. के. कंन्स्ट्रक्शन यांची निविदा असुन त्यांचेसह आलेल्या वाटाघाटीनुसार सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% दराने त्यांचेकडुन काम करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८१/२२ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कमी खर्चाची स्वच्छता योजना अंतर्गत नविन वैयक्तिक शौचाल्य बांधणे (टप्पा-२) बाबत अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३६,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन सन १९९९-२००० चे आर्थिक वर्षात मनपाच्या अर्थ संकल्पात कमी शौचालय बांधणे ही योजना मंजुर असुन चालु आर्थिक वर्षात १७५ लाख तरतुद आहे.

मा. आयुक्त यांनी दि. १०-१२-९९ रोजी प्रस्तावास मान्यता दिली असून सदरील काम शासन परिपत्रक क्र. ग्रास्वका/१०९८/प्र.क्र. ४८४/पा.पु. १६/ दि. २७-११-८८ सेवाभावी संस्थेमार्फत करुन घेण्यास सुचित केले आहे. सेवाभावी संस्थाच्या सुचित उपरोक्त परिपत्रकात आपल्या मराठवाडयातील, औरंगाबाद येथील जिव्हाळा या संस्थेस प्राधान्य (१) देण्यात आलेला आहे.

सदरील काम जिव्हाळा सेवाभावी संस्था प्रति शौचालय रु. ५०००/- प्रमाणे करण्यास तयार असुन तसे लेखी पत्र दिलेले आहे. करिता सदरील काम हे जिव्हाळा सेवाभावी संस्था, औरंगाबाद यांचेकडुन प्रति शौचालय रु. ५०००/- प्रमाणे करुन घेण्याच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३६,००,०००/- चे प्रस्तावास दि. ११-०१-२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये ऐनवेळचे विषय क्र. १६८/१ अन्वये सर्वसाधारण सभेने सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देऊन ठराव संमत केलेला करिता माहितीस्तव.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कमी खर्चाची स्वच्छता योजना अंतर्गत नविन वैयक्तिक शौचालय बांधणेचे टप्पा-२ चे काम शासन परिपत्रक क्र. ग्रास्वका/१०९८/प्र.क्र. ४८४/पा.पु. १६ दि. १७-११-९८ अन्वये सेवभावी संस्थेमार्फत करुन घेण्यास सुचीत केल्यानुसार औरंगाबाद येथील जिव्हाळा या सेवाभावी संस्थेस प्रति शौचकुप रु. ५०००/- प्रमाणे व त्यांचेकडुन सदरचे काम करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८२/२३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगपुरा भाजी मंडई समोर मनपाच्या दुकानाच्या दुकानावर पहिला मजला बांधणे करिता सा.बां. विभाग सन ९७-९८ जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रुपये २५,८७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ४-८-९८ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसे मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र. १४४/९ दि. १९-११-९८ च्या इतिवृत्तान्वये सदरील अंदाजपत्रकीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी कार्यालय निविदा सुचना क्र./मनपा/लेखा/नि/१३/९९ दि. ११-५-९९ अन्वये निविदा मागविले असता निविदा विक्री अंतिम तारखेपर्यंत एकुण ७ सात निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन (३) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दिनांक २८-५-९९ रोजी उपस्थितीत गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मौला अली यार खान | ९.१०% | जास्त दराने |
| २. | हायवे कंन्स्ट्रक्शन | २५% | जास्त दराने |
| ३. | शेख शरिफ | १५% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.१०% जास्त दराची निविदा मौला अली यारखॉन यांचे प्राप्त झाली होती. मा. आयुक्त महोदय यांनी दि. ६-७-९९ च्या आदेशान्वये संबंधित गुत्तेदारास दराबाबतच्या वाटाघाटीस्तव बोलाविण्यात आले असता दराबाबतच्या वाटाघाटी अंतिम ९.१०% जास्त दराऐवजी ४% जास्त दराने सदर निविदेस मा. आयुक्त महोदय यांनी दि. २८-११-९९ अनवये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार दि. १०-१२-९९ रोजी स्थायी समितीचे बैठकीत प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ पाठविला असता विषय क्र. ४१४/३ दि. १०-१२-९९ अन्वये सदर प्रस्तावास मा. स्थायी समिती ने सदर ठेकेदार हा काळया यादीत समाविष्ट असल्याने सदरील प्रस्ताव स्थगिती दिलेली होती. तथापी या विभागाकडुन चौकशी केली असता सदरील ठेकेदार दि. २८-१०-९७ रोजी स्थायी समितीत आपील केले होते. या अपिलावर स्थायी समिती विषय क्र. ३०२/१ च्या ठरावाने सदरील गुत्तेदारास काळया यादीतून नाव कमी करण्यात आलेले आहे.

तरी श्री. मौला अली यारखॉन यांची ९.१०% जास्त दराऐवजी ४% जास्त दराची निविदा प्रस्ताव फेर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगपुरा भाजी मंडी समोर मनपाच्या दुकानांवर पहिला मजला बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री. मौला अली यार खान यांचेशी दराबाबत झालेल्या वाटाघाटीत ठरल्यानुसार सदरील

काम त्यांचेकडुन अं.प. दरापेक्षा ९.१०% जास्त दराऐवजी ४% जास्त दराने करुन घेण्याबाबतचा दि. १०-१२-९९ च्या स्थायी समिती सभेतील स्थगित ठेवण्यात आलेला ठराव क्र. ४१४/३ मंजुर करण्यात येतो. सदरचे काम श्री. मौला अली यार खान यांचेकडुन अं.प. दरापेक्षा ९.१०% जास्त दराऐवजी ४% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने आजची सभा संपल्याने मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १३-०३-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**सोमवार दिनांक १३-३-२००० रोजी मा. सभापती श्री. नरसिंग मुरलीधर ढेगे यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक संपन्न झाली, तिचे इतिवृत्त बैठकीची सुरुवात "वेदे मातरम्" या गिताने सकाळी ११.४५ वाजता महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मालिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे झाली. बैठकीस अधिकारी वर्ग व खालीलप्रमाणे स सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.सदस्य सौ. लता श्रीनिवास | स.सदस्य |
| २) | स.सदस्य सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | स.सदस्य |
| ३) | स.सदस्य श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | स.सदस्य |
| ४) | स.सदस्य श्री. स.अ. इकबालोद्यीन स.मो. कुतुबुद्यीन | स.सदस्य |
| ५) | स.सदस्य श्री. विकास जैन | स.सदस्य |

**संवाद :**

**मा. सभापती** : प्रशासनातर्फे तीन प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. मा. सचिव यांनी कृपया वाचुन दाखवावेत.

**सचिव :** प्रस्ताव वाचुन दाखवतात.

**विषय क्र. ५८३/१ :**

मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले हे महानगरपालिकेत गुत्तेदार म्हणुन काम करीत असुन त्यांचेकडे विविध विभागामध्ये कामे चालु आहेत त्यांनी अर्ज देवून ना हरकत प्रमाणपत्र द्यावे म्हणून विनंती केली आहे. ती खालील प्रमाणे आहे.

१. श्री. नंदकुमार राधाकिशन घोडेले यांनी वैयक्तिक श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले ऐवजी भागीदारी संस्था मे. नंदकुमार घोडेले या नावाने भागीदारी संस्था नोंदणी माझ्यामुळे व सदरील संस्थेतुन ते निवृत्त होत असल्यामुळे त्यांचे नावाने जी काही महानगरपालिकेतील कामे आहेत ती कामे भागीदारी संस्थेतील उर्वरीत भागीदार पुर्ण करतील उर्वरित भागीदारांनी सदरील कामे पुर्ण करण्याबाबतचे हमीपत्र सादर केलेले आहेत श्री. नंदकुमार घोडेले यांनी सहाय्यक निबंधक भागीदारी संस्था औरंगाबाद यांचे नोंदणी प्रमाणपत्र तसेच सदरील संस्थेतून निवृत्त होत असल्याबाबतचे सहाय्यक निबंधक भागीदारी संस्था औरंगाबाद यांचे प्रमाणपत्र तसेच भागीदारी संस्थेतील उर्वतरीत सदस्य यांचे हमीपत्र सादर केलेले आहेत व नाहरकत प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

२. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० (१) फ नुसार महानगरपालिकेच्या वतीने कोणत्याही करारात स्वत: किंवा भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग असेल तर पालिका सदस्य होण्यास अनर्हता नमुद केली आहे.

३. बी-१ निविदा मधील सर्वसाधारण अटीतील क्रमांक ४ नुसार कामाची जबाबदारी सबलेट करण्याची तरतुद आहे. तथापी पुर्वपरवानगी शिवाय सबलेट करता येणार नाही. जरी अशी परवानगी दिली तरी अप्रत्यक्षरित्या कामाची र्स्वस्वी जबाबदारी संबंधित गुत्तेदाराची राहील अशी तरतुद आहे.

उपरोक्त नुसार नियमात तरतुद असुन रु. ३.०० लक्ष वरील सर्व निविदा स्विकारण्याचे अधिकार स्थायी समितीस असल्यामुळे करारनाम्यात बदल करणेस्तव स्थायी समिती सक्षम आहे. या संदर्भात मा. निवडणुक आयुक्त, राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र राज्य यांचेकडे मार्गदर्शन मागितले असता, निविडणुक आयोगाने सदरील प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवण्यास हरकत नाही असे नमुद केले आहे.

त्यामुळे गुत्तेदाराची विनंती निविदा नियमातील अटी व अधिनियमातील तरतुदी विचारात घेवून नियमातील प्रस्तावावर चर्चा होवून योग्य त्या निर्णयास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद**

**सौ. लता दलाल :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रशासनामार्फत योग्य तो खुलासा करावा. या बैठकीत उपस्थित असलेले स. सदस्य हे सुध्दा उमेदवार असुन या प्रस्तावामुळे आचारसंहितेचा भंग तर होणार नाही ना त्यानंतरच निर्णय घेणे योग्य होईल. सदरील प्रस्तावातील मुद्दा क्र. २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०(१) नुसार महानगरपालिकेच्या वतीने कोणत्याही करारात स्वत: किंवा त्यांच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग असेल तर पालिका सदस्य होण्यास अनर्हता नमुद केली आहे. याबाबत सदस्यांवर परिणाम होता कामा नाही. तरी प्रशासनाने या प्रस्ताव संबंधित सविस्तर माहिती द्यावी.

**मुख्यलेखाधिकारी :** प्रस्तावात नमुद केलेले गुत्तेदार श्री. नंदकुमार घोडेले व इतर दोन ठेकेदार श्री. कैसरखॉन व श्री. सलीम समशेर पटेल यांची विविध विभागामध्ये कामे चालु आहेत. त्यांनी विनंती अर्ज देऊन त्यांना ना हरकत प्रमाणपत्र मिळावे म्हणून विनंती केली आहे. त्यानुसार श्री. नंदकुमार घोडेले श्री. कैसर खॉन, व श्री. सलीम समशेर पटेल यांनी वैयक्तिक ऐवजी भागीदारी संस्था मे घोडेले, कैसर खॉन व पटेल या नांवाने भागीदारी संस्था नोंदणी झाल्यामुळे व सदरील संस्थेतून ते निवृत्त होत असल्यामुळे त्यांचे नांवने जे काही मनपातील कामे आहेत ती कामे भागीदारी संस्थेतील उर्वरित भागीदार पुर्ण करतील. भागीदारांनी सदरील कामे पुर्ण करण्याबाबतचे हमीपत्र सादर केलेले आहेत. या संदर्भात मा. निवडणुक आयोग महाराष्ट्र राज्य यांचे कडे मार्गदर्शन मागविले असता त्यांनी ही बाब प्रशासकीय असल्याचे कळविले आहे. व मुंबई प्रांतिक महानगरपालिकेच्या वतीने कोणत्याही करारात स्वत: किंवा त्यांच्या भागीदाराच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग असेले तर पालिका सदस्य होण्यास अनर्हता नमुद केली आहे. तसेच बी-१ निविदामध्ये सर्वसाधारण अटीतील अट क्रमांक ४ नुसार कामाची जबाबदारी सबलेट करण्याची तरतुद आहे. तथापी पुर्व परवानगीशिवाय सबलेट करता येणार नाही. जरी अशी परवानगी दिली तरी अप्रत्यक्षरित्या कामाची सर्वस्वी जबाबदारी संबंधित गुत्तेदाराची राहील अशी तरतुद असुन रु. ३.०० लक्ष वरील सर्व निविदा स्विकारण्याचे अधिकार स्थायी समितीस असल्यामुळे करारनाम्यात बदल करणेस्तव स्थायी समिती समक्ष आहे याबाबत विधी विभागाचे सुध्दा अभिप्राय घेतले आहेत. तेव्हा

स्थायी समितीने उपरोक्त प्रस्तावास मंजुरी दिल्याशिवाय पुढील कार्यवाही करता येणार नाही.

**मा. सभापती :** सदरची बैठक आचार संहितेच्या कालावधीत घेण्यात येत आहे. हया बैठकीत असा निर्णय घेता येतो का? शिवाय निवडणुक आयोगाकडुन आलेल्या पत्राबाबत या बैठकीत प्रशासनातर्फे माहिती द्यावी.

**मुख्यलेखाधिकारी :** या संदर्भात दि. ९-३-२००० रोजी मा. निवडणुक आयुक्त यांना फॅक्सव्दारे विचारणा करण्यात आली होती. त्यांचेकडुन दि. १०-३-२००० रोजी माहिती प्राप्त झाली. त्यांनी पत्रात नमुद केले आहे की, राज्य निवडणुक आयोगाकडील दि. ३-२-९८ चे पत्र क्रमांक रानिआ-१०९७/प्र.क्र. ३६/९७/ पं. रा. अन्वये आचारसंहितेच्या संदर्भात सुचना देण्यात आल्या आहेत. (सुचना पुस्तिका भाग-१ पृष्ठ क्रमांक १४३) सदर पत्रातील परिच्छेद-३ मध्ये मुद्दा क्रमांक ३ येथे आचारसंहिता कालावधीत परिषदेची/विषय समितीची सर्वसाधारण बैठक घेण्यास हरकत नाही. पंरतु आचारसंहितेचा भंग होणार नाही याची आवश्यक ती खबरदारी घ्यावी. आपल्या पत्रातील मुद्दा क्रमांक १ येथे स्थायी समितीच्या बैठकीस आचारसंहिता चालू असल्याने महानगरपालिका अधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे किंवा कसे अशी विचारणा करण्यात आली आहे. आचारसंहितेच्या कालावधीमध्ये सदर बैठक घेण्यास हरकत नसल्यामुळे नेहमीच्या पध्दतीनुसार अधिकाऱ्यांनी बैठकीस उपस्थित राहण्यास हरकत नाही. आपल्या पत्रातील मुद्दा क्रमांक २ येथे निविदामधील अटी व शर्ती ठरविण्याचे व त्यात बदल करण्याचे अधिकार स्थायी समितीला असल्यामुळे सभापती यांनी दि. १०-३-२००० रोजी बैठक घेण्याचे ठरविले असल्यामुळे सदर बैठकीसमोर कंत्राटदार यांच्या बाबतचा प्रशासकीय प्रस्ताव ठेवावा किंवा कसे, याबाबत कृपया मार्गदर्शन व्हावे अशी विचारणा करण्यात आली आहे. या संदर्भात असे नमुद करण्यात येते की, सदरची बाब ही प्रशासकीय कार्यपध्दतीचा भाग असल्यामुळे सदर बाब बैठकीसमोर ठेवण्यास हरकत नाही. आपल्या पत्रातील मुद्दा क्र. ३ येथे नमुद केलेली बाब धोरणात्मक निर्णय समजुन आचारसंहितेचा भंग होईल किंवा कसे याची विचारणा करण्यात आली आहे. आपल्या पत्रातील बाब ही प्रशासकीय बाब असुन त्या संदर्भात कायद्यातील तरतुदीनुसार निर्णय घेतल्यास महानगरपालिका निवडणुकीतील मतदारांवर प्रभाव पडेल. अशा प्रकारची बाब असल्याचे सहजदर्शनी दिसून येत नाही. त्यामुळे या संदर्भात निर्णय दिल्यास आचारसंहितेचा भंग होणार नाही.

**मा. सभापती :** सदर बैठकीच्या पुर्वी ठेकेदाराने असा ठराव घेण्याबद्दल कळविले होते. परंतु या संदर्भात मा. आयुक्तांना पत्र देण्यात आले आहे. त्यानुसार आचारसंहितेचा भंग होणार नाही असे मा. निवडणुक आयुक्ताकडून कळविण्यात आल्यानंतर सदर प्रस्ताव प्रशासनामार्फत ठेवण्यात आला. उपरोक्त प्रस्तावानुसार स्थायी समितीने गुत्तेदारांची विनंती निविदा नियमावलीतील अटी व अधिनियमातील तरतुदी विचारात घेतल्या त्यानुसार स्थायी समिती खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

१) गुत्तेदाराने विनंती केल्यानुसार श्री. नंदकुमार घोडेले यांनी वैयक्तिक श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले ऐवजी भागीदारी संस्था मे. नंदकुमार घोडेले

या नावांने नोंदणी झाल्यामुळे त्यांची अस्तित्वात असलेली कामे सदरील भागीदारी संस्थेच्या नांवे हस्तांतरीत करण्याची विनंती केलेली आहे. भागीदारी संस्था ही कायद्यानुसार नोंदणीकृत असल्याने अशा भागीदारी संस्थेस कामे हस्तांतरीत करण्यास हरकत नाही. कारण एखादा वैयक्तिक रित्या व्यक्ती स्वतःचा व्यवसाय वाढविण्याकरिता भाग भांडवलात वाढ करुन मोठाली कामे करण्याकरिता इतर व्यक्तींकडुन भाग भांडवल जाम करुन भागीदारी स्थापन करु शकतो. अशा प्रकारे स्थापन झालेली भागीदारी संस्था जर वैयक्तिक रित्या करीत असलेल्या व्यवसाय धारकाकडुन चालु असलेली कामे भागीदारी संस्था जर वैयक्तिक कामे भागीदारी संस्थेच्या नांवे हस्तांतरीत करुन घेत असेल व त्या कामाची सर्व जबाबदारी संस्थेवर घेत असेल तसेच आवश्यक ते करारनामे करुन देत असेल तर अशा प्रकारे कामाची जबाबदारी हस्तांतरित करण्यास कायद्यानुसार कोणतेही बंधन नाही.

२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० (२) पोटकलम ब (४) नुसार महानगरपालिकेच्या वतीने आयुक्तांबरोबर किंवा परिवहन व्यवस्थापकाबरोबर जो करार करील किंवा त्याच्याकडुन नेमली जाईल अशा कोणत्याही संयुक्त भांडवल कंपनीत किंवा मुंबई सहकारी संस्था अधिनियम १९२५ (आता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०) अन्वये नोंदलेल्या किंवा नोंदलेली असल्याचे मानण्यात येणाऱ्या कोणत्याही संस्थेस तिचा कोणताही भाग किंवा हितसंबंध आहे केवळ याच कारणावरुन पोटकलम १ खंड "फ" अन्वये अनर्हता ओढवून घेतली आहे, असे मागले जाणार नाही. अशी स्पष्ट तरतुद आहे. त्यामुळे भागीदारी संस्थेत भाग असल्यास पालिका सदस्य घेण्यास अनर्हता होत नाही.

३) बी-१ निविदा मधील सर्वसाधारण अटीतील क्रमांक ४ नुसार कामाची सबलेट करण्याची तरतुद आहे. तथापी पुर्वपरवानगी शिवाय सबलेट करता येणार नाही. जरी अशी परवानगी दिली तरी अप्रत्यक्षरित्या कामाची सर्व जबाबदारी संबंधित गुत्तेदाराची राहील अशी तरतुद आहे. त्यानुसार भागीदारी संस्था संपुर्णतः कामाची जाबाबदारी स्विकारत आहे. व आवश्यक ते सर्व करारनामे करुन देत आहे. तसेच भागीदारी संस्थेचे उर्वरित सदस्य हे कामाची जबाबदारी स्विकारण्याचे हमीपत्र सादर करीत आहेत व वैयक्तिक श्री. नंदकुमार घोडेले हे भागीदारी संस्थेतुन निवृत्त झालेले आहेत. त्यामुळे त्यांचा भागीदारी संस्थेत संबंध राहात नाही. व जरी त्यांचा संबंध संस्थेमध्ये राहिला तरी मुद्दा क्रमांक २ नुसार पालिका सदस्य होण्यास अनर्हता मानल्या जाणार नाही.

उपरोक्त नुसार नियमात तरतुद असुन रु. ३.०० लक्ष च्या वरील सर्व निविदा स्विकारण्याचे, करारनामा बदल करणेस्तव स्थायी समिती सभा असल्याने व या संदर्भात मा. राज्य निवडणुक आयोगानेही सदरील प्रस्ताव स्थायी समितीत निर्णय घेण्यास हरकत नसल्याचे कळविल्यानुसार स्थायी समिती गुत्तेदाराने केलेली विनंती मान्य करते. भागीदारी संस्थेच्या नांवे करारनामा हस्तांतरीत करण्यात यावा. ज्या ज्या कामासाठी आवश्यक त्या सुरक्षा ठेव रकमा अनामत रकमा व ३% कायम सुरक्षा ठेव रकमा भागीदारी

संस्थेकडे हस्तांतरीत करीत असल्याबद्दल मुळ गुत्तेदाराकडुन ना हरकत प्रमाणपत्र घेऊन भागीदारी संस्थेस हस्तांतरीत करण्यात याव्यात त्यामुळे काम करण्याची सर्वस्वी जबाबदारी भागीदारी संथेची राहुन काम न केल्यास करारनाम्याच्या नियमानुसार सर्व रकमा जप्त करण्याचा व कारवाई करण्याचा अधिकार प्रशासनास राहिल.

सदरील प्रस्तावास उपरोक्त नुसार मान्यता देण्यांत येते. व याच बैठकीत या ठरावास कायम करण्यात येते. प्रशासनाने संबंधीत गुत्तेदारास "ना हरकत प्रमाणपत्र" देऊन संविधानाने प्रत्येक नागरिकांस निवडणुक लढविण्यास दिलेल्या हक्काचे पालन करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुत्तेदाराने विनंती केल्यानुसार श्री. नंदकुमार घोडेले यांनी वैयक्तिक श्री. नंदकुमार राधाकिशन घोडेले ऐवजी भागीदारी संस्था मे. नंदकुमार घोडेले या नांवाने नोंदणी झाल्यामुळे त्यांची अस्तित्वात असलेली कामे सदरील भागीदारी संस्थेच्या नांवे हस्तांतरीत करण्याची विनंती केलेली आहे. भागीदारी संस्था ही कायद्यानुसार नोंदणीकृत असल्याने अशा भागीदारी संस्थेस कामे हस्तांतरीत करण्यास हरकत नाही. कारण एखादा वैयक्तिकरित्या व्यक्ती स्वतःचा व्यवसाय वाढविण्याकरिता भाग भांडवलात वाढ करुन मोठाली कामे करण्याकरिता इतर व्यक्तींकडुन भाग भांडवल जमा करुन भागीदारी स्थापन करुन शकतो अशाप्रकारे स्थापन झालेली भागीदारी संस्था जर वैयक्तिरित्या करीत असलेल्या व्यवसायधारकाकडुन चालु असलेली कामे भागीदारी संस्थेच्या नांवे हस्तातरीत करुन घेत असेल व त्या कामाची सर्व जबाबदारी संस्थेवर घेत असेल तसेच आवश्यक ते करारनामे करुन घेत असेल व त्या कामाची सर्व जबाबदारी संस्थेवर घेत असेल तसेच आवश्यक ते करारनामे करुन देत असेल तर अशाप्रकारे कामाची जबाबदारी हस्तांतरीत करण्यास कायद्यानुसार कोणतेही बंधन नाही.

२. मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० (२) पोटकलम ब (४) नुसार महानगरपालिकेच्या वतीने आयुक्ताबरोबर किंवा परिवहन व्यवस्थापका बरोबर जो करार करील किंवा त्यांच्याकडुन नेमली जाईल अशा कोणत्याही संयुक्त भांडवल कंपनीत किंवा मुंबई सहकारी संस्था अधिनियम १९२५ (आता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०) अन्वये नोंदलेल्या किंवा नोंदलेली असल्याचे मानण्यात येणाऱ्या कोणत्याही संस्थेस तिचा कोणताही भाग किंवा हितसंबंध आहे. केवळ याच कारणावरुन पोटकलम १ खंड "फ" अन्वये अनर्हता ओढवून घेतली आहे. असे मानले जाणार नाही. अशी स्पष्ट तरतुद आहे. त्यामुळे भागीदारी संस्थेत भाग असल्यास पालिका सदस्य होण्यास अनर्हता होत नाही.

३. बी-१ निविदा मधील सर्वसाधारण अटीतील क्रमांक ४ नुसार कामाची जबाबदारी सबलेट करण्याची तरतुद आहे. तथापी पुर्वपरवानगी शिवाय बसलेट करता येणार नाही. जरी अशी परवानगी दिली तरी अप्रत्यक्षरित्या कामाची सर्व जबाबदारी संबंधित गुत्तेदाराची राहील अशी तरतुद आहे. त्यानुसार असा निर्णय देण्यात येतो की, मुद्दा क्रमांक १ नुसार भागीदारी संस्था संपुर्णतः कामाची जबाबदारी स्विकारत आहे व आवश्यक ते सर्व करारनामे करुन देत आहे. तसेच भागीदारी संस्थेचे उर्वरित सदस्य हे कामाची जबाबदारी स्विकारण्याचे हमीपत्र सादर करीत आहेत व वैयक्तिक श्री. नंदकुमार घोडेले हे भागीदारी संस्थेतुन निवृत्त झालेले आहेत. त्यामुळे त्यांचा भागीदारी संस्थेत संबंध राहात नाही. व जरी

त्यांचा संबंध संस्थेमध्ये राहिला तरी मुद्दा क्रमांक २ नुसार पालिका सदस्य होण्यास अनर्हता मानल्या जाणार नाही.

उपरोक्त नुसार नियमात तरतुद असुन रु. ३.०० वरील सर्व निविदा स्विकारण्याचे, करारानामा बदल करणेस्तव स्थायी समिती सक्षम असल्याने व या संदर्भात मा. राज्य निवडणुक आयोगानेही सदरील प्रस्ताव स्थायी समितीत निर्णय घेण्यास हरकत नसल्याचे कळविल्यानुसार स्थायी समिती गुत्तेदाराने केलेली विनंती मान्य करते. भागीदारी संस्थेच्या नांवे करारनामा हस्तांतरीत करण्यात यावा. ज्या ज्या कामासाठी आवश्यक त्या सुरक्षा ठेव रकमा भागीदारी संस्थेकडे हस्तांतरीत करीत असल्याबद्दल मुळ गुत्तेदाराकडुन ना हरकत प्रमाणपत्र घेऊन भागीदारी संस्थेस हस्तांतरीत करण्यात याव्यात त्यामुळे काम करण्याची सर्वस्वी जबाबदारी भागीदारी संस्थेची राहुन काम न केल्यास करार नाम्याच्या नियमानुसार सर्व रकमा जप्त करण्याचा व कारवाई करण्याचा अधिकार प्रशासनास राहिल.

**विषय क्र. ५८४/२ :**

मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्री. कैसर खॉन हे महानगरपालिकेत गुत्तेदार म्हणुन काम करीत असून त्यांचेकडे विविध विभागामध्ये कामे चालू आहेत. त्यांनी अर्ज देवून त्यांना नाहरकत प्रमाणपत्र द्यावे म्हणुन विनंती केली आहे. ती खालील प्रमाणे आहे.

१. श्री. कैसर खॉन यांनी वैयक्तिक राणा कंन्स्ट्रक्शन ऐवजी भागीदारी संस्था मे. राणा कंन्स्ट्रक्शन या नावाने भागीदारी संस्था नोंदणी झाल्यामुळे व सदरील संस्थेतुन ते निवृत्त होत असल्यामुळे त्यांचे नांवाने जी काही महानगरपालिकेतील कामे आहेत. ती कामे भागीदारी संस्थेतील उर्वरित भागीदार पुर्ण करतील उर्वरित भागीदारांनी सदरील कामे पुर्ण करण्याबाबतचे हमीपत्र सादर केलेले आहेत. श्री. कैसरखान यांनी सहाय्यक निबंधक भागीदारी संस्था औरंगाबाद यांचे नोंदणी प्रमाणपत्र तसेच सदरील संस्थेतुन निवृत्त होत असल्याबाबतचे सहाय्यक निबंधक भागीदारी संस्था औरंगाबाद यांचे प्रमाणपत्र तसेच भागीदारी संस्थेतील उर्वरित सदस्य याचें हमीपत्र सादर केलेले आहेत व ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

२. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० (१) फ नुसार महानगरपालिकेच्या वतीने कोणत्याही करारात स्वत: किंवा भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग असेल तर पालिका सदस्य होण्यास अनर्हता नमुद केली आहे.

३. बी-१ निविदा मधील सर्वसाधारण अटीतील क्रमांक ४ नुसार कामाची जबाबदारी सबलेट करण्याची तरतुद आहे. तथापी पुर्वपरवानगी शिवाय सबलेट करता येणार नाही. जरी अशी परवानगी दिली तरी अप्रत्यक्षरित्या कामाची सर्वस्वी जबाबदारी संबंधित गुत्तेदाराची राहील अशी तरतुद आहे.

उपरोक्त नुसार नियमात तरतुद असुन रु. ३.०० लक्ष वरील सर्व निविदा स्विकारण्याचे अधिकार स्थायी समितीस असल्यामुळे करारनाम्यात बदल करणेस्तव स्थायी समिती सक्षम आहे. या संदर्भात मा. निवडणुक आयुक्त, राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र राज्य मार्गदर्शन मागीतले असता निवडणुक आयोगाने सदरील प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवण्यास हरकत नाही असे नमुद केले आहे.

त्यामुळे गुत्तेदाराची विनंती निविदा नियमातील अटी व अधिनियमातील तरतुदी विचारात घेवून प्रस्तु प्रस्तावावर चर्चा होवून योग्य त्या निर्णयास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुत्तेदाराने विनंती केल्यानुसार श्री. कैसरखॉन यांनी वैयक्तिक राणा कंन्स्ट्रक्शन ऐवजी भागीदारी संस्था मे. राणा कंन्स्ट्रक्शन या नावाने नोंदणी झाल्यामुळे त्यांची अस्तित्वात असलेली कामे सदरील भागीदारी संस्थेच्या नांवे हस्तांतरीत करण्याची विनंती केलेली आहे. भागीदारी संस्था ही कायद्यानुसार नोंदणीकृत असल्याने अशा भागीदारी संस्थेस कामे हस्तांतरीत करण्यास हरकत नाही. कारण एखादया वैयक्तिकरित्या व्यक्ती स्वत:चा व्यवसाय वाढविण्या करिता भाग भांडवलात वाढ करुन मोठाली कामे करण्याकरिता इतर व्यक्तींकडुन भाग भांडवल जमा करुन भागीदारी संस्था स्थापन करु शकतो. अशा प्रकारे स्थापन झालेली भागीदारी संस्था ज वैयक्तिक रित्या करीत असलेल्या व्यवसायधारकाकडुन चालु असलेली कामे भागीदारी संस्थेच्या नांवे हस्तांतरीत करुन घेत असेल व त्या कामाची सर्व जबाबदारी संस्थेवर घेत असेल तसेच आवश्यक ते करानामे करुन देत असेल तर अशाप्रकारे कामाची जबाबदारी हस्तांतरीत करण्यास कायद्यानुसार कोणतेही बंधन नाही.

२. मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० (२) पोटकलम ब (४) नुसार महानगरपालिकेच्या वतीने आयुक्ताबरोबर किंवा परिवहन व्यवस्थापका बरोबर जो करार करील किंवा त्यांच्याकडुन नेमली जाईल अशा कोणत्याही संयुक्त भांडवल कंपनीत किंवा मुंबई सहकारी संस्था अधिनियम १९२५ (आता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०) अन्वये नोंदलेल्या किंवा नोंदलेली असल्याचे मानण्यात येणाऱ्या कोणत्याही संस्थेस तिचा कोणताही भाग किंवा हितसंबंध आहे. केवळ याच कारणावरुन पोटकलम १ खंड "फ" अन्वये अनर्हता ओढवून घेतली आहे. असे मानले जाणार नाही. अशी स्पष्ट तरतुद आहे. त्यामुळे भागीदारी संस्थेत भाग असल्यास पालिका सदस्य होण्यास अनर्हता होत नाही.

३. बी-१ निविदा मधील सर्वसाधारण अटीतील क्रमांक ४ नुसार कामाची जबाबदारी सबलेट करण्याची तरतुद आहे. तथापी पुर्वपरवानगी शिवाय बसलेट करता येणार नाही. जरी अशी परवानगी दिली तरी अप्रत्यक्षरित्या कामाची सर्व जबाबदारी संबंधित गुत्तेदाराची राहील अशी तरतुद आहे. त्यानुसार असा निर्णय देण्यात येतो की, मुद्दा क्रमांक १ नुसार भागीदारी संस्था संपुर्णत: कामाची जबाबदारी स्विकारत आहे व आवश्यक ते सर्व करारनामे करुन देत आहे. तसेच भागीदारी संस्थेचे उर्वरित सदस्य हे कामाची जबाबदारी स्विकारण्याचे हमीपत्र सादर करीत आहेत व वैयक्तिक श्री. नंदकुमार घोडेले हे भागीदारी संस्थेतुन निवृत्त झालेले आहेत. त्यामुळे त्यांचा भागीदारी संस्थेत संबंध राहात नाही. व जरी त्यांचा संबंध संस्थेमध्ये राहिला तरी मुद्दा क्रमांक २ नुसार पालिका सदस्य होण्यास अनर्हता मानल्या जाणार नाही.

उपरोक्त नुसार नियमात तरतुद असुन रु. ३.०० लक्षाच्या वरील सर्व निविदा स्विकारण्याचे, करारानामा बदल करणेस्तव स्थायी समिती सक्षम असल्याने व या संदर्भात मा. राज्य निवडणुक आयोगानेही सदरील प्रस्ताव स्थायी समितीत निर्णय घेण्यास हरकत नसल्याचे कळविल्यानुसार स्थायी समिती गुत्तेदाराने केलेली विनंती मान्य करते. भागीदारी संस्थेच्या नांवे करारनामा हस्तांतरीत करण्यात यावा. ज्या ज्या कामासाठी आवश्यक त्या सुरक्षा ठेव रकमा व ३% कायम सुरक्षा ठेव रकमा भागीदारी संस्थेकडे हस्तांतरीत करीत असल्याबद्दल मुळ गुत्तेदाराकडुन ना हरकत प्रमाणपत्र घेऊन भागीदारी संस्थेस हस्तांतरीत करण्यात याव्यात त्यामुळे काम करण्याची सर्वस्वी जबाबदारी भागीदारी संस्थेची राहुन

काम न केल्यास करार नाम्याच्या नियमानुसार सर्व रकमा जप्त करण्याचा व कारवाई करण्याचा अधिकार प्रशासनास राहिल.

सदरील प्रस्तावास उपरोक्त नुसार सर्वानुमते मान्यता देण्यात येते. याच बैठकीत या ठरावस कायम करण्यात येते. प्रशासनाने संबंधीत गुत्तेदारास ना हरकत प्रमाणपत्र द्यावे पुढील वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८५/३ :**

मुखलेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्री. सलीम समशेर पटेल हे महानगरपालिकेत गुत्तेदार म्हणुन काम करीत असून त्यांचेकडे विविध विभागामध्ये कामे चालु आहेत. त्यांनी अर्ज देवुन त्यांना ना हरकत प्रमाणपत्र द्यावे म्हणुन विनंती केली आहे. ती खालीलप्रमाणे आहे.

१. श्री. सलीम समशेर पटेल यांनी वैयक्तिक सलीम पटेल ऐवजी भागीदारी संस्था मे सलीम पटेल कॉन्टुक्टर्स या नावाने भागीदारी संस्था नोंदणी झाल्यामुळे व सदरील संस्थेतुन ते निवृत्त होत असल्यामुळे त्यांचे नावाने जी काही महानगरपालिकेतील कामे आहेत ती कामे भागीदारी संस्थेतील उर्वरित भागीदार पुर्ण करतील. उर्वरित भागीदारांनी सदरील कामे पुर्ण करण्याबाबतचे हमीपत्र सादर केलेले आहेत. श्री. सलीम पटेल यांनी सहाय्यक निबंधक भागीदारी संस्था, औरंगाबाद यांचे नोंदणी प्रमाणपत्र तसेच सदरील संस्थेतुन निवृत्त होत असल्याबाबतचे सहाय्यक निबंधक भागीदारी संस्था औरंगाबाद यांचे प्रमाणपत्र तसेच भागीदारी संस्थेतील उर्वरित सदस्य यांचे हमीपत्र सादर केलेले आहेत. व नाहरकत प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

२. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० (१) फ नुसार महानगरपालिकेच्या वतीने कोणत्याही करारात स्वत: किंवा त्यांच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग असेल तर पालिका सदस्य होण्यास अनर्हता नमुद केली आहे.

३. बी-१ निविदा मधील सर्वसाधारण अटीतील क्रमांक ४ नुसार कामाची जबाबदारी सबलेट करण्याची तरतुद आहे. तथापी पुर्वपरवानगी शिवाय सबलेट करता येणार नाही. जरी अशी परवानगी दिली तरी अप्रत्यक्षरित्या कामाची सर्वस्वी जबाबदारी संबंधित गुत्तेदाराची राहील अशी तरतुद आहे.

उपरोक्त नुसार नियमात तरतुद असुन रु. ३.०० लक्ष वरील सर्व निविदा स्विकारण्याचे अधिकार स्थायी समितीस असल्यामुळे करारनाम्यात बदल करणेस्तव स्थायी समिती सक्षम आहे. या संदर्भात मा. निवडणुक आयुक्त, राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र राज्य मार्गदर्शन मागीतले असता निवडणुक आयोगाने सदरील प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवण्यास हरकत नाही असे नमुद केले आहे.

त्यामुळे गुत्तेदाराची विनंती निविदा नियमातील अटी व अधिनियमातील तरतुदी विचारात घेवून प्रस्तुत प्रस्तावावर चर्चा होवून योग्य त्या निर्णयास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुत्तेदाराने विनंती केल्यानुसार श्री. सलीम शमशेर पटेल यांनी वैयक्तिक सलीम पटेल ऐवजी भागीदारी संस्था मे. सलीम पटेल कंन्स्ट्रक्टर्स या नावाने नोंदणी झाल्यामुळे त्यांची अस्तित्वात असलेली कामे सदरील भागीदारी संस्थेच्या नांवे हस्तांतरीत करण्याची विनंती केलेली आहे. भागीदारी संस्था ही कायद्यानुसार नोंदणीकृत असल्याने अशा भागीदारी संस्थेस कामे हस्तांतरीत करण्यास हरकत नाही. कारण एखादया वैयक्तिकरित्या व्यक्ती स्वत:चा व्यवसाय वाढविण्या करिता भाग भांडवलात वाढ करुन मोठाली कामे करण्याकरिता इतर व्यक्तींकडुन भाग भांडवल जमा करुन भागीदारी संस्था

स्थापन करु शकतो. अशा प्रकारे स्थापन झालेली भागीदारी संस्था ज वैयक्तिक रित्या करीत असलेल्या व्यवसायधारकाकडुन चालु असलेली कामे भागीदारी संस्थेच्या नांवे हस्तांतरीत करुन घेत असेल व त्या कामाची सर्व जबाबदारी संस्थेवर घेत असेल तसेच आवश्यक ते करानामे करुन देत असेल तर अशाप्रकारे कामाची जबाबदारी हस्तांतरीत करण्यास कायद्यानुसार कोणतेही बंधन नाही.

२. मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० (२) पोटकलम ब (४) नुसार महानगरपालिकेच्या वतीने आयुक्ताबरोबर किंवा परिवहन व्यवस्थापका बरोबर जो करार करील किंवा त्यांच्याकडुन नेमली जाईल अशा कोणत्याही संयुक्त भांडवल कंपनीत किंवा मुंबई सहकारी संस्था अधिनियम १९२५ (आता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०) अन्वये नोंदलेल्या किंवा नोंदलेली असल्याचे मानण्यात येणाऱ्या कोणत्याही संस्थेस तिचा कोणताही भाग किंवा हितसंबंध आहे. केवळ याच कारणावरुन पोटकलम १ खंड "फ" अन्वये अनर्हता ओढवून घेतली आहे. असे मानले जाणार नाही. अशी स्पष्ट तरतुद आहे. त्यामुळे भागीदारी संस्थेत भाग असल्यास पालिका सदस्य होण्यास अनर्हता होत नाही.

३. बी-१ निविदा मधील सर्वसाधारण अटीतील क्रमांक ४ नुसार कामाची जबाबदारी सबलेट करण्याची तरतुद आहे. तथापी पुर्वपरवानगी शिवाय बसलेट करता येणार नाही. जरी अशी परवानगी दिली तरी अप्रत्यक्षरित्या कामाची सर्व जबाबदारी संबंधित गुत्तेदाराची राहील अशी तरतुद आहे. त्यानुसार असा निर्णय देण्यात येतो की, मुद्दा क्रमांक १ नुसार भागीदारी संस्था संपुर्णतः कामाची जबाबदारी स्विकारत आहे व आवश्यक ते सर्व कराररनामे करुन देत आहे. तसेच भागीदारी संस्थेचे उर्वरित सदस्य हे कामाची जबाबदारी स्विकारण्याचे हमीपत्र सादर करीत आहेत व वैयक्तिक श्री. नंदकुमार घोडेले हे भागीदारी संस्थेतुन निवृत्त झालेले आहेत. त्यामुळे त्यांचा भागीदारी संस्थेत संबंध राहात नाही. व जरी त्यांचा संबंध संस्थेमध्ये राहिला तरी मुद्दा क्रमांक २ नुसार पालिका सदस्य होण्यास अनर्हता मानल्या जाणार नाही.

उपरोक्त नुसार नियमात तरतुद असुन रु. ३.०० लक्षाच्या वरील सर्व निविदा स्विकारण्याचे, करारानामा बदल करणेस्तव स्थायी समिती सक्षम असल्याने व या संदर्भात मा. राज्य निवडणुक आयोगानेही सदरील प्रस्ताव स्थायी समितीत निर्णय घेण्यास हरकत नसल्याचे कळविल्यानुसार स्थायी समिती गुत्तेदाराने केलेली विनंती मान्य करते. भागीदारी संस्थेच्या नांवे कराररनामा हस्तांतरीत करण्यात यावा. ज्या ज्या कामासाठी आवश्यक त्या सुरक्षा ठेव रकमा व ३% कायम सुरक्षा ठेव रकमा भागीदारी संस्थेकडे हस्तांतरीत करीत असल्याबद्दल मुळ गुत्तेदाराकडुन ना हरकत प्रमाणपत्र घेऊन भागीदारी संस्थेस हस्तांतरीत करण्यात याव्यात त्यामुळे काम करण्याची सर्वस्वी जबाबदारी भागीदारी संस्थेची राहुन काम न केल्यास करार नाम्याच्या नियमानुसार सर्व रकमा जप्त करण्याचा व कारवाई करण्याचा अधिकार प्रशासनास राहिल.

सदरील प्रस्तावास उपरोक्त नुसार सर्वानुमते मान्यता देण्यात येते. याच बैठकीत या ठरावस कायम करण्यात येते. प्रशासनाने संबंधीत गुत्तेदारास ना हरकत प्रमाणपत्र द्यावे पुढील वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने मा. सभापती यांनी सभा संपल्याचे घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | सभापती स्थायी समिती, |
| महापगरपालिका, औरंगाबाद. | महापगरपालिका, औरंगाबाद. |